
पुणें मराठी ग्रंथालय
निबंध
क्रमांक—
२१. नोव्हे. २००३
५८
016080




CHITRO_P. BOMBAY.

# हिंदुस्थानांतले दुष्काळ.

बक्षिसाकरितां मागविल्यावरून आलेल्या
अठरा निबंधांत उत्तम ठरलेला निबंध.

**सखाराम गणेश मुजूमदार**

ह्यांनीं लिहिला.

"The English in India are now called upon, either to stand by and witness the pitiless overcrowding of masses of hungry human beings, or to aid the people in increasing the food supply to meet their wants."

*Sir W. W. Hunter.*

तो

जावजी दादाजी ह्यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे
मालक तुकाराम जावजी ह्यांनीं छापून
प्रसिद्ध केला.

इसवी सन १९०१ शके १८२३.

किंमत १० आणे.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क

प्रसिद्धकर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

प्राचीन काळीं हिंदुस्थान देशांतील लोकांच्या मताचा ओघ, ईश्वरी कोपानेंच दुष्काळ पडतो या समजुतीकडे विशेष होता. अलीकडे ही समजूत बऱ्याच अंशीं बदलत चालली आहे. 'राजा हा ईश्वराचा अवतार' या मतास त्या समयीं प्राधान्य असल्यानें, त्या काळची ती समजूत सर्वथैव भ्रामक होती, असें विचारदृष्ट्या ह्मणतां येत नाहीं. अवर्षण, अतिवृष्टि व भयंकर उत्पात हे ईश्वरी क्षोभाचेच परिणाम होत; असा मनाचा कल होऊं देणें, हें फारसें अनिष्ट जरी नाहीं, तरी त्यापासून मानवी प्राण्याच्या शोधक बुद्धीस बरेंच मोठें दूषण लागण्याचा संभव आहे. 'कारणावांचून कार्य घडत नसतें' ह्या सिद्धांतास अनुसरून, प्रत्येक गोष्टींत प्रवर्तक व निवर्तक शक्ति, ह्यांसच प्राधान्य मिळतें. अवर्षण पडल्यास दुष्काळ पडलाच पाहिजे, हा सिद्धांत सांप्रतच्या शास्त्रीय युगांत वजनदार ठरणार नाहीं. अवर्षण पडल्यानें फक्त धान्य पिकणार नाहीं, येवढ्यानें लोकांच्या जवळच्या जीवनविषयक साधनांचा नाश होऊन, त्यांस अन्नाची विवंचना पडावी, हें मात्र उचित नाहीं. आपत्प्रसंगीं जीवनार्थ साधनसंपत्ति जवळ असल्यावर, अनावर्षणाचा अनिष्ट संस्कार घडत नसतो; ही गोष्ट अर्वाचीन पंडितांच्या मतें निर्विवाद शाबीत झाली आहे. पावसाची कमतरता किंवा इतर उत्पात, यांचा निवर्तक शक्तीच्या द्वारें विचार करण्यापेक्षां, प्रवर्तक मार्गाचाच अशा प्रसंगीं स्वीकार करणें, हें जास्त श्रेयस्कर होईल. जगावरील निरनिराळ्या राष्ट्रांचा व अनेक शास्त्रांचा उदय, प्रवर्तक शक्तीच्या साहाय्यानेंच झाल्याचें आढळून येतें.

दुष्काळासारख्या भयंकर आपत्तीच्या जोरास मनुष्यकृतीनें उत्कृष्ट प्रकारचा प्रतिकार करितां येतो. हा दोन प्रकारचा बहुधा असतो. (१) दुष्काळाचें संकट येऊं नये ह्याकरितां अग्रोपाय योजणें व (२) दुष्काळ पडल्यावर जीवनविषयक साधनांचा सर्वांस मनमुराद पुरवठा करून देणें.

सुधारलेल्या राष्ट्रांनीं ह्या दोन प्रकारांपैकीं पहिल्यासच विशेष प्राधान्य दिलें आहे. आमचा हिंदुस्थान देश सौख्यगिरीवर ज्या वेळीं आरूढ झाला होता, त्या समयीं ह्या पहिल्या प्रकारास इकडेही मुख्य पद मिळालें होतें असें दिसतें. निरनिराळ्या राष्ट्रांच्या ह्या देशावर स्वाऱ्या होऊन, आमचे पूर्वज सर्वस्वास मुकल्यानंतर जें स्थित्यंतर झालें, त्यांत आमच्या जीवन-विषयक शक्तीचा एकसारखा ऱ्हासच होत गेला. अर्थात् आमचा देश हळूहळू निर्धनत्वास पावत चालला. ही त्याची उलट गति अद्यापि जरी फारशी मंदावलेली दिसत नाहीं, तरी ती लवकरच मंदावेल अशीं पूर्व-सूचक चिन्हें थोडथोडीं दिसूं लागलीं आहेत. इ. स. १८७७–७८ सालच्या दुष्काळापासून आमच्या इंग्रज सरकाराचें लक्ष, दुष्काळांस प्रतिकार करण्याकडे लागलें आहे. मि० **डिगबी** सारख्या मोठ्या विचारशील ग्रंथकारांनीं ह्या अरिष्टाचें निवारण करण्याचे जे अनेक चांगले उपाय ब्रिटिश सरकारास सुचविले आहेत, त्यांचा उपयोग पुष्कळच होत आहे. फार काय सांगावें, दुष्काळावर हा जो लहानसा निबंध लिहिला त्यांतल्या मुख्य साहित्यास आणि विचारास, मुख्य किंवा सर्वस्वीं म्हटलें तरी चालेल, खरा आधार इंग्रज सरकाराच्या दप्तराचा आणि इंग्लिश ग्रंथकारांच्या विचारपरिपूर्ण ग्रंथांचा, म्हणजे सामान्यत्वें सांप्रतच्या साम्राज्य-स्थितीचा आहे. म्हणून ह्याबद्दल मला त्यांचे उपकार मानणें भाग आहे. शिवाय, धर्मप्रसारार्थ खटपट करणाऱ्या खिस्ती धर्मोपदेशकांनीं, इकडील दुष्काळांसंबंधानें लिहिलेलीं हृदयद्रावक वर्णनें व त्यांनीं मृत-प्राय झालेल्या दुष्काळग्रस्त मनुष्यांचे काढलेले देखावे, हेच प्रथम इंग्लंडांतील विद्वानांचें लक्ष आमच्या देशाच्या दीन स्थितीकडे वळ-विण्यास कारणीभूत झाले. इ० स० १८९६–९७ च्या दुष्काळा-नंतर तर इंग्लंडांतील दयाशील लोकांच्या दयेस विशेषच पाझर फुटला. या देशाच्या निर्धनावस्थेसंबंधानें तिकडे रात्रंदिवस चर्चा सुरू झाली. दयाळू ब्रिटिश सरकाराच्या अमलांत हिंदुस्थानांत दुष्काळाचें संकट येणें, हें बिलकूल चांगलें नाहीं, अशी इंग्लंडांतील मुत्सद्दी लोकांची दृढ समजूत झाल्यामुळें, आमचें प्रजाप्रिय सरकारही आमच्या हितार्थ

विशेष झटूं लागलें आहे. ह्या देशाची अबादी व्हावी यासाठीं आमचें सरकार निरनिराळ्या बाजूंनीं यत्न करीत आहे, तोंच इ० स० १८९९–१९०० सालचा भयंकर दुष्काळ पुढें येऊन उभा राहिला. हिंदुस्थानाच्या वस्तुस्थितीचें खरें ज्ञान मिळविण्याची ही संधि व्यर्थ दवडूं नये, अशा इच्छेनें इंग्लंडांतील कांहीं पत्रांचे संपादक व प्रतिनिधी इकडे येऊन, त्यांनीं आमच्या परिस्थितीचें खरें ज्ञान इंग्लंडांतील लोकांस करून दिलें. आमचें सर्व कल्याण इंग्लंड देशाच्या आधीन असल्यामुळें, तिकडील मुत्सद्दी लोकांस आमची खरी स्थिति कळल्याशिवाय, आमच्या दुःखांचा परिहार व्हावयाचा नाहीं, ही समजूत सांप्रत दृढ झाली आहे. अशा प्रसंगीं आमचें सरकारही स्वस्थ बसलेलें नाहीं. तें निरनिराळे यत्न करीत असतेंच; परंतु त्या यत्नांस योग्य मदत करण्याची जरूर असल्यानें, इंग्लंडांत 'इंडियन फ्यामिन युनियन' सारख्या महत्वाच्या संस्था स्थापन होऊं लागल्या आहेत, ही मोठ्या सुभाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे. आपल्या दीन रयतेची खरी स्थिति आपणास कळावी, याकरितां आमचें सरकार वेळोवेळीं मंडळ्या नेमून तपास करवितें व योग्य असतील त्या अडचणी दूर करितें, हे त्याचे मोठे उपकार आहेत. तसेंच दुष्काळासारख्या प्रसंगीं सरकाराच्या मदतीचा सद्विनियोग व्हावा, यासाठींही आमचें प्रजाप्रिय सार्वभौम सरकार झटत असतें. हिंदुस्थानांतील एतद्देशीय राज्यकर्ते, संस्थानिक किंवा जहागीरदार यांच्याकडूनही त्यांच्या रयतेचा चांगला बचाव व्हावा, यासाठीं बनेल तितक्या तत्परतेनें आमचें सार्वभौम ब्रिटिश सरकार झटतें. प्रत्येक बाबींत आमचें सरकार प्रजाहिताचा विचार दयार्द्र दृष्टीनें करीत असतें. दुष्काळाचें संकट लोकांस किती पीडा देतें तें व सरकाराचे कामगार आपलें प्रजेसंबंधीं कर्तव्य बरोबर बजावितात किंवा नाहीं, हें प्रत्यक्ष पहाण्यासाठीं हिंदुस्थानचे व्हाइसराय नामदार लार्ड **कर्झन** हे गेल्या दुष्काळांत पुष्कळ हिंडले. त्यांनीं ठिकठिकाणीं प्रजेविषयीं खरा कळवळा प्रगट करून, पूर्ण सहानुभूति व्यक्त केली. सरकाराच्या ह्या दयाशील वृत्तीचा जोर वाढून, ह्यापुढें आमच्यावर दुष्काळाचीं संकटें येण्याचीं जर टळतील, तर साधुशिरोमणि तुकाराम महाराजांच्या

“बरी या दुष्काळें पीडा केली” ह्या पवित्र वचनाचें, आह्मांस आदरपूर्वक वारंवार स्मरण होईल, यांत बिलकूल संशय नाहीं.

आपल्या देशाचे अवस्थेचें योग्य ज्ञान मिळवून, आमच्या दुःखांचा परिहार इंग्लिश सरकाराकडून व्हावा, अशी इच्छा ठेवणाऱ्या कांहीं सरकारी कामगारांच्या व स्वतंत्र विचारांच्या लोकांच्या मतांचा आशय, मराठी वाचकांपुढें मांडावा, अशी फार दिवसांपासून माझी इच्छा होती; व त्या इच्छेस अनुसरून मजकडून प्रयत्नही सुरू झाले होते. गेल्या दुष्काळानें आपलें हृदयद्रावक चित्र प्रत्यक्ष पुढें मांडल्यामुळें ती इच्छा दुणावली व दुष्काळांसंबंधीं असलेले ग्रंथ लक्षपूर्वक वाचण्यास आरंभ केला. इतक्यांत ‘निर्णयसागर’ छापखान्याचे मालक रा. रा. **तुकाराम जावजी** जे. पी. यांनीं ‘हिंदुस्थानांतले दुष्काळ’ ह्या विषयावर निबंध मागविल्याची प्रसिद्ध झालेली जाहिरात माझ्या पहाण्यांत आली; त्यामुळें हा विषय लिहिण्यास प्रोत्साहन मिळालें. मूळ जाहिरातीप्रमाणें एकंदर अठरा निबंध त्यांजकडे गेले होते. ग्रंथपरीक्षणार्थ नेमलेल्या विद्वान् मंडळीनें, त्यांतून हा निबंध चांगला ठरविला. ह्या विषयासंबंधानें बऱ्याच दिवसांच्या परिश्रमांतीं मिळविलेली माहिती, पुस्तकरूपानें प्रसिद्धीस येण्यास, ज्यांची जाहिरात कारणीभूत झाली, त्यांचे ह्या स्थळीं आभार मानल्यावांचून रहावत नाहीं.

सार्वभौम ब्रिटिश सरकाराच्या कृपेनें ह्या देशांतून दुष्काळाचें संकट नष्ट होण्यास, प्रकाशकांच्या व माझ्या यत्नांचा उपयोग व्हावा, हेंच ह्या यत्नांचें खरें अमोल सार्थक्य होणार आहे. तें श्रेय परमेश्वरानें आह्मांस द्यावें, एवढेंच त्यापाशीं आमचें मागणें आहे.

मु० पाली–सुधागड–संस्थान<br>भोर. ता. १ आगष्ट सन १९०१. } **सखाराम गणेश मुजूमदार.**

# प्रकाशकांची प्रस्तावना.

ह्या विषयास पाउणशें रुपयांचें बक्षीस लाविलें होतें. त्यावर एकंदर अठरा निबंध आले. त्यांचें परीक्षण करितां, एकंदरींत हा निबंध इतरांपेक्षां चांगला ठरला. ह्मणून, जाहिरातींतल्या संकेताप्रमाणें ह्या निबंधाच्या कर्त्यांस नेमलेलें बक्षीस देऊन हा निबंध छापला आहे.

जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति असतात. त्याप्रमाणें अठरा निबंधकारांच्या अठरा पद्धति होत्या. त्यांत त्या निबंधकारांनीं आपापल्या समजुतींप्रमाणें वेगळ्या वेगळ्या अंगांस वेगळें वेगळें महत्व दिलेलें आढळलें. तसें ह्याही निबंधांत कोठें कोठें अतिक्रमण झाल्याचें दिसून आलें, त्या त्या ठिकाणीं, जाहिरातींत आधीं कळविल्याप्रमाणें, अत्यंत आवश्यक वाटला तेवढा फेरफार करणें भाग पडलें आहे. त्यामुळें क्वचित् एकादे ठिकाणीं अल्पस्वल्प विसंगति झाली असेल. पण त्यास आमचा निरुपाय आहे. वाचकांनीं आणि निबंधकारांनीं क्षमा करावी.

ह्या विषयाचे मुख्य भाग ह्मटले ह्मणजे दोन; दुष्काळाचीं कारणें हा एक, आणि दुष्काळाचें निवारण करण्याचे उपाय हा दुसरा. ह्या दोहोंचें विवेचन सांगोपांग झालें, ह्मणजे तो निबंध चांगला ह्मणावयाचा. तसा बराच क्रम ह्या निबंधांत धरिला आहे. तो बरा साधला आहे, असें वाटतें; तरी, त्याचें सामान्य समापन करण्यास आणि ह्याविषयीं स्वमत काय आहे तें दर्शविण्यास ही संधि बरी आहे, असें वाटलें. ह्मणून आह्मी तिचा थोडासा उपयोग करून घेतों.

आतां प्रथम दुष्काळाच्या कारणांचा विचार करावयाचा. तीं कारणें, सगळीं लहान मोठीं पाहिलीं तर अनंत आहेत. परंतु, त्यांत मुख्य चार दिसतातः—

१. पर्जन्यवृष्टीची अशाश्वती.

२. लोकसंख्येची वृद्धि.

३. शेतकऱ्यांचें अज्ञान.

४. रोख पैशाची कमताई.

हीं दुष्काळाचीं मुख्य कारणें धरिलीं, ह्मणजे, त्याच क्रमानें दुष्काळनिवारणाचे मुख्य उपाय चार दिसतात:—

१. शेताच्या पिकांस पर्जन्यावरच केवळ अवलंबून राहाण्याचें कारण पडूं नये, असें करणें. ह्मणजे, जागोजाग नद्यांचें पाणी अडवून कालवे बांधणें, विहिरी खणणें आणि त्यांचें पाणी शेतांस मिळेसें करणें.

२. लोकसंख्येची वृद्धि कमी करणें. ह्मणजे लोकसंख्या वाढूं न देणें असेंच केवळ नव्हे. तर, एकाच जागीं लोकांची पुष्कळ गर्दी न व्हावी, आणि जिकडे जमीन रिकामी पडली आहे तिकडे वसाहती होऊन, गर्दी मोडावी असें करणें.

३. शेतकऱ्यांस सज्ञान करणें, ह्मणजे, आज शेंपन्नास पिढ्यांपासून शेतकीचा जो क्रम चालत आला आहे, त्यास हात न लावितां, तो तसाच चालवायाचा, असा जो त्यांचा ग्रह आहे तो काढून टाकणें, त्यांस शास्त्रीय पद्धतीनें नवीन युक्तींनीं जमिनींतून पुष्कळ पीक काढायास शिकविणें, आणि लबाड सावकारांस ते न फसत असे शाहाणे करणें.

४. आणि शेतकीशिवाय बाकीचे कारखाने पुष्कळ चांगल्या सुधारलेल्या पद्धतीनें देशांत चालू करून, देशांतलें भांडवल देशांत राहील, शेतकऱ्यांतल्या कांहीं लोकांस त्यांत पडतां येईल, आणि कच्च्या मालाचे पक्के पदार्थ तयार करण्याच्या संबंधाची मजुरी देशांतल्यादेशांत राहील, बाहेर जाणार नाहीं, असें करणें.

ह्या चारही प्रकरणांत सरकार आणि रयत ह्या दोघांनीं लक्ष दिलें पाहिजे. नुसतें एकट्यानें लक्ष देऊन कांहीं एक व्हावयाचें नाहीं. तें लक्ष द्यावयाचें कसें ह्याचा विचार यथाक्रम करूं.

तर प्रथम पाटबंधारे बांधून आणि विहिरी खणून शेतांस पाण्याचा पुरवठा करणें. ह्याविषयीं आज कितीएक वर्षांपासून सरकारांत वाटाघाट चालली आहे, आणि लोकही त्याविषयीं विचार करीत आहेत. इ० स० १८६९ त हिंदुस्थान सरकारानें सेक्रेटरी आफ् स्टेट फॉर इंडिया

ह्यांस अशी सूचना केली होती कीं, हिंदुस्थानांत पाटबंधाऱ्यांच्या पाण्याबद्दल सरकारदेणें हें सक्तीचें करावें, असा कायदा करावा. त्या वेळीं स्टेट सेक्रेटरी ड्यूक आफ् अर्गाइल होते, त्यांनीं पुष्कळ विचार करून, आणि इकडच्या माहीतगार लोकांचीं मतें मिळवून शेवटीं असें उत्तर लिहिलें कीं, "हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांस, पाटबंधाऱ्यांचें पाणी हें नेहमीं फार उपयोगी वाटेल, आणि दुष्काळ पडला असतां तें मिळेल तेव्हां तर मोठी देणगी वाटेल, ह्याविषयीं कांहीं संशय नाहीं. परंतु, त्यांची इच्छा नसतां त्यांच्यावर त्याबद्दलचें देणें लादणें हें त्यांस अत्यंत अप्रिय होईल. ह्याकरितां तसें करूं नये, असें आमचें मत आहे." त्याप्रमाणें शेतकऱ्यांवर पाटाचें पाणी घेण्याविषयीं सक्ति न करितां, सरकारानें बंधारे बांधिले, आणि त्यांच्या पाण्याचा उपयोग शेतांकडे होऊं लागला. त्यांत तीन प्रकार आहेत. १ उत्पन्नाचे बंधारे, २ संरक्षणाचे बंधारे, आणि ३ किरकोळ बांधकामें. उत्पन्नाचे बंधारे ह्मणजे सरकारानें त्यांत भांडवल घालून ते बांधिले आहेत. तें भांडवल, इ० स० १८-९६–९७ पर्यंत, एकंदर ३१२५२९४८० रुपये झालेलें आहे, आणि त्यानें ९४४८६९२ एकर जमिनीस पाणी मिळत आहे. आणि त्या भांडवलावर शेंकडा ६·३५ प्रमाणें व्याज भागत आहे.

दुसरा प्रकार संरक्षणाचे बंधारे. ते एकंदर सरकाराच्या उत्पन्नांतून बांधिलेले आहेत. त्यांवर व्याजाचें वगैरे कांहीं एक उत्पन्न घ्यावयाचें नाहीं आहे. त्यांत सरकारानें इ० स० १८९६–९७ पर्यंत २०९९२५३० रुपये खर्चले आहेत; आणि त्यांनीं २००७३३ त एकर जमीन भिजत आहे.

तिसरा प्रकार किरकोळ बांधकामें. ह्यांत कांहीं कामें प्राचीन हिंदु मुसलमान राजांच्या वेळचीं आहेत, आणि थोडींशीं नवीनही आहेत. ह्यांत सरकारानें फारसा पैसा खर्चलेला नाहीं. त्यामुळें, त्यांपासून जें काय उत्पन्न होत आहे, तो निवळ नफा आहे. ह्या कामांनीं इ० स० १८९६–९७ त ७४४२९९० एकर जमिनीस पाणी मिळत होतें.

पाटबंधाऱ्यांच्या आणि कालव्यांच्या पाण्यानें संकटसमयीं देशाचा कसा

बचाव होतो, ह्याविषयींचें अगदीं ताजें–ह्मणजे यंदांचेंच–ईजिप्तदेशांतलें उदाहरण आहे. यंदां नैल नदीचें पात्र इतकें खोल गेलें होतें कीं, तितकें खोल गेलेलें पात्र अद्यापपर्यंत कधीं कोणाला ठाऊक नाहीं. तें पात्र खालीं गेलेलें पाहून त्या देशांतल्या लोकांस दुष्काळाची मोठी भीति वाटली. परंतु, गेल्या वीस वर्षांत लाखों रुपये खरचून जे कालवे आणि पाटबंधारे बांधिले आहेत, त्यांच्या पाण्यानें बहुतेक सगळीं पिकें बहुतेक दरवर्षाच्या पिकांप्रमाणें आलीं आहेत, आणि त्यांच्या संबंधाचा व्यापारही दरसालप्रमाणें चालला आहे.* हें उदाहरण आमच्या इंग्लिश सरकारास हिंदुस्थानांतल्या दुष्काळांच्या निवारणाच्या संबंधानें विचार करण्यासारखें आहे. आणखी पाटबंधाऱ्यांचें पाणी आपणांस कोणत्या प्रकारें उपयोगीं पडेल हें सरकारास सुचवणें हें शेतकऱ्यांकडे आहे.

आतां दुसरी बाब लोकसंख्येच्या वृद्धीची आहे. रोगांच्या सांथी, लढाया, दुष्काळ इत्यादिकांच्या योगानें वारंवार लक्षावधि माणसें अकालीं मृत्युमुखीं पडतात, हें जरी खरें आहे, तरी, एकंदर राष्ट्राचा हिशेब पाहिला ह्मणजे लोकसंख्या वाढत जात आहे, ह्यांत कांहीं शंका नाहीं. हिंदुस्थानाची लोकसंख्या इ० स० १८८१ त २५३९८२५९५ होती, ती, इ० स० १८९१ त २८४२७६४८८ झाली, आणि इ० स० १९०१ त २९१२३६००० झाली आहे. आणि ही अशी वाढत जावयाची आहे. तेव्हां हिच्या वस्तीस आणि निर्वाहास जागा नेहमीं वाढत्या प्रमाणाची पाहिजे आहे. ती देण्याचा उपाय काय तो एक. आणि तो हा कीं, ज्या प्रदेशांत वस्ती झालेली नाहीं, त्या प्रदेशांत लोकांस राहायास लावणें. तें कधीं बळजबरीनें व्हावयाचें नाहीं, राज्यकर्ते जाऊन तेथें राहिले ह्मणजे लोक आपोआप तेथें जाऊन राहातात. दूरचें उदाहरण नको. मुंबई हें एक अगदीं लहान खेडें इ० स० १६६१ त इंग्लिशांस मिळालें. तेव्हां येथें नुसती मासेमार कोळ्यांची वस्ती होती. आणि हें ठिकाण वाईट हवेविषयीं प्रख्यात होतें. तें एवढेंसें खेडें होतें कीं, दरसाल शंभर रुपये स्वामित्वाबदल घेण्याचें कबूल

* Bombay Gazette 16–9–1901.

करून इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजानें मुंबईंत व्यापार करण्याचा आपला सगळा हक्क ईस्ट इंडिया कंपनीस विकला ! ती मुंबई इलाख्याची–ह्मणजे राजधानीची-जागा केल्याच्या योगानें आज तें आठ नऊ लाख वस्तीचें –इंग्लिशांच्या राज्यांत लंडनाच्या खालोखालचें शहर झालें आहे, त्या मानानें त्याच्या भोंवतालच्या प्रदेशांतही वस्ती वाढून कोट्यवधि रुपयांचे व्यापार चालले आहेत. सेंटपीटर्सबर्ग शहराची गोष्ट अशीच आहे. ह्मणून, हिंदुस्थानाच्या ज्या पडप्रदेशांत लोकांची वसाहत करावयाची असेल, त्यांत सरकारानें आपलें ठाणें ठेवावें, आणि तेथें जाऊन राहाणाऱ्यांस विशेष सवलती द्याव्या. ह्मणजे लोक तेथें जाऊन आपोआप राहातील. ह्या विषयाच्या संबंधानें हंटरसाहेबांनीं आपल्या एका ग्रंथांत ह्मटलें आहे:– "हिंदुस्थानांत लोकसंख्या वाजवीपेक्षां अधिक होत आहे, हा इंग्लिश राजसत्तेचा परिणाम आहे. लोकांच्या अतिवृद्धीवर जे मूळचे दाब पूर्वी होते, ते आह्मीं काढून टाकिले आहेत. ते दाब क्रूरपणाचे आणि मूर्खपणाचे होते, तरी ते काढून घेतल्यामुळें लोकसंख्या वाढत चालली आहे, ह्मणून त्या लोकांच्या निर्वाहाची तजवीज लावणें आमचें जबाबदारीचें मोठें कर्तव्य आहे. ही वाण आमच्या सुधारणेनें उत्पन्न केली आहे, त्यापक्षीं ही आमच्या सुधारणेच्या उपायांनींच भागविली पाहिजे. ते उपाय तीन आहेत. पहिला उपाय हा कीं, शेतकरी लोकांची वस्ती अगदीं पातळ आहे तेथें शेतकऱ्यांच्या दाट वस्तींतले लोक नेणें; दुसरा हा कीं, ज्या जमिनीवर मुळींच वस्ती नाहीं, त्या जमिनींत शेतकरी लोक नेऊन त्यांची वसाहात करणें; आणि तिसरा उपाय हा कीं, जमिनीमध्यें सध्या जें उत्पन्न होत आहे, तें वाढविणें. ह्या उपायांच्या पाळ्या लावून चालावयाचें नाहीं. तिन्ही एकदम चालू करायास पाहिजेत, तर कांहीं उपयोग होईल." ह्या कामांत शेतकऱ्यांनीं लक्ष पुरवायाचें ह्मणजे एवढेंच कीं, सरकारावर विश्वास ठेवून आणि आपल्या सोई पाहून त्यांचें ऐकणें.

जमिनीचा सारा कायमचा ठरलेला असावा, ह्यांतच हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांचा बचाव आहे, असें आमच्यांतल्या प्रमुखांचें ह्मणणें आहे. बाबू रमेशचंद्र दत्त ह्यांनीं ह्मटलें आहे:–"जमिनीचा सारा कायम ठरविणें

ह्यांतच हिंदुस्थानच्या लोकांचें सगळें हित आहे." त्याप्रमाणेंच नामदार आनंदा चार्लू ह्यांनीं नामदार व्हाइसराय साहेबांच्या कौंसलांत ह्मटलें आहे:—"वेळोवेळीं धान्याच्या रकमेंत वाढ झाल्यामुळें, शेतकरी जें काय संग्रहीं ठेवण्यास पाहातात तें सरून जातें, तें होऊं नये असें करण्यास उपाय हाच कीं, सारा कायमचा करावा." ह्या सूचना सगळ्या हिंदुस्थानाच्या आहेत, एकूणतीस कोटि प्रजेच्या आहेत, ह्यांचा विचार इंग्लिश सरकारानें अवश्य करावा.

तिसरी बाब शेतकऱ्यांच्या अज्ञानाची आहे. आह्मी तर असें समजतों कीं, शेतकऱ्यांच्या विपत्तीस जीं काय अनेक कारणें आहेत, त्यांत अज्ञान हेंच मुख्य आहे. त्यांस आपल्या शेतींत सुधारणा करितां येत नाहीं, त्यांस आपला माल सोईवार विकतां येत नाहीं, त्यांस सावकार लोक फसवितात, त्यांस सरकारचे कांहीं लबाड कामदार नाडितात, त्यांस आपल्या पैशास जपतां येत नाहीं, ते भलत्याच कामांत मनस्वी खर्च करितात, त्यांस आपल्या अडचणी सरकारास चांगल्या रीतीनें कळवितां येत नाहींत, त्यांस सरकारापाशीं आपलीं मागणीं चांगल्या प्रकारें मागतां येत नाहींत, त्यांस ग्रामकुठार लोक बुडवितात, इत्यादि ज्या काय गोष्टी आहेत, त्यांस कारण हें आहे कीं, त्यांस विद्या नाहीं. ही गोष्ट आमच्या सरकाराच्याही मनांत येऊन चुकली आहे. इ० स० १८८१ त सरकारानें ह्मटलें आहे कीं, "शेतकऱ्यांस त्यांच्या धंद्याचें चांगलें ज्ञान झाल्यावांचून आणि त्याच्यायोगानें त्यांस त्यांत सुधारणा करतां आल्यावांचून शेतकीचा अभ्युदय होण्याची अशा नाहीं." त्याप्रमाणेंच इ० स० १८९३ च्या आणि इ० स० १८९५–९६ च्या शेतकीपरिषदेनें ह्मटलें आहे कीं, "देशांतल्या शेतकींत जी काय सुधारणा व्हावयाची आहे, ती शेतकऱ्यांकडूनच व्हावयाची आहे, दुसऱ्या कोणाकडून व्हावयाची नाहीं, ह्मणून, शाळांत त्यांस चांगलें ज्ञान देऊन तद्द्वारा ह्या विषयाकडे त्यांचें मन वळविलें पाहिजे." सर रिचर्ड टेंपल ह्यांनीं ह्मटलें आहे कीं, "आमच्या शेतकऱ्यांत शेतकीचें ज्ञान पसरण्यास एक उत्तम मार्ग असा आहे कीं, तें ज्ञान आमच्या सरकारी मुलकी मोठ्या कामदारांस असलें पाहिजे, असा नियम करावा. त्यांत त्यांनीं

पदव्या मिळविल्या पाहिजेत असें करावें. किंवा हें ज्ञान त्यांस पद्धतवार मिळण्याची तजवीज करावी. त्याकरितां, मोठ्या कामदारांसाठीं पाठशाळा असाव्या, लहानांकरितां शाळा असाव्या." त्यांस विद्या शिकवा. म्हणजे हे सगळे प्रकार नाहींतसे होऊन, ते आपापलीं कामें चांगलीं करायास लागतील. तेणेंकरून ते संपन्न आणि सुखी होतील. ह्या कृत्यास पांच तजविजी करायास पाहिजेत.

१. शेतकऱ्यांच्या मुलांनीं कामाच्या हंगामाप्रमाणें दररोज अमुक तास शाळेंत गेलेंच पाहिजे, असा कायदा पाहिजे.

२. त्या मुलांकरितां, वेगळीं पुस्तकें तयार केलीं पाहिजेत. त्यांत शेतकीच्या संबंधाची हवा, वारे, पावसाचीं चिन्हें, पाऊस न पडण्याचीं लक्षणें, हंगाम, खतें, शेतांचे रोग, त्यांचें निवारण इत्यादिकांविषयीं पुष्कळ माहिती पाहिजे. आणखी त्यांतच मद्यपानापासून हानि कशी होते हें चांगलें दाखवून, त्याविषयीं त्यांच्यांत चांगला निर्बंध राहील असें करावें. त्याही कामांत त्यांच्या स्वातंत्र्यांत थोडा हात घातल्यास कांहीं दोष व्हावयाचा नाहीं. कां कीं, हा दुर्गुण त्यांच्यांत फार वाढून त्यांच्या नाशास कारण होत आहे.

३. त्यांस फुकट शिकविलें पाहिजे. सध्या लोकलफंड भरणारांपासून फी थोडी घेतात ती देखील घेऊं नये.

४. वेगळीं नमुन्याचीं शेतें न ठेवितां, शेतकऱ्यांसच बीं, खत, हत्यारें, इत्यादि वस्तु फुकट किंवा अल्प खर्चानें पुरवून, त्यांकडून शेतकीची सुधारणा करवावी. ती त्यांच्या आंगवळणीस पडेल, त्यांस सहज करितां येईल, असें करावें.

५. एकंदरींत, शेतकऱ्यांची योग्यता व्यापाऱ्यांच्या किंवा सरकारी कामदारांच्या बरोबरीची करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यास उपाय हाच कीं त्यांस सुशिक्षित करून, लोकलबोर्डांसारख्या संस्थांत त्यांस घ्यावें आणि कायदेशीर रीतीनें आपलीं कामें करण्यास त्यांस शिकवावें. ह्या कामांत जरी थोडी सक्ति झाली तरी कांहीं चिंता नाहीं. अजाण रोग्यांस मारून मुटकून औषध पाजणें हा कांहीं जुलूम नव्हे. तर तो परोपकारच आहे. ह्या संबंधानें हिंदुस्थानच्या सर्व लोकांविषयीं मोठ्या

अभिमानानें लार्ड मेकाले ह्यांनीं इ० स० १८३३ त पार्लमेंटांत ह्मटलें:- "To have found a great people sunk in the lowest depths of slavery and superstition, and to have so ruled them as to have made them desirous and capable of all the privileges of citizens, would indeed be a title to glory all our own." ह्मणजे "दास्यत्व आणि धर्मवेडेपणांत शेंडीसकट बुडालेलें असें मोठें राष्ट्र हातीं लागावें, आणि त्यावर अशा रीतीनें राज्य करावें कीं त्याच्या योगानें त्यास शहरवासी जनांचे सगळे अधिकार संपादण्याची इच्छा होऊन त्यांचा उपयोग करण्याचें सामर्थ्य यावें, हें महत्पुण्य आहे—मोठें भाग्य आहे—आणि हें सगळें अगदीं आमचें स्वसंपादित असें होणार आहे."

आणखी ह्या संबंधानें आह्मांला असें सुचवायाचें आहे कीं, शेतकऱ्यांस सुखी करण्याकरितां इतर कितीही उपाय झाले—पाऊस वेळच्या-वेळीं पडला, पाटबंधारे बांधिले, धारा कायमचा केला, आणि शेतकरी पेढ्या स्थापिल्या, तरी, जोंपर्यंत त्यांस विद्या आली नाहीं, तोंपर्यंत हे सगळे उपाय अगदीं निष्फल होणार आहेत. कां कीं, त्या उपायांनीं आपला फायदा कसा करून घ्यावा, हें त्यांस कळण्यास आधीं हें शिक्षण पाहिजे आहे. ह्मणून आमच्या राज्यकर्त्यांस आमची एवढीच विनंती आहे कीं, आमच्या देशांतल्या शेतकऱ्यांस सुखी करायाचें असल्यास त्यांच्यांत ज्ञानाचा प्रसार करा ह्मणजे झालें. त्यांत सगळें येईल.

आतां चौथी शेवटची बाब, रोख पैशाची कमताई, ती भरून काढण्यास शेतकी पेढ्या सरकारानें स्थापाव्या असा विचार बहुत दिवसांपासून चालला आहे. मि. हारिंगटन ह्यांनीं ह्मटलें आहे:-"फार थोड्या व्याजानें पैसा सरकारास उसना मिळेल, आणि तो तसाच फार थोड्या व्याजानें सरकार शेतकऱ्यांस देऊं शकेल." खरें आहे. पण, आमचे शेतकरी ह्मटले ह्मणजे अडाणी, कर्जबाजारी, अनियमित, हालगरजी आणि उधळे. त्यांचें आणि आमच्या सरकारांचें जमायाचें कसें? आमचे सावकार लोक तसेच आणि आमचे शेतकरी तसेच, ह्मणून त्यांचें सध्यां चांगलें जमलें आहे. तसें कायदेशीर रीतीनें आमचे शेतकरी आणि सरकार ह्यांचें जमायास कठिण पडेल. शेतकऱ्याचें आज

आज उद्यां उद्यां सरकारच्या कायद्यास सोसावयाचें नाहीं आणि सरकाराचे नियम शेतकऱ्यांना पाळवावयाचे नाहींत. ही मोठी अडचण आहे. आणि हिच्यामुळेंच तो विचार मागें पडला आहे. तरी, लोकांनीं सरकाराच्या अटींप्रमाणें वागायास झटावें, हें आवश्यक आहे. सरकारानें पेढ्या काढिल्यास सावकारांचे व्याजाचे दर कमी होतील, हें एक मोठें कार्य होईल.

ह्या सगळ्या विषयाच्या संबंधानें मि० निकलसन ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत ह्मटलें आहे-"सर्व पृथ्वीभर खरा प्रकार असा आढळून येतो कीं, शेतकरी ह्मटले कीं ते कर्जबाजारी असावयाचे. आणि तें कर्ज त्यांस शेतांतल्या नुकसानीमुळें झालेलें नसावयाचें, तर, त्यास कारण त्यांचें अज्ञान, त्यांचा निष्काळजीपणा, त्यांच्या भाईबंद्या, परकीय लोकांशीं व्यापारांत बरोबरी करणें, अवर्षण, अतिवृष्टि, रोगाची सांत, असें कांहीं तरी असावयाचें." त्याप्रमाणेंच ज्यांनीं पृथ्वीवरच्या सगळ्या देशांतल्या शेतकऱ्यांविषयीं शोध केला आहे, त्यांमध्येंच मि० हिंडमन हे आहेत, त्यांनीं हिंदुस्थानाच्या कल्याणार्थ पुष्कळ लिहिलें आहे. त्यांत एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, "आलीकडच्या माहितीवरून कळतें कीं फ्रान्सांतल्या शेतकऱ्यांची स्थिति फार वाईट आहे. ते मोठ्या विपत्तींत आहेत. त्यांच्या शेतांत जे रोजमजूर काम करतात, त्यांच्यापेक्षां ते अधिक दुःखांत असतात. आणि हीच अवस्था जर्मनींतल्या लहान लहान शेतकऱ्यांची आहे." वास्तविक पाहिलें असतां फ्रान्स आणि जर्मनी हे देश ह्मटले ह्मणजे उन्नतीच्या शिखरास चढलेले आहेत, त्यांतल्या शेतकऱ्यांची अवस्था अशी वाईट असावी काय? तेव्हां शेतकऱ्यांस दारिद्य असावें, हा शापच आहे कीं काय न कळे! असें जरी आहे, तरी थोडा अनुभव आला आहे त्यावरून असें वाटतें कीं, आमच्या शेतकऱ्यांस विद्यादान केलें असतां त्यांत त्यांचा तरणोपाय आहे. तो आमच्या सरकारानें करून पाहावा.

---

**विशेष सूचना.**—ह्या निबंधांत परिशिष्टांचा उल्लेख एक दोन जागीं आला आहे. तीं परिशिष्टें लांबचलांब दुष्काळांच्या यादी होत्या. तीं विस्तारभयास्तव छापलीं नाहींत.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| **भाग पहिला—** | |
| दुष्काळांचा सामान्य विचार. ... ... ... ... | १ |
| **भाग दुसरा—** | |
| हिंदुस्थानांतील प्राचीन दुष्काळ. ... ... ... ... | ८ |
| **भाग तिसरा—** | |
| एकुणिसाव्या शतकांतील दुष्काळ.... ... ... ... | ३३ |
| **भाग चौथा—** | |
| हिंदुस्थानांतील दुष्काळांचें अर्थशास्त्र. ... ... ... | ६६ |
| **भाग पांचवा—** | |
| ह्या देशांतील शेतकरी व दुष्काळ पडण्याचीं मुख्य कारणें. | १०३ |
| **भाग सहावा—** | |
| दुष्काळांचें संकट टाळण्याचे सहेतुक प्रतिबंध. ... ... | १२५ |
| **भाग सातवा—** | |
| दुष्काळांचें तात्कालिक निवारण. ... ... ... ... | १४६ |

# हिंदुस्थानांतले दुष्काळ.

## भाग पहिला.

### दुष्काळांचा सामान्य विचार.

कालः क्रीडत्ययं प्रायः सर्वमापदि पातयन् ।
हेलाविचलिताशेषचतुराचारचञ्चुरः ॥[1]

योगवासिष्ठ.

पृथ्वीवर अनेक प्रकारच्या दैवी कोपांच्या प्रादुर्भावानें आजपर्यंत अनेक प्राण्यांचा संहार झाला आहे. ह्या दैवी आपत्तींतच दुष्काळाचाही समावेश होतो. दुष्काळामुळें असंख्य प्राणी नष्ट झाले, मोटमोठीं शहरें ओस पडलीं, व असंख्य प्रांत तपांचीं तपें बेचिराख झाले. महाभयंकर भूमिकंप, ज्वालाग्राही पर्वतांनीं उद्भवणारा अनर्थपात, व प्रभंजन वातानें घडणारे अनर्थ, यांच्यापेक्षां दुष्काळाचें संकट फारच भयंकर असतें. मोठमोठे राजे, महाधुरंधर योद्धे व तपश्चर्येंत असंख्य वर्षें ज्यांनीं घालविलीं आहेत, असा ऋषिसमुदाय यांना दुष्काळानें आपला प्रताप दाखविल्याचें सर्वश्रुत आहेच. आपल्या हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या आपत्तीनें आजपर्यंत जी खराबी केली, तिचा साग्र इतिहास उपलब्ध नाहीं. ही आपत्ति इतकी भयंकर आहे कीं, राजापासून रंकापर्यंत सर्व लोकांस व पशुपक्ष्यादिकांस तिचा परिणाम भोगावा लागतो. अशा प्रकारची आपत्ति येऊं नये, ह्मणून ऋग्वेदांत भिन्नभिन्न स्थळीं ईश्वराराधन केलें आहे. रामायण, महाभारत इत्यादि ऐतिहासिक ग्रंथांत या आपत्तीचें बऱ्याच ठिकाणीं थोडक्यांत परंतु भयंकर वर्णन आलें आहे; त्याजवरून त्या काळचे आर्य लोकांस दुष्काळरूपी व्याधीनें सर्वथैव

---

१. ज्याचे योगानें सर्वसमर्थ जनही भयंकर आपत्तींत येऊन पडतात; असा जो कुशल काल, तो सर्वांना संकटांत टाकून क्रीडा करीत असतो.

सोडलें नव्हतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. परराष्ट्रांतील लोकांची सत्ता ह्या देशांत स्थापन झाल्यानंतर, पुढें जे दुष्काळ पडले, त्यांचें व पूर्वींच्या दुष्काळांचें स्वरूप यांत बरेंच मोठें अंतर दिसून येतें. हिंदुस्थानांतील दुष्काळांचें संकट कमी करण्याच्या कामांत प्राचीन काळीं या देशास दूरच्या परराष्ट्रांकडून कोणत्याही प्रकारची मदत होऊं शकत नव्हती; इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानाच्या एका भागांत दुष्काळ व दुसऱ्या बाजूस चांगली सुबत्ता असतां, सुबत्तेच्या ठिकाणांतून दुष्काळग्रस्त प्रदेशांतील लोकांच्या संरक्षणास चांगलीशी मदत झाल्याचें जुन्या इतिहासांवरून आढळून येत नाहीं. प्राचीन काळीं इतिहासलेखनाची पद्धत फारच निराळी होती. दुष्काळासारख्या संकटांना फारसें प्राधान्य देऊन त्यांचे इतिहास तयार करण्याकडे विद्वान् लोकांची प्रवृत्ति नव्हती. दुष्काळाचें संकट नेहमीं येऊन लोकांचा हल्लींप्रमाणें संहार होत नव्हता; त्यामुळेंहि या विषयास फारसें महत्व मिळालें नसावें. राजे लोकांच्या व ऋषिवर्यांच्या चरित्रक्रमाबरोबर जेवढ्या महत्वाच्या गोष्टींचें उल्लेखन ग्रंथकारांस करावेंसें वाटलें, तेवढाच सामाजिक देशस्थितीचा इतिहास सांप्रत उपलब्ध आहे. प्रत्येक सामाजिक बाबतीचा साग्र व स्वतंत्र इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, जे दुष्काळासारखे महत्वाचे विषय, ते ह्या प्राचीन माहितीसंबंधानें सर्वथैव अपूर्णच राहतात. ती उणीव आतां पुढें भरून येणें शक्य नाहीं. रघुवंशतिलक दशरथराजाच्या वेळेचें व अजीगर्ताच्या काळचें अनावर्षण हीं दोन संकटें रामायण व महाभारत या ग्रंथांत मुख्य आहेत. महाभारतांत विश्वामित्र व श्वपच यांचें जें कथानक दिलें आहे, त्याजवरून तो दुष्काळ फारच भयंकर होता असें दिसतें. कुत्रीं व मांजरें मारून खाण्यावर त्या वेळीं पाळी आली होती. विश्वामित्रासारख्या महान् तपस्व्यास चांडाळांच्या वस्तींत जाऊन कुत्र्याच्या जंघेच्या मांसानें पितृश्राद्ध करावें लागलें. अजीगर्तास खाण्यास न मिळाल्यामुळें त्यानें आपला मुलगा विकला. ह्या गोष्टी पुराणांतून आढळतात, ह्मणून त्यांत कदाचित् अतिशयोक्तिहि असूं शकेल; परंतु त्या माहितीवरून त्या काळीं महाभयंकर दुष्काळ पडत होते, हें निर्विवाद ठरतें. ह्या दुष्काळांचा कालमानयुक्त व साग्र इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, तत्संबंधानें जास्त माहिती मिळूं शकत नाहीं.

आमच्या हिंदुस्थानांत दुष्काळासारख्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ प्राचीन काळीं लिहिण्याचा प्रघात असता, तर आज हा विषय बऱ्याच निराळ्या स्वरूपानें पुढें आणण्यास संधि मिळाली असती. प्राचीन व अर्वाचीन दुष्काळांची साग्र माहिती एका ठिकाणीं मिळण्याचें साधन अनुपलब्ध आहे. संस्कृत, फारशी, उर्दू इत्यादि भाषांतील कांहीं जुने ग्रंथ आणि इंग्लिश इतिहासकारांनीं दिलेली त्रोटक माहिती, यांपेक्षां जास्त महत्वाचीं साधनें सांप्रत विद्यमान नाहींत. प्राचीन व अर्वाचीन ग्रंथकारांचें लक्ष या विषयाच्या महत्वाकडे बरोबर गेलें नसावें व त्यामुळेंच ही उणीव राहून गेली असावी असें दिसतें. प्राचीन काळची हिंदुस्थानांतील राज्यपद्धति फारच निराळी होती. ह्या देशांत उत्पन्न होणारें सर्व धान्य येथेंच राहत असे, व एक दोन वर्षांचीं अनावर्षणें हीं लोकांस असह्य वाटत नसत. प्राचीन काळचे दुष्काळांतील धान्याचे भावाची तुलना, अर्वाचीन सुकाळांतील धान्याचे भावाशीं केल्यास, त्या दुष्काळांत बरीच स्वस्ताई होती असेंच ह्मणणें भाग पडतें. पैसा देऊन धान्य न मिळणें यालाच प्राचीनकाळचे लोक दुष्काळ असें ह्मणत असत. संपत्ति व धान्य यांचा भरपूर पुरवठा असल्यामुळें, असा भयंकर दुष्काळ चार पांचशें वर्षांत एखादाच येत असे, असें प्राचीन ऐतिहासिक ग्रंथांच्या परिशीलनावरून दृष्टोत्पत्तीस येतें. दुष्काळ ही दैवी आपत्ति, मनुष्य व पशुपक्षी यांच्या संहारार्थच उद्भवते, अशी प्राचीन काळच्या लोकांची समजूत होती; तथापि त्या काळच्या राजे लोकांनीं ह्या आपत्तीचें निर्मूळ करण्याकडे दुर्लक्ष्य केलें नाहीं. मोठमोठे तलाव व पाण्याचे कालवे बांधून, या देशांतील शेतकऱ्यांना त्या काळच्या राज्यकर्त्यांनीं सधन केलें होतें. सरकारसारा फारच माफक व राजा प्रजेला सुख देण्याच्या कामांत विशेष दक्ष असल्यावर, दुष्काळाचें संकट फारच उशिरानें येणें हें शक्य आहे. ज्या सन्मान्य प्राचीन ग्रंथांत दुष्काळांचें उल्लेखन झालें आहे, त्यांशिवाय इतर काळांत दुष्काळ पडले असतील असें मानून चालणें हें अयोग्य होईल. मनुष्यकृतीच्या दोषांपासून पडणाऱ्या दुष्काळांच्या संकटांपेक्षां दैवी कोपानें पडणाऱ्या दुष्काळांची संख्या फारच कमी असते, असें एकंदर जगाच्या इतिहासावरून शाबीत होतें. लढाया, राजकीय जुलूम, स्वार्थप्रा-

बल्य व इतर मानवी दोष, यांचें वर्चस्व फार वाढल्यामुळें जे दुष्काळ पडतात, त्यांपासून होणारें नुकसान फारच मोठें असतें. प्रजा संपन्नावस्थेंत कायम राहिल्यास, मनुष्यांस व पश्वादिकांस लागणारें धान्य, चारा व पाणी यांची खोट पडत नसते. हें साधन लढाया किंवा राजकीय जुलुमानें नष्ट होतांच, जी आपत्ति उद्भवते, तिलाच पुढें दुष्काळाचें स्वरूप प्राप्त होतें, असा बऱ्याच तत्ववेत्त्यांचा सिद्धांत आहे.

हिंदुस्थानांतील प्राचीन लेखकांनीं कृतयुगापासून ग्रंथलेखनास आरंभ केला असून, त्यांत मोघम शब्दांनीं थोडक्यांत समजेल अशा रीतीनें तत्कालिन देशस्थितीचा प्रकाश अर्वाचीन लोकसमूहावर पाडण्याचा यत्न केला आहे. प्रजेच्या संरक्षणाचें सर्व जोखीम क्षत्रियांवर ठेवून, प्रजेची संपन्न स्थिति हेंच राज्याचें वैभव, असें मानण्याचा त्या काळीं प्रघात होता व तोच हल्लीं यूरोप, अमेरिका वगैरे खंडांत प्रचलित आहे. त्या देशांत प्रजेच्या हातांत बरीच सत्ता असल्यामुळें, ती समजूत कायम राहिली; परंतु आमच्या हिंदुस्थानांत मात्र तसें घडलें नाहीं. हिंदुस्थानांतील प्रजा अत्यंत राजनिष्ठ असल्याकारणानें, तिनें आपलें वर्चस्व राजमंडळावर स्थापण्याचा यत्न बिलकूल केला नाहीं. जे राजे चांगले कार्यदक्ष निपजले व ज्यांना प्रजेच्या खऱ्या हक्कांचें चांगलें परिज्ञान होतें, त्यांनीं आपल्या प्रजेला स्वतः संकट सोसून ज्यास्त सुखच दिल्याचें आढळून येतें; परंतु ज्या राज्यकर्त्यांना आपण दैवी पुरुष असें वाटून, प्रजेपासून निघतील तितके पैसे काढणें इष्ट वाटलें, त्यांच्या कारकीर्दींत दैवी व मानुषी आपत्तींचा विस्तार बराच वाढत गेल्याचें प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांत नमूद झालें आहे. वसिष्ठानें रामास उपदेश करितांना, राजे व त्यांची प्रजा दैन्यावस्थेच्या फेऱ्यांत कशी सांपडते, त्या संबंधानें योगवासिष्ठांत जें कळविलें आहे, त्यांत प्रजेचें दारिद्र्य व राजाचा स्वार्थ किंवा आपसांतील कलह हा देशस्थितीस भयंकर स्वरूप आणण्यास विशेष कारणीभूत होतो, असेंच ह्मटलें आहे. राजाच्या कुळांत उत्पन्न झालेल्या मूर्ख मनुष्यासहि राज्याधिकार देण्याची पद्धति व राजा ह्मणेल त्याप्रमाणें अगदीं निमूटपणें वागण्याचा प्रघात या दोन गोष्टींनीं आमच्या हिंदुस्थान देशाची आजपर्यंत बरीच हानि झाली आहे. गादीचा वारसा मिळ-

ण्याकरितां लागलेले तंटे, राजाचे ऐषआराम चालण्याकरितां प्रजेवर लादला जाणारा करांचा बोजा व राजाच्या आप्तांना राजदरबारांतून पावणाऱ्या नेमणुका, यांचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास, आमच्या भारतवर्षास या दैन्यावस्थेनें कां ग्रासून टाकिलें, त्याची सहज कल्पना करितां येईल. राज्यांतील अस्वस्थता व राजाच्या प्रीतींतील माणसांकडून होणारे जुलूम, यांच्या योगानें ह्या देशांतील सर्व ठिकाणची प्रजा निर्धनावस्थेस जाऊन पोहोंचल्याचेंच आढळून येतें. हे प्रकार ज्या काळीं कमी होते, त्या समयीं दुष्काळांचीं संकटें फारच थोडीं येत असत, असें इतिहासांवरून ह्मणतां येईल.

'दुष्काळ' या शब्दाची व्याख्या निरनिराळे ग्रंथकार निरनिराळ्या प्रकारानें करितात. प्राचीन संस्कृत ग्रंथांत दुष्काळास 'ईति' या शब्दानेंच संबोधिलें आहे. ह्या शब्दाची व्याख्या खालीं लिहिलेल्या श्लोकाप्रमाणें होत असतेः–

**अतिवृष्टिरनावृष्टिः शलभा मूषकाः शुकाः ।**
**स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः ॥**

अमरकोश, तृतीयकाण्ड नानार्थवर्ग, श्लोक ६८ टीप.

ह्मणजे, अतिवृष्टि, अनावृष्टि, टोळधाड, उंदरांचा उपद्रव, पोपट वगैरे प्राण्यांचा त्रास, स्वराज्याच्या फौजेपासून होणारी खराबी, परशत्रूच्या फौजेकडून होणारें नुकसान हे सात प्रकार 'ईति' या संज्ञेंत गणले जातात. प्राचीन काळीं याच कारणानें बहुधा हिंदुस्थानावर दुष्काळाचें संकट येत असे. हीं कारणें बऱ्याच अंशानें सर्व जगावर सर्व ठिकाणीं कायमचीं असूं शकतात. गेल्या पांचशें वर्षांत हिंदुस्थानांतील राज्यपद्धतीस निराळें वळण लागल्यामुळें, दिवसेंदिवस दुष्काळाच्या कारणांची वाढ होत चालली असून, वारंवार आमच्या पुढें 'दुष्काळ' येऊन उभा राहत असतो. धान्य पिकलें नाहीं किंवा धान्याची खराबी होऊन, त्याचा संस्कार देशावर जो घडतो, तो दुष्काळाचा पायाच होय, असें कांहीं लोक ह्मणतातः परंतु तसें ह्मणण्यापूर्वी लोकांना मोलमजूरीवर निर्वाह करण्याचा प्रसंग येणें व आज मिळविलेली मजुरी आजच्याच दिवसास पुरणार नाहीं इतकी दशा ज्या

काळीं लोकसमाजांतील मोठ्यांत मोठ्या भागास येते, तोच खरा "दुष्काळ" असेंहि ह्मणतां येईल. ओरीसा प्रांतांतील दुष्काळकमिशनर हे आपल्या रिपोर्टांत 'दुष्काळ' शब्दाची व्याख्या "पैसे देऊन ज्या वेळीं धान्य बाजारांत मिळूं शकणार नाहीं तेव्हांच त्यास दुष्काळ ही संज्ञा द्यावी" अशी करीत आहेत. सर जेम्स स्ट्र्याची हे ह्मणतात कीं, "देशांत लोकांच्या खपापुरतें धान्य नसतें असा जो काळ तो दुष्काळ." ह्या दोन्ही व्याख्या हिंदुस्थानच्या प्राचीन स्थितीस व सांप्रत यूरोप, अमेरिका वगैरे खंडांतील लोकस्थितीस मात्र तंतोतंत लागू पडतात[१]. हिंदुस्थानची स्थिति सांप्रत फारच भिन्न आहे. यूरोप व अमेरिका ह्या देशांत व्यापारधंद्याची खोट नसल्यामुळें, त्या देशांत पैसे जास्त व धान्य कमी असतांहि 'दुष्काळ' आहेसा वाटत नाहीं. इंग्लंडांत त्या देशाचे खपास पुरेसें धान्य पिकत नसल्यामुळें, ती खोट परदेशांतून धान्य मागवून त्या देशांतील लोकांस भरून काढावी लागते. व्यापाराच्या सर्व सोईंची अनुकूलता, हेंच त्या देशांवर दुष्काळाचें संकट वारंवार न येण्याचें मुख्य साधन होय. यूरोपांतील स्थिति पुढें ठेविल्यास धान्याची खोट हेंच दुष्काळाचें मूळस्वरूप आहे असें ह्मणतां येणार नाहीं. त्या देशांत निर्वाहापुरतें धान्य पिकत नसतां, तिकडे दुष्काळ वाटत नाहीं, व हिंदुस्थानांत एक पावसाळा अर्धामुर्धा कोरडा जातांच, दुष्काळाचें भयंकर स्वरूप प्रगट होऊन, असंख्य प्राण्यांचा नाश होण्याचा दुर्दैवी योग येतो, यांतील खरें इंगित फारच निराळें आहे. हिंदुस्थानांत सांप्रत संपत्तीची कमतरता झाल्यामुळें धान्य ज्या साधनानें विकत मिळतें, त्याची मोठी खोट पडते. अर्थात् इकडील दुष्काळ हा धान्याचा नसून तो खरोखर पैशाचाच होय.[२] 'दुष्काळ' या शब्दाचा अर्थ दिवसेंदिवस एकसारखा बदलत चालला आहे. अलीकडील दुष्काळांत लोकांची जी प्रत्यक्ष दीन स्थिति दिसते, तेंच दुष्काळाचें सर्वांत मोठें भयंकर स्वरूप होय. या भयंकर स्थितीचा विचार करून, दुष्काळाची व्याख्या ठरविल्यास, ती फारच हृदयद्रा-

---

१. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ १३०–३१.

२. लोकहितवादीकृत ग्रामरचना; सन १८८३.

वक ठरेल. ज्या काळांत लोकांस उदरनिर्वाहाची विशेष पंचाईत पडते, पांघरण्यास धड वस्त्रही मिळत नाहीं, सर्वत्र अन्नार्थी लोक भटकत असतात व अन्नपाण्यावांचून लोकांचे प्राण नष्ट होण्याचा जो दुर्धर प्रसंग; तोच 'दुष्काळ' होय.

दुष्काळाचें संकट एकटेंच येत नसतें. त्यास सांथींचे रोग व दुसरीं अनेक संकटें यांचें पूर्ण पाठबळ असतें. साधारणतः अन्नाची तंगी पडतांच, निर्धनावस्थेंतील लोकांस निरनिराळे व्याधि जडतात; व त्यामुळें त्यांच्या आयुष्याची हानि झाल्यावांचून राहात नाहीं. पुढें पाण्याच्या टंचाईनें किंवा विकृतिजन्य पाणी उपयोगांत आल्यामुळें तर त्या व्याधींना सांथींचें भयंकर स्वरूप येतें व असंख्य माणसें मृत्युमुखीं पडतात! अतिवृष्टीपासून उद्भवणाऱ्या दुष्काळांत शेतकीच्या जनावरांची फारशी हानि होत नाहीं; परंतु अनावर्षणामुळें पडलेल्या दुष्काळांत शेतकीच्या जनावरांची अतिशयित हानि होते व तें संकट बराच काळपर्यंत लोकांस पीडा देतें. गाई व बैल यांची हानि झाल्यानें, पुढें शेतकी बरोबर होण्यास जो व्यत्यय येतो, तो पुढें चांगली वृष्टि होऊन पिकें जरीं आलीं तरी जाणवल्यावांचून राहात नाहीं. हिंदुस्थान हा देवमातृक[१] देश होय. त्याचा मुख्य आधार शेतकी हा आहे. इकडील लोकस्थिति किती संपन्न आहे, त्याचें दुष्काळ हें प्रत्यक्ष प्रदर्शनच होय. इंग्लंड किंवा यूरोपांतील इतर देशांत अतिवृष्टि किंवा अनावृष्टि कधींही होत नसते असें नाहीं. तिकडे दरसाल बहुधा दुष्काळच असतो; परंतु ते देश संपन्न असल्यामुळें, त्या देशांवर ह्या दुष्काळांपासून अनिष्ट परिणाम घडत नाहीं. उलट त्या देशांतील लोकांचे सर्व धंदे अशा दिवसांत फारच तेजीवर येतात.

---

१. कृषिकर्मावर उपजीवन चालविणारा.

# भाग दुसरा.

## हिंदुस्थानांतील प्राचीन दुष्काळ.[१]

महाभारताच्या काळानंतर ह्या देशांत किती दुष्काळ पडले, त्यांचा इतिहास असावा तसा उपलब्ध नाहीं. मुसलमान राज्यकर्त्यांची कारकीर्द सुरू होण्यापूर्वींचा इतिहास कांहीं संस्कृत ग्रंथांत त्रोटक रूपानें सांपडतो. 'राजतरंगिणी' ह्या ग्रंथांत बऱ्याच जुन्या काळचा इतिहास कालमानासह थोडक्यांत दिला आहे. त्यांत इ० सनापूर्वीं ४४३ व्या वर्षीं काश्मीर, पंजाब, अयोध्या, राजपुताना, मारवाड, गुजराथ व खानदेश ह्या भागांत पडलेला दुष्काळ हा पुरातन होय. हा काळ फारच भयंकर होता. काश्मिरांत ज्वालाग्राही पर्वताचें उद्भवन, पाषाणवृष्टि व अग्निवर्षण वगैरे कारणांनीं तो देश या वर्षीं उध्वस्त झाला. पंजाबांत अनावर्षण पडलें. गुजराथेंतील नद्यांना महापूर आले व त्यांमुळें धान्य पिकलें नाहीं. राजपुतान्यांत व मारवाडांत सामान्यतः कमी पाऊस पडला. ह्या समयीं खानदेश, महाराष्ट्र वगैरे देशांत बरेंच धान्य पिकलें होतें; परंतु पूर्वोक्त दुष्काळग्रस्त प्रदेशांतील भिकार लोटल्यामुळें धान्याची फार महर्गता झाली. तसेंच तिकडील धान्य लुटून नेण्याचाही क्रम कांहीं लुटारूंनीं सुरू केला होता. या काळची लोकस्थिति संपन्न असतां, ह्या आपत्तीचा विस्तार ज्यास्त वाढण्याचें कारण तुरुष्क लोकांनीं स्वाऱ्या करून, या देशांतील संपत्ति लांबविली व कांहीं प्रदेश जाळून फस्त केला हें होय. ह्या दुष्काळांत बरींच जनावरें व मनुष्यें मृत्युमुखीं पडलीं.

इ० सनापूर्वीं १०३ पासून इ० स० पूर्वीं ६६ वर्षांच्या दरम्यान लोटलेल्या ३७ वर्षांत एक भयंकर दुष्काळ काश्मीरांत तुंगजीन राजाच्या कारकीर्दींत पडला होता. हा दुष्काळ अमुकच सालीं पडला असें स्पष्ट सांगण्याचें साधन उपलब्ध नाहीं. ह्या वेळीं शेतांत धान्य बरेंच पिकलें होतें. सर्व काश्मीर प्रदेश भाद्रपद महिन्यांत उत्तम सुशोभित दिसत होता. इतक्यांत शरदृतूच्या आरंभास मोठी हिमवृष्टि झाली. त्यामुळें शेतकीचें मुख्य

---

१. परिशिष्टांक पहिला.

उत्पन्न नष्ट होऊन क्षुधातुर लोकांची संख्या एकदम विशेष वाढली. संग्रहास असलेल्या धान्यावर शेतकऱ्यांनीं थोडेसे दिवस काढिले, पुढें तेहि शेवटीं क्षुधातुर झाले. ह्या दुष्काळाच्या दुःखानें अत्यंत पीडलेले व उदरपोषणास आतुर झालेले ते प्रजाजन स्त्रीच्या प्रेमास, पुत्राच्या स्नेहास व मातापित्यांचे गौरवास विसरून गेले होते. क्षुधेमुळें लज्जा, अभिमान व आपलें कुळ यांचीही त्यांस विस्मृति पडली! दुर्बळ झाल्यामुळें ज्यांच्या कंठीं प्राण आले होते असे लोक अन्नाची याचना करण्याकरितां एकसारखे भटकत असत. पित्यास पुत्र व पुत्रास पिता सोडून कठोर हृदयानें जो तो उदरपोषणाच्या मागें लागला होता. त्यांचीं शरीरें पाहून दयाळू लोकांचें हृदय पोळत होतें. अस्थिपंजररूप बनलेले ते दीन लोक खाण्याकरितां मारामाऱ्या करीत व त्यांतच त्यांचें प्राणोत्क्रमण होत असे. प्रजेची ही दशा पाहून, तुंगजीन राजा नोकरांचाकरांस कमी करून स्वतः दुष्काळग्रस्तांचा परामर्ष घेण्याच्या यत्नास लागला. त्यानें आपल्या अन्नभांडारांतून प्रजेचें पोषण केलें; परंतु जवळची संपत्ति खुंटतांच तो व त्याची राणी वाक्पुष्टा यांना फार वाईट वाटलें. इतक्यांत आकाशांतून पक्षी मरून पडूं लागले, त्यांच्या मांसावर त्या राजानें आपल्या प्रजेचें संरक्षण केलें. पुढें पाऊस चांगला पडला व पिकेंहि उत्तम आलीं, ह्मणून तें संकट जरी फार काळपर्यंत टिकलें नाहीं, तरी या दुष्काळाची मुदत कमींतकमी दोन वर्षांची असावीसें दिसतें. हिमालयाच्या उतरणीवर व काश्मीरांत बर्फाच्या वृष्टीमुळें असंख्य माणसें आणि जनावरें दुष्काळाच्या आरंभास मरण पावलीं. हा दुष्काळ पंजाब व अयोध्याप्रांत यांसहि बराच नडला. ह्या समयीं त्या राजाच्या राणीनें जें औदार्य दाखविलें, व त्याच्या मनाचें तिनें जें समाधान केलें, त्याची कथा फारच मनोरम आहे.

ह्या दुष्काळानंतर इ० स० ८५७ वर्षांपर्यंत मोठा दुष्काळ हिंदुस्थानावर पडल्याचें आढळून येत नाहीं. लढाया व अनावर्षण ह्यांच्यामुळें महर्गता बऱ्याच येऊन गेल्या; परंतु त्यांना दुष्काळाचें स्वरूप येऊं शकलें नाहीं. प्रजा सधन होती; त्यामुळें ह्या एवढ्या मोठ्या काळांत अशी भयंकर आपत्ति येऊं शकली नाहीं. हिंदुस्थानांत व्यापारोद्योग व कलाकौशल्य यांची या

काळांत बरीच भरभराट होती. पुढें काश्मीरचे गादीवर कल्पपालवंशांतील अवंतिवर्मा नांवाचा राजा बसला. ह्याचा राज्यकाळ इ० स० ८५५ पासून ८८२ वर्षांचा आहे. काश्मीरांत व पंजाबांत या दुष्काळानें बरीच खराबी केली. काश्मीरच्या ताब्यांतील प्रदेश या वेळीं चांगला आबाद होता. त्या देशांतील सर्व तलाव पाण्यानें नेहमीं भरलेले असत. नद्यांतूनहि पाण्याचा मोठा सांठा होत असल्यामुळें, बारा महिने शेतकीचें उत्पन्न होत असे. ललितादित्य राजानें नद्यांचे पाट काढून, पंजाबांत पाणी नेल्यामुळें, ते प्रदेश बरेच सुपीक झाले होते. ललितादित्यानंतर लोटलेल्या दोनशें वर्षांच्या काळांत त्या कालव्यांची व्यवस्था नीट राहिली नाहीं व नद्यांना महापूर येऊन, देशांची फारच खराबी होऊं लागली. तलाव जीर्ण होऊन त्यांत पाणी राहीनासें झालें; अशा गोष्टींकडे पुढील राज्यकर्त्यांचें जसजसें दुर्लक्ष होऊं लागलें, तसतसें दुष्काळाचें संकट जवळजवळ येत चाललें. काश्मीरांतील नद्यांना पूर येऊन, इ० सन ८५७ मध्यें दुष्काळ पडला. हे पूर उष्ण काळांत येत. या समयीं एक हजार पांच दीनारांस[1] एक [2]खारी धान्य विकलें जात होतें. ह्या दुष्काळाच्या संकटानें बरेच लोक मृत्युमुखीं पडले. हा महापूर कां येतो, त्याचा शोध राजानें करून पुन्हां असा पूर येऊं नये, ह्मणून उपयुक्त योजना करण्यास त्यानें आरंभ केला. महापद्म सरोवराच्या पाण्यास प्रतिबंध करून, त्या पाण्याचा शेतकीकडे उपयोग करण्याची योजना केली. पाण्याच्या प्रवाहांत वितस्ता नदीनें दवविलेला प्रदेश त्यानें युक्तीनें शेतकीच्या उपयोगास आणिला. सर्व मोठ्या नद्यांचे लहान प्रवाह काढून, त्या राजाच्या कामगारांपैकीं अंत्यज जातीच्या अत्यंत हुशार सुय्यनामक शोधक मनुष्यानें, सर्व काश्मिरांतून महापुरानें उद्भवणारें दुष्काळाचें संकट नष्ट केलें. त्यानें मृत्तिकेची परीक्षा करून पिकें काढण्याच्या पद्धतींत सुधारणा केली. राजानें जे पैसे ह्या महत्त्वाच्या कार्याकडे खर्चिले, त्याचा

---

१. 'दीनार' हें सोन्याचें नाणें होतें व त्याचें वजन ३२ गुंजांचें असे.

२. ३२ शेरांचा एक द्रोण व १६ द्रोण ह्मणजे एक खारी. अर्थात् बंगाली ६ मण ३२ शेरांची एक खारी.

बोजा प्रजेवर न टाकल्यामुळें, त्या काळची प्रजा संपत्तीनें फारच गबर झाली. महापूर व अनावर्षण यांपासून घडणारे वाईट परिणाम ह्या राजाच्या कारकीर्दींत नष्ट झाले. हा दुष्काळ एक वर्षहि पुरा नव्हता. ही व्यवस्था केल्यानें सर्व काश्मिरांत पुढें ३६ दीनारांस एक खारी धान्य मिळूं लागलें. इ० स० ८५५ पूर्वी सुबत्तेच्या दिवसांत काश्मीरांत दोनशें दीनारांस एक खारी धान्य मिळत होतें. नद्यांच्या पाण्याचा गैर उपयोग होत असतो, तो न होऊं देणें व हवामानावर वाईट संस्कार घडूं न देणें, या दोन गोष्टी त्या राजानें केल्यामुळें, तिकडील प्रजा अतिशय संपन्न झाली. फार प्राचीन काळीं मान्धाता राजाच्या कारकीर्दींतहि इतकीं मोटीं महत्त्वाचीं कामें झालीं नव्हतीं, असें राजतरंगिणीकार ह्मणतात.

इ० स० ९१७ मध्यें काश्मिरांत व पंजाबांत दुष्काळ पडला. ह्या समयीं त्या प्रदेशावर पार्थ नांवाच्या राजाची सत्ता होती. त्याची राज्यपद्धति चांगली नव्हती. प्रजेला त्या राजानें व त्याच्या प्रीतींतील कामदारांनीं निर्धन करून सोडलें होतें. त्याच्या ताब्यांतील मांडलिक राजे या राज्यास त्रास देऊन, प्रजेचें वित्त लुटून नेत असत. ह्या प्रसंगीं कानपुर व बहार हे प्रांत काश्मीरच्या सत्तेखालीं होते; परंतु राज्यांतील अव्यवस्थेमुळें ते स्वतंत्र झाले. ह्या समयीं खुद्द राजाचा खजिनाहि लुटला गेला. ह्याच प्रसंगीं तार्तरींतील लोकांनीं स्वारी करून, पंजाबांतील लोकांकडून अपार संपत्ति लुटून गेली. पाण्याचीं बांधकामें या अंदाधुंदींत मोडलीं गेल्यानें, वितस्ता नदीला मोठा पूर आला व नदीच्या कांठीं सुय्यानें वसविलेले गांव वाहून गेले. हा दुष्काळ फारच भयंकर होता. वितस्ता नदीच्या पाण्यावर असंख्य प्रेतें तरत होतीं. राजाचे कांहीं मंत्री पैसे कमाविण्याचे हेतूनें, सरकारी धान्य बाजारकिमतीस महत्व देऊन, त्याप्रमाणें विकीत; त्यामुळें निर्धन लोकांनीं अन्नावांचून प्राण सोडले. ह्या समयीं एक खारी धान्याची किंमत एक हजार दीनार होती. प्रजेची ही दीन स्थिति पाहून राजानें ती घालविण्याचा यत्न केला नाहीं. हा दैवी कोप आहे असें समजून तो राजा आपले चैनींतच गढून गेला होता. शेवटीं त्यास त्याच राज्यांतील कांहीं सरदारांनीं पदभ्रष्ट करून स्वस्थता केली.

इ० स० ९४१-४२ या सालीं उत्तरहिंदुस्थानांत आणि मारवाड व वायव्यप्रांत यांत बराच मोठा दुष्काळ पडला. हा दुष्काळ पडण्याचें कारण लढायांवांचून दुसरें फारसें दिसून येत नाहीं. कांहीं भागांत साधारण अनावर्षण होतें. या दुष्काळास भयंकर स्वरूप कसें आलें, त्याची माहिती बरोबर मिळत नाहीं. ह्या काळीं मुसलमान लोकांच्या बऱ्याच स्वाऱ्या होऊं लागल्या होत्या. इ० स० १०२२ मध्यें दिल्लीच्या आजूबाजूस, बंगाल, बहार, ओरिसा वगैरे प्रांतांत फारच मोठा दुष्काळ पडल्यामुळें, ह्या प्रदेशांतील बरेच गांव ओस पडले. ह्या सालांत गंगा व यमुना ह्या नद्यांस महापूर येऊन, आजूबाजूंच्या प्रदेशांची फारच हानि झाली. कांहीं ठिकाणीं पाण्याची इतकी तंगी पडली होती कीं, पाण्यावांचून असंख्य माणसें यमसदनास गेलीं. मारवाडांत तर ह्या प्रसंगीं भयंकर दुःखवर्षाव झाला. इ० स० १०९९ मध्यें काश्मिरांत दुष्काळ पडला. हा पडण्याचें कारण ‘उदयक्रीडित’ नांवाचें मोठें शहर पाण्याच्या महापुरानें वाहून गेलें, हें होय. हें मोठें व्यापाराचें ठिकाण होतें. राजाचा अतिशय त्रास व प्रजेस निर्धन बनविण्याचा यत्न; या दोन कारणांनीं त्या दुष्काळांत विशेष भर पडली. वैश्यवर्ण हा चौर्यकर्मांत सहसा पडत नसतो; परंतु ह्या प्रसंगीं वैश्य लोक उघड मोठमोठ्या चोऱ्या करूं लागले होते. खुद्द राजाचें रत्नभांडारहि वैश्यांनीं ह्या प्रसंगीं लुटलें. ह्या दुष्काळाबरोबरच सांथींच्या अनेक रोगांनीं आपलें स्वरूप प्रगट करून, लोकांचा संहार केला. या समयीं काश्मीरच्या गादीवर श्रीहर्ष राजा होता. रत्नभांडारें व सावकारांजवळची दौलत संपल्यामुळें, धान्य अतिशय महाग झालें. एक खारी धान्यास पांचशें मोहोरा द्याव्या लागत असत. एका मोहोरेस दोन पळें द्राक्षरस व सहा मोहोरांस एक पल[1] लोंकर मिळत असे. मीठ, मिऱ्यें व हिंग, यांचें तर नांवच बाजारांत निघत नव्हतें. राज्यांत धान्य येण्यास बिलकुल मार्ग नव्हता. महापुरानें मनुष्यें व जनावरें वाहून गेल्यामुळें, असंख्य मुर्दे पाण्यावर तरंगत होते. अशा आपत्तीचे प्रसंगीं राजानें आपले ऐषआराम जरा संकोचित करावयास

---

१. दहा मासे ह्मणजे एक कर्ष व चार कर्षांचें एक पल होतें.

पाहिजे, परंतु श्रीहर्षाचे सर्व विलास एकसारखे चालूच होते. शेवटीं सरकारच्या खजिन्यांतील पैसे या विलासामुळें खुंटले. त्यामुळें प्रजेकडून जास्त पैसे मिळविण्याचे हेतूनें, आपल्या फौजेस हुकूम करून प्रजेस त्या राजानें लुटलें. फौजेनें लोकांच्या घरादारांची राखरांगोळी केली व शेवटीं प्रजेनें संतापून मोठें बंड केलें. एके बाजूस दुष्काळ व दुसऱ्या बाजूस बंडखोर लोकांस पकडून सुळावर चढविण्याचा सपाटा, त्या राजानें आपल्या राजवाड्याजवळ सुरू केला होता. शेवटीं अतिशयित त्रस्त होऊन कांहीं हिंदू लोक पळून काबूलकंदाहाराकडे गेले, व त्यांना मुसलमानी धर्माची दीक्षा घ्यावी लागली.

इ० स० १२०० मध्यें ओरिसा, बंगाल, बहार व आसाम ह्या प्रांतांत दुष्काळ पडला. त्याच्या पूर्वीं गेलेल्या शंभर वर्षांत ह्मणण्यासारखा मोठासा दुष्काळ पडल्याचें आढळून येत नाहीं. इ० स० १२१५ मध्यें राजपुतान्यांत, महाराष्ट्रांत आणि गुजराथेंत बराच मोठा दुष्काळ पडला. हे दोन्ही दुष्काळ लढाया व अनावर्षण ह्या दोनच कारणांनीं पडले होते. इ० स० १२५७–५९ (विक्रम संवत् १३१२–१४) ह्या वर्षीं गुजराथेंत मोठा दुष्कळ पडला. हा तीन वर्षेपर्यंत होता. हा पडण्यापूर्वीं परमदेवसूरि नांवाच्या जैन पंडितानें या दुष्काळाचें भविष्य केलें असल्यानें, गुजराथेचा महाराजा विसलदेव यानें धान्याचीं कोठारें भरून ठेविलीं होतीं. इ० स० १२५७ सालीं गुजराथेंत पाऊस बिलकूल नव्हता व इ० स० १२५८ सालीं तो बराच कमी पडला; त्यामुळें ह्या दुष्काळास विशेष भयंकर स्वरूप आलें. अन्नार्थी लोकांस सरकारानें फुकट अन्न देऊन, त्यांचें या प्रसंगीं संरक्षण केलें; परंतु पुढें सरकारचीं कोठारेंहि रिकामीं झालीं. सिंधचे राजानें दुष्काळ निवारणासाठीं बारा हजार; उज्जनीचा राजा मदनवर्मा यानें अठरा हजार; दिल्लीच्या मोजुद्दीन बादशहानें एकवीस हजार व स्कंधील

---

१—मि० रणछोडभाई उदयरामकृत गुजराथी रासमाळा, भाग १ पृष्ठ ५०५–६.

( कंदाहार ) येथील चक्रवर्ती बादशहानें बारा हजार मुडे[1] धान्य गुजराथेंत पाठविलें होतें. विसलदेवानें कुलीन लोकांस लज्जापिंड दररोज रात्रीं वाटण्याचा क्रम ठेवला होता. प्रत्येक लज्जापिंडांत ( गूळ व कणिकीच्या लाडवांत ) बरेच दीनार घालून, ते लाडू निर्धनावस्थेस पोंचलेल्या अब्रूदार लोकांस सरकाराकडून गुप्त रीतीनें मिळत होते. ह्या दुष्काळांत राजा विसलदेव व जगडूशहा यांनीं प्रजेचे प्राण वांचविण्याकरितां फार प्रयास केले. इ० स० १२९१ पासून ९५ पर्यंतचा पांच वर्षांतील दुष्काळ हा फारच भयंकर होय. ह्या दुष्काळाचें मुख्य कारण आरंभास वाऱ्याचें मोठें तुफान झालें व मोठमोठीं झाडें उलथून पडलीं, मोठमोठ्या इमारती पडल्या व पर्जन्यवृष्टि होऊन नद्यांना एकदम महापूर येऊन, पुढें कांहीं दिवसांनीं पाऊस एकदम बंद झाला. देशांत बरीच अस्वस्थता असल्यामुळें धान्याचे व्यापारी लुटले जात व लुटारू लोकांचा बंदोबस्त बरोबर होत नसे; त्यामुळें हा दुष्काळ असह्य झाला. या समयीं दिल्लीच्या गादीवर जलालुद्दीन खिलजी बादशहा होता. त्यानें इराणांतून आलेल्या सिद्दीमौला नांवाच्या फकिराचा खून केला; ह्मणून हा दुष्काळ त्याचे राज्यांत पडला, अशी मुसलमानी इतिहासकारांची समजूत आहे.

इ० स० १२९६ पासून १३१७ पर्यंतच्या दरम्यान एक मोटा दुष्काळ दिल्लीजवळ पडला. या समयीं दिल्लीच्या गादीवर जलालुद्दीनाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी हा होता. दुष्काळाचें संकट वाढत जातांच बादशहानें आपल्या मंत्र्यांच्या मदतीनें, धान्याचे भाव स्थिर केले. बाहेरून बरेंच धान्य मागविलें व सर्व जमाबंदी पूर्वीप्रमाणें शेतांत पिकणाऱ्या धान्यांतच घेण्याचा त्यानें रिवाज पुनः सुरू केला. शेतकऱ्यास जें धान्य पिकेल, त्यांतून त्याच्या वर्षाचे खर्चापुरतें निराळें काढून, बाकीच्या धान्याचा सहावा भाग सरकारसारा म्हणून घेतला जात असे. अमूक भावानें व्यापाऱ्यांनीं स्वस्ताईच्या किंवा महागाईच्या दिवसांत धान्य विकावें असें त्यानें ठर-

---

१. वजनी ४० तोळ्यांचा एक शेर, ४० शेरांचा एक मण व १०० मणांचा एक मुडा होतो.

विलें; त्यामुळें त्याला थोड्या खर्चांत मोठी फौज ठेवितां आली. ह्या ठरवून दिलेल्या भावांत बदल होऊं नये, याकरितां त्यानें एक कायदा तयार केला व त्याचा बरोबर अंमल होतो किंवा नाहीं, तें पाहून त्याचा योग्य विचार करण्यासाठीं, अत्यंत हुशार अशा कांहीं लोकांची त्यानें या कामाकडे योजना केली.[१]

इ० स० १३४१–४२ सालांत दिल्ली, राजपुताना, दक्षिणमहाराष्ट्र, ह्मैसूर वगैरे ठिकाणीं दुष्काळ पडला. ह्या समयीं दिल्लीच्या गादीवर तघलख वंशाचा महंमद वेडा हा बादशहा होता. त्यानें देवगिरीस (दौलताबादेस) दिल्लीहून राजधानी नेली; त्यामुळें दक्षिणमहाराष्ट्रांतील महर्घतेस एकदम दुष्काळाचें स्वरूप आलें. दिल्लीकडे ह्या वर्षी साधारणतः अनावर्षण पडलें. लढाया व धामधुमी यांच्या योगानें प्रजेचें अत्यंत नुकसान झाल्यामुळें, ते सर्व प्रदेश एकदम दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडले. ह्या दुष्काळाचा परिणाम एके प्रकारें पुढील दुष्काळांस साह्यकारी झाला. इ० स० १३४४-४५ सांत दिल्लीकडे अनावर्षण पडलें, तोंच मागील दुष्काळांत तुटलेले व जे साधारणतः टिकाव धरून राहिले होते, त्यांची फार खराबी होऊन, त्यांना भिक्षेवर निर्वाह करण्याची पाळी आली. [२]शिलोंच्छवृत्तीवर निर्वाह करण्याचा त्यांना प्रसंग आल्यामुळें, थोड्याच काळांत असंख्य माणसें मृत्युमुखीं पडलीं. हा दुष्काळ इतका भयंकर होता कीं, खुद्द शहासहि साधारण अन्न पोटभर खाण्यास मिळत नव्हतें. ह्या दुष्काळांत मांस व धान्य मिळेनासें होतांच, जनावरांचीं चामडीं उकळवून त्यांजवर कांहीं लोकांनीं प्राण वांचविले. हें संकट जातें न जातें तोंच इ० स० १३५१ सालीं दिल्लीजवळ पुन्हां दुष्काळ पडला. मुसलमानी इतिहासकारांनीं या दुष्काळाचें वर्णन फारच सुरेख केलें आहे. इ० स० १३४१ पासून १३५१ पर्यंतचा अकरा वर्षांचा काळ हा ईश्वरी क्षोभाचाच परिणाम होय, असें कांहीं इतिहासकार ह्मणतात. या समयीं दिल्लीचे गादीवर प्रथम महंमद तघलख व

---

१. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ ९–१०.

२. रस्त्यावर पडलेले दाणे टिपणें.

नंतर फिरोजुद्दीन बादशहा होता. त्यानें मात्र प्रजेच्या संरक्षणाकरितां उपाय योजण्यास आरंभ केला. नद्यांच्या पाण्याचा उपयोग शेतकीकडे अनावर्षणप्रसंगीं करितां यावा, ह्मणून ५० नद्यांना त्यानें धरणें बांधिलीं व ३० मोठे तलाव खोदले. यमुनेच्या उगमापासून हिसारापर्यंत नेहेर बांधून ती गागरू नदीस मिळविली. पंजाबांतील सतलजेचाही तिच्याशीं संयोग केला. ह्या त्याच्या व्यवस्थेमुळें दिल्ली, पंजाब आणि आजूबाजूंचा दुसरा प्रदेश हे पूर्णपणें आबाद झाले.

इ० स० १३९६ पासून १४०८ वर्षांपर्यंत एक मोठा दुष्काळ दक्षिण-महाराष्ट्र, राजपुताना, गुजराथ, दिल्ली व हिंदुस्थानचा बहुतेक भाग यांत पडला. हा दुष्काळ 'दुर्गादेवी' या नांवानें प्रसिद्ध आहे. या समयीं कीर्तिराम नांवाच्या राजाचें मोठें राज्य कर्नाटकांत होतें, त्याजवळ त्याच्या कुलदेवतेनें 'नरबलि' मागितला. तो त्यानें दिला नाहीं; ह्मणून हें बारा वर्षांचें अवर्षण पडलें व मनुष्यसंहार झाला, अशी कर्नाटकांतील लोकांची समजूत आहे. हें अवर्षण चार वर्षांचेंच होतें, असें ग्रांट डफ हे आपल्या इतिहासांत म्हणतात. या दुष्काळानें कर्नाटकांतील ८० मैलांच्या आंतील सर्व गांव ओस पडले, असें श्रीगोंदें येथील मामलेदारांनीं दिलेल्या जबाबांत ह्मटलें आहे. या समयीं एका रुपयास एक शेर (८० तोळे) धान्य विकत मिळत असे. ह्यांत सर्व महाराष्ट्र देश हैराण झाला. लुटालुटीचा धंदा करणारे व जबरदस्त लोक मात्र या प्रसंगीं जेमतेम वांचले. या दुष्काळास लढाया व लुटी ह्यांचे योगानें फारच भयंकर स्वरूप आलें. असा महाभयंकर काळ या पूर्वींच्या दोन हजार वर्षांत आला नव्हता असें त्या वेळच्या विद्वानांचें मत आहे. महाराष्ट्रांतून व कर्नाटकांतून इ० स० १३९६–९७ चीं वर्षें दुष्काळाच्या संकटांतून पसार होत आहेत; तोंच इराणचा बादशहा नादीरशहा यानें इ० स० १३९८ मध्यें दिल्लीवर स्वारी केली. त्यानें ह्या देशांत येऊन संपत्तीनें भरलेलीं अशीं शहरें लुटलीं व असंख्य खेडींपाडीं जाळून टाकलीं. त्यानें हा क्रम १३९९ पर्यंत एकसारखा चालविला होता. शेवटीं तो या वर्षीं अपार संपत्ति घेऊन परत गेला. त्याच्या ह्या स्वारीमुळें दिल्लीकडे मोठा दुष्काळ सुरू झाला. बादशहाजवळ संपत्ति उरली नाहीं व इतर

प्रदेशांतून ती येण्याचें साधनहि नव्हतें. या स्वारीमुळें महाराष्ट्रांतील दुष्काळास फारच भयंकर स्वरूप येऊन, महामारीच्या सांथीनें सर्व हिंदुस्थानांत कहर उडवून दिला. थोड्याच काळांत हा दुष्काळ सर्व हिंदुस्थानभर पसरून हाहाःकार सुरू झाला. अन्नावांचून लाखों माणसें व जनावरें या प्रसंगीं मरण पावलीं. पुढें हिंदुस्थानांत अबादी होण्यास हा दुष्काळ मिटल्यावर तीस वर्षें लागलीं. दुष्काळाच्या आरंभास सरकार-सारा फौजेच्या जोरावर जेमतेम थोडासा वसूल झाला; परंतु पुढें तीस वर्षेंपर्यंत प्रजेकडून सरकारास एक पैही मिळाली[१] नाहीं. हा दुष्काळ पडण्यापूर्वीं एक मोठा धूमकेतु महाराष्ट्रांत दिसत होता. मनुष्यें व जनावरें ह्यांच्या अस्थींनीं या प्रसंगीं सर्व दुष्काळग्रस्त प्रदेश व्यापून गेला होता असें म्हणतात.

इ० स० १४१२–१३ सालीं गंगा व यमुना यांच्या जवळचा प्रदेश आणि मारवाड यांत एक दुष्काळ पडला. हा अनावर्षणामुळेंच पडला असावा असें दिसतें. कारण मारवाडांतील बहुतेक प्रजा अन्नपाण्याकरितां गुजराथेंत व खानदेशांत गेली होती. त्या बाजूंस चांगली सुबत्ता असल्यामुळें, ह्या दुष्काळांत फारशी मनुष्यहानि झाली नाहीं. इ० स० १४६० मध्यें महाराष्ट्रांत एक मोठा दुष्काळ पडला. मंगळवेढ्यांतील सरकारी धान्याच्या कोठाराचा दामाजीपंतानें, त्या प्रदेशांतील निर्धन लोकांचे प्राण वांचविण्याकडे या समयीं उपयोग केला असल्याचें दिसून येतें. हा भयंकर दुष्काळ अनावर्षणामुळेंच पडला होता. याचा विस्तार सर्व दक्षिण महाराष्ट्रभर पसरला असावा असें दिसतें.[२] इ० स० १४७१ मध्यें ओरिसा व आसामप्रांतांत अनावर्षण पडलें. या दुष्काळासंबंधानें जास्त माहिती आढळून येत नाहीं. इ० स० १४९१ मध्यें हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत अनावर्षण पडलें होतें. हा काळ फारच भयंकर असल्यामुळें, हिंदुस्थानांतील बरींच निर्धन मनुष्यें मृत्युमुखीं पडलीं. बादशहाकडून प्रजेच्या संरक्षणार्थ सुटलेल्या हुकुमांचा प्रांतांच्या सुभ्यांनीं बरोबर अंमल केला नाहीं; त्यामुळें हें दुष्काळाचें संकट ग-

१. चार्लेस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ १८.

२. मि० खोरी ब्यारिस्टर-ॲट-लॉ-कृत दुष्काळांविषयीं गुजराथी निबंध पृष्ठ ८८.

रीब शेतकऱ्यांना फारच जाचक झालें. बादशहाचा हुकूम जमाबंदी घेण्याचा नसतां, प्रांतांचे सुभे ती वसूल करून तिचा ते आपल्या खानगीकडे उपयोग करीत असत!

इ० स० १५२०–२१ मध्यें मुंबई इलाख्याचा बहुतेक भाग व सिंधप्रांत यांत परराष्ट्रांकडून होणाऱ्या स्वाऱ्यांमुळें दुष्काळ पडला. त्यांतल्यात्यांत सोलापुराकडे पावसाची बरीच कमतरता होती. कर्नल येथरीजच्या रिपोर्टांत ह्या दुष्काळास फारसें महत्त्व दिल्याचें आढळून येत नाहीं. इ० स० १५२७ मध्यें सिंध व पंजाब या प्रांतांत एक मोठा दुष्काळ पडला. ह्या समयीं मिर्झा शहा बेदाई यानें सिंधप्रांतावर स्वारी करून तो प्रांत जिंकून घेतला. शत्रूच्या हातांत धान्य जाऊं नये, ह्मणून त्या वेळचा राजा जामिनदा यानें सर्व धान्याचीं कोठारें जाळून टाकिल्यामुळें, त्या प्रदेशांत धान्याची मोठी तंगी पडून, लोकांचे अन्नावांचून प्राण नष्ट झाले. पंजाबांतहि या वर्षी लढायांमुळें दुष्काळ सुरू झाला होता; परंतु पूर्वीच्या राजकर्त्यांनीं तो प्रांत अबाद करण्याच्या हेतूनें बरीच तर्तूद करून ठेवली होती, ह्या कारणानें तें संकट फार वेळ टिकलें नाहीं. इ० स० १५४० पासून इ० स० १५४३ पर्यंत एक मोठा दुष्काळ सिंध, पंजाब, मुंबई, महाराष्ट्र व सोलापूर या प्रदेशांत पडला. सिंधचा बादशहा शहाहूसन यास हुमायूनची स्वारी आपल्या प्रदेशावर होणार, असें समजतांच, सिंधुनदीच्या पाण्यानें होणारीं पिकें कोणींही काढूं नयेत व बाहेरून येणारें धान्य ह्या देशांत येऊं देऊं नये, असा मिरझा शहा हूननें बंदोबस्त केल्यामुळें, सिंधप्रांत एकदम दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडला. पंजाबप्रांत हुमायूनच्या स्वारीमुळें फारच निर्धन झाला व अन्नावांचून असंख्य माणसें मरण पावलीं. मुंबई इलाख्यांत ह्या सालीं साधारणतः पावसाची तंगी होती, त्यामुळें धान्य कमी पिकलें; त्यांत धान्याचे व्यापाऱ्यांनीं पंजाबांत धान्यास जास्त किंमत येते, या सबबीनें मोसमींत तें खरेदी करून तिकडे नेलें, या कारणानें सर्व मुंबई इलाखा दुष्काळग्रस्त झाला. इ० स० १५५६–५७ सालीं दिल्ली, वायव्यप्रांत, पंजाब व राजपुताना या प्रदेशांवर मोठा दुष्काळ पडला. ह्या वेळीं दिल्लीचे गादीवर अकबर बादशहा होता. हा इतका भयंकर प्रसंग होता कीं, दुष्काळग्रस्त लोकांनीं माणसें मारून खाण्याचा

एकसारखा सपाटा चालविला. मेलेलीं माणसें स्मशानांत नेण्यास त्या समयीं लष्कराची मदत घ्यावी लागत असे. अशी फौज ज्या प्रेताबरोबर नसे, त्या प्रेतवाहकांवर हे दुष्काळग्रस्त लोक हल्ला करीत व प्रेत घेऊन चालते होत, आणि त्याजवरच ते निर्वाह करीत असत. त्यांच्या ह्या क्रमामुळें महामारीचा उपद्रव उद्भवला व दुष्काळग्रस्त लोक नष्ट झाले. कांहीं शहरें या समयीं अन्नपाण्यावांचून असंख्य माणसें मेल्यानें ओसाड पडलीं. हा प्रसंग पाहून अकबराचें मन द्रवलें व त्यानें आपली पूर्वींची राज्यपद्धति बदलून, प्रजेस सुख देण्याकरितां अनेक उपाय योजले. इ० स० १५७९ मध्यें कच्छच्या राज्यांत मोठा दुष्काळ अनावर्षणामुळें पडला. मोठमोठीं अब्रूदार घराणीं या दुष्काळांत पायमाल झालीं. या समयीं कच्छचे गादीवर राय बहारमलजी हे होते. त्यांनीं आपल्या खासगी संपत्तीचा उपयोग करून, गरीब लोक व राज्यांतील नामांकित कुटुंबें, यांचें संरक्षण केलें. इ० स० १५९६ मध्यें मध्यहिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला. ह्याचा विस्तार सर्व आशियाभर वाढला होता. अकबराची राज्यपद्धति उत्तम प्रकारची असल्यामुळें, या दुष्काळाचा संस्कार दक्षिण हिंदुस्थानास जाचक झाला नाहीं. हा दुष्काळ पडण्यापूर्वी नैर्ऋत्य बाजूस एक मोठा धूमकेतु १८ दिवसपर्यंत दिसत होता.[1] इ० स० १५०१ पासून १६०० पर्यंतच्या शंभर वर्षांत हिंदुस्थानांत एकंदर सहा दुष्काळ पडले व त्यांनीं सरासरीनें ११ वर्षांचा काळ गुंतविला होता. ह्या दुष्काळांत अनावर्षणापासून दोन व केवळ लढायांमुळें चार दुष्काळ पडले होते.

'मिराते अहमदी' नांवाचे उर्दू ग्रंथावरून इ० स० १६२८–२९ सालचा गुजराथेंतील दुष्काळ फारच भयंकर होता असें दिसून येतें. या पूर्वींच्या बत्तीस वर्षांपूर्वी पडलेल्या दुष्काळांपेक्षां हा जास्त मोठा होता. एल्फिन्स्टन साहेबांनीं आपल्या इतिहासांत ह्या दुष्काळाचें बरेंच वर्णन दिलें आहे. हा दुष्काळ दोन वर्षेपर्यंत चालू होता. ह्या दोन वर्षांत पाऊस बिलकुल पडला नाहीं. चैत्र वैशाख महिना येतांच पटकीची सांथ सुरू झाली. ती दीड वर्षपर्यंत होती. जिकडे मार्ग सुचेल तिकडे लोक पळून गेले. त्यामुळें त्याचा वि-

१. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ १९.

स्तार दक्षिण महाराष्ट्राच्या बाहेरच्या प्रदेशावर विशेष वाढून, सुपीक ह्मणविलेला माळवा देशहि या समयीं दुष्काळाच्या पूर्ण सपाट्यांत सांपडला. महाराष्ट्रांतील लोकांस हें दुष्काळाचें संकट फार नडलें. ह्या समयीं दिल्लीचे गादीवर मोंगल वंशांतील शहाजहान बादशहा होता व दक्षिणची सुभेगिरी मुर्तुजाखानाकडे होती. ह्या दुष्काळाचें सर्व जोखीम मुर्तुजाखानाचा वजीर मलिकंबर याजवर ठेवून, त्यास बादशहानें नोकरींतून एकदम कमी केलें. शहाजहान बादशहानें दुष्काळाचें संकट कमी करण्याचे हेतूनें कोणते परिश्रम घेतले होते, तें आढळून येत नाहीं. या समयीं धान्याची फारच तंगी झाल्यानें पोरें विकण्यापर्यंत पाळी आली होती; परंतु तीं विकत घेणारें गिऱ्हाईकच मिळत नव्हतें. उंटासारखें महत्त्वाचें जनावर एक रुपयास मिळत होतें. कुत्रीं सुद्धां लोकांनीं मारून खाल्लीं. जनावरांचीं हाडें कुटून त्यांचें पीठ करून, त्याच्या भाकरींचाहि खाण्याकडे लोक उपयोग करूं लागले होते.[१] इ० स० १६३१ मध्यें, महाराष्ट्र, गुजराथ, काठेवाड व कच्छ या प्रांतांत अनावर्षण पडलें. यास गुजराथेंतील लोक 'सत्यायशींचा काळ' असें ह्मणतात. विक्रम संवत् १६८७ मध्यें हा पडल्यामुळेंच त्यास ही संज्ञा मिळाली होती. धान्य बरोबर पिकलें नाहीं व मारवाडचें भिकार येऊन गुजराथेंत दाखल होतांच, ह्या दुष्काळानें भयंकर रूप धारण केलें. दुष्काळपीडित माणसें मनुष्यांस मारून खाऊं लागलीं होतीं. अमदाबाद, सुरत व बऱ्हाणपुर येथील सुभ्यांनीं सरकारी कोठारांतील धान्य प्रजेस वांटून द्यावें, असा दिल्लीचा बादशहा शहाजहान यानें हुकूम सोडला होता. सरकारी खजिन्यांतूनहि सुमारें पन्नास हजार रुपये दुष्काळनिवारणार्थ खर्च पडल्याचें आढळून येतें. या सालची जमाबंदी सरकारानें बिलकुल वसूल केली नाहीं. या दुष्काळाचा विस्तार सर्व आशिया खंडभर थोड्याबहुत मानानें वाढला होता.

इ० स० १६४० पासून १६५५ पर्यंत जीं सोळा वर्षें गेलीं, त्यांत निरनिराळ्या काळीं भिन्न भिन्न स्थळीं दुष्काळाचें संकट कमीजास्त प्रमाणानें उद्भवलें होतें. गुजराथेंत हा दुष्काळ सात वर्षेंपर्यंत होता. हा

१. मि. खोरीकृत 'दुष्काळांविषयीं निबंध' पृष्ठ ४९-५०.

महाराष्ट्रांत व बंगाल्यांतहि फैलावला असल्याचें आढळून येतें. इ० स० १६५०–५२ मध्यें गुजराथेंत मनुष्यांचा अतिशय संहार झाला. देशांत बरीच अस्वस्थता होती; त्यामुळें यास जास्त भयंकर स्वरूप आलें असावें असें दिसतें. दक्षिणेंत ब्राह्मणी राज्यांना आलेली पडती दशा, दिल्लीहून होणाऱ्या स्वाऱ्या, शिवाजीचा महाराष्ट्र राज्यसंस्थापनेचा अद्वितीय प्रयत्न व असंख्य लुटारू याच वेळीं पुढें येऊन त्यांनीं देशाची केलेली खराबी, यांच्या योगानें ह्या दुष्काळाची मुदत जास्त वाढली असेल हें संभवनीय आहे. इ० स० १६६१ मध्यें मध्यप्रांत, पंजाब व बंगाल यांत दुष्काळ पडला. ह्या समयीं दिल्लीच्या गादीवर औरंगजेबास बसून पुरतीं तीनहि वर्षें झालीं नव्हतीं. या समयीं महाराष्ट्रांतील मोंगलांच्या सत्तेस बरीच उतरती कळा लागून, तिकडचा बहुतेक प्रदेश छत्रपति शिवाजी महाराजांच्या ताब्यांत गेला होता. त्यामुळें बंगाल, पंजाब व मध्यप्रांत हे आपल्या ताब्यांत रहावे, याकरितां बादशहानें प्रजेवरील सर्व प्रकारचे कर माफ केले. तो बादशहा जरी अत्यंत क्रूर असे, तरी त्यानें आपल्या अमर्याद खजिन्याचा व रत्नभाण्डाराचा उपयोग दुष्काळग्रस्त लोक व जनावरें यांचे जीव वांचविण्याकडे केला. त्याच्या राज्यापैकीं ज्या भागांत धान्याचें पीक आलें होतें, त्या देशाच्या खपापुरतें धान्य तेथें ठेवून, बाकीचें सर्व धान्य त्यानें दुष्काळग्रस्त प्रांतांत मागविलें, व ज्यांच्या जवळ संपत्ति होती त्यांना स्वस्त दरानें तें विकलें आणि बाकीच्या अनाथ लोकांस तें फुकट वांटलें. त्यानें आपले विलास व उत्सव बंद केले. दरबारचे मोठे खर्च कमी करून, तो दुष्काळाशीं सामना करण्यांत गढून गेला. त्याच्या ह्या व्यवस्थेमुळें हा दुष्काळ फारसा तापप्रद झाला नसावा असें दिसतें. बंगाल्यांतील जमीन रसाळ असून, तिकडे पावसाची हाकाटी बहुधा नसते, त्यामुळें तो प्रांत सहसा दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडत नाहीं; परंतु या प्रसंगीं टोळधाड येऊन अतिशय खराबी झाली; व राज्यांतील सुभे प्रबळ होऊन त्यांनीं जुल्म चालविल्यामुळेंच हा दुष्काळ तिकडे पडला होता असें ह्मणतात. ह्या वेळीं पंजाब व दिल्ली ह्यांच्या लगत्यास मात्र साधारण अनावर्षण होतें.

इ० स० १६८२–८३ मध्यें गुजराथेंत पाऊस बरोबर पडला नाहीं. त्यामुळें गुजराथेंत व मारवाडांत दुष्काळ पडला. या प्रसंगीं महाराष्ट्रांत छत्रपति संभाजीची कारकीर्द सुरू होती; त्यामुळें मोंगल बादशहांनीं तिकडून धान्य मागवून गुजराथेंतील प्रजेचें संरक्षण केलें. या समयीं अमदाबादचे सुभेगिरीवर महमद अमीखान हा होता. तो ईदीच्या सणानिमित्त मोठ्या समारंभानिशीं फिरण्यास निघाला असतां, त्याजवर तेथील दुष्काळपीडित लोकांनीं हल्ला केला. दंगा करण्याऱ्या लोकांची कत्तल करावी असा औरंगजेबानें हुकूम केला होता; परंतु सुभेदार पोक्त वयाचा असल्यामुळें, त्यानें तसें न करितां त्यांतील पुढारी इसमास मात्र विषप्रयोगानें ठार मारविलें व बाकीच्या लोकांची खाण्यापिण्याची त्यानें नीट व्यवस्था लावून दिली. ह्या दुष्काळाची साग्र हकीकत 'मिराते अहमदी' नामक ग्रंथांत फारच हृदयद्रावक दिली आहे. ह्या शतकांत हिंदुस्थानावर एकंदर पांच दुष्काळ पडले, व त्यांत २२ वर्षें गेलीं. या काळांत मनुष्यें व जनावरें यांच्या प्राणांची जी हानि झाली, तिचें साग्र वर्णन फारच भयंकर आहे.

इ० स० १७०३ मध्यें मुंबई इलाख्याच्या बहुतेक भागांत अनावर्षण पडलें; परंतु त्या सर्वांत "थर आणि पारकर" ह्या विभागांत दुष्काळास फारच भयंकर स्वरूप आलें. इ० स० १७१८ मध्यें गुजराथ, महाराष्ट्र व मद्रास या प्रांतांत अनावर्षण पडलें. गुजराथेंत साधारण पावसाची कमतरता होती; परंतु बादशाही जुलमामुळें, त्या देशांतील प्रजेस दुष्काळाच्या फेऱ्यांत सांपडावें लागलें. ह्या समयीं दिल्लीच्या गादीवर फेरुकशहा बादशहा होता, व त्याची हुकमत गुजराथेंतील सुभे मानीत नव्हते. या दुष्काळास गुजराथेंतील लोक तो विक्रम संवत् १७७४ मध्यें पडला ह्मणून "चुंवोतेरो काळ' या संज्ञेनें ओळखितात. त्या समयीं भुकेनें व्याकुळ झालेल्या आईबापांनीं मुलें दोन दोन रुपयांस विकलीं. ह्या वेळीं बाजरी रुपयास ८ शेर (४० तोळ्यांचा शेर) मिळत होती. हा दुष्काळ दोन वर्षेंपर्यंत होता. मारवाडांतहि हा पडल्यामुळें, तिकडील भिकार गुजराथेंत आलें; व त्याचा जोर फार वाढला. गुजराथेंतील भिकार दक्षिणेंत गेलें, त्यामुळें तिकडेहि जबरदस्त महागाई सुरू झाली. इ० स० १७३१

मध्यें गुजराथ, काठेवाड, मारवाड व पंजाब वगैरे ठिकाणीं दुष्काळ पडला. गुजराथेंतील मुसलमानी राज्याची सत्ता निर्बळ झाल्याकारणानें, दक्षिणेंतून मराठ्यांच्या स्वाऱ्या गुजराथेवर होऊं लागल्या होत्या. गुजराथेचे बादशाही सुभे स्वार्थी होऊन, नुकतेच मोंगल बादशाहीचा द्रोह करण्यास लागले होते. इतक्यांत मराठ्यांच्या स्वाऱ्या होतांच, त्यांची सत्ता लोपत चालली, व प्रजा दुष्काळाच्या आणि महर्गतेच्या पूर्ण तडाक्यांत सांपडली. ह्या दुष्काळांत बरींच माणसें अन्नावांचून व कांहीं लढायांत मेलीं. येवढ्यानें हें संकट संपलें नाहीं. सन १७३२ चा बहुतेक पावसाळा गुजराथेंत व मारवाडांत कोरडा गेला; त्यामुळें गुजराथेंतील व मारवाडांतील बराच भाग ओसाड पडला. गुजराथेच्या कांहीं भागांत आरंभास पाऊस अतिशय पडून महापुरानें बरीच हानि झाली. इ० स० १७३३ मध्यें वायव्यप्रांत, मद्रास, गुजराथेचा वरचा भाग व राजपुताना यांत मोठा दुष्काळ पडला. त्याचें संकट मद्रासेंत व वायव्यप्रांतांत बरेंच असह्य झालें होतें. मद्रास इलाखा पूर्वी हिंदुराजांच्या ताब्यांत होता, त्यामुळें त्या राज्यकर्त्यांनीं ह्या प्रदेशावर दुष्काळाचें संकट येऊं नये ह्मणून, शेतकीच्या उपयोगास येतील असे जे मोठमोठे तलाव बांधले होते; त्यांची मुसलमान राज्यकर्त्यांनीं दुरुस्ती केली नाहीं, व कांहीं तर त्यांनीं मुद्दाम बुजवून टाकले असल्यानें, हें अनावर्षण पडतांच तिकडे धान्य बिलकूल पिकलें नाहीं. इ० स० १७२९ मध्यें ठरवून दिलेल्या निरखाप्रमाणें धान्य विकावें लागलें, त्या योगानें तें एकदम खपलें. ह्या दुष्काळांत एक गार्स[१] धान्यास ४० पेगोदा[२] किंमत पडत असे. हल्लींच्या मानानें ती बिलकुल जास्त नव्हती. इ० स० १७३७ मध्यें, राजपुतान्यांत व इ० स० १७३९ मध्यें दिल्लीची आजूबाजू, गुजराथ, महाराष्ट्र व मद्रास ह्यांत दुष्काळ पडला होता. हे दुष्काळ जरी भयंकर होते तरी त्यांची असावी तशी माहिती उपलब्ध नाहीं. इ० स० १७४१ मध्यें खानदेशांत पेंढाऱ्यांनीं केलेल्या लुटीमुळें दुष्काळास भयंकर स्वरूप आलें. इ० स० १७४४ व ४५ पासून १७५२ पर्यंत हिंदुस्थानच्या

---

१. एक 'गार्स' ह्मणजे सुमारें २६० मण ( कच्चे ) होतात.

२. एक 'पेगोदा' ह्मणजे सुमारे साडेतीन रुपये.

बऱ्याच भागांत दोन मोठे दुष्काळ; अनावर्षण, अतिवृष्टि आणि राजसत्तेची अव्यवस्था ह्या कारणांनीं पडले. ह्या समयीं गुजराथेंत गहूं व बाजरी तीन रुपयांस मण या भावानें मिळत होती व तांदूळ साडेतीन रुपयांनीं मण याप्रमाणें मिळत असत. दुष्काळ पडण्यापूर्वीं पूर्वोक्त धान्यें दीड रुपयास मण या भावानें मिळत होतीं. ह्या दुष्काळांत गवताच्या कमतरतेमुळें असंख्य ढोरें मेलीं. यानें गुजराथेंत अतिशयित हानि केली. गुजराथेंतील सर्व नद्या व तलाव आटून जाऊन त्यांतून धूळ उडूं लागली. मेलेल्या माणसांचे व ढोरांचे मांसावरहि कांहीं दुष्काळग्रस्त लोक निर्वाह करूं लागले होते. यांत इ० स० १७४७ चें वर्ष गुजराथेस फारच असह्य गेलें. कोळी व भिल्ल लोक शहरांत जाऊन बाजार लुटीत, त्यामुळें गुजराथेंतील धान्याचे व्यापारी धान्यांत "एक शेर धान्यास एक मण रेती" याप्रमाणें मिश्रण करून ठेवीत. ह्या रीतीनें मणाचा बोजा चोरून नेणारास अवघें एकच शेर धान्य सर्व दिवसभर तें निवडून काढण्याचा यत्न केल्यास मिळत असे. इ० स० १७४६ चें साल कच्छ संस्थानास तापदायक झालें. तेथील राजा लखपतजी यानें सर्व प्रजेच्या संरक्षणाकरितां मोठीं अन्नगृहें काढून, आपली कीर्ति त्या देशाच्या इतिहासांत अमर करून ठेविली. ह्या दुष्काळांत कच्छमध्यें एका रुपयास ३२ शेर बाजरी, ( ४० तोळ्यांचा शेर ) दररुपयास सवाचार शेर तूप व सवाआठ शेर तेल मिळत असे. रेवाकांठ्यांत इ० स० १७४६–४७ हीं दोन सालें वाईट गेलीं. या विभागांत जंगली लोकांनीं आपलीं शेतकीचीं जनावरें मारून खाल्लीं. कांहीं मुसलमान रहिवाशांनीं तर त्या वेळीं आलेल्या टोळांची शिकार करून आपले जीव जेमतेम वांचविले. इ० स० १७५७ पासून १७६० पर्यंत सिंध, गुजराथ, कच्छ व हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत भिन्न भिन्न समयीं दुष्काळ पडले व ते पडण्याचीं कारणेंहि अनेक होतीं. साधारणतः पिकें कमी येऊन, त्यांतच लढाया सुरू झाल्या. सिंधप्रांतास अनावर्षणाचें बिलकूल भय नसतें. सिंधूच्या कांठच्या सर्व प्रदेशांत खऱ्या अनावर्षणांत उत्तम पिकें येत असतात. इ० स० १७५९ मध्यें सिंधप्रांतांत लढाई झाल्यामुळें फारच मोठी तंगी पडली, परंतु तें संकट भयंकर स्वरूपास

जाऊन पोहोंचलें नव्हतें. इ० स० १७५९-६० ह्या वर्षीं गुजराथेंत मराठे व मुसलमान यांचे दरम्यान ज्या मोठ्या लढाया झाल्या, त्यांमुळें दुष्काळास अति भयंकर स्वरूप आलें. मराठ्यांच्या लष्करांत एका रुपयास तीन शेर, व बादशाही लष्करांत एका रुपयास दोन शेरच धान्य विकलें जात होतें. अमदाबाद, बडोदें, भडोच, सुरत वगैरे ठिकाणीं एका रुपयास सहा शेर बाजरी मोठ्या शिकस्तीनें मिळत असे. इ० स० १७६१ मध्यें तर ह्या प्रदेशावर अनावर्षणच पडलें; त्यामुळें मागल्या दुष्काळांत जे लोक जेमतेम जीव वांचवून होते, त्यांना ही आपत्ति असह्य झाली. याच सालीं पानपतास लढाई होऊन पेशव्यांचा मोड झाल्यामुळें, सर्व महाराष्ट्रांत जो हाहाःकार उडाला त्याचें, व मध्यहिंदुस्थानावर आणि दिल्लीच्या जवळच्या प्रदेशावर दुष्काळाचें जें संकट येऊन पडलें, त्याचें थोडक्यांत वर्णन होणें अशक्य आहे. या दुष्काळाचा संस्कार अमदाबादेवर वाईट रीतीनें घडला. हवेंत विकृति उद्भवून व मारवाड्यांच्या गर्दीमुळें दररोज हजारों माणसें तेथें मरत होतीं. प्रेताची व्यवस्था करण्यास माणसें मिळत नव्हतीं. साबरमतीच्या कांठीं एक मोठा खाडा खोदून त्यांत प्रेतें टाकीत असत. या दुष्काळामुळें सात वर्षेंपर्यंत धान्याचे भाव तेजीवर होते. साधारणतः धान्य एक रुपयास कच्चे २० शेर मिळत असे. ह्यांत बऱ्याच लोकांनीं आपलीं पोरें एका रुपयास दोन या प्रमाणानें विकलीं. इ० स० १७६५ मध्यें मुंबई, सिंध, मारवाड, काठेवाड वगैरे भागांत अनावर्षण पडलें. इ० स० १७६६ चें वर्ष मात्र कच्छ संस्थानांतील लोकांस आपत्तीचें होतें. इ० स० १७६८ मध्यें भयंकर पूर आला व इ० स० १७६९ सालीं अनावर्षण पडलें. यामुळें हीं पांच वर्षे हिंदुस्थानांतील लोकांस फारच वाईट गेलीं. इ० स० १७७० मध्यें बंगाल, बहार, ओरिसा, असाम व वायव्यप्रांत ह्यांत मोठा दुष्काळ पडला. हिंदुस्थानांत या शतकांत पडलेल्या सर्व दुष्काळांपेक्षां हा फारच भयंकर होता[1]. ह्या दुष्काळानें बंगालच्या सुपीक भागांपैकीं एक तृतीयांश प्रदेश वैराण झाला; असें बर्डस्मिथ हे ह्मणतात. या सालीं पावसाचा एक थेंबहि पडला

---

१. मि. मिलकृत हिंदुस्थानचा इतिहास भाग ३ पृष्ठ ४८६.

नाहीं. जानेवारीपासून मेपर्यंत पावसाचे कांहीं सरवे पडले असतां तिकडे पीक येत असतें. तेहि या वर्षी पडले नाहींत. या दुष्काळानें एकट्या पाटणाशहरांत उपासमारानें दररोज ५० मृत्यु होऊं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं ही संख्या तिप्पट वाढली. इ० स० १७७० मध्यें सर्व बंगाल्यांत मृत्यूनें कहर उडवून दिला. मुर्शिदाबादेस मृत्युसंख्या इतकी वाढली कीं, प्रेतांना स्मशानांत नेण्यास माणूस नसल्यामुळें, कुत्रे, कोल्हे व गिधाडें गांवांत शिरून त्यांचें भक्षण करीत. बंगाल इलाख्यांत ह्या समयीं एकंदर तीस लाख माणसें मरण पावलीं. कांहींचें म्हणणें, एक कोटी माणसें मृत्युमुखीं पडलीं असें आहे. या दुष्काळाचा विस्तार १,३०,००० चौरस मैलांत वाढला होता व त्याच्या तावडींत तीन कोटी लोकसंख्या सांपडली होती. ग्रांट डफच्या मताप्रमाणें बंगाल्यांतील वस्तीचा पंचमांश आणि वॉर्ड व मार्शमेन ह्यांच्या ह्मणण्याप्रमाणें एक तृतीयांश भाग ह्या दुष्काळामुळें नष्ट झाला. मि. मिल हे ह्मणतात कीं, ह्या दुष्काळानें बंगाल्यांतील लोकसंख्येपैकीं, शेंकडा ६२$\frac{1}{2}$ माणसें मृत्युमुखीं पडलीं. ह्या वेळीं बंगाल्यांत 'ईस्ट इंडिया कंपनी'चा अंमल होता. तिनें आपल्या प्रजेच्या संरक्षणार्थ कोणत्या योजना केल्या होत्या हें आढळून येत नाहीं. उलट कंपनीच्या कामदारांनीं धान्याचा व्यापार करण्याची ही उत्तम संधि समजून, त्यांनीं धान्याचीं खानगी दुकानें घातलीं; व त्याजवर अपार संपत्ति मिळविली. हा दुष्काळ बंगाल्यांतील इंग्लिश लोकांना पैसे कमाविण्याकरितांच आला असल्यानें, मोठमोठे एतद्देशीय धनाढ्य ह्मणविलेले लोक, संपत्ति संपल्यामुळें शेवटीं मृत्युमुखीं पडले. ह्या दुष्काळाचें लार्ड मेकॉले यांनीं फारच सुरेख व सत्यास अनुसरून थोडक्यांत केलेलें वर्णन लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते ह्मणतातः—"इ० स० १७७० चा पावसाळा कोरडा गेला, जमीन वाळून गेली, तलाव कोरडे पडले व नद्या रिकाम्या झाल्या आणि एक असा भयंकर दुष्काळ पडला कीं, त्याचें खरें ज्ञान ज्या कुटुंबाचा निर्वाह त्याच्या मालकीच्या जमिनीवरच चालतो त्यासच बरोबर होईल. गंगेच्या आजूबाजूच्या प्रदेशांत कंगालपणानें अनर्थ केला. गर्भश्रीमंतींत जन्म होऊन ज्यांचें बहुतेक आयुष्य श्रीमंतपणांतच गेलें, अशा

नाजूक, तरुण व सुंदर स्त्रियांचीं मनोहर मुखकमलें कोणाच्याहि दृष्टीस पूर्वीं पडत नव्हतीं, त्याच स्त्रिया या प्रसंगीं आपल्या एकुलत्या एक मुलाकरितां, घरोघर दीनवाणीनें मूठभर भिक्षेकरितां हिंडत असत. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या उजळ दिसणाऱ्या लोकांजवळ दीनस्वरानें याचना करितांना, त्यांच्या नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वाहत होत्या. हुगळी नदीचें पाणी दुष्काळपीडित असंख्य लोकांचीं प्रेतें युरोपियनांच्या आंगणांत व बागांत वाहून नेत होतें. कलकत्त्यामधील मोहोल्यांतील रस्त्यांवर उपासमारानें मरण पावलेल्या व मरणाच्या तयारींत असलेल्या माणसांची एकच गर्दी झाल्यानें, त्या बाजूनें जाणारास मार्ग मिळत नव्हता. मरण पावलेल्या कुटुंबांतील माणसांस अग्निसंस्कार करण्याची किंवा नदींत नेऊन टाकण्याचीहि उपासांमुळें लोकांस शक्ति उरली नव्हती. आपल्या घरांत शिरून कोल्हे व गिधाडें कुटुंबांतील मनुष्यांच्या शरीराचे लचकें तोडीत असतां, त्यांना हांकून काढण्याचेंहि सामर्थ्य त्यांस नव्हतें. सर्व कलकत्ता शहर दुर्गंधीनें भरून गेल्यामुळें कोल्हे, कुत्रे व गिधाडें यांचें तें पूर्ण वसतिस्थान बनलें. हीं जनावरें मनुष्यांचें मांस भक्षण केल्यामुळें इतकीं पिसाळलीं कीं, तीं पुढें जिवंत माणसांवरहि हल्ला करूं लागलीं. ह्या दुष्काळांत दक्षिण बंगाल्यांत एक रुपयास तीन शेर तांदूळ, सवातीन शेर बाजरी, सवाचार शेर गहूं, चार शेर तुरीची डाळ मिळत होती. तूप मात्र २० रुपयांनीं मण मिळत असे."

कर्नल येथरीजच्या रिपोर्टावरून इ० स० १७७३ मध्यें मुंबई इलाख्यांत अनावर्षण पडलें होतें असें दिसतें. ह्या दुष्काळाचा संस्कार कच्छ संस्थानावरहि इ० स० १७७४ मध्यें [1]घडला; ह्या दुष्काळामुळें ईस्ट इंडिया कंपनीचें बरेंच नुकसान झालें. दिल्लीकडे तिला मुलकीचें उत्पन्न बरोबर मिळालें नाहीं. इ० स० १७८१–८२ मध्यें मुंबई इलाखा व मद्रास या बाजूंस दुष्काळ पडला. मद्रासचा कांहीं भाग १७८० मध्यें धान्याचे साधारण तंगींत होता व त्यांत कर्नाटकप्रांत हैदरअल्लीनें १७८० मध्यें

१. मि. खोरीकृत दुष्काळांविषयीं गुजराथी निबंध पृष्ठ ६८.

उध्वस्त केला; त्यामुळें दुष्काळाचें भयंकर स्वरूप एकदम पुढें आलें. या समयीं मद्रास-सरकारानें बरेंच धान्य बाहेरून आणविलें व व्यापाऱ्यांनीं अमुक भावानें तें विकावें असें ठरविलें; परंतु त्याचा त्या देशांतील व्यापाऱ्यांनीं गैर उपयोग करून, त्या प्रदेशावरील दुष्काळाच्या संकटाची एकदम वाढ केली. हा इ० स० १७८२ मध्यें भयंकर स्वरूपास पोहोंचला. बंगाल्यांतील उदार लोकांनीं या दुष्काळनिवारणार्थ तीस हजार रुपयांचा फंड जमवून पाठविला होता. 'मोनिगा मुलमी' नांवाच्या अन्नगृहांत चार हजार माणसांचे प्राण तेथील सरकारानें वांचविले. या कामाकरितां ८०,००० रुपयांचा स्वतंत्र फंड जमा झाला होता. इतकी जरी व्यवस्था केली होती, तरी अन्नावांचून पीडित झालेल्या असंख्य लोकांचीं प्रेतें दररोज रस्त्यावर पडत असत. या वेळीं एका गार्सला १५० पेगोदा म्हणजे सरासरी एका रुपयास २० शेर ( ४० तोळ्यांचा ) बाजरी मिळत होती. कोलेरा वंशाची सिंधप्रांतांतील राजसत्ता बंद होऊन, तेथें तालपुर वंशाचें राज्य इ० स० १७८२ मध्यें स्थापन झालें. या समयीं लढायांमुळें सिंधप्रांतांत दुष्काळ पडला. शिल्लक असलेलें सर्व धान्य जळून गेलें व दोन वर्षें पिकें आलीं नाहींत. या समयीं एक करवार धान्यास ५० रुपये पडत होते. तालपुर वंशांतील राजकर्त्यांनीं दुष्काळनिवारणाकरितां केलेली योजना फारच चांगली होती. ज्या शेतकऱ्यांच्या संग्रहास वीस करवारी धान्य होतें, त्यांना जमीनधारा त्या सरकारानें माफ केला. ज्या शेतकऱ्यांजवळ विसांपेक्षां जास्त करवारी धान्य होतें त्यानें दर वीस करवारींस एक करवार धान्य सरकारास द्यावें असें ठरविलें. त्यामुळें तें संकट असह्य झालें नाहीं. इ० स० १७८३ मध्यें मध्यप्रांत, पंजाब व वायव्यप्रांत हे दुष्काळाच्या तावडींत सांपडले. हा दुष्काळ थर आणि पारकर या सिंधच्या विभागांत इ० स० १७८३ पासून १७९० पर्यंत कमी जास्त प्रमाणानें एकसारखा कायमच होता. या इ० स० १७८२—८३ च्या दुष्काळानें गुजराथेंतील बरींच खेडीं ओसाड पडलीं. ह्या दुष्काळाचा विस्तार वायव्यप्रांतांत फार वाढला. बंगाल व ओरिसा यांच्या उत्तर बाजूपासून लाहोरापर्यंत हा पसरला होता.

या समयीं एक रुपयास १० शेर ( पक्के ) धान्य मिळत होतें. हा फारच भयंकर होता असें कानपूरच्या एका ९० वर्षांच्या मनुष्यानें कमिशनपुढें दिलेल्या जबानीवरून दिसतें. इ० स० १७८४ पासून १७८६ पर्यंत उत्तर हिंदुस्थान, अयोध्या व मुंबई इलाखा यांत दुष्काळ पडले होते. टोळ-धाड, अनावर्षण व लहान लढाया यांनीं त्याचें स्वरूप भयंकर झालें. इ० स० १७६६ चा दुष्काळ गुजराथेंत 'बेताला' या संज्ञेनें प्रसिद्ध आहे. पंजाबांत दुष्काळानें इ० स० १७८५ मध्यें दहा लाख माणसें मेलीं. गुजराथेंपैकीं पालनपुरांत याचा भयंकर परिणाम घडला. कोळी व भिल्लांच्या टोळ्या शहरांतील बाजारांत येऊन धान्याची लूट करीत असल्या-मुळें, धान्याचे व्यापारी संग्रहास असलेलें धान्य जमिनींत मोठ्या बंदोबस्तानें पुरून ठेवीत. या समयीं अयोध्येचे गादीवर असफ उद्दौला हा होता. त्यानें या दुष्काळांत इमामवाडा व रुमाम दरवाजा ह्या दोन इमारती मध्यम स्थितींतील लोकांकडून रात्रीं मशाली लावून काम घेऊन तयार केल्या. सर्व प्रकारच्या लोकांना अन्न देऊन, असफ उद्दौल्यानें औदार्यासंबंधीं आपलें नांव इतिहासांत कायम ठेवलें आहे.

इ० स० १७८७ पासून १७९२ पर्यंतच्या सहा वर्षांत सर्व हिंदुस्था-नांत थोड्याबहुत प्रमाणानें दुष्काळाचें संकट पसरलें होतें. मद्रास, मुंबई, गुजराथ, मारवाड, पंजाब, महाराष्ट्र, वायव्यप्रांत वगैरे भागीं हा होता. इ० स० १७९० पासून ९२ पर्यंत मद्रासच्या उत्तर भागांत याचा जोर जास्त असल्यानें, इ० स० १७९१ च्या एप्रील मध्यें विजागापट्टणाज-वळ १२०० माणसें मेलीं. सरकार दरमनुष्यास पावशेर धान्य देत होतें. एका रुपयास १२ शेर तांदूळ मद्रासेंत मिळत असत. गंजामांतील सरका-रानें तांदुळांच्या पेजेवर ३०० अनाथांस पोसलें होतें. दुष्काळाच्या कामा-वरील २ हजार माणसांस पैशाच्या बदल्यांत धान्याच्या रूपांत मजुरी देत असत. बाहेरून धान्य पुष्कळ यावें, ह्मणून त्याजवरील जकात सरकारानें माफ केली होती; परंतु त्यामुळें फायदा झाल्याचें सरकारास आढळून आलें नाहीं. बंगाल्यांतील तांदूळ सरकारानें मागविल्याकारणानें हें संकट कांहीं कमी झालें. सावंतवाडीच्या राज्यांत याचा जोर फार वाढला होता.

त्या सरकारानें धान्याचीं जहाजें पकडून त्यांजवरील सर्व धान्य दुष्काळग्रस्त लोकांच्या उपयोगास आणलें. या समयीं तेथें एक रुपयास ३ शेर तांदूळ, ८ शेर नागली, ८ शेर ज्वारी व ९ शेर उडीद मिळत असत. हा दुष्काळ रत्नागिरी जिल्ह्यांतहि असह्य झाला होता. त्यामुळें सरकारचा सारा वसूल होण्यास बरोबर ३० वर्षे लागलीं. कर्नाटकांत हा १७९१ चा दुष्काळ 'दोगीबुरा' या नांवानें प्रसिद्ध आहे. 'दोगी' म्हणजे 'मनुष्याचे मस्तकाची कवटी' व 'बुरा' म्हणजे 'दुष्काळ'. ह्याच सालीं दुष्काळ व सांथीच्या रोगानें असंख्य माणसें मेलीं. सर्व प्रदेशांत मनुष्यांच्या अस्थी व मस्तकाच्या कवट्या दिसत होत्या, त्यामुळें ही संज्ञा मिळाली असावी. लोकांच्या संग्रहास धान्य नव्हतें, त्यांत अनावर्षण आणि लढाया सुरू झाल्यामुळें, या दुष्काळास कर्नाटकांत अतिशय भयंकर स्वरूप आलें. झाडांच्या पानावर लोकांनीं निर्वाह चालविल्याकारणानें, सर्व झाडें मृतवत् दिसत होतीं. या समयीं सवादहा आण्यांस एक शेर धान्य मिळत होतें. इ० स० १७८७ पासून इ० स० १७९६ पर्यंत पाऊस बरोबर न पडल्यामुळें व मध्यंतरीं टोळधाड आल्यानें पंढरपुर, सोलापुर व बेळगांवाकडे मोठा दुष्काळ पडला. ह्या दुष्काळाचा जोर १७९१–९२ मध्यें फार होता. पैसे देऊन धान्य मिळेना व धर्माप्रमाणें मांसाहार त्याज्य, यास्तव बऱ्याच लोकांनीं विषप्रयोग करून आत्महत्त्या केली. गरीब लोक झाडपाला व मेलेल्या जनावरांचें आणि माणसांचें मांस खाऊन रहात असत. गोकाक तालुक्यांतील १५ हजार माणसें केवळ दुष्काळाचे सबबीनें मेलीं. पंढरपुरास एका रुपयास ३ शेर बाजरी मिळत होती. पुढें दुष्काळास भयंकर स्वरूप आलें. इ० स० १७९२–९३ मध्यें पुणें जिल्ह्यांत बरोबर पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडला; व त्यांत इतर ठिकाणच्या भिकाऱ्यांनीं भर घातली. कलादगी जिल्ह्यांत इ० स० १७९१ पासून ९४ पर्यंत लढाया व लुटी चालू होत्या. टिपु सुलतान, पेशवे व इंग्लिश ह्यांच्या या वेळीं लढाया चालत असल्यानें, सर्व महाराष्ट्र मोठ्या भयंकर संकटांत सांपडला होता. सिन्नर तालुक्यांत या १७९३–९४ च्या दुष्काळांत रुपयाची पांचशेर बाजरी मिळत होती. सर्व गुजराथ देश या इ० स० १७९०–९१ च्या दुष्काळांत लुटारूंनीं

व भिकाऱ्यांनीं भरून गेल्यानें, गुजराथेंत माणसें व जनावरें फार मेलीं. काठेवाडांत व मारवाडांत हा फार भयंकर अवस्थेस जाऊन पोंचला. भडोच जिल्ह्यांत या समयीं ४५ रुपयांस एक कळशी भावानें बाजरी मिळत होती. बडोद्याचे आसपास याचा जोर फार होता. ह्या बाजूस बरेच गांव ओसाड पडले. कांहीं शेतकऱ्यांनीं शेतकीचीं जनावरें मारून खाल्लीं व तीं संपलीं तेव्हां त्यांनीं आपलीं पोरें मारण्यास आरंभ केला. संखेड्याजवळच्या भिल्लांनीं कित्येक गांव जाळून टाकले आणि लूट करून माणसें व जनावरें मारून त्यांजवर निर्वाह केला. सुरतेच्या इतिहासांत कवी नर्मदाशंकर म्हणतात कीं, शंभर किंवा सवाशें रुपयांचें एकदम धान्य घेणाऱ्यास तें रुपयास आठ शेर या भावानें मिळत होतें. धान्याच्या वखारी लुटल्या जात, त्यामुळें बाजार नेहमीं बंद असे. कित्येक गरीब लोकांनीं गवताच्या कचऱ्याच्या भाकरी करून त्यांजवर निर्वाह केला. कित्येक अब्रूदार लोकांनीं विहिरी, तलाव, नद्या यांत उपासमारामुळें आत्महत्या केली. या प्रसंगीं उन्हाळा अतिशय कडक पडून महामारीची सांथ उद्भवली. याच समयीं मराठे लोक सुरतेवर चालून आले. शेख येंद्रूम हे ह्मणतात कीं, या स्वारीमुळें दुष्काळास भयंकर स्वरूप आलें. मांस खरेदी करण्यास लोकांजवळ पैसे नव्हते. ते कसाईखान्यांत जनावरांचें रक्त पिण्याकरितां एकत्र जमत व कसायानें तें न दिल्यास, तेथें मोठ्या मारामाऱ्या होत. आठ आण्यांस एक पोर विकत मिळत होतें; पण सर्व सुरत शहरांत त्यास विकत घेणारा एकही पैसेदार मनुष्य आढळला नाहीं. पोरें व मोठीं माणसें यांच्या प्रेतांचे ढिगांचेढीग शहराबाहेर पडले होते. सरकार व लोक यांनीं अशीं अनाथ प्रेतें गांवाबाहेर नेऊन टाकण्यासाठीं, बरेच मजूर कामावर लावले असल्यानें, शहरांत फारशी दुर्गंधी होऊं शकली नाहीं. चाऱ्याच्या तंगीमुळें या समयीं फार ढोरें मेलीं. हा दुष्काळ पडण्यास त्या सालचा पावसाळा कोरडा गेला हेंच एक कारण होय. वर्षाकाळांत सर्व दिवसभर आकाश साभ्र राही व रात्रीं स्वच्छ चांदणें पडत असे. यावरून गुजराथींत "दहाडे करे चाळा, राते काढे तारा; आ सुडताळाना चाळा." अशी ह्मण पडली आहे. हा संवत् १८४७ च्या सालीं पडला, म्हणून त्यास गुजराथेंतील

लोक 'सुडताळो' या संज्ञेनें ओळखितात. 'अठरा विश्वे दरिद्र' ही म्हण जशी मराठी भाषेंत प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणें 'सुडताळो' म्हणजे 'घरांत धान्य व पैसा बिलकूल नाहीं' ही म्हण गुजराथेंत ह्या दुष्काळापासून प्रचा- रांत आली.

इ० स० १७९४ व इ० स० १७९६ मध्यें महाराष्ट्र, गुजराथ व बंगाल या बाजूस दुष्काळ होता. मद्रासेंत इ० स० १७९९ पासून १८०१ पर्यंत मोठा दुष्काळ पडला. इ० स० १७८९ च्या दुष्काळामुळें लोक अगोद- रच निस्तेज झाले होते व त्यांत हें अनावर्षण येऊन पडलें. हलक्या जातीचे तांदूळ १६५ रुपयांनीं एक गार्स या समयीं मिळत होते. सरकारानें दुष्काळ निवारणासाठीं सुरू केलेल्या कामावर स्त्रीला महिन्याची १ रुपया व पुरुषास १॥ रुपया मजूरी मिळत असे. धान्य साधारणतः स्वस्त मिळे; परंतु लोकांजवळ पैसा नसल्यानें, या दुष्काळास ज्यास्त भयंकर स्वरूप आलें.

# भाग तिसरा.

## एकुणिसाव्या शतकांतील दुष्काळ.

इ० स० १८०१ मध्यें मद्रास इलाख्यांत दुष्काळ होता. त्या सरकारानें सामान्यतः तन्निवारणार्थ बरेच यत्न केले; परंतु संकटाचा जोर फार वाढल्यानें, ते फारसे उपयोगीं पडले नाहींत. इ० स० १८०३ मध्यें मुंबई-इलाख्याचा बहुतेक भाग, मध्य प्रांत व वायव्य प्रांत ह्यांत मोठा दुष्काळ पडला. याचा विस्तार वायव्य प्रांतांत २०३४७ चौरस मैलांपेक्षां ज्यास्त व एकंदरींत तो ३५०९४० मैलांवर पसरला असावा, असें दिसतें. ह्यांत किती मनुष्यहानि झाली, त्याचे विश्वसनीय आंकडे मिळत नाहींत. ह्या वर्षी ठाणें जिल्ह्यांत गोदावरीच्या कांठचें भिकार फार आलें, त्यामुळें तो जिल्हा एकदम दुष्काळ-ग्रस्त प्रदेश बनला. या समयीं उरणास एक रुपयास एक पायली धान्य मिळत होतें. ह्या वर्षी पाऊस साधारण पडला; परंतु पेंढाऱ्यांच्या बंडामुळें कलादगी जिल्ह्यांत भयंकर आपत्ति आली. तेथें एक रुपयास ४ शेर व विजापुरास एका रुपयास दीड शेर धान्य मिळत होतें. कर्नाटकांत यास 'रागी बुरा' या संज्ञेनें ओळखितात. या प्रसंगीं रागी नांवाचें हलकें धान्य खाऊन लोकांनीं निर्वाह केला. ह्यांत असंख्य माणसें मृत्युमुखीं पडलीं. महाराष्ट्रांतील बऱ्याच भागांत अनावर्षण होतें. पाणी व धान्य फार महाग झालें. राज्यांत अव्यवस्था झाल्यामुळें त्या महर्गतेनें भयंकर रूप धारण केलें. पेंढाऱ्यांनीं महाराष्ट्रांतील बरींच गावें जाळून उध्वस्त केलीं. होळकर व शिंदे यांच्या स्वाऱ्यांनींही महाराष्ट्र देशांत बरीच खराबी झाली असें ह्मणतात. एक रुपयास १ एक शेर धान्य या समयीं मिळत होतें. कुलाबा जिल्ह्यांत साधारण तांदूळ दरखंडीस ४०० रुपये या भावानें मिळत असत! ह्या प्रांताचा वसूल पेशव्यांना दोन वर्षेपर्यंत मिळूं शकला नाहीं. दुसऱ्या सुबत्तेच्या प्रांतांतून धान्य मागवून ह्या दुष्काळांत तें स्वस्त करविणें शक्य नव्हतें. या समयीं ज्यांच्या जवळ पैसे होते, तेच लोक जेमतेम वांचले. महामारी व उपासमार यांनीं असंख्य माणसें मेलीं. महाराष्ट्रांत हें संकट पंधरा महिनेपर्यंत होतें. पेशव्यांनीं धान्यावरची जकात काढून टाकली व

बाहेर जाणाऱ्या धान्यास प्रतिबंध केला, त्यामुळें हें संकट विशेष असह्य होऊं शकलें नाहीं. सरकारी नोकर, लुटारू व श्रीमंत यांना हा दुष्काळ नव्हता. शेतकरी व उपरी लोक मात्र या दुष्काळांत उपासमारानें मृत्युमुखीं पडले. सिंधच्या 'थर आणि पारकर' विभागांत अनावर्षणामुळें मोठी महर्गता चालू होती. वायव्य प्रांतांत गारांच्या वृष्टीमुळें दुष्काळ पडला. बंगाल्यांतून व इतर ठिकाणांहून जे व्यापारी धान्य आणीत, त्यांस सरकार उत्तेजनार्थ इनाम देत असे. या पद्धतीनें एक रुपयास दोन मण (कच्चे) धान्य मिळूं लागलें. दरशंभर मणांस तीस रुपयांपर्यंत उत्तेजनाची रक्कम ठरविली होती. धान्य जरी इतकें स्वस्त होतें, तरी जवळ पैसा नसल्यामुळें कित्येक माणसें मेलीं. सुभेदार यशवंतराव होळकर व नाजीरअल्लीखान यांच्या स्वाऱ्या आणि इतर लोकांच्या लुटीमुळें हा विशेष वाढला.

इ० स० १८०४ मध्यें महाराष्ट्र, गुजराथ, राजपुताना, मध्यहिंदुस्थान व मद्रास या भागांत मोठा दुष्काळ पडला. तंजावरच्या कलेक्टरानें धान्य खरेदी करून, त्याचा पुरवठा लोकांस केला व त्या व्यापारांत त्यास जो नफा झाला, त्याचा त्यानें अनाथ लोकांच्या संरक्षणाकडे उपयोग केला. कर्नाटकांत हा 'बियान वुरा' ह्मणजे 'फार भयंकर दुष्काळ' या संज्ञेनें प्रसिद्ध आहे. या समयीं महाराष्ट्रांत एक रुपयास ६ शेर (पक्के) धान्य मिळत होतें. श्रीगोंद्यास तर याच वेळीं एक रुपयास दोन शेर धान्य विकलें गेलें. हा पडण्याचें कारण लढाया, लुटी, पावसाची साधारण कमतरता व मागील दुष्काळांची कसर हेंच होय. गुजराथेंत हा 'साठोकाळ' या संज्ञेनें प्रसिद्ध आहे. तिकडे हा मुख्यत्वेंकरून लढाया व राजकीय भानगडी यांच्यामुळेंच पडला. महाराष्ट्र व इतर देश यांतून गुजराथेंत आलेलीं असंख्य दुष्काळग्रस्त माणसें मरण पावलीं. गुजराथेंत पाऊस चांगला पडला व इतर ठिकाणीं दुष्काळ असल्यामुळें, पीक जरी चांगलें आलें होतें, तरी भडोचच्या सरकारानें सर्व जमीनधारा माफ केला व निरपेक्षतेनें तगाई देऊन, शेवटीं ती माफ केली. इ० स० १८०५ मध्यें सर्व मद्रास इलाख्यांत भयंकर दुष्काळ पडला. मागील दुष्काळांत मद्रासचे शेतकरी तुटले होते, त्यांत अनावर्षण व राजकीय-संकटें येऊन दाखल झाल्यानें, यास विशेष भयंकर

स्वरूप आलें. मद्रासच्या सरकारानें बंगाल्यांतून धान्य मागविलें; परंतु 'बोर्ड ऑफ् रेव्हिन्यू'स तें आवडलें नाहीं. त्यानें दुष्काळनिवारणाचीं कामें काढण्याची व पैशाच्या रूपानें मजुरी देण्याची योजना अमलांत आणली. हा दोन वर्षेंपर्यंत होता. ह्या दुष्काळानें मद्रास इलाख्यांत केवळ उपासमारानें इ० स० १८०५ मध्यें ३२२५ व इ० स० १८०६ मध्यें ४९०२ माणसें मेल्याचें सरकारी रिपोर्टींत म्हटलें आहे. ही संख्या मुद्दाम फार कमी दाखविली आहे, असें त्या वेळच्या कांहीं इंग्लिश पत्रांचें मत आहे. मद्रासेवरील हे संकट येवढ्यानें संपलें नाहीं. इ० स० १८०७ मध्येंही ह्या प्रदेशावर दुष्काळाचें भयंकर संकट आलें. इ० स० १८०४ पासून इ० स० १८०७ च्या अखेरपर्यंतचीं सर्व वर्षें ह्या भागास भयंकर गेल्यामुळें, मद्रास सरकारानें आपल्या प्रजेकरितां शेवटीं एक गार्सेला ११० पेगोदा देऊन धान्य खरेदी केलें. मद्रासचे त्यावेळचे गव्हरनर लार्ड बेन्टिक् ह्यांनीं ज्यास्त धान्य मागविणाऱ्या व्यापाऱ्यांस उत्तेजनार्थ कांहीं रक्कम देण्याचा ठराव केला असल्यानें, दुष्काळाचें संकट जरा नरम झालें; परंतु निर्धनावस्थेंतील हजारों माणसें या आपत्तीनें मेलीं. जे सशक्त राहिले होते तेच दुष्काळनिवारणाच्या कामांवर दाखल झाले; परंतु ज्यांच्या पोटांचे सांपळे झाले होते, त्यांना मुकाट्यानें प्राण सोडावे लागले. या पांच वर्षांच्या दुष्काळांत मध्यमावस्थेंतील बरींच कुटुंबें नष्ट झालीं. पंधरा हजार माणसें दुष्काळनिवारणाच्या कामांवर व पंचवीसशें मनुष्यें अनाथाश्रमांत ठेवून, सरकारानें त्यांचें संरक्षण केलें. या दुष्काळांत किती माणसें मेलीं, त्याची सरकारास बरोबर खबर लागूं शकली नाहीं; तथापि ज्यांची नोंद सरकारास करितां आली, अशा दुष्काळानें मेलेल्या माणसांची संख्या १७०२७ होती असें त्या सरकारच्या रिपोर्टींत नमूद झालें आहे. रस्त्यांत हजारों माणसें दररोज मरून पडत, त्यांपैकीं कांहीं उपासमारानें, कांहीं क्षुधा किंवा तृषाजन्य विकारानें व कांहीं सांथींच्या रोगानें मरण पावत असावींत, अशी त्या वेळच्या मोठमोठ्या कामदारांची धारणा होती. सिंधप्रांतांतील 'थर आणि पारकर' विभागांत अनावर्षणामुळें इ० स० १८०७ मध्यें जो दुष्काळ पडला, तो इ० स० १८१३ पर्यंत होता, असें कांहीं सरकारी कागदपत्रांवरून दिसतें.

इ० स० १८११ पासून इ० स० १८१३ पर्यंत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत दुष्काळ पडले. इ० स० १८१२–१३ मध्यें काठेवाड ब्रिटिशांच्या ताब्यांत आला. याच सालीं राज्यव्यवस्थेच्या अस्थिरतेमुळें त्या भागांत मोठा दुष्काळ पडला. इ० स० १८१२ च्या आगष्टांत गुजराथेंत फार चांगला पाऊस झाला, त्यामुळें शेतकऱ्यांनीं शेतांत धान्य पेरलें; परंतु पुढें दोन महिनेपर्यंत पावसाचा एक थेंबही पडला नाहीं. उगवलेले धान्याचे रोपे वाळून चालल्याकारणानें, शेतकरी ते उपटून ढोरांस खाण्यास घालूं लागले; परंतु भाद्रपद महिन्याच्या अखेरीस पाऊस खूप पडला व शेतांत राहिलेलें धान्य पुष्कळ पिकलें आणि सुकत चाललेले रोपे उपटल्याबद्दल शेतकऱ्यांस शेवटीं पस्तावा झाला. एकंदरींत गुजराथ प्रांतांत या सालीं तंगी पडली व इ० स० १८११ मध्यें टोळधाड येऊन, गुजराथेंतील धान्याची खराबी झाली होती; त्यामुळें या सालीं दुष्काळाचें थोडेंसें स्वरूप पुढें आलें आणि त्यांत राज्यकारभारांतील अव्यवस्थेनें जास्त भर घातली. शेतकऱ्यांपासून पैसे वसूल करणें हेंच आपलें मुख्य कर्तव्य समजणाऱ्या अमलदारांनीं, अनेक युक्त्यांचा उपयोग करून, त्यांना त्रास देऊन, धान्याचे पैसे वसूल केले; इतकेंच नव्हे, तर सरकारीं धान्यापेक्षां ज्यास्त पैसे सक्तीनें घेऊन, त्या कामदारांनीं स्वतःचें कल्याण करून घेतलें. हा दुष्काळ पडण्यापूर्वी एक रुपया तीन आण्यांस मणभर बाजरी मिळत होती, तीच दुष्काळाच्या दिवसांत साडेतीन रुपयांस मण मिळूं लागली. गहूं सवा रुपयास मण पूर्वीं मिळत होते, त्यांचा भाव भर दुष्काळांत साडेतीन रुपयांचा झाला. हा दुष्काळ सर्व हिंदुस्थानांत पसरला. नेपाळ, मुंबई, गुजराथ आणि मारवाड या विभागांत यानें फार त्रास दिला. टोळधाडीनें व लुटीनें देशाची फार खराबी अगोदरच झाली होती व त्यांत पर्जन्याच्या अनियमित वृष्टीमुळें, संकटाच्या वाढीस ज्यास्त मदत झाली व सर्व बाजूस दुष्काळानें अतिशय हानि केली. माळव्यांत सहसा दुष्काळ पडत नसतो; परंतु या प्रसंगीं मात्र तो पडला होता. बडोदें, अमदाबाद व सुरत या ठिकाणीं ह्या दुष्काळानें फार पीडा दिली. मारवाडांतून आलेल्या भिकारानें सर्व बडोदें शहर भरून गेलें होतें. त्यांच्या अंगावर फाटके कपडेमुद्धां नव्हते.

शहराबाहेर झाडांच्या सांवलींत हें भिकार बसल्याकारणानें बडोद्याची सर्व आजूबाजू दुष्काळमय बनून गेली. तो दुष्काळपीडित लोकांचा हृदयद्रावक देखावा पाहून, क्याप्टन जेम्स रिबेट क्यानार्क यांनीं सर विलीयम असेकीन यांस इ० स० १८१५ मध्यें जें पत्र लिहिलें, त्यांत ते ह्मणतात कीं, "उपासमारानें व्याकुळ झालेल्या मारवाड्यांच्या टोळ्या मीं पाहिल्या. त्यांतच एक स्त्री प्राण सोडण्याच्या तयारींत असून, तिच्या छातीवर तिचें लहान पोर मरून पडलें होतें! ती स्त्री पाणी मागत होती; परंतु तिजवर दया करण्याचेंही तिच्या जवळच्या माणसांच्या अंगांत सामर्थ्य उरलें नव्हतें. थोड्याच वेळानें ती मेली व तिचें प्रेत शेवटीं बऱ्याच वेळानें सरकारी माणसांनीं उचलून नेलें. तिचे आप्त स्वकीयांना तें उचलून नेण्याची व त्यास मूठमाती देण्याची शक्ति उरली नव्हती." तसेंच ते आणखी असें ह्मणतात कीं "दुसरी एक स्त्री उपासमारानें इतकी व्याकूळ झाली होती कीं, तिच्या मरणप्रायः मुलास तिच्या नजरेसमोर कुत्रे तोडून खात असतां, तिच्याकडून त्यांना प्रतिबंध होऊं शकला नाहीं. रस्त्यावर पडणाऱ्या असंख्य मुर्द्यांवर कुत्रे, कोल्हे व गिधाडें यथेच्छ ताव मारीत होतीं. स्वतःचा धर्म व जातिभेद यांस ते लोक विसरून गेले होते. एक ब्राह्मण जो पूर्वीं आपल्या बायकापोरांस जीव कीं प्राण करीत असे, तो आज त्यांना एक दोन रुपयांस विकण्यास तयार झाला. त्यास्थळीं दररोजच्या चोवीस तासांत पांचशेंपेक्षां ज्यास्त मारवाडी झाडाखालीं मरण पावलेले अढळून येत असत. अशा अडचणीच्या दिवसांत हिंदुस्थानांतील लोक आपल्या औदार्याचा उपयोग करून गरीब लोकांचे प्राण वांचवितात. सरकाराकडून व लोकांकडून आश्रय घेण्याच्या गर्दीत, या प्रसंगीं चेंगरून असंख्य माणसें मरत असत. कित्येक स्त्रियांनीं पोटाकरितां लज्जेचा त्याग करून, व्यभिचारास आरंभ केल्यामुळें, त्यांचे मात्र प्राण कांहीं दिवस वांचले. गायकवाड सरकारानें आपल्या औदार्याचा चांगला उपयोग केला व आपल्या आणि इतर राज्यांतील दुष्काळपीडित प्रजेचे प्राण वांचविण्याचें पुण्य संपादन केलें." इ० स० १८१३ मध्यें पेंढाऱ्यांनीं चालविलेली लूट व राजकीय अव्यवस्था यांच्यामुळें सुरत जिल्ह्यांतील बऱ्याच भागांत मोठा दुष्काळ पडला होता.

कच्छ संस्थानांत याचा जोर फारसा नव्हता. काठेवाडांतून कच्छकडे जाण्यास निघालेल्या दुष्काळपीडित लोकांना, रस्त्यांस खाण्यास धान्य व पिण्यास पाणी न मिळाल्यामुळें, कच्छच्या रणांत त्या लोकांनीं मनुष्यें मारून त्यांचे रक्तावर तृषा व मांसावर क्षुधा शमविण्याचा क्रम चालविला होता. मुंबई इलाख्यांतील दुष्काळाचें स्वरूप या समयीं (इ० स० १८१२) फार उग्र होतें. मुंबईतील व्यापाऱ्यांनीं पैसे कमविण्याच्या हेतूनें, बाहेर धान्य ज्यास्त पाठविलें, त्यामुळें मुंबईस विशेष महर्गता झाली. शेवटीं सरकारानें आपल्या छावण्यांतील लष्कराकरितां धान्याचा संग्रह करून, त्यांच्यांत असंतोष उद्भवूं दिला नाहीं. फौजेचें संरक्षण केल्यास, आपली सत्ता कायम राहील, अशी मुंबईचे गव्हरनर डंकन साहेब यांची समजूत होती. इ० स० १८१३ च्या सालीं मद्रासेंत अनावर्षण पडलें. मदुरा येथें बेचाळीस हजार माणसें दुष्काळनिवारणाच्या कामांवर सरकारानें लावलीं होतीं. व्यापाऱ्यांनीं ज्यास्त धान्य आणावें ह्मणून त्यांना दोन हजार पेगोदा (७००० रुपये) उत्तेजनार्थ सरकारानें दिले होते. इ० स० १८१५ मध्यें कच्छ व काठेवाडांत उंदरांच्या उपद्रवानें पिकांची हानि होऊन, बरीच महर्गता झाली होती.

इ० स० १८१८ व इ० स० १८१९ ह्या दोन सालांत वायव्यप्रांत, राजपुताना, गुजराथ व मद्रासचा कांहीं भाग आणि महाराष्ट्र यांत दुष्काळ पडला. गुजराथेंत पाऊस जास्त पडला त्यामुळें, खरीपाच्या व कार्तिक मार्गशीर्षांत वृष्टि झाल्यानें रबीच्या पीकांची अतिशय खराबी झाली. तसेंच हा भाग इ० स० १८१८ मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला व त्याच प्रसंगीं सर्व अमदाबाद जिल्ह्यांत महामारीचा उपद्रव सुरू झाला. पंढरपूर, बार्शी, तुळजापूर वगैरे बाजूस, ह्या सालीं दुष्काळ पडला होता. पेशव्यांची सत्ता नष्ट होण्याचा हा काळ असल्यानें, बहुतेक महाराष्ट्र पेशवे व इंग्लिश यांच्या फौजांमुळें जास्त तंगींत आलें. हजारों कुटुंबें अन्नावांचून या प्रसंगीं मेलीं. या वेळीं बार्शीस एक रुपयास तीन शेर ज्वारी मिळत होती. ह्या सालीं कानड्यांतही दुष्काळानें देखावा दिला, तो इ० स० १८२० पर्यंत होता. भुकेनें व्याकूळ झालेल्या तिकडील लोकांनीं चिंचेचा पाला खाऊन निर्वाह केला;

परंतु पर्जन्यकाळ समीप येतांच संधिजन्य विकृतींचा उद्भव होऊन, असंख्य माणसें मेलीं. वायव्यप्रांतांत या दुष्काळानें कहर उडविला होता. आग्र्यास एक रुपयास १७ शेर, अलिगडास एक रुपयास १९ शेर व काशीस एक रुपयास २१ शेर गहूं विकले गेले. वर्षाकाळांत अनियमित वाऱ्याचा जोर होऊन, पाऊस बरोबर पडला नाहीं हेंच ह्या बाजूस दुष्काळ पडण्याचें मुख्य कारण होतें असें ह्मणतात.

इ० स० १८२० मध्यें सिंध प्रांतांत नदीस महापूर आल्यामुळें, धान्याची खराबी झाली. हा महर्गतेचा काळ इ० स० १८२२ पर्यंत कमीजास्त प्रमाणानें कायम होता. या समयीं तिकडे एक करवार धान्यास १२० रुपये पडत होते. साधारण सुबत्तेच्या दिवसापेक्षां हा भाव आठपट वाढला होता. त्या विभागाच्या सरकारानें ( अमीरानें ) आपल्या कोठारांतून निर्धन प्रजेस फुकट व ज्याच्या जवळ साधारण संपत्ति होती त्यांस स्वस्त दरानें आणि श्रीमंत लोकांस महर्गतेच्या भावानें धान्य पुरवून, प्रजेचे प्राण वांचविले. शेतकऱ्यांना पैशाची मदत देऊन, त्यांना त्यांच्या पूर्व स्थितींत कायम ठेवण्याचेही अमिरांनीं यत्न केले असल्याचें दिसून येतें. ह्या दुष्काळांत त्या बाजूचीं माणसें अन्नावांचून मेल्याचें आढळत नाहीं. कच्छ व काठेवाडांत या सालीं अतिशय वृष्टि होऊन, शेतांतील धान्याचे रोपे पाण्यानें कुजून गेले. पुढें रब्बीचें पीक शेतांत असतां, अतिशय थंडी पडून गहूं, ज्वारी व दुसरीं सर्व धान्यें करपून गेलीं. हा दुष्काळ या बाजूस बराच असह्य झाला होता. मारवाडांतही या समयीं दुष्काळ पडल्यामुळें तिकडील भिकार गुजराथेंत आलें व पुढें सर्व गुजराथप्रांत महर्गतेच्या पूर्ण तडाख्यांत सांपडला. हा दुष्काळ मुंबई इलाख्याच्या बऱ्याच भागांत पसरला होता, असें कर्नल येथरीज हे आपल्या रिपोर्टांत ह्मणतात.

इ० स० १८२४–२५ सालीं हिंदुस्थानांत बराच मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळाचा विस्तार वायव्य व मध्यप्रांत, राजपुताना, मारवाड, गुजराथ, महाराष्ट्र, मद्रास वगैरे भागांत वाढला होता. वाऱ्याचीं तुफानें व अनावर्षण यांच्यामुळें हें संकट आलें असें गुजराथच्या इतिहासांत ह्मटलें आहे. इ० स० १८२५ मध्यें आरंभास गुजराथेंत अतिशय वृष्टि झाली व पुढें पाऊस एकदम

बंद झाल्यानें, धान्य फारच थोडें पिकलें. चारा बराच तयार झाला, त्यामुळें ढोरें मात्र वांचलीं, बाकी मनुष्यांची गुजराथेंत जी हानि झाली, तिचें थोडक्यांत वर्णन होणें अशक्य आहे. ह्या समयीं गुजराथेच्या बहुतेक भागावर दुसऱ्या सयाजीराव गायकवाडांची सत्ता चालू होती. त्यांनीं अर्धा धारा माफ केला होता असें ह्मणतात. कंपनी सरकारानें या प्रसंगीं प्रजेस तारण्याकरितां औदार्यप्रचुर योजना केल्याचें आढळून येत नाहीं. ह्या प्रसंगीं अमदाबादेस एक रुपयास १२ शेर बाजरी मिळत होती. महाराष्ट्रांत या सालीं सर्व पावसाळा कोरडा गेला व विजयादशमीचे दिवशीं मोठा पाऊस पडला, त्यामुळें रबीचीं पिकें जरा बरीं आलीं. एक रुपयास १० शेर ज्वारी पुण्यास या प्रसंगीं मिळत होती. भीमेपासून गोदावरीपर्यंत याचा जोर जास्त होता. तिकडे एक रुपयास ६ शेर हलकें धान्य मिळत असे. पुण्याच्या आजूबाजूस याचा विस्तार शंभर मैलांचा होता. या सालीं सरकारानें रयतेजवळून बिलकूल जमीनधारा व कर घेतले नाहींत. शिंदेसरकारानें आपलें अद्वितीय औदार्य प्रगट केलें व महाराष्ट्रांतील जीं कुटुंबें दुष्काळाच्या संकटांत सांपडलीं होतीं, त्यांना मदत करून आपल्या कीर्तीची वृद्धि केली. मद्रासेकडे या दुष्काळांत बरींच माणसें मेलीं. कित्येक आईबाप आपलीं पोरेंबाळें टाकून चालते झाले होते. पोटास अन्न मिळावें याकरितां कांहीं लोकांनीं मद्रासेंत लूट चालविली. शेवटीं लष्कर आणवून त्या सरकारानें बंदोबस्त केला. तेथील गव्हरनर सर थाम्स मन्रो यांनीं एक ठराव बाहेर पाडून, असें कळविलें कीं, 'तारिख ७ जून १८२४ पर्यंत जितका माल बंगाल, मलबार व कानडा यांतून मद्रासेंत येईल, तितक्यावर दरगासीस सरकार ३० रुपयांचें इनाम देईल. जीं जहाजें बंदरावर धान्य आणतील त्यांना जें मीठ विकत न्यावयाचें असेल, त्याच्या दरगासीस सरकारी भाव पूर्वीं २४ रुपयांचा होता तो तूर्त १८ रुपयांचा ठरविला आहे.' इतका जरी सरकारानें बंदोबस्त केला, तरी लोकांचे प्राण शेवटीं नष्ट व्हावयाचे ते झालेच. अर्काटमध्यें एक रुपयास साडेचार शेर धान्य मिळत असे, त्यामुळें ज्यांच्या जवळ संपत्ति होती तेवढेच लोक वांचले. दर मनुष्यास महिन्याची एक रुपया मजुरी मिळूं शकेल, अशा प्रकारचीं सरकारानें कामें काढिलीं. ह्या

योगानें सरकाराचें काम मात्र बरेंच झालें व लोक शेवटीं उपासमारानें मृत्युमुखीं पडले. मद्रासेंत एक गार्स धान्यास २६० रुपये, उत्तर अर्काटकडे ४५० रुपये, नेलोरास ३०० रुपये, दक्षिण अर्काटकडे ३०० व कडाप्यास ३७० रुपये किंमत पडत होती. मद्रास तालुक्यांत सात हजार व नेलोरमध्यें दोन हजार माणसांचें सरकारानें अन्नगृहांत पोषण केलें.

इ० स० १८२६ मध्यें कच्छ, काठेवाड व गुजराथेचा उत्तर भाग यांत उंदरांचा उपद्रव झाल्यानें, शेतकऱ्यांच्या हातांत धान्य बरोबर आलें नाहीं. इ० स० १८२८ मध्यें हिंदुस्थानच्या कांहीं भागांत अनावर्षण पडलें. महाराष्ट्र, पंजाब व गुजराथेचा कांहीं भाग, या दुष्काळानें हीन दशेस पोंचला. या समयीं मारवाडांत पाण्यावांचून फार माणसें मेलीं. इ० स० १८३० मध्यें हिंदुस्थानांत दुष्काळ पडला होता; परंतु त्याची साग्र माहिती कोठेंही मिळत नाहीं. इ० स० १८३२ मधील दुष्काळ हा ओरिसा प्रांतांत पडला असावा असें दिसतें. मध्यप्रांतांत ह्या दुष्काळानें बरीच खराबी केली होती, असें ह्मणतात. मद्रासेकडे याचें स्वरूप भयंकर होतें. गंतुरास यानें फार माणसें मेलीं. धान्य महाग झाल्यानें लुटींची संख्या वाढली. फेब्रुआरींत १५०० माणसें दुष्काळकामगिरीवर होतीं तीं मे महिन्यांत १२०० झालीं. गंतूर व मच्छलीपट्टणांत धान्य महाग झालें, ह्मणून तेथील गरीब लोक पळून नेलोरास आले; परंतु सरकारानें त्यांना तेथून तात्काळ परत हांकून लावलें. दक्षिण अर्काटांत तगाई देऊन, सरकारानें कुवे खोदविले. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यांत दुष्काळानें १६६ मृत्यु झाले. अनाथ लोकांस दररोज पाऊण शेर व कामावरील मजुरास प्रत्येकीं दीड शेर धान्य या समयीं सरकार देत असे. जून महिन्यांत त्या सरकारानें तेहतीस हजार माणसांस अन्न पुरविलें. गंतुरास या प्रसंगीं एक गार्स तांदुळांस ४२१ रुपये किंमत पडत होती. या भागांतील पांच लाख वस्तीपैकीं एक लाख माणसांच्या पोषणाची जबाबदारी सरकारावर आली; परंतु तितकीं त्या सरकारानें आपल्या अंगावर घेतल्याचें अढळून येत नाहीं. वेलोरास एक रुपयास १ शेर धान्य मिळूं लागतांच, मध्यम स्थितीचे लोक उपासमारानें मरूं लागले व त्यांनीं धान्याचीं दुकानें लुटण्यास आरंभ केला. नेलोरास

दहा हजार माणसांस सरकार जरी अन्न देत होतें, तरी दररोज असंख्य माणसें अन्नावांचून रस्त्यावर मरून पडलेलीं सांपडत असत! धान्याचें जहाज भरून आणणारास १५ पंधरा रुपयांस शंभर मण मीठ देण्याचा ठराव त्या सरकारानें ह्या वेळीं केला होता. गंतुराकडे हें भयंकर संकट इ० स० १८३४ पर्यंत चालूच होतें. ह्या दुष्काळाचा संस्कार दक्षिण महाराष्ट्रावरही घडला असल्याचें अढळून येतें. महाराष्ट्रांत ह्याचा विस्तार १५० चौरसमैलांत पसरला होता. सरकारानें वसूल केलेली सर्व जमाबंदी या समयीं खातेदारांस परत दिली; त्यामुळें त्याचें संकट जरा सौम्य झालें. हाच इलाज दुष्काळाच्या आरंभास अमलांत आला असता, तर घरांतील धान्य विकून धारा लावल्यानें व पुन्हां महागाईत धान्य खरेदी करण्याचा योग आल्यानें, जें शेतकऱ्यांना फारच वाईट वाटलें तें तसें वाटलें नसतें. कृष्णाकांठीं या सालीं पाऊस बिलकूल पडला नाहीं. कोल्हापूरच्या राज्यांतही ह्या दुष्काळानें बरीच हानि केली.

इ० स० १८३२ च्या आषाढांत गुजराथेंत पाऊस पडल्यामुळें, शेतकऱ्यांनीं धान्य पेरलें; परंतु पुढें सर्व श्रावण महिना कोरडा गेला. उन्हानें कांहीं शेतें वाळलीं; परंतु ज्या शेतांना पाण्याची सोय होती, त्यांना पाणी लावल्याकारणानें तीं बरींच तयार झालीं; परंतु या सालीं गुजराथेंतील महर्गता निघून गेली नाहीं. इ० स० १८३३ मध्यें अतिवृष्टि होऊन नद्यांना महापूर आले व शेतकीचें नुकसान झालें. ह्या दुष्काळांत बाजरी, ज्वारी व जव हे एक रुपयास मण या भावानें मिळत होते; तथापि बरींच माणसें मृत्युमुखीं पडलीं. लोक हीन दशेस येत चालले होते, हेंच त्याचें खरें कारण होय. इ० स० १८३३ मध्यें वऱ्हाडांत मोठा दुष्काळ पडला. तिकडील शेतकऱ्यांनीं आपली सर्व मालमत्ता पोटाकरितां विकल्यानंतर, शेवटीं त्यांनीं आपलीं पोरेंही श्रीमंतांना विकलीं. निजामाच्या सुभेदारांनीं व तालुकेदारांनीं ह्या शेतकऱ्यांवर जुलूम करून, त्यांना निर्धनावस्थेस अगोदरच पोंचविलें होतें. सर्व वऱ्हाड प्रांत उपासमारानें मरणाऱ्या लोकांचें मुख्य स्थान बनलें. भोपाळास स्वस्ताई होती, याकरितां तिकडे कांहीं गरीब लोकांस सरकारानें पाठवून, त्यांचें संरक्षण केलें. निजामाचा वजीर चंदुलाल याच्या राजकार-

भारामुळेंच हा दुष्काळ पडला, असें इंग्लिश मुत्सद्दी ह्मणतात. ह्या वेळीं हैदराबाद शहर दुःखमय बनलें होतें. ती सर्व अनाथ बनलेली रयत हत्यारबंद होऊन, हैद्राबादेच्या आजूबाजूस येऊन राहिल्यानें, तो एक लष्करी घेराच पडला आहे, असें वाटत असे. निजामच्या फौजेंतही कंगालपणाचा पूर्ण देखावा दिसत होता. शिपायांना पोटभर खाण्यास मिळेल अशी त्या सरकारानें योजना केली नव्हती, ह्यास्तव त्यांच्या पोटाचे सांपळे बनून ते लोक मरणप्राय झाले! हैदराबादेपासून पंढरपुरापर्यंत सुमारें तीनशें गांव या दुष्काळांत ओसाड पडले. रस्त्यावर मरून पडलेलीं ढोरें व माणसें यांवांचून कांहींच दिसत नव्हतें. अक्कलकोट संस्थानांत तर भुकेकरितां कित्येक खून झाले! एक स्त्री पांच शेर ज्वारी घेऊन रस्त्यानें जात असतां, तिला तिच्या आप्तांपैकीं एकानें ठार मारलें व ती ज्वारी तो घेऊन पळून गेला! एक मुलगा भाकरी घेऊन रस्त्यानें जात असतां, त्याचा केवळ भाकरीकरितां एकानें खून केला. असे बनाव त्या बाजूस बरेच बनले. या दुष्काळांत महामारीनें पूर्ण देखावा दिला व दररोज ह्या रोगानें २०० मनुष्यें मरूं लागलीं. कर्नल बर्डस्मिथ हे ह्मणतात कीं, मद्रासच्या दक्षिण भागांत धान्य पूर्वीपेक्षां (इ० स० १८३२–३३) ह्या दुष्काळांत तिप्पट किंवा चौपट महाग झालें होतें. काश्मीरांत व पंजाबांत या वर्षी दुष्काळाचें संकट आलें. काश्मीरांतील व्यापारी, जवाहिरे व सराफ हे, तो प्रदेश सोडून चालते झाले. तेथील दिवाणाच्या जुलुमामुळें या दुष्काळास भयंकर स्वरूप आलें. या दुष्काळांत पंचवीस हजार माणसें काश्मीरांत अन्नावांचून मरण पावलीं. कित्येकांनीं धान्याकरितां माणसें मारून खाल्लीं. काश्मीरचे महाराज सेरसींग यांनीं या दुष्काळांत लोकांनीं मरूं नये, यासाठीं फार प्रयत्न केले. दोन वर्षांचा जमीनधारा त्या सरकारानें माफ केला. लोकांस धंदा मिळावा याकरितां छावणींतील कामांवर त्या सरकारानें २०००० लोकांस गुंतविलें होतें. इ० स० १८३४ मध्यें मुंबई, कच्छ व काठेवाड या प्रांतांत दुष्काळ पडला. इ० स० १८३३ च्या दुष्काळांत सांपडलेल्या प्रदेशाची हीन स्थिति व या सालीं पडलेलें अनावर्षण, यांच्या योगानें यास ज्यास्त भयंकर स्वरूप आलें. साबरमतीस या समयीं महापूर येऊन,

शेतांची खराबी झाली व धोलका आणि प्रांतीज तालुक्यांत टोळधाड येऊन धान्य नष्ट झालें. कच्छ संस्थानांतही टोळधाडीनें बराच नाश झाला; परंतु तेथील राज्यकर्ते हे फार दक्ष असल्यामुळें, हें संकट लोकांस फारसें नडलें नाहीं. कुव्यांच्या पाण्याचा उपयोग करून, कच्छ सरकारानें बरेंच धान्य पिकविलें होतें. अयोध्या, कानपूर व बांदा या विभागांत इ० स० १८३३ चें साल भयंकर गेलें. फक्त लखनौस सहा आठवड्यांत पन्नास हजार माणसें अन्नावांचून गेलीं. अयोध्येच्या नबाबानें एक लाख रुपये दुष्काळनिवारणाकडे खर्च केले. याच समयीं महामारीचा उपद्रव तिकडे सुरू झाला व त्याजवर औषध समजून बर्फाच्या पाण्याचा उपयोग करीत असत. झांशी व विकानेरकडून बरेच अनाथ लोक दिल्लीस गेले. दिल्लीस या समयीं एक रुपयास ४० शेर धान्य विकलें जात होतें, परंतु बाहेरून धान्य खरीद करणारे व्यापारी तेथें फार आल्यानें, तें पुढें एक रुपयास १० शेरही मिळेनासें झालें. काल्पीस या दुष्काळांत असंख्य माणसें मेलीं. कोल्हे कुत्रे वगैरे प्राणी मनुष्यांस रस्त्यावर फाडून खात होते. बुंदेलखंडांत हा दुष्काळ चार वर्षेपर्यंत होता. शीतळा, ताप व पटकी वगैरे आजारांनीं या प्रसंगीं फार खराबी झाली. मोहरमच्या सणांत अनाथ लोकांस मुसलमानांनीं भोजन घातलें; परंतु तें भोजनच विषतुल्य होऊन, जेवणाऱ्या लोकांपैकीं लक्षावधी माणसें मृत्युमुखीं पडलीं. धान्याचीं उघडीं दुकानें दृष्टीस पडतांच, लोकांच्या टोळ्या त्यांजवर तुटून पडत व तें धान्य ते भुकेनें व्याकुळ झालेले लोक लुटून नेत असत. या दुष्काळाचा विस्तार ३८००० चौरस मैलांत होता व पन्नास लाख लोकांवर हें संकट आलें होतें.

इ० स० १८३६ मध्यें मद्रास इलाख्यांतील गंजाम प्रांतांत दुष्काळ पडण्यापूर्वी, एक रुपयास ८० शेर तांदूळ मिळत होते, ते पुढें २० शेरही मिळेनातसे झाले. तुरीची डाळ १६ शेरांची मिळत असे. मूळ किमतीच्या चौपटीपेक्षां ज्यास्त किंमत वाढल्यानें, मध्यम स्थितीचे लोकही या दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडले. हिंदुस्थानच्या बऱ्याच भागांत हा दुष्काळ पडला होता; परंतु त्यानें फारशी मनुष्यहानि झाल्याचें अढळून येत नाहीं. तापी नदीस पूर येऊन, सुरत शहर वाहून गेल्यानें, इ० स० १८३७ मध्यें

त्या बाजूस दुष्काळ पडला. सुरतेंतील सर्व सावकार तुटले व गरीब लोकांस भिक्षापात्र हातांत घेणें भाग पडलें. तापीच्या पुरांत असंख्य माणसें वाहून गेलीं. वायव्यप्रांताचा कांहीं भाग या समयीं दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडला होता. कानपुरास एक मंडळी स्थापन होऊन, तिनें दररोज १३००० माणसांचा निर्वाह होईल अशी तजवीज केली. पांच महिन्यांत या विभागांत १२०० माणसें दुष्काळानें मेलीं. कानपुरचा एक मोहला तर मुर्द्यांनीं भरून गेला होता. आग्र्यास ह्या समयीं भयंकर आपत्ति चालू होती. धर्मादायगृहांत दररोज अतिशय गर्दी होऊन, शेंकडों माणसें चेंगरून मरत असत. रस्त्यांत पडलेल्या प्रेतांच्या दुर्गंधीमुळें रस्ते बंद झाले. यमुना नदीचें पाणी प्रेतांच्या दुर्गंधीनें खराब झालें होतें. याच प्रसंगीं महामारीचा उपद्रव सुरू झाला. आग्र्याचा फौजदारी न्यायाधीश या समयीं दररोज साठ हजार माणसांस कामावर लावण्यांत व चार हजारांस खाण्यास घालण्यांत गुंतला होता. लोक कुत्र्याप्रमाणें रस्त्यावर मरून पडत; परंतु त्याचा लोकांस विधिनिषेध वाटत नव्हता. कित्येक स्त्रियांनीं आपली जीवंत पोरें यमुनेच्या स्वाधीन करून, ह्या व्यापांतून त्या मुक्त झाल्या. लोकांस दुःखमुक्त करण्याकरितां पैसे जमविले होते; परंतु त्यामुळें हें संकट कमी होऊं शकलें नाहीं. कारण संकट मोटें व रक्कम थोडी. कलकत्त्यांतून एक लाख रुपये दुष्काळनिवारणार्थ सरकारच्या स्वाधीन करण्यांत आले होते. बरद्वानच्या राजानें दोन हजार व दरभंगाच्या महाराजांनीं सहा हजार रुपये सरकारच्या स्वाधीन ह्या प्रसंगीं केले असल्याचें अढळून येतें. वायव्य प्रांतांत हा दोन वर्षेपर्यंत होता. तिकडे याचा विस्तार २५०० चौरस मैलांचा होता. फक्त वायव्य प्रांतांतील पंचायशीं लाख माणसें याच्या पूर्ण सपाट्यांत सांपडलीं व आठ लाख माणसें मेलीं[१]. याचा एकंदर विस्तार ११३००० चौरस मैलांत झाला असून, ब्रिटिश सरकारच्या अमलांत मात्र याचा विस्तार ५६००० चौरस मैलांचा होता. याच्या सपाट्यांत दोन कोटी व ऐशीं लाख लोकसंख्या सांपडली होती. पाऊस न पडल्यानेंच हा दुष्काळ पडला. राजपुताना, मारवाड व पंजाब वगैरे प्रांतांत हा होता. वायव्य प्रांतांत या दुष्का-

१. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ २३३–३४.

ळांत धान्य पूर्वीपेक्षां चौपट महाग झालें; व तोच भाव पांच वर्षेपर्यंत कायम होता. याचा संस्कार इ० स० १८३९ सालीं गुजराथेवर घडला. या सालीं गुजराथेंत पाऊस कमी पडला. रबीचीं पिकें मात्र चांगलीं आलीं. त्यामुळें हा फार भयंकर भासला नव्हता. दुष्काळ पडण्यापूर्वी अकरा आण्यांस एक मण बाजरी व तेरा आण्यांस एक मण गहूं मिळत होते. पुढें ह्या दोन्ही धान्यांचा भाव सव्वा रुपयाचा झाला. साधारणतः हे भाव पावणे दोन पटीजवळ होते; परंतु इतकी महर्गताही सहन करण्याची लोकांच्या अंगांत शक्ति उरली नव्हती. या समयीं बडोद्याचे गादीवर दुसरे सयाजीराव महाराज होते; त्यांनीं इंग्रजसरकारच्या मदतीनें या दुष्काळास भयंकर स्वरूप येऊं दिलें नाहीं. गुजराथ, कच्छ व काठेवाड ह्या ठिकाणींही फक्त महर्गताच होती, असें इ० स० १८७७ व ७८ च्या दुष्काळकमिशनच्या रिपोर्टांत ह्मटलें आहे. इ० स० १८४४–४५ हीं दोन वर्षे दुष्काळाचीं होतीं. या समयीं महाराष्ट्रांत एक रुपयास १० शेर धान्य मिळत होतें. खाण्यास न मिळाल्यानें महाराष्ट्रांतील पेठ तालुक्यांत एक हजार माणसें मेलीं[1]. इ० स० १८४८–४९ चें वर्ष अमदाबादेकडे महर्गतेचें गेलें. कच्छ संस्थानांतही ह्या दोन्ही वर्षांत महर्गताच होती. इ० स० १८५३ मध्यें मद्रासचा कांहीं भाग, सोलापूर, कलादगी वगैरे ठिकाणीं पावसाच्या कमतरतेमुळें दुष्काळ पडला. इ० स० १८५४–५५ मध्यें गंजाम प्रांतांत याचें स्वरूप बरेंच उग्र होतें. मद्रासचे उत्तर बाजूस धान्य तीन किंवा चार पटीनें महाग झालें व तोच भाव १६ वर्षेपर्यंत कायम होता, असें कर्नल बर्डस्मिथ हे आपल्या रिपोर्टांत ह्मणत आहेत. कोल्हापूर संस्थान व महाराष्ट्रांतील कांहीं भाग ह्यांत याचा जोर ज्यास्त होता. या समयीं तो भाग लढाया व लुटी यांमुळें वैराण बनला असल्यानें, हें दुष्काळाचें संकट अनिवार झालें. या समयीं कोल्हापुरास एक रुपयास सव्वाशेर धान्य मिळत असे. तिकडील बरींच माणसें उपासमारानें या समयीं मरण पावलीं. कोल्हापुरचे महाराजांनीं या दुष्काळांत आपल्या औदार्याचा उपयोग करून दुष्काळपीडित लोकांचें संरक्षण केलें. गुजराथेकडे हें वर्ष मह-

---

१. मि० खोरीकृत 'दुष्काळाविषयीं निबंध' पृष्ठ ८४.

र्गतेचें गेलें. इ० स० १८६० मध्यें वायव्य प्रांतांत व पंजाबांत दुष्काळ पडला. वायव्य प्रांतांत ह्याचा विस्तार १८६३९ व पंजाबांत ८७८८ चौरस मैलांचा होता. एक कोटी तीस लाख माणसांवर हें संकट आलें होतें. ह्या दुष्काळांत अन्नावांचून एकंदर २०००००० वीस लाख माणसें मेलीं. ह्या दुष्काळांत माणसें मरूं नयेत, ह्याकरितां सरकारानें फारच काळजी बाळगली; परंतु तिचा फारसा उपयोग झाला नाहीं. झाडांचीं पानें, साली, मुळें वगैरे खाऊन बरेच दिवसपर्यंत लोकांनीं आपला निर्वाह केला. कित्येक अब्रूदार माणसें अन्नावांचून घरांतल्या घरांतच मरण पावलीं. कांहीं वरिष्ठ प्रतीचे लोक प्राणधारणेकरितां दारोदार भिक्षा मागूं लागले. हा भयंकर दुष्काळ दोन वर्षेपर्यंत होता. ह्या दुष्काळांतील धान्याचे वाढलेले भाव सात वर्षेपर्यंत तसेच कायम राहिले होते. दररोज एक लाख चाळीस हजार माणसांस सरकार व श्रीमंत लोकांकडून अन्न मिळत असे. भुकेनें व्याकूळ झालेल्या लोकांच्यानें दुष्काळनिवारणाचें कामही बरोबर होत नव्हतें. इ० स० १८६१ मध्यें दुष्काळानें ९९७७७ ढोरें व २४७०८ माणसें वायव्य प्रांतांत मेलीं. तिकडील बरींच मनुष्यें अन्नाकरितां स्वदेशाचा त्याग करून बाहेर गेलीं. मुरादाबादेंतील पन्नास हजार माणसें देशांतरास गेल्याचें आढळतें. सूत कांतणें, कापड विणणें, दोऱ्या वळणें, धान्य पेरून त्याची व्यवस्था करणें, झोंपड्या बांधणें, रस्ते करणें वगैरे कामें त्या समयीं दुष्काळनिवारणार्थ सरकारानें सुरू केलीं. पडदानशीन स्त्रियांनीं कापूस व लोंकर पांच तोळे कांतल्यास, त्यांस एक आणा सरकारांतून दिला जात असे. ३३०२०३ मनुष्यांस सरकारानें या संकटांतून वांचविण्याचें श्रेय संपादन केलें. पालनपुरास हा दुष्काळ इ० स० १८६५ पर्यंत होता. ह्या समयीं एक रुपयास ८ शेर धान्य मिळत होतें. इ० स० १८६३ मध्यें गुजराथ, कच्छ, काठेवाड या प्रांतांत दुष्काळ पडला. हा पडण्याचें कारण लोकांची निर्धन स्थिति व पावसाची कमतरता हेंच होय. अन्नावांचून व्याकुळ झालेल्या लोकांनीं ह्या दुष्काळांत अमदाबाद शहरांत मोठी लूट केली. असा लुटीचा प्रसंग पुनः येऊं नये, याकरितां तेथील धनाढ्य लोकांनीं २५००० रुपयांची रकम जमवून, तींतून स्वस्त दरानें धान्य विकण्याचें दुकान व कांहीं अनाथ लोकांस अन्न दे-

ण्याकरितां अन्नसत्र घातलें. ह्या कामाकरितां दरमहा १५०० रुपयांचें कायमचें निराळें उत्पन्न करून दिल्यामुळें, पुढें लुटी वगैरे झाल्या नाहींत. हा दुष्काळ पडण्यापूर्वीं बाजरी एक रुपया दोन आण्यानीं मण मिळत होती, तीच पुढें तीन रुपये दोन आण्यांच्या भावानें मिळूं लागली. गहूं एक रुपयास मण मिळत असत, तेच सव्वातीन रुपयांनीं झाले.

इ० स० १८६४–६५ सालीं गुजराथेच्या कांहीं भागांत महर्गता व कांहीं ठिकाणीं दुष्काळ पडला. ह्या दुष्काळांत पालनपुरास एक रुपयास ६ शेर बाजरी मिळत होती. रेवाकाठ्यांत ह्या दुष्काळानें बरीच प्राणहानि झाली. ओरीसा, बंगाल व पंजाब ह्या प्रांतांत हा बराच जोरदार होता. ह्या सालीं गुथराथेंत धान्य बरेंच पिकलें होतें, परंतु परदेशांत तें प्रमाणापेक्षां जास्त गेलें. अमेरिकेंत ह्या प्रसंगीं लढाई चालू होती, त्यामुळें इंग्लंडांत कापसाचा भाव फार वाढला; ह्या सबबीनें गुजराथेंतील शेतकऱ्यांनीं पैसे मिळविण्याकरितां कापूस बराच पिकविला. अर्थात धान्याची खोट फार[1] पडली. भडोच जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं तर या सालीं धान्य बिलकूल पिकविलेंच नाहीं! इ० स० १८६६ सालीं मद्रास, बंगाल, बहार व ओरीसा ह्या भागांत दुष्काळ पडला. या बाजूस कांहीं ठिकाणीं धान्य पूर्वींपेक्षां दसपटीनें, व कित्येक स्थळीं तीसपटीनें महाग झालें आणि कांहीं भागांत पैसे देऊन धान्य मिळत नव्हतें. हा बिघडलेला भाव पूर्व स्थितीवर येण्यास सहा वर्षें [2]लागलीं. बहार प्रांतांतील दुष्काळाचा विस्तार २६१९१ चौरस मैलांचा होता व त्यांत ७७३९७१७ मनुष्यें सांपडलीं. ह्या दुष्काळांत १३५६७६ माणसें अन्नावांचून मरण पावलीं. ओरीसांतील दुष्काळाचा विस्तार ७९४९ चौरस मैलांचा होता व त्यांत ३०१५८२६ मनुष्यें सांपडलीं आणि ८१४४६९ माणसें अन्नावांचून मेलीं. गंजाम प्रांतांत ह्याचा विस्तार ६४०० चौरस मैलांचा होता व अकरा लाख मनुष्यांवर हें संकट आलें होतें. ह्यांत १०८९८ माणसें अन्नावांचून मेलीं[3]. ह्याचा एकंदरींत विस्तार

---

१. मि० खोरीकृत 'दुष्काळांविषयीं निबंध' पृष्ठ ३९.

२. चार्लस ब्लेअरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ २०९.

३. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ २३३–३४.

४३,००० चौरस मैलांपेक्षां जास्त व दीड कोटि जवळ मनुष्यें याच्या पूर्ण सपाट्यांत सांपडलीं होतीं. ह्या दुष्काळांत एकंदर १४ लाख माणसें मेलीं. इ० स० १८४६–४७ मध्यें आयर्लंडांत मोटा भयंकर दुष्काळ पडला होता; परंतु त्यांतही १० लाखांपेक्षां जास्त मृत्यु झाले नव्हते. हा दुष्काळ आयर्लंडांतील दुष्काळापेक्षां फारच भयंकर होता. सरकारानें प्रजेचे प्राण वांचविण्याकरितां पुष्कळ खटपट केली; परंतु हें संकट फार मोठें असल्यानें, त्यास सर्वतोपरीनें प्रतिकार होणें अशक्य झालें. रस्त्यावर माणसें मरून पडत व त्यांचा स्मशानविधि करण्याचें सामर्थ्य लोकांत उरलें नसल्यानें, तीं प्रेतें तेथल्यातेथेंच कुजत आणि त्यांच्या दुर्गंधींचा विस्तार वाढत असे. हाच प्रकार त्या समयीं पटकीचा विकार वाढविण्यास व लोकांचा संहार करण्यास जास्त कारणीभूत झाला. या सालीं पाऊस बरोबर पडला नाहीं व मागील सालांत गेलेल्या महर्गतेनें लोकांच्या अंगांत स्वसंरक्षणाचें सामर्थ्य उरलें नव्हतें, ह्या दोन कारणांनीं हा जास्त असह्य झाला.

इ० स० १८६८ मध्यें वायव्य प्रांत, राजपुताना, गुजराथ, पंजाब, मध्य प्रांत ह्या विभागांत अनावर्षणामुळें दुष्काळ पडला. वायव्य प्रांतांत ह्याचा विस्तार २९,०१३ चौरस मैलांचा होता व १,०२,६९,२०० मनुष्यें या दुष्काळांत सांपडलीं, आणि त्यांपैकीं ६२,७७२ माणसें अन्नावांचून मरण पावलीं. अजमीराच्या आजूबाजूस ह्याचा विस्तार २,६७२ चौरस मैलांचा होता व ४,२६,००० मनुष्यें ह्या संकटाच्या तडाख्यांत सांपडून, त्यांपैकीं १,०६,५०० मनुष्यें अन्नावांचून मेलीं. मारवाडांत ह्या दुष्काळानें फार माणसें मृत्युमुखीं पडलीं. याचा एकंदर विस्तार ३,००,००० चौरस मैलांचा होता व ही आपत्ति ४,५०,००,००० लोकांवर आली होती. ह्या दुष्काळांत अन्नावांचून, पटकीनें, देवीगोवरानें व तापानें एकंदर साडेबारा लाख मृत्यु झाले. मुंबई इलाख्यांतही याचा जोर बराच वाढला होता. ह्या दुष्काळांत सरकारानें उदारपणानें जरी मोठ्या रकमा खर्चिल्या, तरी वायव्य प्रांत व पंजाब ह्या दोन विभागांत असंख्य माणसें अन्नावांचून मेलीं. हा दुष्काळ दोन वर्षेपर्यंत होता. श्रावण महिन्यांत अतिशय वृष्टि झाली व गुजराथेंतील सर्व शहरांत नदीचें पाणी शिरून फार नाश झाला.

शेतांतील धान्याचे कांहीं रोपे वाहून गेले व कांहीं ठिकाणीं पाणी तुंबून ते कुजले. गरीब लोकांचीं घरें वाहून गेल्यानें ते अगोदरच निराधार झाले होते व त्यांत ह्या सालीं धान्य बरोबर पिकलें नसल्यामुळें दुष्काळास भयंकर स्वरूप येण्यास विलंब लागला नाहीं. हा पडण्यापूर्वीं बाजरी एक रुपयास मण या भावानें गुजराथेंत मिळत होती; परंतु भर दुष्काळांत सव्वातीन रुपयांस मण हा तिचा भाव झाला. इ० स० १८६९ सालीं तरी सुकाळ होईल, अशी लोकांस आशा होती; परंतु भाद्रपद महिन्यांत टोळधाड येऊन, राजपुताना व गुजराथ ह्या देशांतील शेतकीची नुकसानी झाली. इ० स० १८६८ च्या दुष्काळांत ह्या टोळधाडीनें जास्त भर घातल्यानें हें दुष्काळाचें संकट विशेष वाटूं लागलें. या नंतर शीतकाळांत हिमवृष्टि होऊन, अन्नावांचून तुटलेले जे गरीब लोक, ते पांघरण्यास वस्त्र नसल्यानें रात्रीं झाडाखालीं निजले असतांच एकदम मरण पावले. निरनिराळ्या रोगांच्या सांथींनीं या प्रसंगीं असंख्य माणसें मृत्युमुखीं पडल्यानें, हा दुष्काळ गुजराथेंतील लोकांत 'पचीसमों' या संज्ञेनें प्रसिद्ध आहे. मारवाडात ह्यानें मोठा संहार केला.

इ० स० १८७३–७४ मध्यें बंगाल्यांत मोठा दुष्काळ पडला. वायव्य प्रांत, नेपाळ, गुजराथ वगैरे भाग यांत सांपडले होते हा दोन वर्षेपर्यंत होता. बंगाल व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांत याचा विस्तार पन्नास हजार चौरस मैल होता, व अडीच कोटि लोक या दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडले होते[१]. ह्या दुष्काळांत एकंदर किती माणसें अन्नावांचून मृत्युमुखीं पडलीं, त्याची माहिती बरोबर अढळून येत नाहीं. चातुर्मास्यांत वृष्टि न झाल्यानें हा दुष्काळ पडला. तसेंच लोक खाऊन पिऊन सुखी आहेत व त्यांच्या जवळ धान्याचा संग्रह फार मोटा आहे; या समजुतीवर सरकारचे हितकर्ते अंमलदार राहिले व बंगाल्यांत तें अनुमान खोटें पडून,

---

१. चार्लेस ब्लेअरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ २३३–३४ मध्यें व सन १८७७-७८ च्या दुष्काळ कमिशनच्या रिपोर्टांत; हा दुष्काळ चाळीस हजार चौरस मैलांत पसरला होता व यांत १,७०,००,००० मनुष्यें सांपडलीं होतीं असें ह्मटलें आहे.

एकदम ह्या संकटाची विशेष वृद्धि झाली. मागील एक दोन वर्षांत धान्य स्वस्त झाल्यानें शेतकऱ्यांनीं तें फार विकलें. स्वस्ताईचे दिवसांत एका रुपयास जेथें दोन मण तांदूळ मिळत असत, त्याच ठिकाणीं ह्या दुष्काळांत एका रुपयास १४ शेरही ते मिळत नव्हते! इ० स० १७७० मध्यें पडलेल्या दुष्काळापेक्षांही हा फार भयंकर होता असें ह्मणतात. दुष्काळांतील लोकांस मदत करण्याकरितां इंग्लंडांत व हिंदुस्थानांत मोठ्या रकमा एकत्र झाल्या. नामदार महाराणी साहेबांनीं या परोपकारी कृत्याकरितां दहा हजार रुपयांची रकम दिली होती. हिंदुस्थानांतील राजे लोकांनींही मोठमोठ्या रकमा देऊन आपलें खरें औदार्य प्रगट केलें. ह्या दुष्काळाचें निवारण कसें करावें, त्या संबंधानें अंमलदार मंडळींत मोठा वादविवाद चालला होता; परंतु शेवटीं गव्हर्नर जनरल लार्ड नार्थब्रूक यांनीं निराळीच युक्ति काढून, प्रजेच्या संरक्षणाचें बरेंच श्रेय संपादन केलें. सर जार्ज क्यांबेल यांचें म्हणणें होतें कीं, बंगाल्यांतून नेपाळांत जें धान्य जातें, त्यास प्रतिबंध करावा. ही सूचना लार्ड नार्थब्रूक यांनीं मान्य केली नाहीं. बहारांतील अफूचीं शेतें कापून तेथें धान्याची लागवड करावी, अशी कांहीं अंमलदारांची सूचना होती व तिचा बऱ्याच अंशानें स्वीकार झाला असावा असें दिसतें. इ० स० १८७२ मध्यें गुजराथेंत व महाराष्ट्रांत महर्गता चालू होती. बंगाल्यांत हा भयंकर दुष्काळ पडल्यानें, गुजराथेंत व महाराष्ट्रांतही सामान्यतः दुष्काळानें आपला देखावा दिला होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इ०स० १८७५–७६ सालांत बहार प्रांतांत महर्गता होती, तिजमुळें मृत्युसंख्या फार वाढली. इ० स० १८७६ पासून १८७८ पर्यंतच्या काळांत सर्व हिंदुस्थानांत फारच मोठा दुष्काळ पडला. इ० स० १८७६ चा पावसाळा मद्रासेकडे कोरडा गेला. मुंबई इलाख्यांतील खानदेश, नाशीक, अहमदनगर, पुणें, सोलापूर, सातारा, कलादगी, बेळगांव व धारवाड या नऊ जिल्ह्यांत दुष्काळ पडल्यानें, तिकडील गरीब लोकांच्या झुंडी मुंबईस दाखल झाल्या होत्या. हैदराबाद व म्हैसूर या राज्यांत ह्या समयीं जो दुष्काळ चालू होता, त्याचा विस्तार ८०,००० चौरस मैलांपेक्षां जास्त

होता. ह्या दोन्ही राज्यांतील एक लाख ऐशीं हजार माणसें अन्नावांचून मेलीं. मद्रास इलाख्यांत सव्वा नऊ लाखांजवळ मृत्युसंख्या आली होती असें म्हणतात. इ० स० १८७६ पासून १८७८ पर्यंतचा दुष्काळ फारच मोठा होता. या दुष्काळाचा एकंदर विस्तार २,०५,६०० चौरसमैलांचा असून, त्यांत ३,६४,००,००० मनुष्यें सांपडलीं होतीं.[1] हे दोन्ही आंकडे फारच कमी आहेत. सन १९०० सालीं प्रसिद्ध झालेल्या एका रिपोर्टांत, या दुष्काळाचा विस्तार २,५०,००० चौरस मैलांचा होता असें म्हटलें आहे. कोल्हापुराकडे या दुष्काळानें फार खराबी केली. एका भाकरीस एक गाई ह्या दरानें या सालीं गाई विकल्या गेल्या! मुलांचें संरक्षण व्हावें, ह्याकरितां कांहीं लोकांनीं आपलीं पोरें श्रीमंत लोकांना देऊन टाकलीं. सरकारानें दुष्काळनिवारणार्थ उदार दिलानें कामें काढल्यानें, लोकांचें बरेंच संरक्षण झालें. कडापा जिल्ह्याचे कलेक्टरानें फड्या निवडुंगाच्या खुराकावर शेतकीचीं ढोरें वांचविलीं, त्यामुळें त्यांचा पुढें चांगला उपयोग झाला. दुष्काळनिवारणार्थ सरकारानें आठ कोटि रुपये खर्चिले. गुजराथेंत या दुष्काळानें फार माणसें मेलीं. तिकडे अडीच रुपयांस एक मण बाजरी मिळत होती, तरी ती खरेदी करून घरीं आणण्याचें मुख्य साधन जें द्रव्य, तें जवळ नसल्यानें लोकांचे फार हाल झाले. इ० स० १८७८ सालीं टोळधाड येऊन गुजराथेंतील पिकें नष्ट झालीं. इ० स०

---

१ सन १८७७–७८ च्या दुष्काळकमिशनच्या रिपोर्टांत खालीं लिहिल्याप्रमाणें तपशील दिला आहे—

| विभाग. | क्षेत्रफळ चौरसमैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|
| मद्रास इलाखा. | ८३,८०० | १,९४,००,००० |
| मुंबई ,, | ६४,००० | १,००,००,००० |
| म्हैसूरचें राज्य. | २७,१०० | ५१,००,००० |
| हैदराबादचें राज्य. | ३०,७०० | १९,००,००० |
| | २,०५,६०० | ३,६४,००,००० |

१८७६ पासून १८७८ अखेरपर्यंत सर्व गुजराथ देशाची या दुष्काळानें खराबी करून, बरींच गांवें ओसाड पाडलीं. गुजराथेंत दुष्काळ पडतांच तिकडील धान्य महाराष्ट्रांत जाण्यास प्रतिबंध झाला. दक्षिणेंतील दुष्काळपीडित लोक कळक व बांबू ह्यांचें बीं, झाडांचीं पानें व चिंचेचा मोहर खाऊन निर्वाह करीत होते. जी. आय्. पी. रेल्वेवरील दररोज एक हजार रुपयांचें धान्य या समयीं चोरलें जात असे. एका रुपयास आठ शेर धान्य कलादगी जिल्ह्यांत ह्या प्रसंगीं मिळत होतें. व्यापाऱ्यांना धान्याचा निरख बांधून द्यावा, असा सर रिचर्ड टेंपलसाहेबांस लोकांनीं अर्ज केला होता; परंतु त्यांनीं तसें करण्याचें नाकारिलें. जास्त नफा कमाविण्याचे लालचीनें मिळेल तेथून व्यापारी धान्य घेऊन येतील व निरख बांधल्यावर तसें होणार नाहीं, ह्या सबबीवर लोकांची ती मागणी नाकारिली होती. सरकारानें अनेक बांधकामें सुरू करून लोकांचे प्राण वांचविले. महाराष्ट्रांतील उत्पन्नापैकीं पाऊण कोटि रुपयांच्या वसुलाची सरकारानें लोकांस सूट दिली. हिंदुस्थानांतील लोक स्वतःवर भयंकर आपत्ति जरी येऊन पडली, तरी ते सहसा दुसऱ्यापासून मदत घेण्यास तयार होत नाहींत, अशी या समयीं मुंबई सरकाराची पूर्ण खात्री झाली. शेंकडा २० या प्रमाणानें लोक सरकारानें मदतीकरितां सुरू केलेल्या कामांवर येतील, अशी सरकारची पूर्वीं पूर्ण खात्री होती; परंतु शेवटीं शेंकडा ३$\frac{१}{२}$ ही मनुष्यें सरकारी कामांवर येऊन दाखल झालीं नाहींत! सर्व बांधकामांवर पुरुषांपेक्षां स्त्रियांचीच संख्या जास्त दाखल झाल्याचें पुढें सरकारास आढळून आलें. निजामाचे राज्यांत दुष्काळनिवारणाच्या कामांवर साडे चार लाख माणसें होतीं, व एक लाख माणसांचा त्या सरकारानें फुकट निर्वाह केला. म्हैसुरच्या सरकारानें दुष्काळनिवारणार्थ या वेळीं दीड कोटि रुपये खर्चिले. या दुष्काळामुळें त्या सरकारास पाऊण कोटि रुपयांचें कर्ज झालें. मद्रास इलाख्यांतील दुष्काळनिवारणार्थ त्या सरकारानें फार मोठ्या रकमा खर्चिल्या. मद्रासेंतील सरकारानें वेळेवर उपाय न योजल्याकारणानें, एक लाख मनुष्यें सिंहलद्वीपास गेलीं; त्यामुळें तेथेंही मोठा दुष्काळ पडला. रस्त्यानें धान्य घेऊन जाणाऱ्या आगगाड्यांवर हे लोक तुटून पडत व धान्य लुटून नेत; त्यामुळें माणसें फार मरत असत. मद्रासच्या बाजूस

दुष्काळामुळें असंख्य माणसें मेलीं. रस्त्यावर माणसें मरून पडत असत. इ० स० १८७७ च्या जुलई व सप्टेंबर या महिन्यांत लोकांची फारच वाईट दशा झाली. अन्नावांचून मरणारांची संख्या अतिशय वाढून, त्यांत महामारीचे विकाराचा जोरदार उद्भव झाल्यानें, तिकडील मृत्युसंख्या नेहमीं होणाऱ्या मृत्युसंख्येच्या दसपट वाढली. दुष्काळनिवारणाच्या कामांवरील मजुरांस रोजचें एक शेर धान्य व अर्धा आणा मजुरी दिली जात असे; परंतु तींत त्यांचें पोट भरत नसल्यानें, अर्धपोटीं उपाशीं राहून सक्त काम करणें त्यांना भाग पडे. या कारणानें बरेच मजूर अशक्त होऊन मृत्युमुखीं पडले. रस्त्यावर मरून पडणाऱ्या लोकांस मूठमाती देण्याचा इजारा, सरकारानें दरमुर्धास आठ आणे याप्रमाणें अनेक लोकांस दिला होता. मद्रासेकडे या दुष्काळानें लोक फारच क्षीण झाले. असें ह्मणतात कीं, गर्भवती स्त्रियांची प्रसवशक्तिही या समयीं नष्ट झाली होती. ह्या दुष्काळाचा अनिष्ट परिणाम हिंदुस्थानांतील लोकांस पुढें बरेच दिवसपर्यंत भोगावा लागला. ह्या दुष्काळांत रोगादिकांनीं साडे बावन्न लाख माणसें मेलीं. इ० स० १८७८ मधें काश्मिरासारख्या सुपीक प्रदेशांत दुष्काळ पडला. तेथील धान्य हिंदुस्थानांत पूर्वीं बरेंच आलें होतें. शेंकडा २५ पेक्षां जास्त मृत्यु तिकडे दुष्काळामुळें झाले. तेथील महाराजानें सर्व कर व जमीनधारा माफ करून, अन्नावांचून पीडिलेल्या लोकांचा निर्वाह चालविण्याकरितां फार प्रयत्न केले. काश्मिरांत शालींचा मोठा व्यापार चालतो, त्यामुळें तेथील लोक बरेच संपत्तिमान् असतात; परंतु तो धंदा इ० स० १८७० पासून परदेशांतील लोकांनीं बसविल्यामुळें, ते लोक निर्धन होत चालले व त्याचा इ० स० १८७८ मध्यें अनावर्षण पडतांच, दुष्काळाच्या रूपानें त्या देशावर अनिष्टकारक संस्कार घडला. फ्रांको--जर्मन लढाईमुळें काश्मीरी माल तिकडे तसाच पडून राहिला, व काश्मिरांतील कारागिरांस उपासमार कंठण्याचा प्रसंग आला, असें त्या दुष्काळाचा तपास करण्याकरितां नेमलेल्या कमिशनरांचें म्हणणें आहे.

इ० स० १८८० मध्यें वायव्य प्रांतांत सप्टेंबर महिना व अक्टोबरचा अर्धा भाग पावसावांचून कोरडा गेला, त्यामुळें पिकें बरोबर आलीं नाहींत.

या समयीं दररुपयास १५ शेर धान्य मिळत होतें. ही जरी सरकारी-दृष्टीनें 'महर्गता' ठरली, तरी तिचा परिणाम दुष्काळाच्या बरोबरीनेंच वायव्य प्रांत, महाराष्ट्र, वऱ्हाड वगैरे प्रदेशांत घडला. मध्यहिंदुस्थानांतही हें वर्ष दुष्काळासारखेंच गेलें. सरकारानें जरी मदतीचीं कामें सुरू करून, लोकांना धंदा दिला होता, तरी अन्नाच्या कमतरतेमुळें उद्भवणाऱ्या ज्वरादि विकारांनीं असंख्य माणसें मृत्युमुखीं पडलीं. इतर प्रदेशांतही या सालीं पावसाची बरीच कमतरता होती. इ० स० १८८४ मध्यें पंजाब व दिल्लीच्या आजूबाजूस बरीच महर्गता होऊन, तिनें दुष्काळाचें स्वरूप धारण केलें. इ० स० १८८२ पासून या बाजूस पिकें कमी येत गेलीं व सरकारसारा मात्र शेतकऱ्यांस पूर्ण भरावा लागला. या सालीं खरिपाचें पीक शेंकडा ६२, इ० स० १८८३ मध्यें तें शेकडा २५ व इ० स० १८८४ मध्यें रब्बीचें पीक शेंकडा ३६ आलें होतें. या सालांत पाऊस पडला नसल्यानें, हें साल दुष्काळाचेंच होतें; परंतु 'हा दुष्काळ आहे' असें त्या वेळच्या सरकारी कामदारांनीं कबूल न केल्यामुळें, शेवटीं ही 'महर्गता' ठरली. या समयीं सरकारानें त्या विभागांत मदतीचीं जरी बरींच कामें सुरू केलीं होतीं; तथापि उपासानें मरण पावणाऱ्या मनुष्यांची संख्या बरीच वाढल्याचें, शेवटीं सरकारानें कबूल केलें. इ० स० १८८४–८५–सालीं बंगाल, बहार, छोटानागपुर व मद्रास या बाजूस दुष्काळ पडला. हा दुष्काळ दोन वर्षेपर्यंत होता. मद्रासेंत दररुपयास २५ शेर धान्य मिळत होतें. बंगाल्यांत या दुष्काळानें फारच त्रास दिला. अन्नावांचून बरींच कुटुंबें नष्ट झालीं. मध्यम स्थितीचे कित्येक लोक ह्या दुष्काळांत निर्धन बनून, त्यांना भिक्षा मागण्याचा प्रसंग या समयीं आला. सरकारानें दुष्काळनिवारणाकरितां बरीच खटपट केली; परंतु निर्धन कुटुंबांस अशा प्रसंगीं जो त्रास भोगावा लागतो, तो बिलकूल टळला नाहीं. इ० स० १८८६–८७ सालीं मध्य हिंदुस्थानांत मोठी महर्गता झाली. साधारण धान्य या समयीं २० शेरांचें मिळत होतें. पावसाच्या कमतरतेनें हा दुष्काळ पडला. यांत बरींच माणसें अन्नाच्या कमतरतेनें मेलीं. हा शेवटीं 'दुष्काळ' ठरला नाहीं. उपासमार पडण्याचें कारण लोकांजवळ पैका नसल्यानें, धान्याची खरेदी होऊं शकली नाहीं; अर्थात् धान्याची खोट

पडली व लोक अन्नावांचून मृत्युपंथास लागले. ह्या दुष्काळासंबंधीं सरकारच्या दप्तरांतील कागद खऱ्या वस्तुस्थितीच्या बरेच विरुद्ध आहेत असें म्हणतात. इ० स० १८८८–८९ सालीं बहार, दरभंगा, गंजाम व ओरिसा या विभागांत सरकारच्या मताप्रमाणें महर्गता होती. बहारमध्यें ह्या सालीं पावसाची एकंदर सरासरी ५.४४ इंचांची असल्यानें धान्य बरोबर पिकलें नाहीं. हिचा विस्तार बहारमध्यें एक हजार चौरस मैलांचा होता. या सालीं ११ किंवा १२ शेरांच्या भावानें हलकें धान्य मिळत होतें. नेपाळच्या सरहद्दीपर्यंत हा काळ पसरला होता. आठ लाख मनुष्यें दुष्काळनिवारणाच्या कामांवर या समयीं दाखल झालीं होतीं. मद्रासच्या गंजाम विभागांत हा दुष्काळ फारच भयंकर होता. या बाजूस २४,४२२ मनुष्यें फक्त महामारीच्या विकारानें मेलीं. एकंदर मृत्युसंख्या बरीच वाढून, या दुष्काळास भयंकर स्वरूप आलें होतें. गंजाम प्रांतांत या सालीं नेहमींपेक्षां पाऊस फारच कमी पडला. दुष्काळनिवारणाच्या कामांवरील मजुरांची संख्या बरीच वाढली होती. मध्यम स्थितीचे लोकही या प्रसंगीं मदतीच्या कामांवर दाखल झाले. इ० स० १८८९–९० सालीं अयोध्या, वायव्य प्रांत, राजपुताना वगैरे ठिकाणीं दुष्काळ पडला. ह्या आपत्तीच्या निवारणार्थ सरकारानें बरेच यत्न केले. मोठमोठीं कामें काढून, लोकांस धंदा दिल्यानें, कांहीं लोकांचे प्राण वांचले. ह्या दुष्काळाची एकंदर हकीकत प्रमाणबद्ध मिळत नाहीं. इ० स० १८९१–९२ सालीं मद्रास इलाख्यांत मोठा दुष्काळ पडला. इ० स० १८७७ सालीं त्या भागांत दुष्काळ पडल्यानंतर, त्या इलाख्याच्या सरकारानें जरी तिकडे दुष्काळ पडूं नये, म्हणून अनेक प्रकारचे उपाय योजले होते, तरी पुढें हें दुष्काळाचें संकट येऊन उभें राहिलेंच. रेल्वे सडका करून, आयातनिर्गत व्यापार वाढविला; परंतु तो त्या प्रदेशावर येणाऱ्या दुष्काळरूपी संकटाचें निवारण करण्यास शक्तिवान् झाला नाहीं. महाराष्ट्रावर या दुष्काळाचा संस्कार बऱ्याच अंशानें घडला होता. ह्याचा मद्रासकडे एकंदर विस्तार २२,७०० चौरस मैलांपर्यंत वाढला असल्यानें, अन्नावांचून बऱ्याच लोकांचे फार हाल झाले. नेहमीं या विभागांत बराच पाऊस पडावयास पाहिजे; परंतु ह्या दोन सालांत तो सरा-

सरीनें ३० इंचांपेक्षां जास्त पडला नाहीं. दुष्काळनिवारणार्थ सरकारानें ज्या सोई करणें लौकिक दृष्टीनें युक्त होत्या, त्या सर्व अमलांत आणल्या; तथापि त्या संकटाचा जोर कमी होऊं शकला नाहीं; उलट मागील दुष्काळांपेक्षां या समयीं जास्त लोकांस सरकारच्या आश्रयावर अवलंबून रहाण्याची पाळी आली आहे, असें सरकारच्या नजरेस आलें. या दुष्काळाकडे सरकारानें साडे सोळा लाख रुपये खर्चिले. दुष्काळाच्या विभागांतील मृत्युसंख्या नेहमींपेक्षां बरीच वाढली होती. मुंबई इलाख्याच्या दक्षिण भागांत याचा विस्तार ९,४८४ चौरस मैलांचा असून, ही आपदा १४,६७,००० लोकांवर येऊन पडली होती. धारवाडाकडे एक रुपयास १४ शेर धान्य या प्रसंगीं मिळत असे. ह्या समयीं बंगाल्यांत व वरच्या ब्रम्हदेशांत महर्गता चालली असल्यानें, बंगाल्यांतून व वरच्या ब्रम्हदेशांतून धान्य मागवून, दुष्काळग्रस्त प्रदेशाचें संरक्षण करणें अशक्य झालें होतें. बंगाल्यांत ह्या महर्गतेचा विस्तार ५,७०० चौरस मैलांचा होता व ही आपत्ति ३८,८०,००० मनुष्यांवर आली होती. हें संकट टाळण्यासाठीं सरकारानें ३,८०,००० रुपये खर्च केले. राजपुतान्यांत इ० स० १८९० पासून १८९२ पर्यंत हें भयंकर संकट चालू होतें. राजपुतान्यांत व मारवाडांत याचा एकंदर विस्तार दोन लाख ८० हजार चौरस मैलांचा होता व हें संकट तिकडे एकंदरींत पांच लाख माणसांस विशेष जाचक झालें. ह्या बाजूस मृत्युसंख्याही फार वाढली होती.

इ० स० १८९५–९६ मध्यें वायव्य प्रांत, बुंदेलखंड व राजपुताना या विभागांत पावसाच्या कमतरतेमुळें दुष्काळ पडला. या सालीं, बुंदेलखंडांत अन्नावांचून बरेच लोक मेले. कांहीं घरंदाज लोक अब्रूमुळें आत्मघात करून, या त्रासांतून मुक्त झाले. सरकारानें लोकांचे प्राण वांचविण्याकरितां फार आयास केले; परंतु ते जरा उशीरानें सुरू झाल्यामुळें, दुष्काळाच्या आरंभास प्रजेची दैना उडून तिचा बराच नाश झाला असेल, हें निर्विवाद आहे. या विभागांतील बरेच लोक या समयीं आपला देश सोडून, जिकडे निर्वाह होईल तिकडे जाण्याच्या इच्छेनें वऱ्हाड व गुजराथेंत गेले. त्यांच्या असंख्य टोळ्या आल्यानें, तिकडेही फार महर्गता झाली.

इ० स० १८९६ –९७ सालीं हें दुष्काळाचें संकट गुजराथ, महाराष्ट्र, मध्य प्रांत, खानदेश वगैरे प्रदेशावर आलें. राजपुतान्यांत व बुंदेलखंडांत हा दुष्काळ चालूच होता. तिकडे त्यास ह्या सालीं विशेष भयंकर स्वरूप आलें. गुजराथेंत व महाराष्ट्रांत ह्या सालीं पावसाची बरीच कमतरता झाली होती. सोलापुराकडील कोष्टी लोकांना खाण्यास न मिळाल्यानें ते लोक शेवटीं गांव सोडून चालते झाले. पंढरपूर, अहमदनगर वगैरे बाजूस या दुष्काळानें माणसें फार हैराण झालीं. ह्या कामांवर येणाऱ्या लोकांजवळून फारच सक्त काम घेण्यांत येत असे. पुणें जिल्ह्यांतील कांहीं भागांत व सह्याद्रीच्या आजूबाजूस रहाणाऱ्या निर्धन लोकांनीं, माडांचीं झाडें कापून त्यांच्या काष्टगर्भाचें पीठ करून, त्यांच्या भाकरीवर निर्वाह केला. झाडांचीं पानें, वृक्षांच्या मुळ्या व जंगली कंद यांच्यावरही कांहीं लोकांनीं निर्वाह केल्याचें ऐकण्यांत आलें होतें. साळी, कोष्टी, विणकर, सुतार, लोहार वगैरे कारागिरांकडूनही या दुष्काळांत सरकारानें खडी फोडण्याचेंच काम घेतलें. अशा कामांवर जाण्यास लोक तयार नसतात, त्याचें कारण काम फार करावें लागून, पोटास पुरेसा तनखा मिळत नाहीं हेंच होय. ज्यांचा उपायच नसतो ते मात्र अशा कामांवर जातात, व शेवटीं श्रमातिरेक आणि आरोग्यसंवर्धक साधनांची खोट, या दोन कारणांनीं त्यांच्या शरीराची हानि होत असते. खानदेशांत कांहीं अनाथ आईबापांनीं पोटास नसल्यामुळें, मुलांस विहिरींत टाकून मारविलें असल्याचें-ही या प्रसंगीं ऐकूं आलें. काठेवाडांत द्वारकेच्या बाजूस याचा जोर विशेष होता. मारवाडांतून बरेंच भिकार गुजराथेंत आल्यानें, तो प्रदेश ज्यास्त विपत्तिग्रस्त बनला. गुजराथेंतील व इतर ठिकाणच्या धान्याच्या व्यापाऱ्यांनीं सट्टे करून, भाव फार वाढवून अपार संपत्ति मिळविली. बंगाल्यांतून व ब्रम्हदेशांतून व्यापाऱ्यांनीं धान्य बरेंच मागवून, जास्त किंमतीनें विकण्याचा क्रम सुरू केल्यानें, निर्धनावस्थेंतील लोकांस ओघानेंच उपासमार पडूं लागले. गुजराथेंत व महाराष्ट्रांत साधारण धान्य पिकलें; परंतु सरकारसाऱ्याची मोसम येतांच शेतकऱ्यांनीं तें विकून टाकलें व सरकारच्या ऋणांतून ते कांहीं अंशीं मोकळे झाले. व्यापाऱ्यांनीं तें धान्य ज्यास्त पैसा कमाविण्याच्या लालचेनें युरोपांत रवाना केलें. पुढें दुष्काळ पडतांच

धान्य विकणाऱ्या लोकांस पस्तावा झाला; परंतु तें त्यांनीं केवळ निरुपायास्त-वच विकलें असल्यानें, त्याबद्दल त्या शेतकऱ्यांस दोष देणें इष्ट नाहीं. ह्या देशांतील दुष्काळग्रस्त लोकांस मदत करण्यासाठीं युरोप, अमेरिका व रशियाचें राज्य वगैरे ठिकाणांहून मकई व गहूं यांनीं भरलेल्या आगबोटी आल्यानें, लोकांचा बराच निर्वाह झाला. ग्रेटब्रिटन व आयर्लंडाच्या क्षेत्रफळाच्या अडीचपट प्रदेश या दुष्काळांत सांपडला होता. ज्या लोकांना सरकारानें मदत दिली, त्यांची संख्या ग्रेटब्रिटन व आयर्लंडाच्या वस्तीच्या दुप्पट होती. या दुष्काळाचें निवारण करण्याकडे सरकारानें आठ कोटि रुपये खर्चिले. कुवे व तलाव खोदण्याकडे दोन कोटि रुपयांचा खर्च झाला. हिंदुस्थानांतील लोकांकडून २९, १६,०००, ग्रेटब्रिटन १,२२,५१,०००, इतर इंग्लिश संस्थानांकडील ११, २३,००० व इतर राष्ट्रांकडील २, ४६,००० रुप-यांची रक्कम दुष्काळनिवारणार्थ मदतीदाखल हिंदुस्थानास मिळाली होती, असें सरकारानें आपल्या ठरावांत ह्मटलें आहे. या दुष्काळांत पन्नास ला-खांपेक्षां ज्यास्त माणसें दुष्काळजन्य रोगादिकांनीं मेलीं. वऱ्हाड व धारवा-डाकडे ह्या प्रसंगीं महा भयंकर उदाहरणें घडून आल्याचें, त्या वेळच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें होतें. ह्याच हंगामांत हिंदुस्थानचे सरकार नामदार लार्ड एल्जिन हे प्रवासास निघाले व त्यांनीं कळवळ्याचीं भाषणें करून, लोकांस फार खूष केलें. ह्या वेळीं मुंबई इलाखा व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांत ग्रंथिकसन्निपाताच्या रोगानें प्रळय उडवून दिल्याकारणानें, लोक फार हवालदिल झाले होते.

इ० स० १८९९ च्या एप्रिलांत हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागांत मोठा पाऊस पडून, नद्यांना मोठे पूर आले. ता० १५ जूनपर्यंत बिलकूल पाऊस पडला नाहीं. पुढें दोन तीन दिवस मृगनक्षत्राचा पूर्वेकडून आलेला पाऊस पडल्यानंतर, नैर्ऋत्यवायु जोरानें वहाण्यास आरंभ झाला. हा वारा श्रावणअखेरपर्यंत होता. दिवसा आकाशांत ढगें येत व रात्रीं स्वच्छ चांदणें पडत असे. लोकांचे डोळे पावसाकडे एकसारखे लागले होते; परंतु तो न पडल्यामुळें लोक फार चिंतातुर झाले. आषाढ शुद्ध ५ स विद्युत्पात झाल्यास पुढें पाऊस पडण्याचा संभव असतो. या समजुतीवर विश्वास ठेवणारे

गुजराथेंतील लोक ह्या दिवशीं सर्व रात्रीस एकसारखें आकाशाचें निरीक्षण करीत होते; परंतु विद्युत्पात झाल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें नाहीं. याच समयीं मद्रास इलाख्यांत दक्षिण बाजूस पीत वर्णाचा धूमकेतु १७ दिवसपर्यंत दिसत होता. सप्टेंबरच्या आरंभास मात्र कांहीं ठिकाणीं थोडासा पाऊस पडला. याचा शेतकीकडे उपयोग करणें हें केवळ अशक्य होतें. या अनावर्षणामुळें व्यापाऱ्यांनीं धान्याचे भाव एकदम वाढविले. शेंसवाशें वर्षांत इतका भयंकर दुष्काळ कधींही पडला नव्हता, असें खुद्द सरकारानें कबूल केलें आहे. तसेंच सरकारचे वायुचक्रशास्त्रवेत्ते ह्मणतात कीं, असा महा भयंकर दुष्काळ इ० सनाच्या चवदाव्या शतकानंतर आजपर्यंत बिलकूल पडला नव्हता. मुंबई इलाखा, मध्य प्रांत, राजपुताना, मारवाड, पंजाब, हैदराबाद, मद्रास इलाखा व हिंदुस्थानचा दुसरा बहुतेक भाग, येवढ्यावर ह्या दुष्काळानें प्रळय केला. या दुष्काळाच्या आरंभास म्हणजे सप्टेंबर व अक्टोबर महिन्यांतच गुजराथ, काठेवाड, मारवाड वगैरे देशांतील खेडेगांव निर्वाहविषयक साधनाच्या अभावामुळें ओसाड पडले. गुजराथेपैकीं नवसारी विभागांतील डोंगराळ प्रदेशांत मात्र पाऊस साधारणतः बरा पडला व त्यामुळें गवत उत्पन्न झालें. बाकी सर्व गुजराथेंत गवत उगवलें नाहीं. महाराष्ट्रांतील डोंगराळ प्रदेशांत थोडींशीं पिकें आलीं; परंतु तीं सरकारसाऱ्यासही पुरण्याइतकीं नव्हतीं. गुजराथेंतील कांहीं ठिकाणच्या शेतकऱ्यांनीं शेतकीच्या जनावरांकरितां कुव्याच्या पाण्यानें थोडासा चारा व थोडेंसें धान्य पिकविलें, परंतु त्याचा म्हणण्यासारखा उपयोग होऊं शकला नाहीं. धान्याच्या अभावामुळें पीडिलेलीं पांखरें कळप करून येत व अशा पिकलेल्या शेतांवर हल्ला करीत, ह्यायोगानें धान्य शेतकऱ्यांच्या घरांत येईपर्यंत तीन चतुर्थांश भाग नष्ट झाला. भुकेनें व्याकूळ झालेले इतर लोकही शेतांतील धान्य चोरून नेत असत. मोठमोठ्या रेल्वे स्टेशनांवर मात्र हृदयद्रावक देखावा दृष्टीस पडत असे. रेल्वेंतून आलेल्या धान्याचे थैल्यांच्या ढिगांवर हल्ला करण्यासाठीं कावळे टपून बसलेले असत. दुसऱ्या बाजूस चिमण्या, साळुंख्या, पोपट, होले वगैरे पांखरें धान्याकडे एकसारखीं पहात बसत होतीं. कावळ्यानें थैल्यास चोंच

मारून धान्य नेल्यावर, खालीं पडलेले दाणे हीं पूर्वोक्त पांखरें टिपून घेण्याची जी त्वरा करीत, तें पाहून मनास आश्चर्य वाटल्यावांचून रहात नसे. रस्त्यावर पडणारें गवत गोळा करून, तें विकून त्याचे जे दोन तीन पैसे येतील, तेवढ्यावर क्षुधा शमविण्याचा इरादा ठेवणाऱ्या लोकांच्या झुंडींच्याझुंडी नजरेस पडत होत्या. अन्नाकरितां बाहेरून आलेल्या लोकांचे थवे, जीर्ण वस्त्रांनीं परिवेष्टित व कांहीं लोकांजवळ बिलकूल वस्त्रही नव्हतें, अशा अवस्थेंत शहराच्या आसपास झाडांखालीं बसलेले अढळून येत. ह्या प्रसंगीं गांवांतील लोकांनीं झाडपाल्याचा उपयोग, ढोरांच्या व स्वतःच्या खाण्याकडे केला. गुजराथ देशांत चाऱ्यावांचून पंधरा लाख ढोरें मेलीं. ढोरें मरूं नयेत, याकरितां गुजराथेचे कमिशनर लेली यांनीं तीं ठाणें जिल्ह्यांत पाठविलीं होतीं; परंतु ती हवा त्यांस न मानवून तेथें गेल्यावर फारच थोडीं जनावरें शिल्लक राहिलीं. सर्व गुजराथेंत ढोरांचा संहार झाला व चामड्याचा व्यापार करणाऱ्या लोकांच्या व्यापाराची वृद्धि झाली. चार आण्यांस एक गाई या समयीं बडोद्यास मिळत असे; परंतु तिला घेऊन तिचें संरक्षण करणारें गिऱ्हाईकच अढळून येत नसे. चाऱ्यावांचून दीन झालेल्या ढोरांच्या कळपांवर कांहीं क्षुधार्थी लोक हल्ला करीत व तीं जनावरें पळवून, त्यांच्या मांसावर निर्वाह करण्याचा क्रम कांहीं ठिकाणीं सुरू झाला होता असें म्हणतात. रेवाकांठ्याच्या बाजूच्या भिल्लांनीं तर गांवांस आग लावून गुरें व धान्यें पळवून नेण्याचा क्रम चालविल्याचें अढळून आलें. मोठमोठे तलाव व नद्यांचीं पात्रें या समयीं कोरडीं पडलीं होतीं. अक्टोबरच्या अखेरीस थंडी अतिशय पडून बरींच माणसें मेलीं. ढोरांचे व माणसांचे मृत्यु हे सहज होऊन, गांवाच्या आजूबाजूंस हाडांचे सांगाडे दृष्टीस पडत. नवेंबरच्या अखेरीस सरकारानें दुष्काळनिवारणाचीं कामें सुरू केलीं. सर्व हिंदुस्थानांत या कामांवर ७५ लाख मनुष्यांस काम मिळत असे. ह्या प्रसंगीं दोन लाख अनाथ माणसांस सार्वभौम व एतद्देशीय सरकारानें फुकट अन्न दिलें. ह्या दुष्काळाचा एकंदर विस्तार ४,५०,००० चौरस मैलांत पसरला होता[१] व हें संकट

१ हिंदुस्थानचे वायुचक्रशास्त्रवेत्ते मि० इलियट हे आपल्या रिपोर्टांत याचा विस्तार सहापासून सात लाख चौरस मैलांचा होता असें ह्मणतात.

८, १०,००,००० मनुष्यांवर आलें होतें. अशा प्रसंगीं दुष्काळाशीं सामना करून आपलें संरक्षण करून घेण्याची शक्ति, हिंदुस्थानांतील लोकांच्या अंगांतून नष्ट झाल्यामुळें, हें संकट विशेष असह्य[1] झालें. ह्या दुष्काळांत कांहीं श्रेष्ठ वर्गाचे लोकही दुष्काळनिवारणाच्या कामांवर दाखल झाले. असा प्रकार मागील दुष्काळांत कधींही झाला नव्हता. इ० स० १९००च्या जानेवारीपासून ह्या दुष्काळास विशेष भयंकर स्वरूप आलें व भिकाराची संख्या फार वाढली. अन्नावांचून त्यांच्या पोटांचे सांपळे झाले व त्यांना बरोबर चालतांही येत नव्हतें. दुष्काळनिवारणाच्या कामांवरील मजुरांत अनेक प्रकारच्या रोगांचा उद्भव होऊन, त्यांची मृत्युसंख्या या समयीं विशेष वाढली. मद्रास, हैदराबाद, अहमदनगर, खानदेश, पंचमहाल, अमदाबाद वगैरे प्रदेशांतील दुष्काळनिवारणाच्या कामांवर महामारीची सांथ उत्पन्न होऊन, असंख्य माणसें मृत्युमुखीं पडलीं. धोलक्याच्या जवळ असलेल्या एका कामांवर वीस हजार माणसें एका आठवड्यांत मेलीं. खानदेशांतील कामांवर तर ह्या सांथीनें प्रळयच उडवून दिला. लोकांस मूठमाती देण्याकडे कांहीं सरकारी नोकर रात्रंदिवस खपत होते; तथापि दोन आठवडेपर्यंत प्रेतें संपलीं नाहींत! सरकारांतून व्यवस्था लागेपर्यंत असंख्य माणसें अन्न व पाण्यावांचून अतिशयित दुःख पावत असत. पोरांचा निर्वाह व्हावा म्हणून कांहीं अनाथ आईबाप आपलीं पोरें चार किंवा सहा आण्यांस विकण्यास तयार झाले. ख्रिस्तीधर्मप्रवर्तक मंडळ्यांनीं या संधीचा लाभ घेऊन, बरींच माणसें त्यांनीं आपल्या धर्मांत घेतलीं. क्षुधेच्या पीडेनें व्याकूळ झालेल्या लोकांनीं आपल्या धर्ममर्यादेचाही शेवटीं त्याग केला. त्यांनीं लज्जा सोडली व जेथें व जसें अन्न मिळेल, त्याचा ते स्वीकार करूं लागले. मोऱ्यांतून वहाणाऱ्या पाण्यांत जीं भाताचीं शितें येत तीं टिपून खाणें, उष्ट्या पत्रावळी चाटणें व पत्रावळी धुऊन तें खरकटें पाणी पिणें, हेंच या समयीं त्या अनाथ लोकांच्या निर्वाहाचें मुख्य साधन झालें होतें; परंतु पुढें महामारीचा विकार उद्भवतांच, सरकारानें ज्ञातिभोजनें बंद केल्यामुळें, त्या दीन लोकांचे फार हाल होऊं लागले.

---

१. ता० ३ एप्रिल सन १९०० रोजीं पार्लमेंटसभेंत हिंदुस्थानचे प्रधान लार्ड ज्यार्ज ह्यामिल्टन यांचें झालेलें भाषण.

लग्न किंवा व्रतबंधाच्या समारंभांत मांडवांत ब्राम्हणमंडळी जेवणास बसली असतां, हजार दोन हजार भिकारी तुटून पडून, त्यांनीं ब्राम्हणांच्या पुढ्यांतील पात्रें उचलून नेल्याचे दाखले, बडोद्यांत इ० स० १९०० च्या मार्च महिन्यांत घडून आले. पहांटे पांच वाजल्यापासून रात्रीं ११ वाजेपर्यंत ‘मला खाण्यास द्या’ या आवाजानें सर्व बडोदेंशहर गजबजून गेलें होतें. जिकडे तिकडे भिकाऱ्यांचें केविलवाणें मागणें ऐकू येऊन, त्यांची दीन व हृदयद्रावक स्थिति दृष्टीस पडत होती. प्रत्यक्ष मुलाची आई आपल्या लहान मुलावरील माया झुगारून देऊन, अन्नाच्या शोधार्थ भटकत होती. चोऱ्या करणारांची संख्या या समयीं विशेष वाढली. मोकळें राहून उपासमार सोसण्यापेक्षां चोरी करून कैदेंत गेल्यास, तेथें पोटभर खाण्यास तरी मिळेल, या समजुतीनें लहान चोऱ्या करणारांचा बराच सुकाळ झाला होता; परंतु फटके मारण्याच्या कायद्याच्या भयामुळें, तर त्या लोकांना उलट ज्यास्त उपासमार पडूं लागले. रस्तोरस्तीं अन्नार्थी लोक दीन होऊन भटकत होते. स्त्रिया व गाई यांची प्रसवशक्ति नष्ट होऊन, त्या रस्त्यावर प्रसूत होऊन, त्यांचीं पोरें एके बाजूस व त्या एके बाजूस निचेष्टित होऊन पडल्याचें नित्यशः आढळून येत असे. दयाळू लोक अशा समयीं आपल्या दयेचा बराच उपयोग करीत; परंतु ती योग्य प्रसंगीं नसल्यामुळें, तीच दयाशीलवृत्ति त्या अनाथ लोकांस मारक होत असे. फार दिवसांचीं उपोषणें, नुस्त्या पाण्यावर आठ दहा दिवस काढलेले व अशा प्रसंगीं एकदम बेरेंच खाण्यास मिळतांच, हीं माणसें मृत्युमुखीं पडत. ‘खाण्यास फार मिळाल्यानें हीं माणसें मेलीं’ असें सरकारी रिपोर्टांत ह्मटलें आहे; परंतु हे मृत्यु खरोखर दुष्काळाचेच होत. तसेंच रस्त्यावर व इतर ठिकाणीं जीं प्रेतें सांपडत, त्यांच्या मृत्यूचीं निरनिराळीं कारणें दाखविण्यांत येत असत. ‘श्वास निघून गेल्यानें,’ ‘जुलाब उलट्या झाल्यानें’ व ‘खाण्यास अफू न मिळाल्यानें’ हे मृत्यु झाले; असें नोंदून ठेवण्यांत येत असे, त्यामुळें या दुष्काळांत खरोखर अन्नावांचून किती माणसें मेलीं तें निश्चयात्मक ठरविणें अशक्य आहे. बडोदें सरकारानें दुष्काळनिवारणाकडे सुमारें एक कोटि रुपयांचा खर्च केला; परंतु दुष्काळाचें संकट कमी होऊं शकलें नाहीं. ह्या पावणे तीन कोटि उत्पन्नाच्या राज्यांत एक कोटि रुपये केवळ दुष्काळ–

निवारणाकडे खर्च झाले, हें औदार्य सामान्य नव्हे. हिंदुस्थानचे व्हाईसराय नामदार लार्ड कर्झन हे म्हणतात[1] कीं, "हिंदुस्थानांत दरसाल सरासरीनें ४१ इंच पाऊस पडतो, असें तीस वर्षांच्या अनुभवावरून म्हणतां येईल. इ० स० १८९६ सालीं तो ५ इंच व इ० स० १८९९ मध्यें तो एकंदरींत ११ इंच कमी पडला. इतर वर्षांपेक्षां इ० स० १८९९ सालीं शेंकडा २७ टक्के कमी वृष्टि झाली. इतका कमी पाऊस कधींही पडला नव्हता, असें सरकारी दप्तरांवरून शाबीत होतें. इ० स० १८९९ च्या आक्टोबर-पासून दुष्काळास आरंभ झाला. या सालीं शेतांत कोणत्याही प्रकारचीं पिकें येऊं शकलीं नाहींत. आजपर्यंत ज्याचा अनुभव ह्या सरकारास आला नाहीं, अशा भयंकर दुष्काळाशीं आह्मी सामना करीत आहोंत. इतर दुष्काळां-पेक्षां मृत्यूंची संख्या जरी या दुष्काळांत कमी आहे, तरी याचा विस्तार फार मोठा व याच्या तावडींत सांपडलेल्या मनुष्यांची संख्याही अतिशय मोठी आहे. सरकार व इतर उदार गृहस्थ यांच्या मदतीनें दुष्काळग्रस्त लोकांचे प्राण वांचत आहेत. ह्या दुष्काळांत शेतकी व जनावरें यांचा जो नाश झाला, त्याचें थोडक्यांत वर्णन होणें अशक्य आहे." या दुष्काळांत धा-न्याचे भाव मूळ किंमतीपेक्षां पांचपट व गवताचा भाव गुजराथेंत ३० पट वाढला होता! या दुष्काळाचा साग्र इतिहास कोणीं लिहिल्यास तो अतिशय हृदयद्रावक होऊन, त्यापासून भावी प्रजेस पुष्कळ गोष्टी शिकतां येतील. असो; ह्या दुष्काळांत झाडांच्या साली, पानें, मुळ्या वगैरे खाऊन, कांहीं ठिका-णच्या लोकांनीं निर्वाह केला. राजपुतान्यांतील मेडिकल अडमिनिस्ट्रेटर कर्नेल अॅडाम्स हे म्हणतात कीं, राजपुतान्यांत 'पिलीया त्राट' जातीचा मऊ दगड असतो; तो कुटून त्याचें वस्त्रगाळ चूर्ण पिठांत मिसळून, त्याच्या भाकरीवर राजपुतान्यांतील कांहीं गरीब लोकांनीं उपजीविका चालविली होती; परंतु केवळ भूक शमविण्यासाठीं दगडाचा उपयोग होत गेल्यानें, ते लोक निस्तेज होऊन, शेवटीं मृत्युमुखीं पडले. ह्या दुष्काळानें हिंदुस्थानच्या लोकसंख्येवर फारच

---

१. ता० २७ मे सन १९०० रोजीं नामदार व्हाईसराय यांचे, लंड-नचे लार्ड मेयर यांस सिमला येथून गेलेल्या पत्राचा हा फारच थोडक्यांत गोषवारा दिला आहे.

वाईट परिणाम घडला. प्रसिद्ध मि. विलियम डिग्बी यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, "इ० स० १८९६ व इ० स० १८९९–१९०० च्या दुष्काळांनीं हिंदुस्थानांतील असंख्य मनुष्यांचे बळी घेतले. इ० स० १८९१ सालीं हिंदुस्थानची लोकसंख्या २८,७२,२३,४३१ होती. मागील वाढीच्या क्रमाचा विचार करून सरासरी काढल्यास, इ० स० १९०१ च्या ता. १ मार्चला ती ३३,०३,०६,४९५ झाली पाहिजे; परंतु ती यंदां तितकी न होतां २९,४०,००,००० झाली. अर्थात् वाढीच्या शास्त्रीय दृष्टीनें ३,६३,०६,४९५ लोकसंख्या कमी झाली. हें इतकें युरोपचें गिऱ्हाईक या दुष्काळानें गमाविलें, असें मानतां येईल."

---

# भाग चौथा.

## हिंदुस्थानांतील दुष्काळांचें अर्थशास्त्र.

या देशांत पडणाऱ्या दुष्काळांच्या आंगोपांगांचा विचार करून, त्याजवरून मि० ब्राऊन यांनीं इ० स० १८७७ मध्यें 'हिंदुस्थानांतील दुष्काळांचें अर्थशास्त्र' या नांवाचें एक महत्वाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकांतील विषयांचे निरनिराळे अकरा भाग करून, त्यांत त्यांनीं ह्या देशांत दुष्काळ कां पडतात, त्यांचें निवारण कसें करावें, व तें संकट टाळतां येईल किंवा नाहीं, याचा तात्विक दृष्टीनें मुख्य विचार केला आहे. सांप्रत दुष्काळांस जन्म देणारा 'हिंदुस्थान' हा एक मुख्य देश आहे, असें मि० ब्राऊन हे म्हणतात. दुष्काळाचें संकट देशावर वारंवार येणें हें चांगलें नाहीं. तें राजकीय तत्वदृष्ट्या टाळतां येईल. हिंदुस्थानाच्या जुन्या इतिहासांवरून या देशांत पूर्वीं फार उशीरानें दुष्काळ पडत असत; परंतु तो क्रम अलीकडे बराच बदलला आहे. या देशांत दुष्काळ पडण्याचीं दोन मुख्य कारणें आहेत. त्यांतलें एक असें कीं, शेतकीस पाणी बरोबर न मिळाल्यानें ह्मणजे खपापुरता पाऊस न पडल्यानें अन्नाची खोट पडून दुष्काळ पडतो; व दुसरें कारण, पाऊस पडो किंवा न पडो, परंतु वर्षाकाळांत अथवा दुसऱ्या ऋतूंत तलाव, विहिरी किंवा कालव्यांचें पाणी शेतकीस मिळण्याची सोय नसल्यानें, शेतांत लावलेल्या धान्याचीं रोपें वाळून जातात व दुष्काळ पडतो. ह्या दोन कारणांसंबंधानें मि० ब्राऊन ह्मणतात कीं, अशा प्रसंगीं मजूर, शेतकरी व बिनधंदेवाले लोक दुष्काळाच्या तडाख्यांत तात्काळ सांपडतात, शेतकीवरच ज्या लोकांचा निर्वाह चालतो, असे सर्व लोक साधारण महर्गतेंतही अलीकडे दीन होत असतात. हिंदुस्थानांतील बहुतेक जमीन शेतकीकडे गुंतली असून, सर्व देशाचा मूळ आधार हल्लीं शेतकीवरच अवलंबून राहिला आहे. हिंदुस्थानाशिवाय इतर देशांतील प्रजेचा मुख्य आधार शेतकीवरच नसतो. ते लोक निरनिराळ्या धंद्यांत गुंतले असतात व थोडेसे लोक मात्र शेतकी करितात. अशा स्थितीमुळें तिकडील लोक एखादा पावसाळा कोरडा जातांच भुकेनें मरण्याच्या

पंधास लागत नाहींत. हिंदुस्थानांतील सर्व लोक शेतें पिकतील तरच आपणांस पोटभर खाण्यास मिळेल, या समजुतीस सांप्रत विशेष प्राधान्य देतात. मि० ब्राऊन हे या समजुतीचें सर्व जोखीम हिंदुस्थानांतील सुशिक्षित म्हणविलेल्या ब्राह्मणजातीवर टाकीत आहेत. ते त्यांना मतलबी व 'धार्मिक बाबतींत कांहीं तरी सांगून शेतकऱ्यांना फसविणारे ठग' आहेत असें ह्मणतात. त्यांचा हा आरोप गेल्या पन्नास वर्षांमागील अवस्थेस कदाचित् लागू पडेल; परंतु अलीकडे ती स्थिति बदलल्यानें, तो दोष आमच्या ब्राह्मणजातीवर ठेवणें हा केवळ अन्यायच होईल. शेतकऱ्यांना निर्धनावस्थेस पोंचविणारे मारवाडी व बनिये हेही होत, असें मि० ब्राऊन हे म्हणतात. हे लोक शेतकऱ्यांना कर्ज देऊन, व्याजांत व हिशेबांत त्यांना अतिशय फसवितात. जो शेतकरी या लोकांच्या दारांत पाय ठेवतो तो कफल्लक बनल्यावांचून तेथून मुक्त होत नाहीं. तो जोंपर्यंत जरा खाऊन पिऊन सुखी असतो, तोंपावेतों त्याला सावकाराकडून कर्ज मिळतें व त्या इसमाची जामिनगिरी तो इतर कुळांच्या संबंधानें कबूल करितो. अशा तऱ्हेच्या मनुष्यास जामीन होण्यासंबंधानें शिफारस होते. मुर्वतीखातर त्याला ती गोष्ट कबूल करावी लागते, व शेवटीं एखादें कूळ बुडतांच त्याची जबाबदारी या जामीनदारावर येते व शेवटीं हाही त्याच दीनावस्थेस जाऊन पोंचतो. नंतर न्यायाचे कोर्टांत निवाडा होईपर्यंत धंदे सोडून धक्के खावे लागणें, वकिलांचे स्वार्थ व कोर्टाच्या कडक अटी या तीन कारणांनीं ते शेतकरी भिकेस जरी मिळाले, तरी ते ऋणमुक्त होऊं शकत नाहींत, असें मि० ब्राऊन यांचें मत आहे. शेतकरी अशा दीन स्थितींत सांपडतांच, आजूबाजूचे दुसरे लोकही विपत्तिग्रस्त होतात. सोनार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार किंवा ज्या लोकांचा मुख्य आधार शेतकऱ्यांवरच असतो ते सर्व लोक या विपत्तींत सांपडतात. या लोकांवर हें संकट हळू हळू येत असतें. धान्याची कमतरता होतांच त्यांना आपली खरी स्थिति कळूं लागते; परंतु त्यांचा त्या समयीं बिलकूल उपाय नसतो. त्यांना हें दुष्काळाचें संकट फार नडतें व त्यांचीं गुरेंढोरें वगैरे उपयोगाचीं जनावरेंही ओघानेंच नष्ट होतात. सावकार कर्जाच्या सबबीनें नेतात, शेत-

करी तीं निरुपायास्तव विकून टाकतात किंवा खाण्याचे हाल होऊन तीं मृत्युमुखीं पडतात! इतकी स्थिति येतांच हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांवर दुष्काळाचें संकट येतें; मग पाऊस पडो किंवा न पडो. पावसाची कमतरता किंवा अतिवृष्टि ज्या प्रसंगीं असते, त्या वेळीं तर हें संकट भयंकर रूप धारण करितें; परंतु इतर प्रसंगींही हिंदुस्थानांतील शेतकरी पूर्वोक्त दीन स्थितीच्या पूर्ण फेऱ्यांत सांपडले जातात असें मि० ब्राऊन हे ह्मणतात.

मि० अॅडाम स्मिथ यांचे दुष्काळसंबंधीं विचार फार महत्वाचे आहेत. त्यांचें असें मत आहे कीं, सरकारानें दुष्काळाच्या प्रसंगीं व्यापारांत हात घालूं नये. सरकारानें व्यापारांत हात घातल्यास धान्याच्या व्यापाऱ्यांना वाईट वाटतें व ते आपला धंदा एकदम बंद पाडतात. या कृतीनें दुष्काळास उग्र स्वरूप येण्याचा संभव असतो. केवळ व्यापाऱ्यांनीं केलेल्या संपामुळेंच दुष्काळ पडत नाहीं. तो पडण्यास पावसाचेंही एक कारण आहे; परंतु तें फारसें वजनदार नाहीं. पाऊस न पडल्यानें दुष्काळ ज्या देशांत पडतो, अशा देशांत हिंदुस्थान देश मात्र अलीकडे मुख्य पदास जाऊन पोंचला आहे. पावसाची कमतरता, टोळधाड, लढाया व इतर राजकीय बाबती, यांचे प्राबल्यानें हिंदुस्थानांतील दुष्काळास भयंकर स्वरूप येतें. कित्येक प्रसंगीं सरकाराकडून घडणाऱ्या चुक्यांमुळेंच दुष्काळ पडत असतात. प्रत्येक देशांत उंच व सखल आणि रूक्ष व दमदार जमीन कमी किंवा जास्त प्रमाणानें असतेच. हिंदुस्थानांत सामान्यतः असा नियम आहे कीं, ह्या देशांत एखादा भाग जरी पावसावांचून किंवा पिकाशिवाय फुकट गेला, तरी दुसऱ्या भागांत विपुल पीक आल्यावांचून रहात नाहीं. जगावरील इतर देशांत असें नाहीं. तेथें दुष्काळ पडण्याचे प्रसंग जरी कांहीं कारणानें उशिरां येतात, तरी ते दुष्काळ जास्त भयंकर असतात. फार लांबून धान्य आणविल्यावांचून तिकडील दुष्काळ शांत होत नाहींत. हिंदुस्थानाच्या एकंदर स्थितीवरून, धान्याची खोट याच देशाच्या दुसऱ्या भागांतून पुरी पाडतां येते. सरकार व्यापारांत हात घालतें, म्हणून दुष्काळ पडतात, हे मि० अॅडाम स्मिथचे विचार हिंदुस्थानास लागू नाहींत. युरोप किंवा इतर देश कीं ज्या देशाचा निर्वाह बाहेरून धान्य येण्यावरच अवलंबून असतो,

अशा देशास मात्र ते लागू पडतील. मद्रासेंत पडलेल्या अनेक दुष्काळांच्या प्रसंगीं या नियमांचा अम्मल होतांच दुष्काळास भयंकर स्वरूप आल्याचें, इतिहासांवरून अढळून येतें. युरोपांतील व हिंदुस्थानांतील व्यापारी यांत मोठें अंतर आहे. तिकडील व्यापारी अशा प्रसंगीं इतर देशांतून मोठ्या उत्साहानें धान्य आणून, धान्याची खोट भरून काढण्यास तयार असतात; तसें हिंदुस्थानांत नाहीं. येथील व्यापारी अशिक्षित असून त्यांच्यांत साहस नसल्यानें, जगावर चाललेल्या घडामोडीचें त्यांना बरोबर ज्ञान नसतें, व त्यांच्याकडून धान्याची खोट पुरी पाडण्याचा यत्न होत नाहीं. त्यांनीं धान्य आणल्यास, त्याचा उपयोग ते जास्त पैसा मिळविण्याकडेच करितात. वाजवी किंमत ठेवणें हें तत्व त्यांच्या अंगवळणीं बिलकूल पडलेलें नाहीं. धान्याचा पुरवठा बाजारांत भरपूर असतांही, धान्याचे भाव हिंदुस्थानांतील बाजारांत प्रमाणापेक्षां जास्त वाढत असतात. तसेंच अशा आपत्तीच्या प्रसंगीं धान्याचे सट्टे होत असल्यानें, गरीब लोकांस उपासमार काढण्याची पाळी येत असते. हा क्रम युरोपांत नाहीं. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांत सचोटी नसल्यानें, त्यांच्या निरोपावर हजारों कोशांवरून धान्य येऊं शकत नाहीं; अशा प्रसंगीं सरकारच्या मध्यस्थीची फार जरूर असते. देशाच्या खपापुरतें धान्य देशांत ठेवणें व जास्त असेल तितकें बाहेर घालविणें आणि धान्याची खोट असल्यास ती हरप्रयत्नानें भरून काढणें, हीं या देशांतील सरकारचीं पूर्वापार कर्तव्यें ठरून चुकलीं आहेत. तुर्कस्थानच्या ताब्यांतील अर्झरूम प्रांतांत दरसालपेक्षां सन १८९९ सालीं धान्याचें पीक शेंकडा ३० याप्रमाणानें कमी येतांच, त्या सरकारानें तेथील धान्य बाहेर जाण्याची बंदी केली, व बाहेरून धान्य आणवून ती खोट भरून काढण्याचा हुकूम केला. हा हुकूम पुढील सालचें उत्पन्न कसें येतें तें नक्की ठरेपर्यंत अमलांत रहावयाचा असल्याचें त्या सरकारानें प्रसिद्ध केलें आहे.[1] इतर देशांतही याच नियमाप्रमाणें सरकार व्यापारांत हात घालून लोकांचें संरक्षण करितें. हिंदुस्थानाप्रमाणें युरोपांत मोठे दुष्काळ पडत

---

१. 'आडव्होकेट ऑफ इंडिया' पत्रांत ता० ११ डिसेंबर १८९९ ची इस्तंबूल येथील प्रसिद्ध झालेली तार.

नाहींत. मोठी लढाई सुरू होऊन तिकडील व्यापारास प्रतिबंध झाल्यास, तिकडे दुष्काळ पडण्याचा संभव असतो. हिंदुस्थानाची स्थिति सर्व बाजूंनीं युरोपापेक्षां भिन्न आहे. युरोपांत महर्गता मात्र होत असते, व अशा प्रसंगींही सरकार व्यापारांत हात घातल्यावांचून रहात नाहीं. इ० स० १८४६ मध्यें आयर्लंडांत दुष्काळ पडला, त्या समयीं सर रॉबर्टस् पील यांनीं आयर्लंडाकरितां हिंदुस्थानांतून धान्य खरेदी करून तें तिकडे नेलें. तसेंच लार्ड रसेल यांनींही सरकारतर्फे धान्य खरेदी करून, सन १८४७ मध्यें स्वस्त दरानें विकण्याचीं दुकानें काढल्याचे दाखले सांपडतात. आपली प्रजा भुकेनें मरूं नये, याची जबाबदारी जेथें खास सरकारावरच असते, तेथें या बाबतीचा चांगला उपयोग होतो. हिंदुस्थानाचें दारिद्र्य वाढत चाललें असतां, त्यास प्रतिकार करण्याचें सोडून, भरदुष्काळांतही या देशांतील धान्य बाहेर जाण्यास विशेष मोकळीक असते. हें तत्व विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इ० स० १८९७ च्या भरदुष्काळांत लोक अन्नावांचून मरत असतां, या देशांतून सुमारें तीन कोटी रुपयांचें धान्य परदेशांत गेलें. हीच स्थिति सन १९०० च्या दुष्काळांतही घडली. या सालीं मागील सालापेक्षां उलट जास्त धान्य परदेशीं रवाना झालें. तसेंच हिंदुस्थानांतील ढोरें चाऱ्यावांचून मरत असतांही, बराच चारा दक्षिण आफ्रिकेंतील लढाईकडे गेला. अर्थात् या कृतीनें ह्या देशांतील गरीब शेतकऱ्यांच्या जनावरांवर किती वाईट परिणाम घडला असेल, त्याची सहज कल्पना होऊं शकते. हिंदुस्थानांत धान्य भरपूर पिकतें व त्याजवर हल्लीं सर्व जगाचा निर्वाह चालू आहे, तशी युरोपची स्थिति नाहीं. युरोपांतील एका व्यापारी पत्रानें म्हटलें आहे कीं, जर युरोपांत बाहेरून धान्य येण्याची बंदी झाली तर, आपल्या देशांतीलच धान्यावर फ्रान्स ३३३ दिवस, जर्मनी ३११, इटाली २८९ व स्पेन २८० आणि इंग्लंड १८७ दिवस वांचेल. ह्या ह्मणण्यांत कदाचित् अतिशयोक्ति असेल; परंतु त्याजवरून त्या देशांत खपापुरतें धान्य उत्पन्न होऊं शकत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद ठरते. हिंदुस्थानांत जरी भरपूर धान्य पिकतें, तरी त्याजवर वारंवार दुष्काळांचें संकट येतें, व युरोपांत तसें होत नाहीं, याचें कारण ते देश सांप्रत व्यापारोपजीवी आहेत हेंच होय.

हिंदुस्थानांतील दुष्काळांसंबंधानें जान स्टुअर्ट मिल यांचे विचार लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात कीं, दुष्काळ पडतांच हिंदुस्थानांतील सधन व लालचू लोक पैशाच्या जोरावर धान्याची खेरेदी फार करितात. ते धान्य विकत घेऊन, आपल्या संग्रहास ठेवतात, व त्यामुळें बाजारांत धान्याची खोट पडण्याचा किंवा भाव वाढण्याचा संभव उत्पन्न होतो; अशा प्रसंगीं सरकारच्या मध्यस्थीची फार जरूर असते. धान्याचा व्यापार वाजवी दरानें सरकारानें लोकांस करूं द्यावा; परंतु जर खानगी व्यापारांत लवाडी होण्याची किंवा व्यापार बंद होण्याचीं चिन्हें दिसूं लागतील, तर अशा समयीं सरकारानें मध्यें पडून त्यास सुस्थितीवर आणण्याचा यत्न अवश्य केलाच पाहिजे. फार लांबून धान्य किंवा इतर माल आणविण्याकरितां, हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना पूर्ण मोकळीक नसणें व लागेल ती मदत देण्यास सरकारानें विलंब लावणें हें इष्ट नाहीं. धान्याचे भाव वाढतांच गरीब लोकांत धान्य खेरेदी करण्याची शक्ति उरत नाहीं, व ते शेवटीं खाण्यास न मिळाल्यानें मरण पावतात! त्यांची ही दशा बराच वेळपर्यंत सरकारास कळूं शकत नाहीं. याकरितां धान्याचे भाव वाढूं लागतांच, सरकारानें आपल्या सत्तेनें ते स्थिर करण्यास झटलें पाहिजे. अर्थशास्त्राच्या नियमांप्रमाणें धान्याचे भाव दुष्काळाच्या आरंभास थोडेसे वाढावयाचेच; परंतु दुष्काळाच्या मध्य भागांत तर ते स्थिरच ठेवले पाहिजेत. अप्रतिबंध–व्यापारतत्व हें हिंदुस्थानास बिलकूल लागू नाहीं. कारण या देशांतून जीवनविषयक धान्य व कच्चा माल बाहेर जातो व बाहेरून इकडे देशाच्या अवनतीस कारणीभूत होणारे पदार्थ मात्र येत असतात. या देशांत तयार होणाऱ्या कच्च्या मालावर परदेशांतील मजुरांना काम मिळतें व इकडील मजूर ओघानेंच काम न मिळाल्यामुळें निर्धन होतात. प्राचीन काळीं ह्या देशावर दुष्काळ फारच थोडे पडत असत, त्याचें हेंच मुख्य कारण होय. सर्व प्रकारचे धंदे इकडे चालत, व इकडील धान्याचा लाभ बाहेरच्या देशांस बहुधा मिळत नसे.

मद्रासचे सनदी अम्मलदार मि० डालझेल हे म्हणतात कीं, पाश्चात्य अर्थशास्त्राच्या नियमांचेंच अनुकरण करावयाचें असा निश्चय केल्यानें, हिंदुस्थानांतील महर्गतेच्या संकटास बहुधा दुष्काळाचें रूप येतें. महर्गतेच्या

दिवसांत अन्नावांचून जितकीं माणसें मरतात, त्यापेक्षा ज्यास्त अर्थशास्त्राच्या नियमांप्रमाणेंच वागावयाचें, असा निश्चय झाल्यावर मृत्युमुखीं पडतात, असा मला अनुभव आला आहे. व्यापारांत हात घालावयाचा नाहीं, हा नियम परदेशाच्या सरकारास कदाचित् लाभ देईल; परंतु त्यापासून हिंदुस्थानाच्या लोकांचें मात्र फारच मोठें नुकसान होतें. धान्याचे भाव वाढल्यावर धान्य खरेदी करण्याची लोकांत शक्ति रहात नाहीं, व माल खपणार नाहीं, या सबबीवर व्यापारी धान्याची खोट भरून काढण्याचा यत्न करीत नाहींत. अशा प्रसंगीं धान्याचा पुरवठा करण्यासाठीं सरकारानें व्यापाऱ्यांस पैशाची मदत देणें हेंच युक्त आहे. बाजारांत होणारे फेरफार लक्ष्यपूर्वक पाहून, सरकारानें आपल्या निर्धन प्रजेचा बचाव करण्याकरितां झटलें पाहिजे. हिंदुस्थानांत पडलेल्या सर्व दुष्काळांवरून ही गोष्ट शाबीत होते कीं, सरकारच्या मध्यस्थीती अशा प्रसंगीं लोकांस फार जरूर असते. ती जर न केली तर, ह्या देशाची पुढें फारच खराबी होऊन, या देशावर फारच भयंकर दुष्काळ येतील. आम्ही परस्थ असल्यामुळें, ह्या लोकांची खरी स्थिति आम्हांस बरोबर कळत नाहीं, व आमचें मुलकीचें उत्पन्न वाढत चाललें म्हणजे हा देश सधन झाला असें आम्ही समजतों; परंतु आमची ही समजूत किती भ्रामक आहे, तें ह्या देशावर एखादा पावसाळा कोरडा जातांच आमच्या नजरेस पडतें.

सर चार्लस ब्लेयर हे म्हणतात कीं, हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागांत पांच, दहा किंवा पंधरा वर्षांनीं दुष्काळ पडतो. ज्या दुष्काळाचा विस्तार जास्त असतो, असा दुष्काळ फार दिवस टिकतो व त्यामुळें लोकांची फार हानि होते. असा भयंकर दुष्काळ ५०,१०० किंवा १५० वर्षांनीं एखादाच या देशावर येत असतो. लहान लहान दुष्काळांत लोकांची जी खराबी होते, तीच पुढें भयंकर स्वरूप धारण करिते, असें इतिहासांच्या परिशीलनावरून दिसून येईल. दुष्काळाचा जितका विस्तार लहान, तितकें त्याचें संकट कमी असतें; कारण अशा ठिकाणच्या दुष्काळाचें निवारण होण्यास विलंब लागत नसतो; परंतु त्याचा विस्तार मोठा असल्यास, त्याचें निवारण होण्याची अशक्यता उद्भवते. असे भयंकर दुष्काळ हिंदुस्थानांत अलिकडे लवकर लवकर

येऊं लागले आहेत. डाक्टर बेलो हे म्हणतात कीं, इराणांत १८७० सालीं जो दुष्काळ पडला, तसा सुमारें ५५० वर्षांत पडला नव्हता. इराणांत दुष्काळांचीं संकटें वारंवार येत नाहींत; कां कीं, त्या देशांतील शेतकऱ्यांना तेथील सरकारानें सधनावस्थेंत ठेवलें आहे. जगावरील इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांतील शेतकी वरिष्ठ प्रतीची पूर्वीं होती; परंतु गेल्या १५० वर्षांत ती स्थिति इकडून नाहींशी झाली. साधारण सुबत्तेच्या दिवसांतही, हिंदुस्थानांतील शेतकरी उपासमार कंठीत असतात; तेव्हां अशा विपत्तिमय स्थितीची वाढ एखादें अवर्षण येतांच जास्त होऊन, साधारण महर्गतेसही दुष्काळाचें स्वरूप येणें हें युक्त आहे. हिंदुस्थानांत अलिकडे अशी स्थिति चालू आहे कीं, महर्गता व दुष्काळ यांत बिलकूल अंतर उरलें नाहीं. साधारण महर्गतेंतही दुष्काळाचें उग्र स्वरूप दृष्टीस पडण्याचा दुर्दैवी योग येतो. पावसाची कमतरता होतांच दुष्काळ पडतो. जवळ पैसा असून धान्याचे भाव ज्या समयीं वाढतात, तेव्हां महर्गता असते; परंतु धान्यसंग्रहास जवळ पैसा नाहीं, अशा प्रसंगीं तो दुष्काळच मानतां येईल. पैसे देऊन धान्य न मिळण्याचा दुर्दैवी योग, हिंदुस्थानांत हजारों वर्षांत एकही येण्याचा संभव नाहीं. कारण हा देश कृषिकर्मजीवी असल्यानें, धान्याची पूर्ण आपत्ति पडणें शक्य नाहीं; परंतु धान्य पुष्कळ पिकलें असतांही, जवळ पैसे नसल्यानें उपासमार काढण्याचे ज्यांना प्रसंग येतात, अशा लोकांची संख्या अलिकडे वाढत चालली आहे. हिंदुस्थानांतील कांहीं सधन लोकांवर दुष्काळाच्या दिवसांत महर्गतेपेक्षां जास्त संस्कार घडूं शकत नाहीं; परंतु गरीब लोकांस मात्र साधारण महर्गतेंत, फार तर काय सुबत्तेच्या काळांतही खाण्यास न मिळाल्यामुळें मृत्युमुखीं पडावें लागतें. अशी दीन स्थिति ह्या देशांतील शेतकऱ्यांना अठराव्या शतकापर्यंत खास आली नव्हती. सुबत्तेच्या दिवसांत ज्या देशांतील लोकांना उपास कंठण्याचा प्रसंग येतो, त्या देशावर दुष्काळाचें संकट येतांच, लोकांचा संहार किती जास्त होत असेल, याची सहज कल्पना करतां येईल.

आयर्लंडांतील विश्वविद्यालयाचे प्रख्यात अर्थशास्त्री चार्लस डेवीस हे ह्मणतात कीं, 'अन्नाची कमतरता' हें प्रजेच्या वाईट स्थितीचें सर्वांशीं कारण

नाहीं; परंतु तो तिच्या अवस्थेचा एक दुर्घट परिणाम आहे. देशांत अन्नाची खोट असतां, पिकें निष्फळ गेल्यास दुष्काळ हा पुढें आलाच पाहिजे. दुष्काळ पडत असतां त्यास प्रतिबंध करितां येईल. तसें करितांना तीन मुद्यांकडे मात्र विशेष लक्ष दिलें पाहिजे. (१) लहान मोठे कालवे काढणें, ओहोळ, ओढे व नद्या यांच्या पाण्यास प्रतिबंधक कामें करणें; ऋतुमानावर संस्कार करविणाऱ्या झाडांची लागवड होणें व कोणत्याही ऋतूंत पीक येऊं शकेल अशी योजना करणें; आणि पाण्याची कमतरता, महापूर व जंतूंचा पिकावर घडणारा वाईट परिणाम यांना प्रतिकार करणें. (२) सर्व प्रकारचीं धान्यें एकाच ऋतूंत पिकत नसतात, यासाठीं निरनिराळ्या धान्यांची ऋतुमानास अनुसरून लागवड करितां यावी, ह्या हेतूनें निरनिराळ्या धान्यांची शोधपूर्वक संख्या वाढविणें व लागवड करणें; सुगीच्या दिवसांत जास्त पिकलेलें धान्य आपत्प्रसंगार्थ राखून ठेवणें; आणि तशा आपत्तींत निर्धनत्वास पावलेल्या लोकांस विम्याप्रमाणें संपत्तीची एकदम मदत करणें. आणि (३) धान्याची खोट पडतांच ती भरून काढण्याचा व दुष्काळांत तें लोकांस सहज मिळूं शकेल अशी योजना करणें. ह्या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष होतांच दुष्काळांचें संकट असह्य होतें व असंख्य माणसें मृत्युमुखीं पडतात; असा नेहमीं अनुभव येत असतो. पूर्वोक्त प्रकारांपैकीं पहिल्या योजनेकडे दुर्लक्ष झाल्यामुळेंच चीनच्या उत्तर बाजूस दुष्काळ पडतात. पिलीनदीस महापूर येत असल्यानेंही बरेच दुष्काळ त्या प्रदेशावर स्वाऱ्या करीत असतात. इ० स० १८६६ चा ओरिसा प्रांतांतील दुष्काळ हा वरील योजनेंपैकीं दुसऱ्या प्रकारच्या तजवीजींच्या कमीपणाचा परिणाम होय. धान्याचा संग्रह तेथें नव्हता व इतर स्थळांहून तें आणविण्यास फक्त एकच सडक होती. तसेंच समुद्रांतून तें आणविण्याच्या कामावरही त्या प्रसंगीं दाब होता. बाहेरच्या प्रदेशांतून तिकडे धान्याचा पुरवठा होईपर्यंत दहा हजार माणसें मेलीं. सर्व ठिकाणीं जाऊं शकतील अशा आगबोटींची योजना, व सर्व खंडांत प्रसार झाला आहे असे लोहमार्ग, यांचा समावेश दुष्काळनिवारणाच्या दुसऱ्या प्रकारात होतो. इ० स० १८४५–४७ सालीं आयर्लंडांत जो दुष्काळ पडला, तो तिसऱ्या प्रकारच्या योजनेकडे दुर्लक्ष झाल्याचा परिणाम होता.

देशांत धान्य बरेंच पिकलें होतें, परंतु तें अप्रतिबंध व्यापारतत्वाच्या कायद्यानें परदेशांत वाहून नेलें व बटाट्यांचें एक पीक न येतांच तिकडे दुष्काळ पडला. अर्थात् या योजनेनें पुष्कळ माणसांचे बळी घेतले. इ० स० १८७६–७८ च्या हिंदुस्थानांतील दुष्काळांत परदेशांत लोहमार्गानें बरेंच धान्य खेंचून नेल्याकारणानें, सुमारें ५० लाखांपेक्षां जास्त माणसांवर प्राणांत संकट आलें. दुष्काळ लोकांस बाधूं नये, याकरितां देशस्थितीचा विचार प्रथम करावयास पाहिजे. मालाची नेआण करणारीं साधनें कमी असतील, लागवड कमी होत असेल, व लोकांच्या संग्रहास दोन वर्षांस पुरेल इतकें धान्य नसेल, तर प्रथम ह्या अडचणी काढून टाकणें इष्ट आहे. दुसरी गोष्ट ही लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, ज्या देशांत जें धान्य पिकतें, त्या धान्यावर त्या देशांतील लोकांचा जास्त हक्क असावा, व तें तेथील गरीब लोकांस थोड्या किंमतींत मिळावें. परदेशीय किंवा श्रीमंत लोकांकडून जास्त किंमत मिळते, म्हणून तें आम्ही विकतों अशी सबब राहूं देणें हें इष्ट नाहीं. परदेशीयांकडून जास्त किंमत जरी मिळत असेल, तरी तें त्यांस न मिळेल असा बंदोबस्त झाला पाहिजे. दुष्काळनिवारणार्थ तीन प्रकारानें सावधगिरी ठेवण्याची जरूर असते. (१) दुष्काळनिवारणार्थ कालव्यांचीं बांधकामें न करितां व देशांत धान्यसंग्रह नसतां, फक्त ठरींव भावानें इतर कामांवर गरीबांस भाकरी देणें, यानें त्या आपत्तीचें निवारण कधींही होणार नाहीं. धान्याच्या रूपानें भरपूर मजुरी मिळून, लोकांकडून घेतलीं जाणारीं कामें उत्पादक श्रमांपैकीं असावींत. (२) अप्रतिबंध व्यापारतत्वानें या संकटास फार भयंकर स्वरूप येतें. गरीब देशांतील धान्य श्रीमंत देश खेंचून नेतो व गरीब देशास शेवटीं विवंचनेंत पडावें लागतें. व्यापाराची मोकळीक ही जेथें जास्त पैसे मिळतील तेथें धान्य नेत असते. जेथें धान्याची जरूर असेल, तेथेंच व्यापारी तें घेऊन जातील, ही समजूत भ्रामक आहे. इंग्लंड हा सधन, बलवान्, व सत्ताधीश देश असल्यामुळें, त्या देशाकडे हिंदुस्थानांतील धान्य वाहून जातें. तेथें धान्याची जरूर असल्यामुळेंच तें जातें ही समजूतही चुकीची आहे. गेल्या अर्धशतकाच्या इतिहासावरून असें अढळून येतें कीं, हिंदुस्थानांत धान्याची जरूर फार असतां, इंग्लंडा-

तील बाजारांत पडून राहिलेलें धान्य परत आलें नाहीं. याचें खरें कारण हिंदुस्थानाची गरज भागविण्याकडे असलेलें दुर्लक्ष हेंच होय. ह्यामुळें दुष्काळांत उपासमार पडून हिंदुस्थानांतील लाखों माणसें संकटांत पडलीं. (३) लोकसंख्या वाढल्यानें दुष्काळ पडतो ही समजूतही चुकीची आहे. वस्ती वाढणें हें असाधारण असतें. जमीन जितक्या लोकांच्या निर्वाहास धान्य पुरवूं शकते, त्यापेक्षां जास्त धान्य तिच्याजवळ मागितलें असतां, तें तिनें न दिल्यानेंच दुष्काळ पडला, असें एकही उदाहरण अढळून येत नाहीं. जेथें शेतकी जास्त असते तेथें दुष्काळ नसतो व जेथें वस्ती ज्यास्त तेथें तो असतो, असा नियम नाहीं. गेल्या पन्नास वर्षांत अयोध्या, बंगाल, पंजाब ह्या जास्त वस्तीच्या; आयर्लंड, मद्रास, मुंबई, व चीनचा उत्तर प्रांत, ह्या मध्यम वस्तीच्या; आणि इराण, राजपुताना, आशियामायनर व उत्तर ब्राझील या कमी वस्तीच्या प्रदेशांत दुष्काळ पडले होते. वस्तीच्या कमीजास्तपणाचा दुष्काळांशीं बिलकूल संबंध नाहीं.

हिंदुस्थानाचा साग्र इतिहास १३ व्या शतकापासून बराच उपलब्ध आहे. त्यांत साधारण महर्गतेचा इतिहास बिलकूल दिलेला नाहीं. दुष्काळांचें वर्णन मात्र त्यांत बरेंच प्रमाणासह दिलेलें अढळतें; त्याजवरून १३ व्या शतकांत चार दुष्काळ पडले होते असें दिसतें. १४ व्या शतकांत ५, पंधराव्यांत ४, सोळाव्यांत ६ व १७ व्यांत ५ दुष्काळ पडल्याचें इतिहासावरून अढळून येतें. हा क्रम पुढील दोनशें वर्षांत बदलला. हा बदलण्याचें कारण, राज्यकारभारांतील असंख्य भानगडी व प्रजेची झालेली खराबी हेंच होय. अठराव्या शतकांत हिंदुस्थानामध्यें एकंदर २४ दुष्काळ पडले. त्याच्या पहिल्या पंचविशींत २, दुसरींत ६, तिसरींत ८ व चौथींत ८ म्हणजे पहिल्या पन्नाशींत ८ व दुसऱ्या पन्नाशींत १६ दुष्काळ पडल्याचें इतिहासावरून अढळून येतें. अनेक उलाढाल्या होऊन, हिंदुस्थानांतील इतर राजकीय भानगडींस ज्या काळीं आरंभ झाला, तेथपासून हिंदुस्थानाच्या लोकांवर दुष्काळाचें संकट बरेंच त्वरेनें येऊं लागलें. अठराव्या शतकांत पडलेल्या २४ दुष्काळांचा विचार केल्यास, प्रत्येक दुष्काळ सरासरीनें ४ वर्षें ३ महिन्यांनीं पडला असें दिसतें.

पहिल्या पन्नास वर्षांत ह्या दुष्काळांची सरासरी सहा वर्षे ३ महिन्यांची होती, तीच दुसऱ्या पन्नाशींत तीन वर्षे दीड महिन्याची झाली. पहिल्या पन्नाशींत जे दुष्काळ सवासहा वर्षांनीं येऊन गेले, त्यांच्यापेक्षांही जास्त भयंकर असे दुष्काळ ह्या १८ व्या शतकांतील दुसऱ्या पन्नाशींत येण्यास प्रत्येकास सवातीनही वर्षे लागलीं नाहींत. ह्या चोवीस दुष्काळांपैकीं सर्व दुष्काळ गुजराथ, महाराष्ट्र व मारवाडांत होते. यांपैकीं काश्मीरांत तीन, पंजाबांत ९, वायव्य प्रांतांत १५, अयोध्येकडे ४, राजपुतान्यांत १६, मद्रासेकडे ९, बंगाल्यांत ५ व सिंध प्रांतांत १६ दुष्काळ पडले होते. इतर प्रांतांत एकाच काळीं सर्व दुष्काळ पडले नाहींत. काश्मीरांत इ० स० १७६९,१७८७ व १७९२ हीं वर्षे मात्र दुष्काळांचीं होतीं. बंगाल्यांत इ० स० १७६९,७०,७३,७४ व १७९६ हीं वर्षे दुष्काळाचीं होतीं. गुजराथ, महाराष्ट्र व मारवाड ह्या ठिकाणीं नेहमीं दुष्काळ असतो; असें या शतकाच्या इतिहासावरून दिसतें. काश्मीर, आसाम, ओरिसा, नेपाळ वगैरे डोंगराळ प्रदेशांत दुष्काळ फारसे पडत नाहींत व बाकीच्या सर्व प्रदेशांत थोड्या किंवा जास्त प्रमाणानें दुष्काळ बरेच पडतात असें दिसतें.

एकुणिसाव्या शतकांत एकंदर ४७ दुष्काळ पडले. सरकारी रिपोर्टांत ४५ दुष्काळ व २ महर्गता पडल्या असें ह्मटलें आहे. हिंदुस्थानांत 'महर्गता' हाच 'दुष्काळ' असतो. सुबत्तेच्या दिवसांतील धान्याचे भावापेक्षां ते थोडेसे वाढतांच, लोकांना उपासमार कंठण्याची पाळी येत असल्यानें 'महर्गता' कोणती व 'दुष्काळ' कोणता, हें बिनचूक ठरविणें सांप्रत अशक्य झालें आहे. ह्या देशास सांप्रत इतकी निर्धनावस्था येऊन पोंचली आहे कीं, खऱ्या सुबत्तेच्या दिवसांतही लोकांना अन्नावांचून काळ कंठावा लागतो; अशा प्रसंगीं 'महर्गता' व 'दुष्काळ' यांची मर्यादा निराळी ठरविणें अशक्यच होय. ह्या एकुणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत ११, दुसरींत १२, तिसरींत ११ व चौथींत १३; अर्थात् पहिल्या पन्नासींत २३ व दुसरींत २४ दुष्काळ पडल्याचें अढळून येतें. ह्या शतकांतील दुष्काळ सरासरीनें दोन वर्षे, एक महिना व २२ दिवसांनीं पडला. पहिल्या पन्नाशींत हे दोन वर्षे दोन महिन्यांनीं व दुसऱ्या पन्नाशींत ते सरासरीनें दोनवर्षे एक

महिन्यानें पडले आहेत. हे जरी ४७ दुष्काळ पडले, तरी त्यांचें संकट ५८ वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत होतें; याचा विचार केल्यास सरासरीनें एक वर्ष दहा महिन्यांनीं हिंदुस्थानावर दुष्काळाचें वर्ष येतें असें अनुमान निघतें. अटराव्या शतकांत पडलेल्या २४ दुष्काळांचीं एकंदर वर्षे ४५ होतीं, व त्या मानानें त्या शतकांत सरासरीनें २ वर्षे, २ महिने व २० दिवसांनीं दुष्काळाचें संकट येत गेलें असें दिसतें. अटराव्या शतकापेक्षां एकुणिसाव्या शतकांत दुष्काळ जास्त पडले व ते फारच लवकर पडत गेले असें सर्व बाजूंचा विचार केल्यास निर्विवाद ठरतें. एकुणिसाव्या शतकांतील दुष्काळांपैकीं काश्मीरांत ३, पंजाबांत १४, वायव्य प्रांतांत २०, अयोध्या ९, राजपुताना २८, गुजराथ ३१, महाराष्ट्र ३४, मारवाड ३६, मद्रास २०, बंगाल ६ व सिंध १५ या प्रमाणें दुष्काळ पडले. हिंदुस्थानाच्या एका भागांत दुष्काळ तर दुसऱ्या भागांत सुबत्ता असा नियम या दुष्काळांत होता. एकाच प्रसंगीं हें दुष्काळाचें संकट सर्व हिंदुस्थानावर कधींही पडत नसतें. दुष्काळाचें निवारण करण्याकरितां इतर राष्ट्रांकडून मदत मिळविण्याची अपेक्षाही पूर्वीं नव्हती; परंतु या शतकापासून तशा मदतीची बरीच आवश्यकता उद्भवली आहे. ही मदत जरी योग्य प्रकारानें मिळते, तरी असंख्य माणसें ह्या दुष्काळांत मृत्युमुखीं पडल्यावांचून राहिलीं नाहींत. मारवाड, महाराष्ट्र, गुजराथ, राजपुताना, वायव्य प्रांत व मद्रास हे भाग दुष्काळाच्या संकटांत बहुतकरून सांपडत असतात. एक दुष्काळ येऊन गेल्यानंतर येणारा दुसरा दुष्काळ फारच भयंकर स्वरूपानें पुढें येत असतो. दुष्काळाचा विस्तार जितका मोठा, तितकें त्याचें संकट फार भयंकर व जास्त दिवस टिकणारें बहुधा असतें. इ० स० १८७७ च्या दुष्काळाचा विस्तार २,५०,०००, सन १८९७ च्या दुष्काळाचा विस्तार तीनपासून चार लाख, व सन १९०० च्या दुष्काळाचा विस्तार सहा पासून सात लाख चौरस मैलांचा होता; असें हिंदुस्थानसरकारचे वायुचक्रशास्त्रवेत्ते मि० इलियट हे ह्मणतात.

मि० विलीयम डिग्बी हे ह्मणतात कीं, पाऊस न पडल्यानें दुष्काळ पडण्याचा संभव उत्पन्न होणें, यांत फारसें आश्चर्य नाहीं; परंतु एखादा पाव-

साळा कोरडा जातांच, ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील इतर प्रदेशांत दुष्काळ पडत नाहीं व तो हिंदुस्थानांतच पडतो; ही गोष्ट फार विचार करण्यासारखी आहे. हिंदुस्थान देशांत दुष्काळ पडण्याचें खरें कारण धान्याचा तोटा हें नव्हे, तर तें खरेदी करण्याकरितां लागणाऱ्या पैशाची खोट हेंच होय. अलीकडे हिंदुस्थानाच्या बहुतेक भागांत आगगाडी सुरू असल्यानें, धान्याचा पुरवठा पुष्कळ होत असतो; परंतु पैशाची अनुकूलता नसल्यानें, त्या धान्याचा उपयोग आपले प्राण वांचविण्याकडे लोकांस करून घेतां येत नाहीं. दिवसेंदिवस हिंदुस्थानाची लोकस्थिति बिघडत चालली असून, ते लोक स्वसंरक्षणास असमर्थ होत चालले आहेत. त्यांची पोषकशक्ति नष्ट होत चालली असल्यानें, त्या देशावर दुष्काळांचीं संकटें वारंवार येणें यांत फारसें नवल नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या दप्तरांतील कागदांवरून दिसतें कीं, सन १८०० पासून १८५४ वर्षापर्यंत त्या देशांत १३, सन १८६० पासून १८७८ पर्यंतच्या वर्षांत १३ व सन १८७८ पासून सन १९०० पर्यंतच्या काळांत १६ दुष्काळ ह्मणज एकंदरींत या शतकांत ४५ दुष्काळ पडले आहेत. हे फार आहेत. ह्यांनीं लोकांची हानि फार झाली आहे. बुद्धि कमी झाली ह्मणून ह्मणा, व्यापारधंदे बसले ह्मणून ह्मणा, जमिनीचा कस गेला ह्मणून ह्मणा, किंवा अतर्क्य कारणांनीं पाऊस कमी आणि अनियमित पडतो ह्मणून ह्मणा, आमचें इंग्लिश सरकार रयतेच्या रक्षणार्थ इतकें झटत असतां, आणि कोट्यावधि रुपये खर्चीत असतां, दुष्काळापासून इतकी पीडा लोकांस भोगावी लागते, ही गोष्ट खरोखर फार खेदास कारण आहे. तरी लोकांस साह्य करण्यास आगगाड्यांत भांडवल घालण्यापेक्षां पाटबंधाऱ्यांत घालावें, अशी जी योजना सरकारांत निघाली आहे, तिचा उपयोग फार होईल.

हिंदुस्थानाचा एकंदर विस्तार १५,५७,३८२ चौरस मैलांचा असून २८,७२,२३,४३१ लोकसंख्या सन १८९१ सालच्या खानेसुमारीच्या वेळीं होती. या सालीं ६,७४,३१,६२६ शेतकरी होते व ते सन १८८१ सालापेक्षां २५,९५,४१७ कमी झाले आहेत. सेवावृत्ति करणारांची संख्या १८८१ सालीं ४,९५,८०,३३९ होती ती सन १८९१ सालीं ५,६५,३८१ नें वाढली

आहे. इ० स० १८८१ सालीं हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या २४,१३,६३,६८९ होती व ती सन १८९१ सालीं ४,५८,५९,७४२ नें वाढली आहे. ही वाढ शेंकडा १९ या प्रमाणानें आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या वाढली ह्मणून, हा देश निर्धन झाला असें कांहीं लोक ह्मणतात; परंतु तें खरें ठरणें अशक्य आहे. उत्तर अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानें व युरोपांतलीं इतर राष्ट्रें, यांतील प्रजावृद्धि झपाट्यानें होत असतां, त्या देशांवर दुष्काळाचीं संकटें वारंवार येत नाहींत व हिंदुस्थानांतच तीं यावीं हें विचार करण्यासारखें आहे. इ० स० १८९१ सालीं हिंदुस्थानांत दरचौरस मैलास १८४ मनुष्यांची वस्ती होती. या संख्येची युरोपांतील कांहीं ठिकाणच्या वस्तीशीं तुलना केल्यास, या बाबतीचें विशेष स्पष्टीकरण होतें. बेल्जममध्यें सन १८९७–९८ सालीं वस्ती दरचौरस मैलास ५७९, फ्रान्सांत १८८, जर्मनींत २५० व जपानांत ही वस्ती दरचौरस मैलास २८९ होती; परंतु ते देश कलाकौशल्यांत बरेच पुढें गेल्यानें तिकडील लोकसंख्येची वाढ लोकांस असह्य वाटत नाहीं. दिवसेंदिवस हिंदुस्थानांतील उत्पादक वर्ग कमी होत असून, अनुत्पादक वर्ग वाढत चालला आहे. सन १८८१ पासून १८९१ पर्यंतच्या दहा वर्षांत शेतकरी कमी झाले व सेवावृत्ति स्वीकारणारांची संख्या बरीच वाढली आहे. अशी स्थिति जगावरील इतर देशांत कधींही आढळून यावयाची नाहीं. तिकडे उत्पादक श्रमाची वाढ एकसारखी चालू आहे व अनुत्पादक धंदे नाश पावत असतात; त्यामुळें तिकडील प्रत्येक मनुष्याचें वार्षिक उत्पन्न बरेंच वाढत चाललें आहे. इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्याचें सरासरीनें वार्षिक उत्पन्न ६१५ रुपये ( ४१ पौंड ), स्काट्लंडचें ४८० रुपये, आयर्लंड २४०, आस्ट्रेलिया ६४६, अमेरिका ४००, कानडा ३९०, फ्रान्स ३८५, रशिया १०५, तुर्कस्थान ६९ व हिंदुस्थानांतील लोकांचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें ३० रुपये आहे असें एका शोधकानें ह्मटलें आहे. हिंदुस्थानाचे फडणीस सर इ. बेरिंग हे ह्मणतात कीं, हिंदुस्थानांतील लोकांचें सरासरीनें वार्षिक उत्पन्न २७ रुपयांचें आहे. सर डब्ल्यु. वेडर्बर्न व मि० दादाभाई नवरोजी यांचे मतानें हें उत्पन्न वीस रुपयांपेक्षां जास्त

नाहीं. सर रिचर्ड टेंपल यांचे मतें तें फक्त दहाच रुपये आहे. हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ येवढें अफाट असतां, ह्या देशांतील लोकांचें उत्पन्न इतकें कमी होण्याचें कारण, व्यापार धंद्यांची कमतरता व निरुद्योगी लोकांची संख्या जास्त हेंच होय. हिंदुस्थानांत दिवसेंदिवस गरीब लोकांची वाढ होत चालली आहे. ज्यांना चांगल्या सुबत्तेच्या दिवसांतही पोटभर खाण्यास मिळत नाहीं अशा लोकांची संख्या, सन १८८१ सालीं १६,४५,९८,०४८ म्हणजे शेंकडा ६८ होती, ती सन १८९१ सालीं १८,९२,३७, ३५१ झाली. अर्थात् ह्या दहा वर्षांत ती २,४६,३९,८०३ जास्त वाढली. ह्या वृद्धीचा विचार केल्यास, निर्धन लोकांची वाढ होत असून, मध्यम व सधन लोकांची संख्या कमी होत आहे, हें खालील आंकड्यांवरून कळेल.—

| स्थिति | इ० सन १८८१. | | इ० सन १८९१. | |
|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | शेंकडा सरासरी | लोकसंख्या | शेंकडा सरासरी |
| श्रीमंत. | २,९५,९६,९६५ | १२.२ | १,७२,९५,०७२ | ६.२ |
| मध्यम. | ४,१५,९२,६८९ | १७.३ | ३,०९,६८,५४१ | १०.७ |
| गरीब. | १६,४५,९८,०४८ | ६८.२ | १८,९२,३७,८५१ | ६५.९ |
| भिक्षा मागणारे | ५५,७५,९८७ | २.३ | ७०,८५,६१३ | २.४ |
| विदेशीय. | ............ | ...... | ४,२६,३६,३५४ | १४.८ |
| एकंदर लोकसंख्या. | २४,१३,६३,६८९ | | २८,७२,२३,४३१ | |

ज्यांची प्राप्ति वार्षिक खर्चास पुरून थोडीबहुत शिल्लक राहते, असे लोक 'श्रीमंत' या कोष्टकांत, ज्यांचें खर्च भागण्याइतकें उत्पन्न असतें किंवा ज्यांना बाजारांत थोडेंसें तरी कर्ज मिळूं शकतें असे लोक 'मध्यम' या कोष्टकांत व ज्यांना चांगल्या सुबत्तेच्या दिवसांतही पोटभर खाण्यास मिळत नाहीं, असे लोक 'गरीब' या कोष्टकांत दाखल केले आहेत. गरीबांची

संख्या वाढणें व मध्यम स्थितींतील आणि श्रीमंतांची संख्या कमी होणें, हेंच वारंवार दुष्काळ पडण्याचें मुख्य कारण आहे. सन १८७६–७७ सालीं ज्या लोकांना सरकारच्या आश्रयाची बिलकूल जरूर वाटत नव्हती, त्यांनीं सन १८९७ च्या दुष्काळांत सरकारानें सुरू केलेल्या कामांवर मजुरी केल्याचें व सन १८९७ सालीं जे लोक जरा खाऊनपिऊन सुखी म्हणविले जात असत, ते सन १८९९–१९०० च्या दुष्काळांत मदतीच्या कामांवर येऊन दाखल झाल्याचें, हिंदुस्थानचे व्हाइसराय नामदार लार्ड कर्झन यांनीं आपल्या एका भाषणांत कबूल केलें आहे. अर्थात् सांपत्तिक दृष्टीनें वरिष्ठ म्हणविलेल्या लोकांचा ऱ्हास होत असून, निर्धन लोकांची संख्या वाढणें, असा प्रकार ज्या देशांत चालतो, त्या देशावर दुष्काळांच्या वारंवार स्वाऱ्या होऊन, असंख्य मनुष्यांचा संहार होणें हें अगदीं साहजिक आहे. सन १८९१ सालीं हिंदुस्थानांतील लोकांचें एकंदर उत्पन्न ८,५७,४१,६४,९०० रुपयांचें होतें व त्या मानानें तें दरमाणशीं २७ रुपये सरासरीनें येतें; परंतु या उत्पन्नांतून सरकारसारा व दुसरे सर्व प्रकारचे कर वजा केल्यास, त्या उत्पन्नाची सरासरी रु. ९–१०–० ची येते. पन्नास वर्षांपूर्वीं ही प्राप्ति दरमनुष्यास १०८ रुपयांची होती, ही गोष्ट सरकारानें कबूल केली आहे. हिंदुस्थानांत एक वर्षाच्या अंतरानें अलिकडे मोठे दुष्काळ पडूं लागले असल्यानें, प्रत्येक दुष्काळांत असंख्य माणसें व लाखों जनावरें यांना प्राणांत संकट भोगावें लागतें. हिंदुस्थानासंबंधानें कळकळ बाळगणारे मि० हिंडमन हे म्हणतात कीं, हिंदुस्थानांत राज्यकारभार चालविण्याचें धोरण कसें आहे, तें दुष्काळ आला म्हणजे आपणांस समजतें. आपल्याकडून होणाऱ्या चुकांनीं आपली प्रजा किती निर्धन झाली आहे, तें त्या समयीं ईश्वर आपणांस कळवीत असतो. सर लुईस म्यालेट यांनीं सन १८७९ सालीं आपल्या एका सरकारी पत्रांत म्हटलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील जमीन हळू हळू वांझ बनत असून, त्या जमिनीस जास्त लोकांचें पोषण करावें लागतें. पडीत जमीन लागवडीस आणण्यास फार प्रयास पडतात व मोठा खर्च करावा लागतो; परंतु तितकें सामर्थ्य हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांत राहिलें नाहीं. शेतकीच्या उपयोगास येणाऱ्या जनावरांचें प्रमाण घटण्याचें

कारण चाऱ्याची खोट, शेतकऱ्यांचें दारिद्र्य, व त्या जनावरांची वाढ करण्याकडे सरकारचें दुर्लक्ष्य हेंच मुख्य आहे. लोकसंख्या वाढत आहे; व शेतकी निर्बळ होत चालली, अशा प्रसंगीं तो देश दैन्यावस्थेच्या पूर्ण फेऱ्यांत सांपडणें हेंच युक्त आहे. सरकारानें जमीनधारा जरी आतां कमी करण्याचा यत्न केला, तरी तूर्त इतकेंच होईल कीं, दुष्काळाचीं संकटें फार लवकर येत असतात, तीं जरा उशीरां येतील." या पत्रानंतर लोटलेल्या काळांत लोकसंख्या चार कोटी ज्यास्त वाढली व शेतकीच्या उपयोगास येणाऱ्या जमिनीचा विस्तार मात्र पूर्वींच्या इतकाच म्हणजे १५,५०,००,००० एकर कायम आहे. साडेपंधरा कोटी एकर जमिनीवर सुमारें तीस कोटी मनुष्यांचें व सरकारचे असंख्य कामदार आणि त्यांच्या अद्वितीय इच्छा यांचें उपजीवन होत असतें. सरकारचा संबंध ज्या बाबतींशीं असतो, अशा प्रसंगीं काटकसर होऊं शकत नाहीं; ती शेतकऱ्यांच्या पोटगीकडे मात्र होते व त्यामुळें त्यांना उपास काढण्याचा प्रसंग येतो. साडेपंधरा कोटी एकर जमीन जी लागवडींत आहे, तिजपैकीं बरीच जमीन कापूस, नीळ, कुसुंबा, ताग, चहा, काफी, अफू, व तमाखू वगैरे पदार्थ पिकविण्याकडे कीं ज्यांचा लोकांच्या निर्वाहास तादृश्य उपयोग होत नसतो, अशा वस्तु पिकविण्याकडे गुंतल्यामुळें, हिंदुस्थानांत निर्वाहविषयक साधनांची बरीच खोट पडत चालली आहे. याप्रमाणें हिंदुस्थानांत धान्य जरी कमी पिकतें, तरी त्यांतूनही तें सराईस परदेशीं जातें व त्या धान्याच्या बदल्यांत परकीय व्यापारी जी किंमत देतात, ती इतकी थोडी असते कीं, त्या रकमेंतून, सरकारचें देणेंही पुरें होत नाहीं. हिंदुस्थानांत प्रत्येक मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें ३६ शिलींग आहे; ही संपत्ति ३६५ दिवसांस पुरण्यासारखी नसल्यानें, ह्या देशांत अत्यंत आपत्तींतूनच काळाचे दिवस कंठावे लागतात. दरसाल कोट्यवधि माणसें दारिद्र्याचे पूर्ण फेऱ्यांत सांपडत आहेत असें असतां, इंग्लंड दरसाल त्यांजकडून चार कोटी पौंड नेतें. ही संख्या दरसाल वाढत चालली आहे. इ० स० १८७६ पेक्षां सन १८९६ ची ही रकम दुपटीजवळ वाढली. जोंपर्यंत इंग्लंड हिंदुस्थानांतून पैसे आणण्याचा असाच क्रम चालू ठेवील, तोंपर्यंत

हिंदुस्थान कधींही सधन होणार नाहीं. हिंदुस्थानांत हल्लीं (ता. ७ मे १९००) ८,५०,००,००० लोक दुष्काळाचें संकट भोगीत आहेत. हिंदुस्थानाच्या ज्या भागांत कायम जमीनधाऱ्याची पद्धति आहे, तिकडील लोकांपेक्षां ज्या प्रदेशांत जमीनधारा नेहमीं वाढत असतो, तिकडील शेतकरी जास्त कंगाल बनले आहेत; असें असतांही शेतांत पिकणारें धान्य घरीं येण्यापूर्वींच सरकार आपला कर वसूल करून घेतें, त्यामुळें त्या शेतकऱ्यांवर सावकारांच्या व्याजमनोतीच्या खर्चाची जबाबदारी येऊन पडते व त्यांना दोनप्रहरची भ्रांत होण्याचा प्रसंग येतो! हिंदुस्थानांतील लोक कृषिकर्मजीवी आहेत व त्यांची संख्या ज्या अर्थीं वाढत चालली आहे, त्या अर्थीं तो देश सधन बनत चालला असावा, असें कांहीं अर्थशास्त्रवेत्त्यांचें मत आहे; परंतु तें निदान हिंदुस्थानास तरी लागू नाहीं. हिंदुस्थानांतील जमिनीचा कस उतरत आहे. त्या जमिनीवर बारा महिने मेहनत करून, तीन महिन्यांच्या खर्चास पुरण्याइतकेंही धान्य उत्पन्न होत नसतें. 'दारिद्र्य हें लोकसंख्येची जास्त वाढ करितें,' हें मि० अॅडाम स्मिथ यांचें वाक्यच हिंदुस्थानास लागू पडतें. इ० स० १८०१ पासून १८४६ पर्यंत गेलेल्या काळांत आयर्लंडांतून या सिद्धांतास पूर्ण पुष्टि मिळाली. रशियाच्या सर्वांत गरीब विभागांत लोकसंख्या बरीच वाढत असते. तसेंच इंग्लंडांतील कसब्यांमधील निर्धन प्रदेशांतही लोकसंख्येची बरीच वाढ झालेली आढळते. हल्लीं जे मोठे दुष्काळ हिंदुस्थानांत पडतात, ते फक्त पावसाच्या कमतरतेमुळेंच एकदम पडत नाहींत. त्या देशांतील लोकांस निर्धन बनविण्याकरितां ज्या विषवृक्षाचें बीं लावलें गेलें, त्याचा हा जोमदार वृक्ष पुढें वाढत चालला आहे. 'दुष्काळ अकस्मात् पडला' ही गोष्ट खरी नाहीं. तो येणार हें मुत्सद्यांच्या दृष्टीनें पूर्वींच ठरलेलें होतें. तो पडला नसता तर मात्र आश्चर्य वाटलें असतें. दुष्काळाचीं चिन्हें ओळखण्यास इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील मुत्सद्दी शक्तिवान् असतां, त्या देशावर येणारीं हीं महाभयंकर संकटें टाळण्याचा प्रयत्न बरोबर होत नाहीं, हेंच खरें सखेदाश्चर्य होय.[1]

---

१. मि० हिंडमन यांनीं गेल्या वीस वर्षांत इंग्लंडांतील 'डेली

'दुष्काळ' कशास ह्मणावें, हाच हल्लीं एक वादग्रस्त प्रश्न झाला आहे. इ० स० १८९६-९७ च्या दुष्काळासंबंधानें हिंदुस्थानाचे प्रधान लार्ड जार्ज ह्यामिल्टन यांचें पार्लमेंटमध्यें जें भाषण झालें, त्यांत ते ह्मणाले होते कीं, "इंग्लंडांत ज्या भावानें धान्य मिळतें, त्यापेक्षां हिंदुस्थानांत स्वस्त दरानें हल्लीं तें मिळतें; यास्तव तिकडे दुष्काळ आहे असें ह्मणतां येत नाहीं." इंग्लंडच्या लोकांची व हिंदुस्थानांतील लोकांची प्राप्ति, यांचा विचार केल्यास, इंग्लंडांत नेहमीं धान्याची महागाई जरी असते, तरी दुष्काळ पडत नाहीं, व साधारणतः धान्याचे भाव वाढतांच, हिंदुस्थानांत दुष्काळ पडतो; यांतील खरें इंगित तात्काळ समजेल. धान्याचे भाव कितीही वाढले तरी तें खरेदी करण्याची ज्या देशास शक्ति आहे, त्या देशांत निर्धन हिंदुस्थानापेक्षां धान्य महाग मिळतें, या सबबीनें 'दुष्काळ नाहीं' ह्मणणें हें फारच विलक्षण आहे. इंग्लंडास दरसाल हिंदुस्थानाकडून धान्याचा मोठा पुरवठा होत असतो. ज्या पदार्थांची इंग्लंडास फार जरूर, अशा वस्तूंची खोट भरून काढणें, हेंच तूर्त हिंदुस्थानाचें कर्तव्य ठरून गेलें आहे. गहूं, नीळ, अळशी, कापूस वगैरे पदार्थांसंबंधानें हिंदुस्थानसरकाराकडून दरसाल इंग्लंडास जे रिपोर्ट जातात, त्यांजवरून ही गोष्ट पूर्णांशीं सिद्ध होते. ऐन मोसमीच्या दिवसांत ह्मणजे सरकारधारा भरण्याच्या हंगामांत, शेतकऱ्यांजवळून धान्य विकत घेऊन, तें इंग्लंडास नेण्याकरितां कांहीं मंडळ्या तिकडून आल्या असून, त्यांचें काम आज बऱ्याच दिवसांपासून एकसारखें चालू आहे. ते धान्याचे व्यापारी इकडील धान्य साफ करून, त्याजवर आपला मोठा नफा व इतर खर्च चढवून इंग्लंडास नेऊन विकतात. इंग्लंडच्या बाजारांतून धान्याची मागणी येण्यापूर्वींच, हिंदुस्थानांतील कांहीं स्वार्थी व्यापारी तो माल तिकडे रवाना करितात, व नफा मिळविण्याची इच्छा ठेवतात; अर्थात् हें धान्य लांबून तिकडे गेल्यामुळें इंग्लंडास हिंदुस्थानापेक्षां महाग पडतें. हिंदुस्थान हें धान्याचें जन्मस्थान असल्यानें, इंग्लंडापेक्षां हिंदुस्थानांत धान्याचे भाव कमी असणें हेंच युक्त आहे. दुष्काळ

---

क्रानिकल' पत्रांत लिहिलेले लेख, त्यांचीं इंग्लंडांत झालेलीं भाषणें व त्यांचे इतर लहान लेख, ह्यांच्या आधारानें हा थोडक्यांत सारांश दिला आहे.

असो किंवा सुगीचे दिवस असोत; परदेशांत या देशांतून हजारों खंडी धान्य जातें; त्यामुळें इकडे त्याचे भाव ओघानेंच वाढतात. थोडेसे भाव चढ-तांच, दुष्काळ येणें हें तत्व हिंदुस्थानाच्या प्रस्तुतच्या स्थितीस तर तंतोतंत लागू पडतें. इंग्लंडच्या लोकवस्तीच्या मानानें त्या देशास पुरून उरण्याइ-तकें तिकडे धान्य पिकत नाहीं. तिकडे जरी एखादे वर्षी पीक आलें नाहीं, तरी दुष्काळ पडण्याचें त्या देशास बिलकूल भय नसतें. तसें हिंदुस्थानांत नाहीं. इंग्लंड सधन असून तो देश फार लहान आहे. इंग्लंडापेक्षां हिंदु-स्थानाची लोकसंख्या ३० पट ज्यास्त व इंग्लंडच्या क्षेत्रफळापेक्षां हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ सवाएकतीस पट ज्यास्त आहे. इंग्लंडला चारी बाजूनें समुद्रकिनारा असून, जगावर त्याचा व्यापार फार मोठा आहे. पाहिजे ती वस्तु थोड्या वेळांत इंग्लंड आणूं शकतें. जलमार्गानें हिंदुस्थानापेक्षां इंग्लंड १६० पट व रेल्वेनें ५०० पट पुरवठा आपल्या देशांत करून देशाच्या गरजा भागवीत असतें. असो. इ० स० १७९१ मध्यें हिंदुस्थानांत पडलेल्या भयंकर दु-ष्काळाच्या वेळीं, गहूं व बाजरी सवा दोन रुपयांस मण या भावानें मिळत होती; परंतु आज ( सन १९०० ) त्याच धान्याचा भाव अनुक्रमें ६ व ८ रुपयांचा झाला आहे. ही वाढ जवळ जवळ तिप्पट झाली. इ० स० १८३७ मध्यें बंगाल्यांत एक रुपयास एक मण पांच शेर ( बंगाली ) गहूं मिळत होते, ते सन १८९७ सालीं एक रुपयास पावणेदहा शेर मिळूं लागले. या साठ वर्षांत हा धान्याचा भाव मूळच्यापेक्षां साडेचार पटीनें वाढला. गेल्या पन्नास वर्षांपूर्वी सुबत्तेच्या दिवसांत गहूं एक रुपयास १ मण मिळत असत, ते अलिकडच्या सुबत्तेच्या दिवसांत तीन रुपयांसही मिळत नाहींत! ही धा-न्याची महर्गता या देशांतील संपत्ति इंग्लंडाप्रमाणें वाढली असती, तर ती आह्मांस बिलकूल असह्य झाली नसती. हिंदुस्थानापेक्षां इंग्लंडांत धान्य महाग मिळतें व दुष्काळाच्या दिवसांत तें इंग्लंडापेक्षां हिंदुस्थानांत स्वस्त असतें, येवढ्याच सबबीवर 'दुष्काळ नाहीं' असें ह्मणतां येणें अशक्य आहे. सांप्रत इंग्लंड ज्या संपन्न अवस्थेंत आहे, त्याच अवस्थेंत हिंदुस्थान देश असता, तर हल्लींपेक्षांहीं ज्यास्त किंमत धान्यास द्यावी लागली असती, तरी 'दुष्काळ आहे' असें ह्मणण्याचा दुर्दैवी योग त्यास बिलकूल आला नसता. हिंदुस्थानांतील

लोकांचें वार्षिक उत्पन्न ज्या काळीं मोठें होतें, त्या समयीं (अकबराचे वेळीं) एका मनुष्यास महिन्यास पांच आण्यांचाही खर्च येत नव्हता, व हल्लीं वार्षिक उत्पन्न घटलें असतां, एका मनुष्याचा मासिक खुराकी खर्च पांच रुपयांतही आटपत नाहीं! इंग्लंडची स्थिति अशी नाहीं. त्या देशांतील लोकांजवळ भरपूर पैसे आहेत व त्यांना पाहिजे तितका खर्च करण्याची शक्ति मिळाली आहे. इंग्लंडांतील गरीब मनुष्यास रहाण्यास चांगलें घर असतें व हिंदुस्थानांतील गरिबास घरदारही नसतें. त्याला झाडाखालीं किंवा एखाद्या देवळांत आपलीं हंडी-मडकीं ठेवून दिवस कंठावे लागतात! इंग्लंडांतील भिकाऱ्यांच्या अंगावर फाटके कपडे अढळून यावयाचे नाहींत, व हिंदुस्थानांतील भिकाऱ्यांच्या अंगावर अगोदर कपडाच मिळण्याची मारामार व कदाचित् तो असल्यास त्यास छिद्रें पडून, त्याच्या बरगड्या व शरीराची बांधणी कशी आहे तें त्यांतून स्पष्ट दृष्टीस पडतें! हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील महर्गता यांचा विचार केल्यास, हिंदुस्थानांतील लोकांस महर्गतेपासून जितका त्रास होतो, तितका इंग्लिशांस होत नाहीं. इंग्लंडांतील लोक सधन असून, त्यांना कोणत्याही पदार्थाची उणीव पडूं शकत नाहीं. चार्लस ब्लेयर हे ह्मणतात कीं, "हिंदुस्थानाची ही निर्धन स्थिति जर जावयाचीच असेल, तर त्या देशावर वारंवार भयंकर दुष्काळ आलेच पाहिजेत[१]" इंग्लंड हल्लीं बाहेर कोळसा पाठवून इतर देशांतून धान्य किंवा दुसरे पदार्थ नेतें, त्याचप्रमाणें हिंदुस्थानानें कोळसा किंवा लोखंड पाठवून, धान्य किंवा खपाचे दुसरे पदार्थ इंग्लंडांतून आणविण्याचा क्रम सुरू केल्यास, 'दुष्काळ' कसा असतो याची इंग्लंडच्या लोकांस कल्पना करितां येईल.

हिंदुस्थानांतील शेतकीचीं जनावरें हल्लीं बरींच कमी होत चाललीं आहेत. इ० स० १८९३-९४ पासून या संबंधाचा जो सरकारी-पंचवार्षिक आंकडा प्रसिद्ध झाला आहे; त्याजवरून ही बाजू पूर्णांशीं समजूं शकते. सन १८९३-९४ सालांत सर्व हिंदुस्थानांत २,९४,६१,९४५ बैल, ३,०२,४३,०२८ गाई, ३९,३२,८५४ रेडे, ८६,३४,०४२ ह्मशी व १,६३,५२,५१३ लहान जनावरें होतीं. सन

१. चार्लस ब्लेयरकृत 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' पृष्ठ १२७.

१८९७-९८ सालांत २,७६,१२,६०२ बैल, २,०९,२६,९९६ गाई, ३३,०३,७८१ रेडे, ८४,३५,०८६ ह्मशी, व १,७८,३०,८७२ लहान जनावरें होतीं. या पांच वर्षांत बैल शेंकडा ६.३ व गाई शेंकडा ३०.८ कमी झाल्या! शेतकीच्या उपयोगास येणाऱ्या जनावरांची वाढ लोकसंख्ये-बरोबर झाली असती, तर या देशाच्या दारिद्र्याची वृद्धि होणें अशक्य होतें. शेतकीचीं जनावरें न वाढतां तीं कमी झालीं, याचें जोखीम अप्रत्यक्ष रीतीनें इंग्लंडावरच येऊं शकेल. 'गायरानें' पूर्वी या देशांत होतीं, तीं अलीकडे बंद झालीं, तेणेंकरून शेतकऱ्यांच्या जनावरांना अप्रत्यक्ष रीतीनें चाऱ्याचा दुष्काळ पडला. शेतकरी स्वतः दारिद्र्यानें पीडिला गेला असल्यानें, त्याच्याकडून त्याच्या जनावरांचीं शुश्रूषा न होतां, त्या जनावरांवर कामांचा ज्यास्त बोजा येऊन पडतो. अर्थात् तीं अल्पायुषी होतात. पन्नास वर्षांपूर्वी ह्या देशांत ज्या वयाच्या बैलास नांगरास धरण्याचा निषेध मानीत असत, त्यापेक्षांही लहान वयाचे बैल अलीकडे शेतकरी नांगरास जुंपून, जेमतेम शेतकी करीत असतात. शेतकीचीं साधनें कमी होत चालल्यानें, अलीकडे लहान बैलांसही ज्यास्त किंमत पडूं लागली आहे. गाईची संख्या गेल्या पांच वर्षांत जी घटली, तेंही या देशाच्या दुर्दशेचें खरें दर्शक होऊं शकेल.

हिंदुस्थानाचा विस्तार व त्यांतील सुपीक प्रदेश, यांचा विचार केल्यास, ह्या देशांतील गहूं फ्रान्सापेक्षां वरच्या प्रतीचे ठरले पाहिजेत; परंतु अलीकडे ते खालच्या प्रतीचे ठरूं लागले आहेत. नेपोलियनच्या वेळीं फ्रान्सांत जी जमीनधाऱ्याची पद्धति सुरू झाली, तिच्यामुळें त्या देशाची जमीन हिंदुस्थानापेक्षां सुपीक नसतांही, फ्रान्साच्या गव्हांचा व्यापार विशेष वाढला आहे. दरसाल हिंदुस्थानांतून ४५ कोटी रुपयांचा गहूं विलायतेस जातो. "असा धातुक्षय लागल्यामुळें हिंदुस्थानाचीं हाडें पिचून तो देश शरपंजरीं पडला आहे. हिंदुस्थानांत जे दुष्काळ पडतात ते पैशाचे असतात, धान्याचे नव्हत. ही गोष्ट लोकांनीं लक्षांत ठेविली पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकांस पुरून उरण्याइतकें धान्य त्या देशांत पिकतें; परंतु तें धान्य विकत घेण्यास त्या लोकांजवळ आह्मीं पैसाच राहूं दिला नाहीं; तर अशा प्रसंगीं

हिंदुस्थानांतील लोकांचे किती हाल होत असतील, याची सहज कल्पना होऊं शकेल[1]." 'फ्रेंड ऑफ इंडिया' पत्र ह्मणतें कीं, "हिंदुस्थानाच्या बहुतेक लोकांचें जीवन शेतकीच्या धंद्यावर आहे व तो धंदा पावसावांचून होत नाहीं; परंतु जे लोक शेतकींत गुंतले आहेत; ते आपला, सरकारचा व सावकारांचा निर्वाह करून, दुष्काळाशीं सामना करण्यास हल्लीं शक्तिवान नाहींत." सन १८६३ मध्यें ओरिसा प्रांतांत जो दुष्काळ पडला, त्या संबंधानें त्या विभागाचे कमिशनर हे ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतून परदेशीं पुष्कळ माल रवाना होतो. येवढ्यावरून हिंदुस्थानाची संपन्नता वाढली, असें मानणें हें अगदीं गैर आहे. प्रसंग येऊन पडल्यामुळें ह्या देशांतील लोकांस माल बाहेर पाठविल्यावांचून सुटकाच नसते. हें संपन्नतेचें लक्षण नसून, तें दैन्यावस्थेचेंच होय. सरकारचा सारा भरण्याकरितां धान्य फार विकावें लागे, त्यामुळें ओरिसा प्रांतांतील शेतकऱ्यांजवळ तें शिल्लक राहिलें नाहीं. व त्याचा हल्लीं वाईट परिणाम घडत आहे." इंग्लंडांतील 'नाइन्टिन्थ सेंचुरी' मध्यें सन १८८४ सालीं सिमोर किंग ह्यांचा एक निबंध प्रसिद्ध झाला आहे, त्यांत ते ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या व्यापारावर मिळणारा नफा, परद्वीपस्थ व्यापारी खाऊन जातात; इतकेंच नव्हे, तर त्या व्यापाऱ्यांच्या क्षुधेच्या पूर्ततेकरितां, हिंदुस्थानदेशाकडून दुसऱ्याही कांहीं प्रकारचे लाभ सरकार त्या व्यापाऱ्यांना देववून, त्यांना संतुष्ट ठेवतें. हिंदुस्थानाचा परदेशांशीं हल्लीं व्यापार वाढला आहे असें आपण ह्मणतों; परंतु ती त्या देशाची नुकसानीच वाढत आहे. सडका, आगगाडी वगैरे व्यापारोपयोगी साधनांची खोट भरून काढण्याचा आपण जो यत्न केला, त्याजमुळें त्या देशाच्या तोट्याची रक्कम मात्र दरसाल फुगत चालली आहे." डाक्टर डब्ल्यु. डब्ल्यु. हंटर हे ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतील सर्व गरीब लोकांस जर पोटभर खाण्यास मिळेल, तर हल्लींच्यापेक्षां फारच थोडें धान्य हिंदुस्थानाच्या बाहेर जाईल." तसेंच त्यांनीं आपल्या "हिंदुस्थानांत इंग्लंडनें केलेलीं कामें" या पुस्तकांत ह्मटलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं

१. लंडन येथील 'डे लाईट' व 'फ्रेंड ऑफ इंडिया' या नांवांच्या प्रजापक्षीय पत्रांत या बाबतींसंबंधानें बरेंच लिहिलें गेलें आहे.

एक तृतीयांश माणसें अर्धपोटीं उपाशीं रहात असतात!" मि० फ्लेचर यांनीं 'न्यू एज' नांवाच्या वर्तमानपत्रांतील एका लेखांत, सन १८९७ सालीं ह्मटलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील तीस कोटी लोकसंख्येपैकीं शेंकडा ८० मनुष्यें अगदीं विपन्नावस्थेंत राहून दिवस कंठीत आहेत. तिकडील लोक सहनशील असल्यानें, तें भयंकर दुःख ते सहन करितात.........मध्यान्ह काळाची वेळ कशी जाते, याचीच हिंदुस्थानास तूर्त मोठी चिंता पडली आहे. अशा लोकांजवळून घेतलेल्या पैशावर आमचा राज्यकारभार चालू आहे. ज्या मनुष्यांचें वार्षिक उत्पन्न एक पौंडही नाहीं; त्यांना जो न्यायाधीश त्यांच्या तंट्यांचा इनसाफ करितो, त्याच्या पगाराकरितां एक हजार पौंड अप्रत्यक्ष रीतीनें द्यावे लागतात!" सर आक्लंड कोल्वीन हे ह्मणतात कीं, "गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थानांतील कर मोठ्या प्रमाणावर वाढत गेले आहेत...... देशाचें उत्पन्न व पीकपाणी हें दुष्काळानें खुंटलें व लोक अगदीं दीन झाले आहेत. हिंदुस्थानावर इंग्लंडानें जो खर्चाचा बोजा लादला, तो उचलण्याचें त्या देशास बिलकूल सामर्थ्य उरलें नाहीं. सरकारचें उत्पन्न वाढलें, येवढ्यावरून तो देश संपन्न झाला, असें निष्पन्न होत नाहीं. सरकारचें जितकें उत्पन्न वाढतें, तितकेंच किंबहुना त्यापेक्षां ज्यास्त लोकांचें दारिद्र्य वाढत असतें[1]." मि० साम्युएल स्मिथ हे ह्मणतात कीं, "ज्या वर्षांना 'सुकाळ' असें तुह्मी विशेषण देतां, त्या सालींही हिंदुस्थानांतील प्रजेस उपास काढावे लागतात; इतकी ती प्रजा निर्धन झाली आहे. गेल्या वर्षीं हिंदुस्थानाच्या बहुतेक भागावर जो भयंकर दुष्काळ पडला, त्यामुळें लोकांच्या त्या दुःखांत उलटी भरच येऊन पडली. शेतकरी हे आपल्या मालमत्तेस सर्वांशीं मुकले आणि त्यांचीं शेतकीचीं व दुसरीं जनावरें चारा आणि पाण्याच्या कमतरतेमुळें मरण पावलीं. शेतकीचीं दुसरी साधनें त्यांना पोटाकरितां विकावीं लागलीं. अशी स्थिति असल्यामुळें त्या लोकांस सरकारदेणें जड जात असेल हें उघड आहे. हिंदुस्थानाच्या सर्व भागावर जोंपर्यंत कायम जमाबंदी होणार नाहीं व शेतकींत केलेल्या सुधारणेचें

---

१. सन १८९७ च्या डिसेंबर महिन्याचा 'नाइन्टिन्थ सेंचुरी'चा अंक.

फळ शेतकऱ्यांस अक्षयीं चाखण्यास मिळणार नाहीं, तोंपर्यंत, त्या देशाचा उत्कर्ष होण्याची आशाच करावयास नको[१]."

हिंदुस्थानांत आगगाडी झाल्यास, या देशाचा उत्कर्ष होईल अशी पूर्वी समजूत होती. परंतु आगगाडी उलट लवकर दुष्काळ आणते, असें आतां या देशांतील लोकांच्या पूर्ण प्रत्ययास येऊन चुकलें आहे. धान्याची खोट जेथें असेल तेथें मात्र आगगाडीनें लवकर धान्य जाऊन पोंचेल; परंतु यापेक्षां ज्यास्त, दुष्काळाच्या समयीं तिचा उपयोग होत नाहीं. ना० सुब्रह्मण्य अय्यर, यांनीं सन १८९८ सालीं 'इंडिया' पत्रांतील एका लेखांत ह्मटलें आहे कीं, "...... आगगाडीच्या प्रसारामुळें आपल्या देशांतील जुने व महत्वाचे सर्व उद्योगधंदे बसले. हिंदुस्थान हा कांहीं नवीन देश नव्हे. एखाद्या नव्या देशास नूतन साधनांच्या द्वारें सुधारण्याचा यत्न केल्यास, तें क्वचित् प्रसंगीं फलद्रुप होत असतें; तसें आपल्या देशाचें मुळींच नाहीं. ज्या ठिकाणीं आगगाडीचें शुष्ककाष्ट दाखल झालें, तेथील जुने व उपयुक्त धंदे हळू हळू बंद पडले. अर्थात् कित्येक लोक त्यामुळें वृत्तिहीन झाले. ह्या देशांतील ग्रामसंस्था अशी आहे कीं, त्या गांवाच्या खपास लागणारे सर्व पदार्थ, त्याच गांवांत उत्पन्न व्हावेत; परंतु आगगाडीच्या प्रसारामुळें परदेशांतील माल येऊन, येथील लोकांच्या धंद्यांवर आघात झाला व त्या लोकांना निर्धनावस्थेंत दिवस कंठण्याचा प्रसंग आला. कापड विणण्याचें उदाहरण हें या बाबतींत फार महत्वाचें आहे. कापड तयार करण्याच्या कामांत हिंदुस्थाना इतका कुशल असा जुना देश जगावर दुसरा कोठेंही आढळून येणार नाहीं. पूर्वी ह्या देशांत तयार झालेलें कापड युरोप, अमेरिका वगैरे देशांतील बाजारांत विकण्यास जात असे, तसें आतां नाहीं. आतां तिकडून कपडा इकडे येत असतो. हिंदुस्थानांतील विणकर लोक, त्यांचा धंदा बसल्यामुळें, इतके गरीब झाले आहेत कीं, त्यांचें थोडक्यांत वर्णन होणें अशक्य आहे. यंत्रांतून तयार झालेली वस्तु खेडेगांवांतही दाखल झाल्यानें, या देशांतील कारागिरांचा दैवयोग फिरून, ते नष्टचर्येच्या फेऱ्यांत सांप-

---

१. ता. २१ फेब्रुआरी सन १८९८ रोजीं पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानासंबंधानें झालेलें भाषण.

डले....." दुष्काळाच्या प्रसंगीं या कारागिरांनाच अगोदर उपासमार काढण्याचा प्रसंग येत असतो. मि० फीचर हे ह्मणतात कीं, "रोग झाल्यावर उपाय करण्यापेक्षां, अगोदर रोगच न होऊं देणें हें ज्यास्त श्रेयस्कर आहे. ......आपणांस आपला पन्नास वर्षांचा अनुभव स्पष्ट दाखवितो कीं, आगगाडीचा धंदा हा हिंदुस्थानास शहाणपणाचा उद्योग नाहीं, तसेंच तो एकाही दुष्काळास हटवूं शकला नाहीं, परंतु उलट जें पाणी अनावृष्टीचे वेळीं लोकांस मरतांना बचावतें; तें त्यानें मिळूं दिलें नाहीं;[1] अर्थात् आगगाड्यांचीं कामें करण्याकडे आपण गुंतलों व पाण्याच्या बांधकामांकडे आपलें दुर्लक्ष झालें......." आगगाडी झाल्यास या देशांत दुष्काळ पडणार नाहींत अशी पूर्वी समजूत होती; परंतु पुढें ती खोटी ठरली व ती उलट दुष्काळ लवकर आणते, असेंही बऱ्याच विद्वानांचें आतां ठरींव मत झालें आहे. प्राचीन काळीं इतर देशांतून ह्या देशांत धान्य येण्याचें साधन जरी अनुकूळ नव्हतें, तरी इकडे पडणाऱ्या दुष्काळांस भयंकर स्वरूप येत नव्हतें; व अलीकडे सर्व प्रकारची अनुकूळता असतां, दुष्काळाचें संकट असह्य होतें, याचें कारण लोकांजवळ संपत्ति राहिली नाहीं हेंच होय.

तेराव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष ना० शंकर नायर यांनीं उमरावतीस राष्ट्रीय सभेच्या आरंभास केलेल्या भाषणांत ह्मटलें होतें कीं, "हिंदुस्थानाचें भयंकर दारिद्र्य हेंच दुष्काळाचे मुळाशीं आहे. मद्रास इलाख्यांत रयतवारी सुरू झाल्यापासून, जे आंकडे पुढें आले, त्याजवरून तिकडील रेव्हिन्यू बोर्डानें असा अंदाज केला आहे कीं, चांगला पाऊस पडलेल्या सालीं, दोन कोटी ऐशीं लाख लोकसंख्येपैकीं पन्नास लाख लोकांना खाण्यास एक दाणाही उरत नाहीं! अशी जेथें स्थिति, तेथें पाऊस कमी पडल्यावर काय दशा होत असेल, तें सहज कळूं शकेल. हिंदुस्थानाचें दारिद्र्य आपणांस वाटेल तेथें व वाटेल तिकडे पसरलेलें दिसतें. त्याला प्रत्यक्ष सरकारी आंकड्यांचीच जरूर नाहीं. महागाई, ह्मातारपण, आजार वगैरेची तरतूद करण्याचें लोकांजवळ साधन बिलकूल उरलें नाहीं. जे शेतकरी पूर्वी सधन होते, ते दिवसें-

---

१. 'साटर्डे रिव्यु' नांवाचे पत्रांतील मि. फीचरकृत "कालव्यांविरुद्ध लोहमार्ग" हा लेख.

दिवस भिकारी व मजूर बनत चालले आहेत. दारिद्र्यामुळें त्यांना शेतकी करण्याची शक्ति उरली नाहीं. जरा पावसानें ताणून धरलें कीं, दुष्काळ पुढें येऊन उभाच राहतो! पूर्वी उशिरानें दुष्काळ येत होते; परंतु अलीकडे तर दरसाल इकडे दुष्काळच असतो. हा देश फार सुपीक, नानाप्रकारचीं पिकें काढण्यास अनुकूल हवापाणी, लोक काटकसरी व कष्टाळू इतकें असूनही, शेतांत पिकणाऱ्या धान्यावर लोकांचा निर्वाह होऊं शकत नाहीं, हें केवळ आश्चर्यच होय. ह्या देशाची जी निर्वाहक साधन संपत्ति, तिला अलीकडे लागलेल्या नुकसानाचाच हा परिणाम आहे. सामान्य लोकांचें अत्यंत दारिद्र्य, प्रत्येक वर्षी येणारी दुर्भिक्षता, वारंवार येऊन देश उध्वस्त करणाऱ्या इतर आपदा, आणि मनुष्यसंहार करणारे इतर प्रकार, यांच्याबद्दल नीतिशास्त्रदृष्ट्या सरकारास जबाबदार धरणारांची समजूत दृढ होत चालली आहे. लोकसंख्येची वाढ हेंच पूर्वोक्त संकटांचें खरें कारण, असें कांहीं इंग्लिश मुत्सद्दी ह्मणतात; परंतु ती त्यांची समजूत केवळ भ्रामकच होय. देशाची संपन्नता वाढविणें हेंच सरकारचें खरें कर्तव्य होतें; तें बजावलें गेलें असतें, तर लोकसंख्येच्या वाढीवर दूषण ठेवण्याचा प्रसंगच आला नसता.[1]" मिसेस ॲनिबिझांट या तत्वज्ञानी बाईनीं, हिंदुस्थानासंबंधी आपला अनुभव इंग्लंडास कळवितांना ह्मटलें आहे कीं, "दोन तीन वर्षांत हिंदुस्थानांत पिकें बरोबर न आल्यानें व व्यापारांत चढाओढ झाल्यानें मोठा दुष्काळ पडला. धान्य उत्पन्न करणाऱ्या देशांशीं हिंदुस्थान देश चढाओढ करतो. या प्रकारानें तो देश सर्वथैव निर्धन बनला. ही संवय त्या देशास इंग्लंडानेंच लावली आहे." मि. होल्डरनेस हे ह्मणतात कीं, वीस वर्षांमागें ज्या हिंदुस्थानांत सर्व लोकांस पुरून, दरसाल एकावन लाख साठ हजार टन धान्य उरत असे, त्याच देशांत हल्लीं सत्रा लाख टनही धान्य शिल्लक राहत नाहीं. हिंदुस्थानांत धान्याचा सांठा बिलकूल नसतां, जेवढें धान्य तिकडे पिकतें, त्यांतील तीन चतुर्थांश परदेशांत जातें! अशी स्थिति असल्यामुळेंच त्या देशावर दुष्काळाचें संकट येत असतें. हिंदुस्थानांतून धान्य इंग्लंडास नेण्याचा जो

---

१ ता. २७ डिसेंबर सन १८९७ रोजीं राष्ट्रीयसभेच्या प्रमुखांचें झालेलें भाषण.

क्रम हल्लीं सुरू आहे, तो अर्थशास्त्रास फारच सोडून असल्याकारणानें, त्या देशावर दुष्काळाचें संकट येतें.

हिंदुस्थानास दारिद्र्य येण्यास इतर बाबती जशा कारणीभूत झाल्या, त्याचप्रमाणें कांहीं सामाजिक प्रघातही देशांतील लोकांस त्रासदायक झाले आहेत. आमची दायविभागपद्धति फार घातक आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे विभाग ती वडिलार्जित समजून होतात, त्यामुळें एकाही शेतकऱ्याजवळ त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहापुरती जमीन रहात नाहीं. ही दायविभागपद्धति इतकी अनिष्ट आहे कीं, विभाग होतां होतां, कित्येक शेतकऱ्यांजवळ बिलकूल जमीन न राहतां, शेवटीं त्यांना दुसऱ्याची जमीन मक्त्यानें करण्याचा व लोकांच्या मजुरीवर निर्वाह करण्याचा प्रसंग येत असतो. दरसाल या लोकांची संख्या वाढत चालली आहे. कित्येक संपत्तिमान कुटुंबें या पद्धतीनें सर्वांशीं नष्ट होऊन गेलीं. वडिलार्जित मिळकतीचे विभाग न करितां, ती फक्त ज्येष्ठ पुत्राकडे ठेवून, बाकीच्या मुलांना स्वतः संपादन करण्याची संधि देण्याचा प्रघात इकडे युरोपाप्रमाणें असता, तर ह्या देशाची इतकी खराबी झाली नसती. फरुकाबादचे माजी न्यायाधीश मि० रास हे ह्मणतात कीं, "जेथें सर्व मुलांचा सारखा वारसा पोंचत असतो, तेथील जमीनदार दरिद्री होऊन, त्यांच्या जमिनी विकल्या जातीलच. तशांतून राज्यांत शांतता असेल, तर जमिनीच्या विभागाचे तंटे लागून त्याचा पूर्वोक्त परिणाम घडावयाचाच." लोकांत ह्या प्रघातानें आळस येतो, व हक्काकरितां भांडणें सुरू होऊन, कित्येक घराणीं नष्टचर्येच्या पूर्ण फेऱ्यांत सांपडतात. दायविभागासंबंधानें न्यायासनापुढें जीं प्रकरणें चालतात, त्यांजवरून ह्या तंट्यांची वाढ कशी होत गेली, त्याची सहज कल्पना होऊं शकते. तसेंच लोकांची गृहस्थितिही फार बिघडली आहे. वरिष्ठ प्रकारच्या लोकांत निरनिराळ्या प्रकारचे अवाढव्य खर्च विनाकारण चालतात, त्यामुळें देशाच्या संपत्तीचा एकंदरींत फारच नाश होतो. परदेशांतील मालाचा खप केवळ चैनीकरितां होऊन, त्यामुळें संपत्ति तिकडे जाते व त्याचा परिणाम गरीब अवस्थेतील लोकांवर घडतो. शेतकरी व कारागीर हे खर्चाची फारच काटकसर करून आपला निर्वाह जेमतेम करितात; परंतु जे थोडेसे संपत्तिमान

लोक ह्या देशांत आहेत, त्यांचे खर्च भागविण्याकरितां, त्या निर्धन लोकांवर ज्यास्त जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी ह्मणजे व्याज व भारी मनोती किंवा तिचें त्या प्रसंगीं कांहीं निराळेंच स्वरूप असतें. शेतकरी हा उत्पादक वर्ग असून, नोकरीचा पेशा स्वीकारिलेला वर्ग हा त्यांजवर उपजीवन चालविणारा आहे; परंतु दुष्काळाच्या किंवा महर्गतेच्या दिवसांत शेतकऱ्यांना जितका त्रास पडतो, तितका नोकरीच्या पेशांतील लोकांस पडत नाहीं; कारण त्यांना धान्य खरेदी करण्याची शक्ति असते व उत्पादक ह्मणविलेल्या शेतकऱ्यांस ती बिलकूल नसते. त्यांच्या घरांतून जें धान्य सराईच्या तोंडीं थोड्या किंमतीनें बाहेर जातें, तेंच धान्य महर्गतेंत त्यांना परत मिळण्याचें साधन नसतें. तसेंच शेतकऱ्यांच्या श्रमावर ज्यांचा निर्वाह अवलंबून असतो, अशा लोकांची संख्या एकसारखी वाढत चालली आहे. कुटुंबांतील चालकाचें उत्पन्न थोडें व त्याजवर उपजीवन करणारांची संख्या जास्त वाढली, म्हणून लोक दिवसेंदिवस गरीब होत चालले आहेत. हिंदुस्थानांतील लोकांचा मुख्य निर्वाह तांदूळ, गहूं, व दुसरीं हलक्या किमतीचीं धान्यें यांजवर होतो. साधारण महर्गतेंतही या धान्यांचे भाव वाढतात व लोकांस फार त्रास पडतो. दक्षिण हिंदुस्थानांत तांदूळ व उत्तर हिंदुस्थानांत गहूं हीं विशेष प्रचारांतील धान्यें होत. ह्या देशावर वारंवार दुष्काळ येतात; परंतु तीं धान्यें लोकांच्या संग्रहास राहूं शकत नातींत. कांहीं सधन लोक धान्य भरून ठेवतात; परंतु दुष्काळाच्या दिवसांत तें लुटलें जाण्याचा संभव असतो. लोकांत शक्ति उरली नसल्यानें, दुष्काळाचें संकट असह्य होऊं नये याकरितां, कोणत्याही प्रकारच्या सावधगिरीचे उपाय योजण्यास ते अशक्त झाले आहेत. अधिकारबलाचा कांहीं सरकारी नोकर गरीब लोकांच्या विरुद्ध उपयोग करितात, त्यामुळेंही कित्येक कुटुंबें आपत्तीच्या पूर्ण तडाख्यांत सांपडलीं आहेत.

सर बार्टल फ्रेयर यांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानांत धान्याचें पीक सर्वथैव पावसावर अवलंबून असतें. पाऊस दरसाल तिकडे चांगला पडत नाहीं, त्यामुळें धान्याची कमतरता होते. हिंदुस्थानांत कांहीं लोकांचे जातिविशिष्ट धंदे ठरलेले आहेत. पूर्वापार धंदे सोडून दुसरा उद्योग स्वीकार-

ण्यास ते लोक तयार नसतात, त्यामुळें त्यांचे दुष्काळाच्या वेळीं फार हाल होतात. अशा प्रसंगीं प्रत्येक मनुष्यास त्याच्या मर्जीप्रमाणें काम देऊन, मजुरी देण्याचें सामर्थ्य सरकारास नाहीं. सर्व वर्गांच्या लोकांपासून एकच प्रकारचें काम दुष्काळांत सामान्यतः घेतलें जातें. मजुरी करणें हें फारच हलकें काम आहे असें समजणारे लोक हिंदुस्थानांत बरेच आहेत. कांहीं लोक तर इतके लालचू आहेत कीं, जास्त पैसे मिळविण्याचे इच्छेनें ते धान्याचें पीक न काढतां, अफू, कापूस, गुळी वगैरे पदार्थ पिकवितात. हे पदार्थ दुष्काळाच्या वेळां उपयोगीं पडत नाहींत. धान्य खपापुरतें न पिकविल्यानें कांहीं ठिकाणीं सुकाळांतही दुष्काळ पडतो. हिंदुस्थानांत धान्याशिवायच्या पदार्थांच्या लागवडीकडे एकंदर ८ कोटी एकर जमीन, इ० स० १८९८ सालीं गुंतली गेली होती व दरसाल ही संख्या हळू हळू वाढतच चालली आहे. धान्याच्या मोसमींत सधन व्यापारी धान्य विकत घेऊन, पावसाळ्याच्या आरंभास त्याचे भाव वाढवून, जी महर्गता करितात, ती पद्धति इतकी वाईट आहे कीं, तिचा योग्य वेळीं बंदोबस्त न झाल्यास हटकून वाईट परिणाम घडतो.

हिंदुस्थानाचा व्यापार व उद्योगधंदे बसल्यानें, ज्यांचा धंदा केवळ मजुरीवर चालतो, त्यांना मजुरी अगदीं थोडी मिळते; इतकेंच नव्हे, तर कांहीं लोकांना उपासमार कंठावे लागतात. मजुरांना कामाची गरज असते व ती व्यापाऱ्यांना किंवा कारखानदारांस नसते. अर्थात् थोड्या मजुरीवर रहाण्याचा दुर्दैवी योग त्यांस येतो. अशा प्रसंगीं एखादें अनावर्षण पडतांच, धान्याचे भाव एकदम वाढतात, व या लोकांना फारच आपदा भोगावी लागते. धान्य महाग व मजुरी थोडी, असा क्रम ज्या समयीं सुरू होतो, त्या काळास 'दुष्काळ' असें ह्मणण्यास हरकत नाहीं. थोड्या पैशांत ज्यास्त काम करून घेण्याचा क्रम सुरू होतांच, देशावर अनर्थपात घडत असतो. सुकाळांतही हिंदुस्थानांतील मजुरीचे दर वाढत नसतात, त्यामुळें मजुरांच्या संग्रहांत पैसा रहात नाहीं व पुढें दुष्काळाचें संकट आल्यास उलट मजुरीचा दर कमी होऊन धान्य महाग होतें; अशा प्रसंगीं या मजुरांची दशा फारच वाईट होते. रोजमुरा वाढला असतां, धान्याचे भाव जरी वाढले, तरी

त्यापासून अपाय घडत नसतो. हिंदुस्थानांत दुष्काळांमध्यें धान्याचे भाव वाढतात व रोजमुरा कमी होतो, असा सर्वसाधारण नियम आहे. युरोपांत असें नाहीं. धान्याचे भाव वाढतांच रोजमुराही वाढत असतो. सुकाळांतसुद्धां हिंदुस्थानांतील मजुरांस पोट भरण्याइतका रोजमुरा मिळत नाहीं; त्यामुळें धान्याचे भाव थोडेसे वाढतांच, या लोकांची त्रेधा उडते. त्यांना आपलें जीवित अशक्य वाटतें. अशा प्रसंगीं त्यांस सरकार व धनवान् लोकांनीं योग्य मदत देण्याची फार जरूर आहे. परंतु ती मिळत नसल्यानें, लवकरच दुष्काळाचें भयंकर संकट पुढें येऊन उभें रहातें. पावसाची साधारण कमतरता होतांच, प्रत्येक गांवांत मजुरी करणारे जे लोक असतात, ते निराश्रित होतात व त्यांना अन्नावांचून मरण्याची प्रथम पाळी येते. शेतकऱ्यांना मजुरांची जरूर नसते व मजुरांजवळ खाण्यास धान्य नसतें, या दोन कारणांनीं प्रत्येक गांवीं दुष्काळाच्या आरंभास फार वाईट परिणाम घडत असतो. हेंच या देशांतील शेतकरी संपन्न असते, तर अशा प्रसंगीं ते शेतकींत सुधारणा करण्याचा यत्न प्रथम करिते; व त्या गांवच्या मजुरांना भरपूर काम मिळालें असतें. खुद्द शेतकऱ्यांना हल्लीं अर्धपोटीं किंबहुना कांहीं काळ सर्वांशीं उपाशीं रहावें लागतें, अशा अवस्थेंत त्यांच्याकडून या मजुरांचा निर्वाह न होणें हेंच स्वाभाविक आहे. ह्या मजुरांची संख्या अलीकडे बरीच वाढत चालली आहे. सन १८८१ सालीं १,३२,३६,५२३ मजूर ह्या देशांत होते, ते सन १८९१ सालीं २,०२,८४,८८२ झाले. ह्या दहा वर्षांत ही मजुरांची वाढ शेंकडा ५३ झाली. मजुरांना रोजमुरा चांगला मिळतो, या सबबीवर ही वाढ झाली नाहीं. निर्वाहाचें साधन उरलें नसल्यामुळें, त्या लोकांना मजुरीचा धंदा स्वीकारावा लागतो. दरसाल ही संख्या प्रत्येक गांवीं एकसारखी वाढतच चालली आहे.

मि० राबर्टस् ओल्सोय मिल्नर हे ह्मणतात कीं, "ज्या प्रदेशांतील जमीन अतिशय सुपीक आहे, अशा हिंदुस्थानांतील एकपंचमांश लोक शेतकीच्या धंद्यावर उपजीविका चालवितात. हिंदुस्थानांतील शेतकीचा विस्तार दरसाल कमी होत चालला आहे. १८९४-९५ सालीं १९,१६,००,००० एकर जमीन लागवडींत होती, ती इ० स० १८९९-१९००

सालीं फक्त १६,६०,००,००० एकर लागवडींत राहिली. शेतकीपेक्षां जास्त अगत्याचा दुसरा उद्योग मुंबईतील गिरण्यांचा. हा सन १८७५ पासून १८९५ पर्यंत बराच वाढत गेला; परंतु हल्लीं या उद्योगांतील वीस गिरण्या बंद पडल्या असून, आणखी वीस लवकरच बंद पडतील अशीं चिन्हें दिसत आहेत. रुपयाची किंमत कृत्रिमपणानें उतरल्यामुळें, त्या गिरण्यांत तयार झालेला माल जास्त महाग पडतो. हिंदुस्थानांतील लोकांजवळ मालाची खरेदी करण्यास पैसा उरला नाहीं. इ० स० १८७३ मध्यें हिंदुस्थानांत चांदीचें व इंग्लंडांत जरी सोन्याचें नाणें चालू होतें, तरी त्या समयीं हुंडीच्या व्यापारांत घोंटाळा होऊं शकला नव्हता. हिंदुस्थानाचें उत्पन्न चांदीच्या नाण्यांत असून, दरसाल इंग्लंडास १,७०,००,००० पौंडांची रकम सोन्याच्या नाण्यांत हिंदुस्थान देश भरतो. या कारणानें गेल्या १५ वर्षांत हुंडणावळीबद्दल हिंदुस्थान सरकारास पुष्कळ खर्च झाला. ही स्थिति मिटविण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें इ० स० १८९३ सालीं नाण्याचा कायदा केला व चांदीच्या टंकसाळी बंद केल्या...... इ० स० १८७६-७७ च्या दुष्काळांत लोकांनीं आपल्या संग्रहास असलेले पूर्वीचे चांदीचे दागिने विकले व त्यांची किंमत त्यांस ४० लाख पौंड मिळाली; परंतु इ० स० १८९३ च्या नाणेंविषयक कायद्यामुळें हे दागिने पूर्वी ज्या किंमतीस घेतले होते, तिजपेक्षां शेंकडा ५० पासून ६० पर्यंत त्यांची कमी किंमत उत्पन्न होऊं लागली. तसेंच या कायद्याचा दुसराही असा परिणाम घडला कीं, गहूं, कापूस वगैरे मालाबद्दल हिंदुस्थानांतील लोकांस पूर्वी दोन हजार रुपये मिळत होते, त्याचेच आज १५०० रुपये मिळूं लागले! ........ हिंदुस्थानांत पुढें दुष्काळ पडूं नयेत, अशीच सरकारची इच्छा असेल तर, चालू राज्यपद्धतींत फेरफार करून, ती त्या देशांतील लोकांच्या भरभराटीस कारणीभूत होण्यासारखी सुरू करून, तो देश उद्योगधंद्यांत पुढें जाईल अशी तजवीज करावी.[१]"

सर विलियम हंटर हे ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतील ज्या लोकां-

---

१. इंग्लंडांतील 'रेनाल्डस् न्यूसपेपर' ता० ३ जून १९००

पासून आपण संपत्ति मिळवितों, त्या लोकांच्या दीन स्थितीचें इंग्लंडांतील लोकांस जर बरोबर ज्ञान होईल, तरच आपल्या वर्तनाची आपणांस खरी योग्यता कळेल. तो देश अतिशय कंगाल बनला असल्यानें, यापुढें त्याची फारच वाईट दशा होण्याचें भय आहे." दरसाल लाखों माणसें दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडत आहेत. पाऊस न पडण्यावरच हिंदुस्थानचे दुष्काळ सांप्रत अवलंबून रहात नाहींत. पावसाची कमतरता होतांच दुष्काळास भयंकर स्वरूप येतें, येवढाच पावसाचा दुष्काळाशीं संबंध आहे. घरीं खाण्यास नसल्यास तो दुष्काळच असतो. असे दुष्काळपीडित लोक हिंदुस्थानांत असंख्य आहेत. पावसाच्या कमतरतेचा त्यांच्या उपासमाराशीं फारसा संबंध नाहीं.

इ० स० १८५८ पूर्वीं हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति हल्लींपेक्षां बरीच चांगली होती. त्या वेळची अवस्था पाहून, पुढें आम्ही फारच भयंकर दैन्यावस्थेच्या फेऱ्यांत सांपडणार, याचें भविष्य कांहीं विद्वान् इंग्लिश लोकांनीं त्याच वेळीं केलें होतें. तारीख २४ जून सन १८५८ रोजीं इंडिया बिलाच्या वाचनाच्या वेळीं, मि० जॉन ब्राईट यांचें पार्लमेंटमध्यें जें भाषण झालें, त्यांत त्यांनीं ह्मटलें होतें कीं, "... इंग्लिशांच्या सत्तेखालीं आलेल्या प्रदेशांतील जमीन नांगरून, तिजवर निर्वाह करणारे लोक मोठ्या दारिद्र्यांत, मोठ्या फिकिरींत व भयंकर दुःस्थितींत सांपडत चालले आहेत......", इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांतील लोक अतिशय निर्धन बनत चालले आहेत; हे बेचाळीस वर्षांपूर्वीचे उद्गार जरी आहेत, तरी ते आजच्या स्थितीस बऱ्याच अंशानें लागू पडतात. हिंदुस्थानांतील लोकांस दारिद्र्य येऊन तो देश केवळ कंगाल बनला आहे. त्याला जगावरील इतर राष्ट्रांच्या मदतीवांचून, दुष्काळाचे कठिण दिवस टाळतां येत नाहींत, ही स्थिति खुद्द सरकारानेंही प्रांजळपणें कबूल केली आहे.

इ० स० १८०१ पासून इ० स० १९०१ पर्यंतच्या शंभर वर्षांत हिंदुस्थानाच्या अवस्थेचें बरेंच स्थित्यंतर झालें आहे. हिंदुस्थानाच्या भौतिक स्थितीचा विचार केल्यास, इ० स० १८०० मध्यें लार्ड वेल्सलीच्या ताब्यांतील व आज (इ० स० १९००) लार्ड कर्झनचे अमलांतील हिंदुस्थान देश,

यांत अतिशय मोठें अंतर पडलें आहे[१]. हिंदुस्थानाचें स्वामित्व लार्ड वेल्सलीनें ज्या अवस्थेंत घेतलें, त्या अवस्थेचें अनिष्ट रूपांतर होऊन तो देश लार्ड कर्झनचे हवालीं हल्लीं इंग्लंडानें केला; असें कांहीं पाश्चात्य विद्वान् ह्मणतात. इंग्लंडचे व्यापारी हिंदुस्थानाचा माल इंग्लंडच्या बाजारांत जातांच, इ० स० १८०१ मध्यें फार घाबरले होते, तें त्यांचें भय हल्लीं सर्वांशीं नष्ट होऊन, हिंदुस्थानाची दारिद्र्यावस्था विशेष वाढतांच, इंग्लंडच्या व्यापाऱ्यांना आपली इच्छा वाढविण्यास उत्तम संधि मिळाली. हिंदुस्थान देश गेल्या शतकांत इतका निकृष्टावस्थेंत येऊन पोंचला आहे कीं, आतां त्याच्या दारिद्र्याची परिसीमाच उरली नाहीं. गेल्या शंभर वर्षांपासून हिंदुस्थानांतून परदेशांत संपत्तीचा प्रवाह फारच मोठ्या वेगानें जाऊं लागला, त्यामुळें तो देश दरसाल ज्यास्त निर्धन बनत चालला आहे. पाश्चात्य अर्वाचीन अर्थशास्त्राचें परिपालन व परदेशांचें हिंदुस्थानाशीं दळणवळण हींच या अखंडित प्रवाहाचीं मुख्य कारणें होत. हिंदुस्थानास क्षयरोग लागून, तो अर्थसाधनरहित झाला असल्यानें, त्यास शक्ति आणण्यासाठीं इंग्लंडनें फारच त्वरेनें यत्न केले पाहिजेत. इंग्लंडाच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या सरकारच्या मदतीनें हिंदुस्थानांतून जी संपत्ति वाहून नेली, तिची फेड होत नसल्यामुळेंच, हा देश अर्थसाधनरहित होत गेला; ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. सर मान्टिगोमरी हे म्हणतात कीं, "आमच्या पूर्वीं हिंदुस्थानांत जे राज्यकर्ते होऊन गेले, त्यांनीं हिंदुस्थानाच्या संपत्तीचा तेथेंच राहून उपयोग केला, त्यामुळें तेथील लोकस्थितीवर भयंकर आघात झाला नाहीं. सध्याचा क्रम फारच निराळा आहे. तिकडून संपत्ति परदेशास दरसाल जाते. अर्थात् तितकी खोट त्या देशांत पडत गेली हें उघड आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतून दरसाल ३० लक्ष पौंड संपत्ति इंग्लंडास जाते, ही रकम व्याजमुद्दलासह तीस वर्षांत ७,२३,००,००० पौंड होते. हिंदुस्थानास दरसाल पडत असलेला हा खाडा सामान्य नाहीं. व त्याची फेड बरोबर रीतीनें होईल अशी शक्तिही इंग्लंडास नाहीं." मि०

---

१. तारिख १४ डिसेंबर १९०० चें इंडियापत्र व कलकत्त्याचें तारिख ७ जानेवारी सन १९०० चें अमृतबझार पत्र.

होरेस बेल यांच्या मताचा आशय असा आहे कीं, हिंदुस्थानांत आगगाडी, तारायंत्र व टपाल या संस्था चांगल्या चालतात, म्हणून त्या देशाची सांपत्तिक स्थिति सुधारली असें मात्र मानतां येत नाहीं. हिंदुस्थानांतून परदेशांत जें धान्य जातें, त्याचा मोबदला त्या देशास कशा रीतीनें मिळतो, याचा विचार केल्यास, धान्य पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांवर सरकारानें मोठा दाब ठेवण्याची आवश्यकता आहे. तारायंत्र व टपाल यांच्या योगानें उलट लोकांवर एके प्रकारचें अप्रत्यक्ष कराचें दडपण येऊन पडलें. लोकांस मद्यप्राशनाची संवय लागते, म्हणून मद्यविक्रीचीं दुकानें बंद करणें किंवा लोक शस्त्रानें खून करतात, यासाठीं शस्त्रांचे कारखाने बंद करणें हें जसें योग्य नाहीं, त्याचप्रमाणें आगगाडीनें परदेशांत धान्य फार जातें, ह्मणून तिचा प्रसार कमी करणें हेंही योग्य नाहीं. आगगाड्या बंद करण्याची शिफारस करण्यापेक्षां, परदेशांत जाणाऱ्या धान्यावर दाब ठेवा, हें सांगणें फारच शहाणपणाचें होईल. इ० स० १८७९–८० सालीं दुष्काळ कमिशनानें सुचविल्याप्रमाणें हजारों मैलपर्यंत लोहमार्गाचा प्रसार केला आहे; तरी हिंदुस्थानावर दुष्काळाचें संकट येतच असतें. अर्थात् आगगाड्यांपासून दुष्काळप्रतिबंधास चांगली मदत होत नाहीं, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी जेथें धान्याची खोट असते तेथें तें नेण्यास आगगाडीपासून बरीच मदत होते. ज्या सुपीक प्रदेशांतून दुष्काळांत आगगाडी धान्य वाहून नेईल, तेथील लोकांस दुष्काळाचें संकट भोगण्याचा प्रसंग येईल, ही तक्रारही वजनदार आहे. अशा प्रसंगीं सरकारानें योग्य विचार करावयाचा असतो. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वॉलराथ हे म्हणतात कीं, "प्राचीनकाळीं हिंदुस्थानांतून शेतकीच्या उत्पन्नाशिवायचा माल परदेशांत फार जाई, व तिकडून कच्चा माल या देशांत बराच येत असे. हल्लीं त्याच्या उलट व्यवहार चालू झाल्यानेंच, हिंदुस्थानावर दुष्काळाच्या वारंवार स्वाऱ्या होतात."

मि. स्पिनी यांचे हिंदुस्थानांतील दुष्काळांविषयीं विचार फार महत्वाचे आहेत. त्यांच्या मताचा एकंदरींत आशय असा आहे कीं, हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकाराचें राज्य झाल्यापासून त्या देशास फार फायदे झाले, हें निर्विवाद आहे; परंतु सांपत्तिक स्थितींत मात्र त्या देशाची अवस्था वेगळी

झाली. तिकडील सर्व व्यापार व उद्योगधंदे परराष्ट्रांनीं बसवून टाकले. इंग्लंडांत पूर्वी अवर्षणें फार पडत व दुष्काळांच्याही स्वाऱ्या वारंवार होत असत; परंतु आतां तसें होत नाहीं. इंग्लंडांतील मेघमंडळांत सुधारणा केल्यामुळें किंवा पावसाशीं सलोख्याचा तहनामा ठरविल्याकारणानें दुष्काळांच्या स्वाऱ्या होत नाहींत; हें ह्मणणें अगदीं खोटें आहे. अवर्षणें पुष्कळ पडतात, परंतु इंग्लंडांत दुष्काळ पडत नाहीं. सरकारानें व्यापार व उद्योगधंदे फार वाढविले, त्यामुळें लोक अतिशय सधन झाले आहेत. आयर्लंडांत व रशियांत ह्या शतकामध्यें बरेच दुष्काळ पडले. उद्योगधंद्यांची खोट, हेंच त्या दुष्काळांचें कारण होय. लोक सधन असल्यावर दुष्काळाची बाधा त्यांस होत नसते. कालव्यांचीं बांधकामें करून, शेतकऱ्यांवरील कराचें दडपण कमी केल्यावांचून, हिंदुस्थानास दुष्काळरूपीं जडलेला व्याधि नष्ट होऊं शकणार नाहीं. हिंदुस्थानाचें दारिद्र्य हेंच दुष्काळाचें खरें व मुख्य कारण आहे.

---

# भाग पांचवा.

## ह्या देशांतील शेतकरी व दुष्काळ पडण्याचीं मुख्य कारणें.

प्राचीनकाळीं हिंदुस्थानांतील शेतकरी वर्ग फारच सधन होता. शेतकीचीं सर्व साधनें अनुकूळ असून, सरकारदेण्याची सक्ति फारशी शेतकऱ्यांवर होत नसे. 'शेतकरी हा आपला धनी' अशी समजूत असल्यामुळें, त्यांना संतोष देणें हेंच त्या वेळच्या सरकाराचें कर्तव्य ठरलें होतें. शेतकीचे उत्पन्नांतून सरकारास थोडासा भाग देऊन, बाकीच्या भागावर फक्त शेतकऱ्यासच आपला निर्वाह चालवावा लागत असे. त्या काळीं ह्या देशांतील शेतकरी वर्ग बराच सधन होता. जमिनींत जें पीक येईल त्याच्या प्रमाणावर सरकार शेतसारा घेत असे. शेतकऱ्यांचें संरक्षण करण्याकरितांच, त्यांच्याकडून आपणांस कर मिळतो, ही समजूत त्या काळच्या राज्यकर्त्यांची असल्यामुळें, दुष्काळ किंवा लढाया, यांपासून उद्भवणाऱ्या अडचणींतून सरकार त्या वर्गाचा बचाव करण्यास झटत असे. शेतें जास्त पिकल्यास आपणांस उत्पन्नहि जास्त येईल, या आशेचें राजकर्त्यांच्या ठायीं ज्या समयीं वास्तव्य होतें, तो काळ ह्या देशाच्या खास भरभराटीचाच होय. राज्यकर्त्यांनीं शेतकीकडे लक्ष देऊन, तिचा चांगला उत्कर्ष केल्यामुळें, सर्व धंद्यांपेक्षां शेतकी वरिष्ठ प्रतीची ठरली होती. अतिवृष्टि, अवर्षण वगैरे आपत्ति आल्यास शेतकऱ्यांजवळ भरपूर धान्य असल्यानें, त्यांना त्या आपत्तीपासून बिलकूल पीडा होत नव्हती. त्या समयीं खरा दुष्काळ नोकर वर्गास मात्र भोगावा लागत असे. कारण ज्या वर्षीं दुष्काळ पडे, त्या सालीं जमिनीचें उत्पन्न सरकारास मिळत नसे; अर्थात् नोकरीचा पेशा स्वीकारलेल्या लोकांवर त्या प्रसंगीं फार वाईट परिणाम घडे. त्या काळचें सरकार अशा प्रसंगीं आपल्या नोकरलोकांपेक्षां, प्रजेची जास्त काळजी बाळगीत होतें. दुष्काळाच्या दिवसांत नोकरवर्गास प्रथम उपासमार काढावी लागे. त्याचें कारण सरकाराच्या खजिन्याचा उपयोग मुख्यतः देशाची अबादी करण्याकडेसच होत असे. व्यापारी लोकांचा वर्ग त्या समयीं मध्यम गणला जात होता.

संपत्तीचें मुख्य साधन शेतकरी वर्गाकडे होतें. नोकर वर्ग त्या वेळीं अत्यंत दरिद्री होता. ज्यास जमीनजुमला नाहीं व व्यापार करण्याचें साधन नाहीं, त्यानें दास्यकर्मांत पडून आपला निर्वाह करावा, असा सामान्यतः प्राचीनकाळीं प्रघात होता. दास्यकर्म हें त्या समयीं अत्यंत नीच मानलें जात असे. शेतकऱ्यांना सर्व प्रकारची अनुकूलता असल्यानें, राजदरबारांत त्यांचेंच वजन जास्त होतें. नोकरी किंवा व्यापार करण्यापेक्षां शेतकरी बनणें, हें त्या समयीं प्रतिष्ठितपणाचें दर्शक मानीत असत. व्यापार व नोकरी हे अक्षयचे धंदे नव्हत; परंतु शेतकीचा धंदा कायमचा व संपत्तिप्रद आहे असें त्या वेळीं ठरलें होतें. शेतकऱ्यांना उपासमार काढण्याची पाळी आली कीं, जगाचा अंत होण्याचा समय आलाच, अशीहि त्या काळीं समजूत होती असें दिसतें. जमीनदारपणा हा नेहमीं चालणारा व निर्भयपणाचा होय. मुसलमानी कारकीर्दीचा प्रकाश या देशावर पडण्यास आरंभ होतांच, 'उत्तम शेतकी, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' ही समजूत बदलून, तिला अगदीं विरुद्ध स्वरूप येत चाललें. परक्या देशांतून आलेल्या ह्या लोकांस नोकरांची फार जरूर होती. ती गरज भागविण्यासाठीं सरकारानें बरींच मोठीं वेतनें देण्याची लालूच दाखवून, दास्यकर्मास प्राधान्य दिलें. प्राचीन राज्यकर्त्यांच्या कारकीर्दींत, राज्यकारभारांतील सर्व लोक स्वराज्यांतील जमीनदार व वतनदार असत. त्यामुळें प्रजेच्या हिताचा जास्त विचार होण्यास संधि मिळे; परंतु पुढील काळांत उपरी लोकांसच राजदरबारांत मान मिळूं लागला व त्यांना स्वदेशाभिमान उद्भवण्यास कारण नसल्यानें, प्रजेच्या हिताकडे जावें तसें त्यांचें लक्ष गेलें नाहीं. अलीकडे असा साधारण नियम आढळून येतो कीं, सरकाराच्या सत्तेचा उपयोग करण्याचें ज्यांच्या हातांत असतें, त्यांना शेतकऱ्यांपेक्षां सावकारांची जरूर फार असल्यामुळें, रयतेकडे त्यांचें जावें तसें लक्ष जाऊं शकत नाहीं. व्यापारी हा चाणाक्ष वर्ग असून, त्यास आपलें वर्चस्व कसें ठेवावें हें चांगलें समजतें, तसें आमच्या शेतकऱ्यांचें हल्लीं नाहीं. यांचे पूर्वज फार चाणाक्ष होते; परंतु अलीकडच्या शेतकरी वर्गाची प्रजा केवळ अशिक्षित असून, तिला आपलें महत्व बिलकूल कळत नाहीं, असेंच ह्मणणें भाग प-

डतें. आपले हक्क काय, आपणांस अशी दैन्यावस्था कां आली, हें जाण-ण्याचें त्यांना जर सामर्थ्य असतें, तर त्यांच्यावर ह्या दुष्काळांच्या स्वाऱ्या कधींहि होऊं शकल्या नसत्या.

प्रसिद्ध भारवि कवीनें आपल्या ‘ किरातार्जुनीयम् ’ नांवाच्या काव्यांत, युधिष्ठिर व वनेचर यांच्या संवादामध्यें, प्राचीनकाळच्या शेतकीचा थोड-क्यांत उल्लेख केला आहे. जमीन न नांगरतां पिकें काढणें आणि पाव-साच्या व नदीच्या पाण्यानें धान्य पिकविणें, ह्या क्रिया त्या वेळींहि प्रचारांत होत्या. त्या समयीं शेतकऱ्यांजवळ धान्यसंचय बराच असे व ते स्वतः आपल्या उत्पन्नाचा योग्य अंश सरकारास पोंचता करीत. वसुलाकरितां सर-कारास कोणत्याही प्रकारची तजवीज करावी लागत नसे, असें त्यावरून दिसतें. हिंदुस्थानांत आर्यांच्या वसाहती झाल्या, तेथपासून शेतकीस प्राधान्य मिळत गेलें व पुढें बऱ्याच काळपर्यंत तेंच महत्व कायम होतें. परचक्र वगैरे सात प्रकारच्या आपत्ति शेतकऱ्यांवर येत; परंतु त्या समयीं शेतकऱ्यांज-वळ धान्याचा मोठा सांठा असल्यानें, त्या आपत्तींपासून त्यांचें फारसें नुक-सान होत नव्हतें. सरकाराचें मात्र जास्त नुकसान होत असे. सरकार-धाऱ्यास त्याच सालची शेतकी जबाबदार होती. शेतकऱ्याची मालमत्ता सरकारसाऱ्यास जबाबदार नव्हती. ह्या पद्धतीमुळें शेतकरी सधन रहात व सरकारास खरा दुष्काळ पडत असे. अशा प्रसंगीं परदेशांवर स्वाऱ्या करून, सरकार आपला निर्वाह जेमतेम करीत असे. हा क्रम पुढें बदलला. शेतकरी अ-ज्ञान होत गेले व राज्यकर्ते केवळ सत्तीनें सारा वसूल करूं लागले. त्यांनीं शेत-कऱ्यांच्या मालमत्तेवर सरकारसाऱ्याची जबाबदारी टाकली. शेतांत पीक येवो किंवा न येवो, ठरींव धारा दिलाच पाहिजे. हा नियम होतांच, शेतकऱ्यांस उतरती कळा लागत चालली. स्वराज्याच्या वेळीं या वृक्षाचें बीजारोपण झालें होतें. पुढें मुसलमानी अंमल होऊन, शेतकऱ्यांवर सरकारदेण्याचा जास्त बोजा पडत चालला. ब्रिटिश सरकाराचा उदय होतांच, पूर्वींचीं शेतकऱ्यांच्या व्यवस्थेचीं धोरणें बदलून, जमाबंदी नाण्याच्या रूपांत आली, आणि तीच हल्लीं चालली आहे. ती बहुतेक कायमची झाल्यामुळें जी नोकरी पूर्वीं कनिष्ठ प्रकारची ठरली होती, तीच उत्तम ठरण्याचा आणि उत्तम

शेतकीस 'कनिष्ठ' हें विशेषण लागण्याचा दुर्दैवी योग आला. त्या काळीं वारंवार दुष्काळ पडत असते, हंडीमडकीं विकण्याची शेतकऱ्यांना पाळी येत असती, स्वतः उपास काढून व सावकारांचें देणें करून सरकाराचा सारा भरण्याचा प्रसंग येत असता, जमिनीस जास्त पीक येत नसतें, जमिनींत पिकविलेलें धान्य व्याजांतच संपलें जात असतें, शेतकऱ्यांवर करांचा मोठा बोजा असता, तर शेतकी उत्तम आहे, असें कधींहि ठरलें नसतें. त्या समयीं शेतकऱ्यांच्या घरीं गाड्या, घोडे, बैल वगैरे बरींच जनावरें होतीं व दूधदुपत्याचा पूर्ण सुकाळ होता. दुष्टांचें शासन व शिष्टांचें परिपालन करून, राज्याची व्यवस्था ठेवणें हेंच प्राचीनकाळीं राज्यकर्त्यांचें कर्तव्य ठरलें होतें. पूर्वमीमांसेवर झालेल्या टीकेसह कोलब्रूक साहेबांच्या भाषांतरावरून दिसून येतें कीं, राजानें शेतकऱ्यांना त्रास पोंचूं नये, यासाठींच त्यांचे जवळून कर घ्यावा; परंतु जमिनीचें स्वामित्व[१] राजाकडे नाहीं. आपल्या श्रमाचा उपभोग घेणाऱ्या लोकांचीच ती होय. याज्ञवल्क्यांनीं तर याहिपेक्षां जास्त महत्वाचे विचार प्रगट केले आहेत. ते ह्मणतात पडित किंवा लागवडींत असलेल्या जमिनीवर राजाचा हक्क नाहीं. प्रजेस वाटेल तेव्हां तिनें पडित जमीन लागवडीस आणावी व राजास उत्पन्नाचा ठरींव अंश मात्र द्यावा. मनूच्या काळीं प्रत्यक्ष जमिनीवर कर घेण्यांत येत नव्हता. जंगल वगैरे तोडून, ज्यांनीं जमीन लागवडीस आणिली त्यांचीच त्या जमिनीवर सत्ता असे. तसेंच जमिनीच्या फक्त उत्पन्नावर कर घेण्याचा राजास हक्क होता. शेतांत पिकलेल्या धान्याचा सहावा, आठवा, बारावा भाग राजानें घ्यावा, असें त्या समयीं ठरलें होतें. सरकारावर ज्या समयीं आपत्ति येईल, त्या वेळीं उत्पन्नाच्या एकचतुर्थांशापेक्षां राजानें जास्त कर घेऊं नये; असाहि त्या प्रसंगीं नियम होता. राज्यांत शांतता असल्यास एकद्वादशांश व आपत्तीच्या प्रसंगीं $\frac{१}{८}$, $\frac{१}{६}$, व $\frac{१}{४}$ कर सरकारास मिळे; यापेक्षां जास्त प्राप्ति सरकारास प्रजेकडून बिलकूल होत नव्हती. भूमिगत द्रव्य व खनिज पदार्थ यांजवर सरकाराचा अर्धा भाग असे. राजा आपलें संरक्षण करितो, याच सबबीनें त्याचा

---

१. "न राज्ञां भूमिर्धनं, किन्तु तस्यां भूमौ स्वकर्मफलं भुञ्जानानां सर्वेषां प्राणिनां साधारणं धनम्" ( पूर्वमीमांसायाम् )

हा हक्क ठेवला होता. शेतकऱ्याकडील जमीन काढून दुसऱ्यास देण्याचा हक्क राजास नव्हता. राजा जमीन, गांवें वगैरे लोकांस नोकरीच्या बदल्यांत इनाम देत असे, परंतु तो फक्त त्या जमिनीचा किंवा गांवाचा सरकारास येणारा हक्कच बक्षीस होत असे. शेतकरी, गांवनोकर व गांवकीचे हक्क यांपासून त्यांचें कोणत्याहि प्रकारें नुकसान होत नव्हतें. प्रजेच्या संरक्षणाचें काम राजाकडे असल्यानें, त्यानें आपला हक्क घेऊन तें कर्तव्य बजावावें, हाच क्रम सर्वांशीं चालू होता. प्रस्तुत कांहीं सरकारी नोकर गांवीं जाऊन गरीब शेतकऱ्यांस कसें वागवितात याचा विचार केल्यास, ह्या देशांतील शेतकऱ्यांचें हें भयंकर स्थित्यंतर फारच हृदयद्रावक वाटतें. हिंदुधर्मशास्त्राची ही कर घेण्याची पद्धत फारच उत्तम असून, ती अशी आहे कीं, हा प्रघात जोंपर्यंत चालेल, तोंपावेतों दुष्काळासारखें भयंकर संकट येण्याचा बिलकूल संभव नाहीं.[१] हे ज्या पाश्चात्य विद्वानानें विचार प्रगट केले आहेत, तो आणखी असेंहि ह्मणतो कीं, शेतकऱ्यांच्या जमिनीवर सावकार व सरकाराचा बोजा ठेवून, जमिनीची विक्री करण्यास आपण पूर्ण मोकळीक दिल्यानें, शेतकऱ्यांच्या साधनसंपत्तीचा ऱ्हास होत गेला. पूर्वी उत्पन्नावर सरकारसाऱ्याची आकारणी होत असे. अतिवृष्टि किंवा अनावर्षण या प्रसंगीं शेतकरी खाऊनपिऊन सुखी असत. त्यांना धान्य विकावें लागत नसे, त्यामुळें प्रत्येक गांवीं धान्याचा मोठा सांठा होत असे आणि अशा आपत्तीच्या प्रसंगीं शेतकरी व सरकार हे आपल्या गांवची जमीन जास्त पीक देण्यास कशी समर्थ होईल, याचा पोक्त विचार करून त्याप्रमाणें तजवीज करीत असत. कुवे, तलाव व बावड्या बांधून जमीन सुपीक करणें व जमिनीस भरपूर खत घालून तिजकडून जास्त पीक काढणें, हेंच त्या काळीं शेतकऱ्यांचें मुख्य कर्तव्य होतें व तें बजावण्याची शक्तिहि त्यांच्यांत होती. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें राजाची मालकी जमिनीवर नाहीं. हें तत्व मुंबईच्या हायकोर्टानेंहि कानडा जिल्ह्यांतील एका तंट्यांत कबूल केलें आहे. "हिंदुधर्मशास्त्राकडे दृष्टि दिली, तर जमिनीवर राजाची मालकी आहे, असें मानण्यास शास्त्रांत अगर वहिवाटींत कोठेंच आधार सांपडत नाहीं. तसेंच अ-

१. हिंदुस्थानांतील राज्यपद्धतीची मार्गोपदेशिका पृष्ठ ३.

र्वाचीन शास्त्रकारहि हा अधिकार राजाकडे आहे असें कबूल करीत नाहींत.[१]" रानें, डोंगर, तीर्थें, देवस्थानें, मिठागरें व तलाव ह्यांच्यावर कर बसविण्याचा राजास प्राचीनकाळीं अधिकार नव्हता. नद्या, तलाव व विहिरींच्या पाण्यानें पिकविलेल्या जमिनीवर पाण्याचा व उत्पन्नाचा असे दोन वेगळे कर नव्हते. उत्पन्नाचा अंश मात्र राजास मिळत असे. पाण्याचा कर मुसलमानी अंमलापासून पुढें आला व त्याचें अनुकरण ब्रिटिश सरकारानें आणि आमच्या एतद्देशीय राजांनीं केलें. मुसलमानी कारकीर्दीत प्रजेवर असंख्य कर बसून, प्रजेची फारच खराबी झाली. पूर्वीं जी प्रजा स्वतंत्र होती, तीच पुढें पारतंत्र्याच्या भाराखालीं दबली गेली. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें ज्या बाबतींवर सरकारदेणें बसत नव्हतें, अशा बाबतींवर मुसलमानी सरकारानें कर बसविण्याचा क्रम चालविला असतांहि, तो शेतकऱ्यांनीं कबूल केला हें त्यांच्या अज्ञानाचेंच त्यांस वाईट फळ मिळालें. शेतकऱ्यांच्या हक्कांचा ऱ्हास करून, परदेशीय लोकांना वसाहती करण्यास मुसलमानींत मोकळीक झाली व त्यामुळें शस्त्रजीवि लोक पुढें आले. बऱ्याच शेतकऱ्यांनीं या समयीं सरकाराच्या त्रासामुळें आपल्या जमिनी सोडून देऊन, त्यांनीं सरकारांत नोकऱ्या पतकरल्या. शेतकऱ्यांवर देण्याचा बोजा जास्त पडून, शेतकरी हे सरकारीं कामदारांकडून होणाऱ्या त्रासास जास्त पात्र झाले. सरकाराच्या ५ रुपये पगाराच्या शिपायानें येऊन शेतकऱ्यांस धक्के मारण्याचा काळ मुसलमानी अंमलांत सुरू होऊन, कुळें व जमीनदार हा एक निराळा भाग उत्पन्न झाला. इनामदार लोक प्रबळ होऊन, ते आपल्या मनगटाच्या जोराचा शेतकऱ्यांवर उपयोग करूं लागले. थोड्या खर्चांत राज्याचा बंदोबस्त करितां यावा व आपली सत्ता सर्व प्रजेवर असल्यानें, आपण करूं तो हुकूम प्रजेनें पाळलाच पाहिजे; या समजुतीचा जोर कांहीं दिवसांनीं वाढत चालला. मुसलमानी अंमल सुरू होण्यापूर्वीं, सुमारें पांचशें वर्षांवर या प्रघाताचा जन्म झाला. तो काळ जरी ह्या देशाच्या बराच भरभराटीचा होता, तरी राज्यकर्त्यांच्या ह्या समजुतीवर प्रजेचा बिलकूल दाब राहिला नव्हता. 'राजा हा ईश्वराचा अंश' आणि राजा व प्रजा यांचा 'पितापुत्र

---

१. 'बडोदावत्सल' वर्ष १२ अंक ४५ (ता० २९ आगष्ट सन १८९७).

संबंध' पुढें आला असल्यानें, राज्यकर्ते मंडळ प्रबळ झालें. इतकेंच नव्हे, तर परदेशीय राज्यकर्त्यांस एकप्रकारें तो नमुनाच होऊन बसला. पूर्वीं ऐनजिनसी धारा उत्पन्नाच्या मानावर होता, तें धोरण बादशाही अंमलांत थोडेंसें बदललें. प्रत्येक गांवचें इतकें धान्य सरकारसाऱ्याच्या बदल्यांत मिळालें पाहिजे. असा हुंडवा ठरून, त्याजवर थोडासा नक्त सारा बसला. हा बसवितांना जमिनीची मापणी करावी लागली. जमिनीच्या उत्पन्नाची सरासरी काढून, तिजवर सारा घेण्याचें प्रमाण बिघ्यावर ठरविलें. राजकीय सलामी व इतर कर हे नाण्यांत घेण्याचा रिवाज सुरू झाला. ही पद्धति अकबराच्या कारकीर्दीपर्यंत थोड्या फार प्रमाणानें चालू होती. अकबराचा राज्यविस्तार मोठा होता व दरसाल सरकारी धान्याचे भाव ठरवून जमाबंदी करणें, हें फारच त्रासाचें काम वाटून, दहा वर्षांची सरासरी काढून, उत्पन्न ठरविण्याचा व त्याचा $\frac{1}{3}$ सरकारसारा घेण्याचा प्रघात अंमलांत आला. मनूच्या वेळच्या जमाबंदीपेक्षां या काळच्या जमाबंदींत शेतकऱ्यांवर सरकारदेण्याचा; उत्पन्नाचा $\frac{1}{4}$ जास्त बोजा पडला व जमीनहि तिची मशागत बरोबर न झाल्यानें पीक थोडें देऊं लागली. सरकारसारा कमी व जमिनींत पीक जास्त असा क्रम जोंपर्यंत होता, तोंपर्यंत शेतकऱ्यांची चांगली भरभराट होती. अकबराच्या वेळीं नाण्याच्या रूपांत जरी जमीनधारा आला, तरी पडित जमिनीचा व पाण्याचा उपयोग केल्यास, त्याचा आकार सरकार घेत नव्हतें. लोकांस जंगल व डोंगराचा शेतकीकडे किंवा दुसऱ्या कामांकडे उपयोग करण्याची पूर्वीं मोकळीक होती; तिला या समयीं जरा संकोचित स्वरूप आलें. जंगलाचा उपयोग करणारावर थोडासा कर बसला. हा कर बसवितांना शेतकीच्या उपयोगास लागणारें जंगल माफीनें शेतकऱ्यांकडे पाळलें जात होतें. गांवचीं जनावरें चरण्यासही सरकारानें बरेंच रान मोकळें ठेवलें असल्यानें, अकबराच्या राज्यपद्धतीपासून त्यावेळच्या शेतकऱ्यांवर फारसा वाईट परिणाम घडून आला नाहीं. अगोदरच शेतकरी सधन होते व त्यांत त्यांच्याकडून वसूल होणाऱ्या साऱ्यास नाण्याचें स्वरूप दिल्यानें, लोकांस जरा बरें वाटणें हें साहजिक आहे; तथापि कांहीं विद्वान् लोकांनीं ही नवीन

पद्धति पुढें फार घातक स्वरूप धारण करील, असें सरकारास कळविण्याकडे त्या समयीं दुर्लक्ष केलें नाहीं. शेतकऱ्यांना घरें बांधण्यास व शेतकीस लागणारीं लांकडें सरकारी जंगलांतून पुरीं पाडलीं जात होतीं; त्यामुळें सरकारानें आपल्या धर्मशास्त्राच्या विरुद्ध बंदोबस्त केला, असें कोणाच्याही स्वप्नांत आलें नाहीं. सरकारवाडे व इतर इमारतींकरितां मोठ्या जंगलांतून सरकार लांकडें तोडून नेत असे. ह्या देशांतील लांकडें हल्लींप्रमाणें बाहेर व्यापाराकरितां जात नव्हतीं. फक्त येथेंच त्यांचा व्यापार चालत होता. त्यामुळें शेतकऱ्यांस लांकडांची वाण कधीं जाणवली नाहीं.

मनूच्या वेळची पद्धति जोंपर्यंत कायम होती, तोंपावेतों शेतकरी बरेच सधन होते. मुसलमानी अमलाच्या आरंभापासून तें धोरण बदलून, जमीनधारा जास्त झाला, तो अद्यापि वाढत चालला आहे. सोळाव्या शतकांत ज्या विभागांतील जमिनींचें सरकारी उत्पन्न ७,७३,३२,३११ रुपयांचें होतें, त्याच भागांतून इ० स० १८९५।६ सालीं १२,३१,८८,६४० रुपये प्रस्तुतच्या सरकारानें वसूल करून घेतले. हल्लींचें सरकार जितकी जमाबंदी घेतें तितकी मोंगल बादशहांच्या वेळीं घेतली जात नव्हती[१]. ह्याचें एक मोठें कारण असें आहे कीं, मोंगलांच्या वेळेस पुष्कळ जमीन पड होती, ती ह्या राज्यांत लागवडीस आली आहे. मुंबई इलाख्यांत दर ३० वर्षांनीं जमीनबाबीचें उत्पन्न वाढतें; परंतु शेतकीचें पीक वाढत नसतें. पुण्याची पेशवाई इ० स० १८१८ सालीं बुडाल्यानंतर, दक्षिणेंतील जमीनधाऱ्याचा वसूल एकसारखा वाढत चालला. इ० स० १८१८मध्यें महाराष्ट्रांत ११५ लाख रुपयांचा जमीनधारा होता, तो इ० स० १८४३ मध्यें १५० लाखांपेक्षां जास्त झाला! ह्याचेंहि मुख्य कारण पूर्वींची पुष्कळ पड जमीन लागवडीस आली हेंच असावें!! सरकारसाऱ्याकरितां पूर्वीं जमिनीचें लिलांव होत नव्हतें, तें होऊं लागलें व हळू हळू शेतकरी मजूर बनले आणि जमिनीची मालकी वरच्या दर्ज्याच्या लोकांकडे जात चालली; परंतु दर तीस वर्षांनीं सरकारसाऱ्याची वाढ होऊन, वरच्या दर्जाचे

१. सर रोमेशचंद्र दत्त यांचीं वायव्यप्रांत. बंगाल, पंजाब वगैरे प्रांतांच्या जमिनधाऱ्यासंबंधानें पत्रें.

लोक अन्नान्नदशेस पात्र होत चालले. मद्रासेप्रमाणें मुंबई इलाख्यांत रयतवारीची पद्धत दाखल होतांच, या प्रदेशांतील शेतकरी गरीब होत चालले. सारावसुलीचें काम दिवसेंदिवस जास्त कठीण झालें. हजारों एकर जमीन ओसाड पडली व मुंबईइलाख्याच्या कांहीं भागांत ⅓ जमीनसुद्धां लोकांच्या मालकीची उरली नाहीं[१]. इ० स० १८३६ सालीं जी जमाबंदी झाली तींत, मुंबई इलाख्यांतील जमीनधारा बराच वाढला. दुसरी जमाबंदी सन १८६६ सालीं झाली व तींत जमिनधारा सन १८३६ सालच्या जमाबंदीपेक्षांहि जास्त वाढल्यामुळें, या तीस वर्षांत लोकांची फारच दैना उडाली. तिसरी जमाबंदी १८९६ सालीं सुरू झाली व तींत दुसऱ्या जमाबंदीपेक्षां कांहीं अधिक, सारा झाला. दर तीस वर्षांनीं जमिनीचें उत्पन्न वाढत नसतां, जमीनधारा मात्र वाढत चालला. या गोष्टीचा विचार केल्यास, शेतकरी गरीब कां होत चालले, त्याची सहज कल्पना करतां येईल. मि०रोमेशचंद्र दत्त हे आपल्या एका पत्रांत म्हणतात कीं, ''उत्पन्नावर हल्लीं धान्याची आकारणी केली जात नसून, जमिनीच्या किंमतीवर किंवा पोकळ तपासणीवर हल्लीं जमिनीची प्रत ठरते व धारा वाढविला जातो. लागवड वाढली किंवा पदार्थांच्या किंमती वाढल्या, याच तत्वावर हल्लीं जमिनीचा आकार ठरविला जात नसतो. एखादी नवीन सडक केली किंवा रेलवेचें साधन अनुकूल झालें अथवा शांतता राहूं लागली, एवढ्या सबबीवरहि कांहीं ठिकाणीं धान्याची वाढ होत असते. ह्या कारणांना जोंपर्यंत प्राधान्य मिळेल, तोंपर्यंत दक्षिणेंतील शेतकऱ्यांना ऊर्जितावस्था यांवयाची नाहीं. हीं जीं कारणें पुढें येत आहेत, तींच शेतकऱ्यांना जास्त भिकारी बनवीत असतात. रेलवेचें किंवा रस्त्याचें साधन अनुकूल झाल्यानें, सावकारांना दिवाणींत फिर्याद करण्यास बरीच सोई झाली ''शेतकऱ्यांच्याच हितासाठीं उत्पन्नाचा जो अंश त्यांजकडे रहाणें वाजवी आहे, त्याजवर साऱ्याची धाड पडत असेल आणि साऱ्याचा ऐवज पुरा करण्यासाठीं, ह्या अंशांतून जर कांहीं भाग खर्ची घालावा लागत असेल, तर फक्त भाव वाढले, येवढेंच

१. सन १८९२–९३ सालाचा मुंबई इलाख्याचा मुलकीकडील रिपोर्ट पृष्ठ ७६.

कारण लावून, साऱ्याचे दर वाढविणें हें वाजवी होणार नाहीं." असें स्टेट सेक्रेटरींनींही सुचविलें होतें. मद्रासचे अमलदार मि० राजर्स हे ह्मणतात कीं, "जमीनधाऱ्याचें ओझें जड झाल्यामुळें, कित्येक जमिनी ओसाड पडल्या आहेत. वायव्यप्रांतांतील जमिनदारांना शेतकऱ्यांकडून जें उत्पन्न मिळतें, त्याचा अर्ध भाग सरकार घेतें. अर्थात् शेंकडा दहा या प्रमाणानें सरकारास सारा मिळतो. मद्रासेकडे ३३ पासून ४० टक्के सरकारास मिळतात. बंगाल्यांत उत्पन्नाच्या एकषष्ठांशापेक्षां अधिक भाग शेतकऱ्यांकडून जमिनदारांस मिळत नसतो. मध्यप्रांतांत शेंकडा ७२ या प्रमाणानें सरकारदेणें शेतकऱ्यांवर बसलें आहे. हिंदुस्थानांतील जमिनीवर जबर कर बसल्यामुळें व लोकांचे उद्योगधंदे सर्व बसवून टाकल्याकारणानें, या देशांतील लोकांस दुष्काळांपासून होणाऱ्या भयंकर यातना वारंवार भोगाव्या लागतात.[१]"

ब्रिटिश सरकाराचा अंमल बसल्यानंतर या देशांतील जमीनधारा किती वाढला, तें सरकाराच्या मुलकी खात्याच्या रिपोर्टावरून, सहज कळून येतें. इ० स० १८७४-७५ सालीं हिंदुस्थान सरकाराचें उत्पन्न ५८,०१,११,४८० रुपये होतें; तें सन १८९८-९९ सालीं ९९,०८,५४,००० रुपये झालें.[२] ही उत्पन्नाची वाढ शेंकडा ७२-६ ची झाली! हें उत्पन्न शेतकींत सुधारणा झाल्यामुळें वाढलें असतें, तर ह्या देशांतील शेतकऱ्यांना निर्धनावस्था येण्याचा बिलकूल संभव नव्हता. इतका जरी हा सारा वाढला आहे, तरी पुढें तो आणखी किती वाढेल, त्याचा अजमास नसल्यानें, शेतकरीवर्ग सर्वथैव हताश बनला आहे. शेतकीची सुधारणा व तिची दरसाल जोपासना करणें, हीं दोन फारच महत्वाचीं कामें आहेत. परंतु शेतकरी निर्धन बनल्यामुळें, ती त्यांच्याकडून होऊं शकत नाहींत. मद्रास व मुंबई इलाख्यांत सरकारानें रयतवारीची पद्धत दाखल करून, शेतकऱ्यांशीं जो

---

१. मद्रासच्या जमीनधाऱ्यासंबंधानें मि० राजर्स, यांचा रिपोर्ट.

२. सन १८७४-७५ सालीं एक पौंडाची किंमत दहा रुपये होती व सन १८९९ सालीं ती १५ रुपये झाली, त्यामुळें पौंडांत हें उत्पन्न फारसें वाढलेलें दिसत नाहीं.

प्रत्यक्ष संबंध जोडला, त्यापासून सरकाराच्या दृष्टीनें कदाचित् फायदा होत असेल; परंतु त्यामुळें शेतकऱ्यांवर कित्येक खर्च विनाकारण लादले जातात. बंगाल्यांत जी कायम जमीनदारी पद्धत चालू आहे, तीच ह्या भागांत चालू असती, तर या बाजूचे शेतकरी कधींही निर्धन बनले नसते. उत्पन्नाच्या मानानें ऐनजिनशी जमीनधारा घेण्याची जुनी पद्धती फारच उपयुक्त आहे. या पद्धतीनें सरकारास प्रथम कदाचित् फार त्रास पडेल; परंतु पुढें तिचा परिणाम सरकार व शेतकरी यांच्यावर फारच चांगला घडेल. हल्लीं नाण्याच्या रूपानें जमीनधारा वसूल होत असल्यानें, शेतकऱ्यांना ऐनमोसमींत स्वस्त दरानें धान्य व्यापाऱ्यांच्या पदरांत घालावें लागतें. तसेंच शेतांतून धान्य घरीं येण्यापूर्वींच सरकारसारा भरण्याची मुदत येते, त्यामुळें 'वाढीचें दिढी व्याज' कबूल करून, सावकारांकडून पैसे घेऊन, ते सरकाराच्या हवालीं करावे लागतात! या पद्धतीनें शेतकरी इतके कंगाल बनून गेले आहेत कीं, त्यांना जमीन कसण्याचीही शक्ति बरोबर उरली नाहीं. ऐनजिनशी धाऱ्याची पद्धति किती सुखावह आहे, तें सायप्रस बेटांतील वार्षिक रिपोर्टावरून सर्वांशीं कळूं शकतें. या बेटांत पूर्वीं ऐनजिनशी जमीनधारा उत्पन्नाच्या मानावर घेण्यांत येत असे; तो इ० स० १८७८ पासून नाण्याच्या रूपानें जमिनीची प्रतवारी ठरवून, तिजवर घेण्याचें ब्रिटिश सरकारानें सुरू केल्यामुळें, सरकाराची बाकी कुळांकडे दरसाल फार थकूं लागली. तसेंच लोकही निर्धन बनत चालले. लोकांच्या दारिद्र्यामुळें सरकाराचा राज्यकारभार चालविण्यासही फार खर्च येऊं लागला. ही गोष्ट त्या बेटांतील प्रख्यात पुरुषांच्या लक्षांत येऊन, ऐनजिनशी धारा घेण्याची पूर्वींची पद्धति पुनः सुरू करावी, अशी त्यांनीं मागणी केल्यावरून, सरकारी कामदारांत वादविवाद होऊन, शेवटीं ऐनजिनशी धारा घेण्याची जुनी रीत दाखल झाली. हा अनुभवजन्य जुना प्रघात अंमलांत येतांच, सरकार साऱ्याची बाकी थकेनाशी झाली व लोकही चांगल्या स्थितींत आले[१]. तसेंच वसुलास सरकारी कामदारांस जास्त त्रास पडेनासा

१. 'फिन्यान्शल न्यूज' पत्राच्या ता० २७ सपटेंबर इ० स० १८९७ च्या अंकांत, ह्या बाबतीचा बराच खुलासा झाला आहे.

झाला. पूर्वीं राज्यकारभारास मोठा खर्च लागत असे, तोही बराच कमी करण्यास सरकारास या व्यवस्थेनें संधि मिळाली. नाण्याच्या रूपांतील जमाबंदी व तिचें वाढत जाणारें स्वरूप, हीं दोन कारणें ह्या देशांतील शेतकऱ्यांस फार पीडा देत असतात. लोक कर्जबाजारी होऊन, त्यांना सुकाळाच्या दिवसांतही खाण्यास मिळेनासें झालें; ही गोष्ट सामान्य विचारांची नाहीं. शेतसारा व सावकारांच्या देण्याची फेड करण्याच्या कामांत, जमिनीची विक्री किंवा लिलांव करण्याची पाळी येते, त्यामुळें हिंदुस्थानांतील बरेच शेतकरी गरीब होत चालले आहेत. इ० स० १८८२ पासून इ० स० १८९६ पर्यंतच्या १५ वर्षांत, हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची जमीन सावकारांच्या व सरकाराच्या देण्याच्या बदल्यांत किती विकली गेली, तिच्या वाढीचा विचार केल्यास, शेतकरी किती व कसे निर्धन बनत चालले आहेत, त्याची सहज कल्पना करितां येईल. इ० स० १८८२ सालीं ज्या कुळांना आपल्या जमिनी शेतसारा भरण्यासाठीं व सावकारांच्या देण्याची फेड करण्याकरितां विकाव्या लागल्या, त्यांची संख्या ७,५६,७८० होती; ती इ० स० १८९६ सालीं १८,१७,७६७ झाली. ह्या पंधरा वर्षांत बरेच शेतकरी निर्धन होऊन, अन्नास महाग झाले. ही वाढ शेंकडा १०४·२ ह्मणजे दुपटीपेक्षां ज्यास्त झाली. दरसाल ही कुळांची संख्या एकसारखी वाढतच चालली आहे. मद्रास इलाख्यांत तर शेतकऱ्यांजवळच्या जमिनी विकत घेण्यास कोणीही तयार होत नाहींत. तिकडे इ० स० १८९७-९८ सालीं ज्या कुळांकडे बाकी राहिली होती, ती वसूल करण्यासाठीं जमिनीचें लिलांव झालें; परंतु त्या समयीं एकही मागणी करणारा पुढें न आल्यानें, शेवटीं सरकारास ती जमीन आपल्या नांवावर दाखल करावी लागली! बंगाल्यांत व पंजाबांत जमिनीची किंमत बरीच वाढली आहे; परंतु ती जमीन चांगली किंवा लोक सधन झाले, यामुळें नव्हे. ज्या लोकांच्या जमिनी पूर्वीं विकल्या गेल्या होत्या; त्यांनीं पुढें नोकरी धंदा करून बराच पैसा कमावल्यामुळें, त्या लोकांचा कल जमीन खरेदी करण्याकडे विशेष वळल्याकारणानें, तिकडील जमिनींची किंमत वाढली आहे. हे जमीन विकत घेणारे शेतकीच्या कामांत कसलेले शेतकरी

नसल्यानें याचा परिणाम पुढें फारच वाईट घडण्याचा संभव आहे.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना सावकारांची मनधरणी केल्यावांचून सुटका नसते. त्यांच्याजवळ वर्षाच्या निर्वाहास पुरण्याइतकें धान्य रहात नसल्यानें; धान्याची मोसम निघून जातांच, पुढील वर्षी शेतांत पिकणाऱ्या धान्यावर, सावकारांकडून कर्जाऊ धान्य आणवून, त्याजवर निर्वाह चालविणारांची संख्या अलीकडे बरीच वाढत चालली आहे. अर्थात् नवीन धान्य पिकतांच, त्यांतून पूर्वी खाल्लेलें धान्य व्याजासह सावकारांच्या पदरांत घातल्यावांचून त्यांस सुटका नसते. सरकारसाऱ्याकरितां घेतलेली रक्कम फेडण्यासाठींही 'मातीच्या मोलानें' धान्य सावकारांस द्यावें लागतें. हे सर्व खर्च भागून जें थोडेंसें धान्य उरेल, त्याजवर शेतकऱ्यांस आपल्या कुटुंबाचा निर्वाह चालविणें भाग पडतें. बारा महिने शेतांत एकसारखी मजूरी करून, शेवटीं तीन चार महिन्यांच्या खपापुरतेंही धान्य त्यांच्या जवळ न उरण्याचा दुर्दैवी योग येणें, हें अगदीं अयोग्यच होय. पूर्वी सावकारांचा वसूल वेळेवर होत असे, त्यामुळें ते शेतकऱ्यांस कर्ज देत असत; परंतु सांप्रत शेतकऱ्यांकडे बरीच बाकी थकत चालल्याकारणानें, सावकारांनीं आपला हात आखडण्याचा क्रम सुरू केला. हल्लीं सरकाराचा सारा कर्ज केल्यावांचून शेतकऱ्यांकडून भरला जात नाहीं, ही गोष्ट हिंदुस्थानाच्या फडणिसांनीं कबूल केली आहे. ह्या कर्जबाजारी स्थितीमुळें, शेतकऱ्यांजवळ पांघरण्यास व नेसण्यास पुरेंसें वस्त्रही हल्लीं नसतें. अशा दीन बनलेल्या शेतकऱ्यांचा पक्ष घेऊन, सरकारानें त्यांचा बचाव करावा, हेंच ज्यास्त श्रेयस्कर आहे. माजी व्हाइसराय लार्ड ल्यान्सडौन यांनीं, शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमलें होतें. त्या कमिशनानें शेतकऱ्यांना सावकारांच्या घरीं जाण्याचा प्रसंग कां येतो, त्याचा तपास करून सरकारास असें कळविलें कीं, "सरकाराचा धारा भरण्याइतकें धान्य जरी शेतांत न पिकलें, किंवा वेळेवर धान्य शेतकऱ्यांच्या हातांत जरी न आलें, तरी शेतकऱ्यांनीं अमुक दिवसांच्या आंतच सरकाराचा पैसा भरला पाहिजे, हा नियम फारच कडक आहे. या पद्धतीमुळें शेतकऱ्यांना वारंवार सावकारांच्या आश्रयास जाण्याचे जे प्रसंग येतात, ते

फारच घातक आहेत." ह्या सूचनेचा विचार सरकारानें कृपा करून अवश्य करावा.

"ब्रिटिश हिंदुस्थानांतील जमिनी विकण्याचा कायदा" ह्या विषयावर बऱ्याच हुशार इंग्लिश अंमलदारांनीं चांगला विचार करून, सरकाराच्या ह्या राज्यपद्धतिविरुद्ध मत दिलें आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीची विक्री किंवा लिलांव होणें हें राष्ट्रास दारिद्र्य येण्यास कारणीभूत होत असतें. सावकारांच्या देण्याची फेड, कुळांच्या वंशपरंपरेनें चालत आलेल्या जमिनीवर होत असल्यानें, उत्पादक ह्मणविलेल्या शेतकरी लोकांचा वर्ग निर्धन बनला व कपटानें धन मिळवून, लोकांच्या मालमत्तेचा अपहार करण्याची इच्छा ठेवणारा जो सावकार लोकांचा वर्ग, तो उत्कर्ष पावत चालला. सरकारसारा व सावकारांच्या देण्याकरितां जमिनीची मालकी सोडण्याचा शेतकऱ्यांवर प्रसंग येतांच, ते अनाथ बनून उदरनिर्वाहाकरितां देशांतरास जातात. त्यामुळें ओघानेंच खऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी होते. इ० स० १८७२–७३ सालीं मि० वेस्ट यांनीं "हिंदुस्थानांतील जमिनी आणि सरकाराचा कायदा" या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, जमिनी फरोक्त करण्यासंबंधानें, लोकांना पूर्ण स्वातंत्र्य न देतां, कांहीं निर्बंध ठरविण्याची फार आवश्यकता आहे. ज्या जमिनींची प्रतबंदी झाली असेल, त्या सरकाराच्या परवानगीवांचून मालकाला कोणत्याही प्रकारें दुमाला करितां येणार नाहींत, असा सरकारानें हुकूम फिरवावा. शेतकऱ्यांचीं घरें, गुरें व जमीन यांजवर कोर्टाचा हुकूम चालूं नये. कुटुंबाचें क्षेम राखण्यास अवश्य अशा जमिनीचे विभाग होतात, त्यामुळें देशांत दारिद्र्याचा विस्तार हळू हळू फार वाढतो. अशा वांटणीच्या प्रसंगीं हिस्सेदारांस भागाबद्दल रोकड पैसा थोडासा देववावा." वायव्यप्रांतांतील रेव्हिन्यू बोर्डाचे हक्कदार सभासद मि० रीड हे ह्मणतात कीं, कर्जदारांची जंगम मिळकत विकली जाऊनही, जर कर्जाची फेड होत नसेल, तर त्यांची जमीन कांहीं वर्षांच्या करारानें सावकारांस द्यावी; परंतु त्या सावकारांस त्या जमिनीचा मालक बनूं देऊं नये. आग्र्याचे माजी कमिशनर मि० हाव्ही यांचें असें मत आहे कीं, "जमीन वहिवाटणारांच्या कर्जासाठीं त्यांच्या हयातीपर्यंत मात्र जमि-

नीचें उत्पन्न विकण्याचा अधिकार हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मालकाला येतो. तेव्हां ही वहिवाट पुनः अंमलांत आणून, शेतकऱ्यांना सरकारानें तारावें." मि० ब्राऊन हे ह्मणतात कीं, "शेतकऱ्यांस कर्जबाजारीपणा येण्यास अनेक कारणें झालीं आहेत. अनावृष्टीमुळें धान्य न पिकणें, अतिवृष्टीनें त्यांचें मोठें नुकसान होणें, लग्न किंवा इतर बाबतींत मोठा खर्च करण्याचे त्यांजवर प्रसंग येणें, आणि मध्यम स्थितींतील त्रासदायक लोकांकडून लुबाडलें जाणें, हीं मुख्य कारणें शेतकऱ्यांना दारिद्र्यसागरांत बुडवितात. व्याजाचा दर अतिशय मोठा असल्यामुळें, कर्ज लवकर वाढतें व त्याची फेड कुळांकडून अपरिहार्य कारणांनीं होऊं शकत नाहीं."

शेतकऱ्यांच्या मुलांना, त्यांच्याच धंद्याचें बरोबर ज्ञान मिळेल, अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे; परंतु तिकडे अद्यापि कोणाचेंही लक्ष जात नाहीं. शेतकऱ्यांचीं मुलें लिहिण्यास शिकून, अलिकडे दास्यकर्मांत शिरत आहेत व पूर्वापार शेतकीचा धंदा त्यांना फारच हलका वाटतो. याकरितां त्या धंद्याचें खरें ज्ञान मुलांस देऊन, त्यांना तयार करणें हेंच सरकार व लोकपक्षाचे पुढारी यांचें मुख्य कर्तव्य आहे. नामदार रहिमतुल्ला महमद सयानी यांनीं, कलकत्त्याच्या कायदे कौन्सिलांत इ० स० १८९७ सालीं भाषण करितांना ह्मटलें होतें कीं, "शेतकींत सुधारणा होत नाहीं, याचीं कारणें शेतकऱ्यांचें व जमीनदारांचें दारिद्र्य आणि त्यांना शेतकीचें शिक्षण देण्याची योजना नसणें, हीं दोनच मुख्य होत. ज्या देशास 'सुवर्णभूमि' हें बहुमान्य पद मिळालें होतें, तोच देश आज दैन्यावस्थेच्या पूर्ण फेऱ्यांत सांपडून, त्याची सर्व जगावर अपकीर्ति व्हावी, हें फारच विलक्षण आहे. दुष्काळाच्या आरंभासच धान्याचे भाव एकदम वाढणें, सरकाराच्या आश्रयास जाणारांची संख्या फुगणें व सर्व जगावरील उदार लोकांपुढें हात पसरून याचना करण्याचा ह्या देशास प्रसंग येणें, हें ह्या देशावर आलेल्या भयंकर आपत्तीचें दर्शकच होय. ज्या देशांतील जमीन शेतकीच्या उपयोगाची नाहीं, अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांपेक्षां हिंदुस्थानांतील रसाळ जमिनीवर मेहनत करणारे शेतकरी इतके विपत्तिग्रस्त कां व्हावेत; याचा विचार होण्याची फार जरूर आहे. आपल्या शेतकींत कोणती सुधारणा करणें इष्ट व कोणती

योजना आपण करीत नाहीं, हें ह्या देशांतील बऱ्याच शेतकऱ्यांस समजतें; परंतु त्यांना दारिद्र्यानें ग्रासिल्यामुळें, त्यांच्या हातून शेतकीची मशागत बरोबर होऊं शकत नाहीं. ज्यास्त मजबूत बैल खरेदी करून, त्यांचें पोषण करण्याची व शेतांस खत घालण्याची शक्ति शेतकऱ्यांत जोंपर्यंत उत्पन्न होणार नाहीं, तोंपावेतों शेतकींत सुधारणा होणें अशक्य आहे. त्यांस कर्जबाजारीपणांतून मुक्त करून, पुढें त्यांना सावकारांच्या येथें जाण्याचा प्रसंग न येईल, अशी पद्धति सरकारानें कृपा करून सुरू करावी. शेतकऱ्यांकरितां पेढ्या स्थापन करून, ऐनजिनशी पिकावर जमाबंदी घेण्याचें धोरण कायम करावें; ह्मणजे शेतकऱ्यांच्या बऱ्याच अडचणी दूर होतील."

शेतकरी व उद्योगधंदे करणाऱ्या लोकांना थोड्या व्याजानें पैसे देण्याच्या पेढ्या, जर्मनींत फ्रेडरिक धी ग्रेट बादशहानें, जमीनदार आणि उमरावांच्या मंडळ्यांकडून स्थापन करविल्या. ह्या पेढ्यांचा परिणाम त्या देशाच्या भरभराटीस कारणीभूत झाला. तशा पेढ्या हिंदुस्थानांत काढण्याची फारच जरूर आहे. फ्रान्सांतील जमीन जरी सुपीक नाहीं, तरी तिकडे त्या सरकारानें अशा प्रकारच्या पेढ्या स्थापून व शेतकऱ्यांना कांहीं विशेष सवलती देऊन, त्या देशास उत्कर्षप्रद अवस्थेस आणल्याचें आढळून येतें. प्रत्येक शेतकरी या पेटीवर आपल्या प्राप्तीचा थोडासा अंश जमा करितो व मदतीची जरूर लागल्यास, त्याला त्या पेटींतून चांगली मदत होते. सहकारतत्वाचा (कोआपरेटिव) त्या देशांत उदय झाल्यामुळेंही तिकडील सर्व प्रकारचे व्यापारधंदे आणि शेतकी वरिष्ठ प्रतीची ठरण्यास विलंब लागला नाहीं. इंग्लंडांत सहकारी मंडळ्या स्थापन झाल्यानें, तिकडे व्यापारधंदे बरेच वाढले व त्या देशावर दुष्काळाच्या संकटांपासून फारसे अनिष्ट परिणाम घडत नाहींत.

थोड्या बैलांवर हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना ज्यास्त काम घ्यावें लागतें, त्यामुळें शेतकीची नांगरणी बरोबर होत नाहीं. शेतकीच्या जनावरांची वाढ करविण्याच्या बदल्यांत, त्यांचा अलिकडे एकसारखा नाश होत आहे. मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं शेतकीच्या जनावरांची संख्या बरीच घटत चालली. तसेंच लोक निःशस्त्र झाल्यामुळें, हिंस्र पशूंकडून शेतकीचीं बरींच जनावरें

मारलीं जातात व कांहीं जनावरांना पोटभर चारा खाण्यास मिळण्याची सोई नसल्याकारणानें, सांथींचे रोगांचा उद्भव होतो आणि बरींच जनावरें दरसाल मृत्युमुखीं पडत असतात. तसेंच कांहीं ठिकाणीं दरसाल पाण्याची टिपळूण लागते, व त्यांचे पाण्यावांचून अतिशय हाल होत असतात. दुष्काळाच्या दिवसांत तर शेतकीच्या जनावरांची अतिशय खराबी होत असते. अगोदरच ह्या देशांतील शेतकीचीं जनावरें कमी होत चाललीं आहेत व त्यांत त्यांच्या शेणाचा सर्पणाकडे उपयोग करावा लागल्याकारणानें, जमिनीस पीक बरोबर न येणें यांत फारसें नवल नाहीं. दरसाल लोकांचें सर्पण व इमारतीकरितां जें जंगल तुटलें जातें, त्याचा विचार केल्यास, जंगलाची वाढ करविण्याच्या बदल्यांत, त्याचा क्षयच ज्यास्त होत चालला आहे; हें निर्विवाद ठरतें. प्राचीन काळीं ह्या देशांत अरण्यें फार असत, त्यामुळें पावसाची हाकाटी फारशी नसे; परंतु गेल्या शतकापासून, पावसाची कमतरता हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागांत नाहीं, असें एखादें वर्ष आढळून येणें अशक्य आहे. पाऊस न पडण्यास मुख्य कारण, जमीनीवर पाऊस खेंचून आणणाऱ्या साधनांची पडत चाललेली खोट हें आहे. असा साधारण नियम आहे कीं, डोंगर व समुद्र या बाजूस पाऊस इतर ठिकाणांपेक्षां ज्यास्त पडतो. ज्या ठिकाणीं झाडें फार असतात, तेथें वाऱ्यापासून पावसावर आघात होत नाहीं; तर उलट लांबून आलेले जोराचे वारे मंद होतात. जेथें झाडें कमी असतात, तेथें व रेताड प्रदेशांत सामान्यतः कमीच पाऊस पडतो. इ० स० १८७७-७८ सालच्या दुष्काळाच्या आरंभासही हिंदुस्थानाचा किनारा व जंगल जेथें पुष्कळ आहे अशा ठिकाणीं इतर स्थळांपेक्षां पाऊस बराच ज्यास्त पडला होता. इ० स० १८९९ सालींही डोंगराळ प्रदेशांत पावसानें सर्वांशीं टाळा दिला नव्हता. डोंगराळ प्रदेश व समुद्रकिनारा ह्या बाजूस धान्य बरेंच पिकलें; परंतु दुष्काळग्रस्त प्रदेशांत तें लोहमार्गानें नेल्यामुळें, त्या दुष्काळास विशेष भयंकर स्वरूप आलें होतें. जंगलाची तोड सुरू झाल्यापासून, डोंगराळ प्रदेशांतही अलिकडे पावसाची कमतरता पडत चालली आहे. तुर्कस्थान व इराणांत बरेंच जंगल अस-

त्यानें, तिकडे पावसाची खोट बहुधा पडत नाहीं. हिमालयाच्या उतरणीवरही पावसाची खोट नसते. 'नेपाळांत दरसाल कमींतकमी सहाशें इंच पाऊस पडतो' असें ह्मणतात. ज्या बाजूस जंगल थोडें, प्रदेश रेताड व मेघाकर्षक इतर साधनांची खोट अशा मारवाडांत, दरसाल पावसाची कमतरताच आढळून येते. सर्व हिंदुस्थानांत एकाच वेळीं पावसाची उणीव असूं शकत नाहीं. याचें कारण समुद्रकिनारा व डोंगराळ प्रदेश हेंच होय. ह्या अनुभवावरूनच इंग्लिश सरकारानें जंगलाचा कायदा ठरवून, त्याची तोड न व्हावी, तर वृद्धि व्हावी, अशी योजना लोककल्याणार्थ केली आहे. हें फार चांगलें आहे; परंतु शेतकीच्या उपयोगास लागणारें जंगल माफीनें शेतकऱ्यांकडे पाळलें जात नसल्यानें, शेतकऱ्यांना ज्यास्त त्रास भोगावा लागतो. जंगलची तोड आणखीही एका बाजूनें लोकांस विशेष असह्य झाली आहे. डोंगरावर पडणारें पावसाचें पाणी पूर्वी झाडांच्या मुळ्यांच्या अडथळ्यामुळें, जमिनींत बरेंच मुरून रहात होतें व नद्यांना वेळोवेळीं फार मोठे पूर येत नसत, ते अलिकडे बरेच येतात व जंगलाची तोड होऊं लागल्यानें, पावसाची कमतरता व अतिवृष्टि हीं कारणें उद्भवून, देशाची फारच हानि होत असते. जेथें झाडें नाहींत अशा स्थळीं सामान्यतः पाऊस अगदीं कमी पडतो व कदाचित् मेघाकर्षकवायु आरंभास जोरदार व मध्यंतरीं एकदम निर्जीव झाल्यास, अतिवृष्टि होऊन त्या प्रदेशावर फार वाईट परिणाम घडतो. कित्येक गावें व नदीच्या कांठची शेतकी महापुरानें वाहून जाते आणि जमिनीचा कस कमी होतो. तसेंच कांहीं स्थळीं गाळ येऊन बसतो. डोंगराच्या बाजूनें वहाणारें पाणी समुद्रास मिळेपर्यंत, त्यास जितका अवरोध होईल, तितकी त्याची गति कमी होते व जमीन दमदार बनते. कोंकणांतील कांहीं अनुभवी लोकांचें असें मत आहे कीं, पन्नास वर्षांपूर्वी ज्या नदीच्या पाण्यास ज्यास्त ओढ नव्हती, त्याच बाजूचें जंगल तुटतांच आज त्या नद्यांचें पाणी ज्यास्त वेगानें वहात आहे. डोंगरावरून पडणाऱ्या पाण्यास झाडें, मोठे दगड व खडक यांपासून होणारे अवरोध अलिकडे बरेच नष्ट झाले, त्यामुळें जमिनींत पावसाचें पाणी मुरून न राहतां वाहून जातें व एखादा पाऊस न पडतांच जमीन सुकते. जमिनींतील पाण्याचे

झरेही अलिकडे कमी होत चालले असून, उंचवट्यांवरील झाडें निर्जीव होत चालली आहेत. डोंगराळ प्रदेशांतील उंचवट्यावर असलेलीं झाडें, डोंगरांच्या पायथ्यांशीं असलेल्या झाडांपेक्षां ज्यास्त लहान व खुरटीं असतात, याचें कारण त्या उंचवट्यावरील जमिनींत पाणी न रहातां, तें खालीं उतरून जातें हेंच होय. पाण्याच्या गतीस अलिकडे प्रतिबंध होत नसल्यानें, नद्यांचीं पात्रें वाढत जाऊन, आजूबाजूची माती वाहून जाते आणि ज्या ठिकाणीं पाण्याचा सांठा पूर्वी रहात असे, तीं स्थळें उन्हाळ्यांत हल्लीं कोरडीं पडतात. अर्थात् पाऊस जरी बेताचा पडला तरी शेतकी चांगली होत नाहीं व पावसाची कमतरताच ज्या वर्षी असते, त्या सालीं तर प्रत्यक्ष आपत्तीच येऊन दाखल होते. फार प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील शेतकरी केवळ पावसावर अवलंबून रहात नसत. पावसाची कमतरता नजरेस पडतांच, ते खाऊन पिऊन सुखी होते त्यामुळें, जमीन सुपीक करण्याकडे लक्ष देत व या संधीचा भावी आपत्तीच्या विरुद्ध उपयोग करून ते घेत होते. नद्यांचीं पात्रें वळवून त्यापासून देशाची अवादी व झाडांची लागवड दुष्काळाच्या दिवसांत त्यांनीं केल्याचे दाखले, हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासांत बरेच आढळून येतात. जी जमीन शेतकीच्या उपयोगास येण्यासारखी असेल, तेवढ्या जमिनींतीलच झाडें तोडून लोक आपल्या गरजा भागवीत असत. डोंगरावरचीं झाडें तोडणें हें फारच अपायकारक कृत्य आहे असें ते समजत असावे असें दिसतें. ओढे व नद्या यांच्या कांठच्या झाडांवर शस्त्र चालविणें हें अतिशय निषिद्ध मानण्याचा प्राचीन काळीं प्रघात होता.

दिवसेंदिवस जमिनीचा कस कमी होत चालला आहे, अशी शेतकऱ्यांची मुख्य तक्रार आहे व ती बऱ्याच अंशानें खरीही आहे. जमिनींतील दमदारपणा अलिकडे निघून जात असून, ती ज्यास्त निकस बनत चालली आहे. डाक्टर हंटर हे ह्मणतात कीं, "वायव्यप्रांतांतील ज्या जमिनींत हल्लीं दरएकरास ८४० पौंड गहूं पिकतो, तिजमध्यें अकबर बादशहाच्या कारकिर्दीत ११४० पौंड गहूं पिकत होता. हल्लीं पीक कमी होण्याचें मुख्य कारण जमिनीस पुरेसें खत मिळत नाहीं हेंच होय." मि० रॉबर्ट एच्. इलियट हे ह्मणतात कीं, "गुजराथेंत अकबराच्या वेळीं ज्या ज-

मिनींत दरएकरास भात ११३८ शेर पिकत होतें तींत तें आतां ८०० शेर, गहूं जेथें १११५ शेर पिकत होता, तोच आज तेथें ६६० शेर व कापूस जेथें २२३ शेर पिकत होता तेथेंच तो आज ५२ शेर पिकतो! इ० स० १८२८ मध्यें ज्या जमिनींत दरएकरास ८३ शेर कापूस पिकत होता, तेथेंच तो इ० स० १८४४ सालीं ६३ शेर पिकला." शेतकऱ्यांजवळ पैसा व धान्य नाहीं, त्यामुळें त्यांच्याकडून जमिनीची मशागत न होणें, यांत फारसें नवल नाहीं. पूर्वीपेक्षां अलिकडे धान्य कमी पिकतें, इतकेंच नसून, प्राचीन काळीं शेतांत पिकणाऱ्या धान्यांत जितका सत्वांश होता, तितका अलिकडील धान्यांत नसतो, असेंही पदार्थपृथक्करणशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. दरसाल जमिनींत पिकणारें धान्य जमिनीचा रस शोषून घेतें, त्यामुळें तिचा सत्वांश कमी होतो. ह्या देशांतील प्रजा अलिकडे अल्पायुः व अशक्त झाली आहे, त्याचीं जीं कित्येक कारणें आहेत, त्यांत निःसत्व अन्नाचा लोकांस उपयोग करावा लागणें व वनस्पत्यांचें निस्तेजत्व, या दोन कारणांचा समावेश करितां येईल. ढोरांस मिळणारा चारा व दुसरा खुराक सत्वशील नसल्यानें, दूधही निःसत्व झालेलेंच लोकांस मिळतें. शेतकीची जमीन ज्या तत्वांची बनलेली असते, तीं तत्वें धान्यांत येत असल्यानें, त्यांची हळू हळू जमिनींत खोट पडत चालली आहे.[1] ज्या तत्वांवर धान्यांचा निर्वाह होतो, तीं तत्वें जमिनींत कशीं व कोणत्या प्रमाणानें घालावीं, त्याचें ज्ञान संपादन केल्यावांचून, जमिनी ज्यास्त पीक देऊं शकणार नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. इंग्लंडांतील जमीन हिंदुस्थानापेक्षां कमी प्रतीची असतांही, तिला हल्लीं भरपूर खत मिळून, तिची चांगली मशागत होते, म्हणून तेथें हल्लीं दरएकरास १५०० पौंड गहूं पिकतो. फ्रान्सांत हें पिकाचें प्रमाण बरेंच वाढलें आहे. उत्तर अमेरिकेंतील शेतकी सर्वांत ज्यास्त कसदार हल्लीं ठरत आहे, त्याचें कारण त्या जमिनीचा कस उतरूं न देतां, ती ज्यास्त कसदार बनविण्याचा तिकडील शेतकरी प्रयत्न करीत असतात; तसें हिंदुस्थानांत बिलकुल नाहीं. इकडील जमीन जरी निःसत्व बनत

१. शेतकीच्या विषयावरील शास्त्रीय पुस्तकें वाचून पाहिल्यास, ही बाजू चांगली समजूं शकेल.

चालली आहे, तरी तिच्यांत सत्वशीलपणाची वृद्धि करण्याचा बिलकुल यत्न होत नाहीं. अगोदरच जमीन निःसत्व झालेली व तींत होणाऱ्या अल्प उत्पन्नावर पुष्कळ लोकांच्या इच्छा पुऱ्या पडावयाच्या; तेव्हां अशा स्थितींत शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची वृद्धि होऊन, दुष्काळांपासून उद्भवणारे अनिष्ट परिणाम भोगण्याचा शेतकऱ्यांना प्रसंग येणें, हें अगदीं साहजिक आहे.

शेतकऱ्यांचें उत्पन्न दरसाल कमी होत चाललें व त्यांचे गांवकीचे आणि इतर खर्च मात्र वाढत चालले आहेत. शेतांत धान्य पिकून घरीं येईपर्यंत, बारा बलुते व इतर हक्कदार लोक आपला हक्क दाखवून, शेतकऱ्यांजवळून खळ्यावरूनच धान्य नेत असतात. इतर भिक्षुक मंडळींचाही शेतकऱ्यांच्या पाठीमागें त्रास कमी नसतो. गांवचे तलाठी व गांवकामदार यांनाही खूष ठेवल्यावांचून त्यांस सुटका नसते. तसें न केल्यास त्यास खराब करण्यास हे लोक कमी करीत नाहींत. तसेंच अर्धेमुर्धे शिकलेले गांवगुंड लोकही, गरीब व अज्ञान शेतकऱ्यांस फार पीडा देत असतात. अशा लोकांस सावकारांचा पाठिंबा असतो. शेतकरी निरक्षर असतात, त्यामुळें त्यांच्या नांवाचीं खोटीं खतें लिहून, त्यांजवर दोन चार स्वार्थी लोकांच्या सावकार साक्षी घालवितो व पुढें शेतकऱ्यांस खबर न देतां, एकदम दिवाणींत फिर्याद दाखल होते. शेतकऱ्यांस लिहिण्यास येत नसल्यानें, दस्ताऐवजाच्या खरेखोटेपणाचा प्रश्न न्यायासनापुढें येऊं शकत नाहीं. सावकारांस सर्व अनुकूलता असल्यानें, चांगले वकील मिळतात व शेतकऱ्यांची उलट स्थिति असल्यानें, त्या अनाथ शेतकऱ्यांवर भयंकर आपत्ति येऊन पडते. ज्यांना धंदारोजगार नसतो व ज्यांचा निर्वाह केवळ गांवकुटाळकीवरच चालतो, अशा लोकांची संख्या अलिकडे बरीच वाढत चालली आहे. त्यांना भिऊन वागल्याशिवाय शेतकऱ्यांस सुटका नसते. ह्या लोकांनीं थोडेंसें शिक्षण मिळविल्याचा बदला, खेडेगांवच्या गरीब व अज्ञान लोकांना हल्लीं इतका वाईट रीतीनें मिळत आहे कीं, ह्या आपत्तींतून शेतकऱ्यांची लवकर सुटका न केल्यास, ते जमीनदोस्त होण्याचें मोठें भय आहे. या लबाड लोकांच्या लबाड्या उघडकीस आणण्याचें ज्ञान, जर शेतकऱ्यांस मिळेल, तरच त्यांचा त्यांतून बचाव होऊं शकेल.

शेतकऱ्यांचें व इतर लोकांचें लक्ष पावसाकडे विशेष असतें. वर्षाकाळाच्या आरंभास व शेतकीची लागवड झाल्यावर तो कसा पडतो, इकडे सर्व लोकांचे डोळे लागतात. पाऊस चांगला पडल्यास सुकाळ होण्याची त्यांना जरी आशा नसते, तरी आपल्या शेतांत धान्य पिकेल व आपणांस खाण्यास तें थोडेंसें तरी मिळेल, येवढीच त्यांची आशा असते. दरसाल किती पाऊस पडतो व यंदां कसा पडेल इकडे लोकांचें लक्ष फार असतें. असें असण्याचें कारण, शेतकऱ्यांच्या शेतांत धान्य पिकून, त्याचा पुरवठा होईल, मजुरांस शेतकऱ्यांकडून थोडेंसें काम मिळेल व सराईत लोकांस स्वस्त दरानें धान्य विकत घेण्याची सोई होईल; या तीन कारणांनीं हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें लक्ष पावसाकडे असतें. पाऊस आल्यानें त्यांचें नेहमींचें दारिद्य त्यांना फारसें पीडा देऊं शकत नाहीं. 'पावसाळा कोरडा गेल्यानें दुष्काळ पडतो' याचा हल्लीं खरा अर्थ, पावसाच्या कमतरतेमुळें लोकांचें मूळचें दारिद्य त्यांस ज्यास्त पीडा देऊं लागतें, असाच केला पाहिजे. लोक निर्धन झालेले नसते, तर ही पावसाची कमतरता त्यांस बिलकूल असह्य झाली नसती. ही पावसाची खोट भरून काढण्याची अनुकूळता नसून, लोक दारिद्र्यानें ग्रासिलेले असल्यामुळें, त्यांना पावसाची कमतरता फार नडणें हें अगदीं स्वाभाविक आहे. दरसाल कोणत्या विभागांत किती पाऊस पडतो व तो खरोखर किती पडला पाहिजे, हा विषय फार महत्वाचा आहे. तूर्त दुष्काळाचें संकट याच तत्वावर अवलंबून राहिलें आहे, असें विद्वान् लोक प्रतिपादन करितात. थोड्या उत्पन्नांत संसार चालविणाऱ्या सर्व लोकांवर, अशा दिवसांत अनिष्ट संस्कार घडतो; याचें कारण पावसाच्या कमतरतेमुळें धान्याचे भाव वाढतात हेंच होय. हे भाव जरी वाढले, तरी त्याचा अहितकारक संस्कार घडूं नये, अशी शक्ति संपादन केल्यावांचून, या देशावर दुष्काळरूपी राक्षसाच्या होणाऱ्या स्वाऱ्या बंद पडणार नाहींत.

# भाग सहावा.

## दुष्काळांचें संकट टाळण्याचे सहेतुक प्रतिबंध.

हिंदुस्थानांत पडणारे दुष्काळ जरी अनावर्षणापासून भयंकर स्वरूप धारण करितात, तरी त्यांना दुसऱ्या अनेक यत्नांनीं प्रतिबंध करितां येईल. शरीर निरोगी बनविण्याकरितां कसरत व इतर उपाय योजतां येतात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानास दुष्काळरूपी महाभयंकर व्याधि जडूं नये व त्याचे वारंवार हल्ले होऊं नयेत, याकरितां अनेक प्रकारचे इलाज अमलांत आणल्यास, दुष्काळाच्या संकटापासून लोकांस पीडा होऊं शकणार नाहीं. अंगीं संकटांशीं झुंझण्याचें सामर्थ्य असल्यास, संकटाचा जोर फारसा वाढत नसतो. त्याचप्रमाणें या दुष्काळांशीं आह्मीं पूर्ण सामना करण्याची शक्ति अगोदर संपादन केली पाहिजे. पाऊस पडणें किंवा न पडणें, हीं दोन कारणें हल्लींच्या समजुतीप्रमाणें ईश्वरदत्त आहेत. मनुष्यकृतीनें हीं दोन कारणें नष्ट करण्याचे यत्न, जगावरील कांहीं शोधक विद्वानांनीं चालविले आहेत. तोफांच्या साहाय्यानें किंवा दुसऱ्या यांत्रिकशक्तीचा उपयोग केल्यानें, जेथें नसेल तेथें पाऊस खपापुरता पाडतां येतो, असें अनुभवांतीं ठरेपर्यंत, पावसाचें कारण ईश्वरदत्त समजणें हें युक्त आहे. ईश्वरदत्त कारणानें दुष्काळ पडतो; हें तत्व कायम ठरविण्यापूर्वीं, जगावरील इतर देशांचा विचार करणें इष्ट दिसतें. पावसाची कमतरता किंवा अतिवृष्टि, जगावर अनेक स्थळीं होत असते; परंतु त्या देशांत हिंदुस्थानाप्रमाणें दुष्काळानें असंख्य माणसें मरत नाहींत, ही गोष्ट प्रथम लक्षांत ठेवली पाहिजे. पावसाच्या कमतरतेनें व अतिवृष्टीनें धान्य कमी उत्पन्न होईल किंवा तें मुळींच पिकणार नाहीं. टोळधाड किंवा लढाईमुळेंही उत्पन्न झालेल्या धान्याची फार तर खराबी होईल; परंतु तेवढ्यानें हिंदुस्थानांतील लोकांना मृत्युमुखीं पडण्याचा दुर्दैवी योग यावा, हें फारच विलक्षण आहे. आमच्या देशाची सांपत्तिक स्थिति जगावरील इतर देशांपेक्षां फार वाईट आहे, तेव्हां तेंच दुष्काळाचें मुख्य कारण मानण्यास हरकत येणार नाहीं. हें दारिद्य ज्या कारणांमुळें आलें असेल, तीं नष्ट करण्याचा यत्न केल्यास, पुढें दुष्काळाच्या संकटांपासून उद्भवणारा असह्य

परिताप भोगण्याचा बिलकुल प्रसंग येणार नाहीं. हें दारिद्र्य नष्ट करविण्यास अनेक प्रकारचे उपाय योजितां येतील. प्राचीन काळीं लोकांना एक दोन वर्षांच्या अनावर्षणापासून फारशी पीडा होत नसे; त्याचें कारण त्या वेळची सांपत्तिकस्थिति हल्लींप्रमाणें खालावलेली नव्हती. हिंदुस्थानांतील पैसा व धान्य बाहेर जात नव्हतें. आज तसें नाहीं. हल्लीं जगावरील बहुतेक ठिकाणीं आमच्या देशांतील धान्य जात असतें. इतकें धान्य पाठवूनही दुष्काळाचें संकट इकडे असह्य होणार नाहीं, असें ह्या देशास बनविणें प्रस्तुत काळीं इष्ट आहे. दुष्काळाचें संकट टाळण्याकरितां झटणें हा सर्वांत महत्वाचा उपाय होय. संकट येऊन पडल्यावर जे उपाय योजावयाचे, ते फक्त परिहार करणारेच असले पाहिजेत. देशावर दुष्काळाचें संकट आल्यास, त्यापासून पीडा होऊं नये, हे विचार दूरदृष्टीचे असल्यानें, त्यांनाच ज्यास्त प्राधान्य देणें भाग पडतें. अठराव्या शतकांत व एकुणिसाव्या शतकाच्या आरंभास जे दुष्काळ पडले, त्यांत एका प्रदेशांतील धान्य दुसऱ्या प्रदेशांत नेण्याची सोय नसल्यानें, दुष्काळ ज्यास्त खराबी करितो, या सबबीवर आगगाडीची योजना अंमलांत आली; परंतु पुढें पडलेल्या दुष्काळांत, आगगाडीच्या योजनेनेंही दुष्काळास प्रतिबंध होऊं शकत नाहीं, असें अनुभवास आलें. युरोपांत आगगाड्या व आगबोटी यांची पूर्ण अनुकूलता असल्यानें, त्या देशांत फारसे दुष्काळ पडत नाहींत, अशी पूर्वींच्या ह्या देशांतील इंग्लिश कामदारांची समजूत होती; परंतु इ० स० १८७७–७८ सालचा दुष्काळ पडतांच, ती केवळ भ्रामक आहे असें वाटलें. जेथें खरोखर धान्याची खोट असते, परंतु पैसा भरपूर असतो, अशा देशावर आगगाडी किंवा आगबोटी ह्या दुष्काळाचें संकट येऊं देत नाहींत, असा एक सिद्धांत पूर्वोक्त दुष्काळापासून जन्मास आला. जेथें धान्याची मूळ खोट नसते, परंतु तें खरेदी करण्यास पैशाची अनुकूलता असत नाहीं, अशा ठिकाणीं, हीं दोन साधनें दुष्काळांना उलट साहाय्यकारी होतात. ह्याच साधनांत ह्या देशांतील लोकांचें भांडवल गुंतलें गेलें असतें व तें आमच्या देशांतील पदार्थांचा उपयोग करून जर तयार झालें असतें, तर संपत्तीची वाढ विशेष झाल्यावांचून राहिली नसती. आगगाडीचीं यंत्रें व दुसरें सा-

मान हें येथील पदार्थांपासून, येथील कारखान्यांत तयार झाल्यानें ह्या देशाचा बराच फायदा झाला असता. हल्लीं आगगाडीचीं यंत्रें, गिरण्या व इतर कारखान्यांतील सर्व यंत्रें परदेशांतून येत असून, तीं येण्याचा मार्ग आगगाडीमुळें विशेष मोकळा झाल्यानें, इकडील संपत्ति एकसारखी परदेशांत वाहून जात असते. तसेंच परदेशांतील नाशवंत माल येथें येऊन, येथील प्रजेची दैनाही थोड्याच वेळांत उडून जाण्याचा रस्ता, ह्या साधनामुळें मोकळा झाला आहे.

प्रत्येक देशाच्या अबादीचा मुख्य आधार व्यापाराचा विस्तार व शेतकींतील मुख्य सुधारणा यांच्यावर आहे. या दोन धंद्यांचें उत्तम ज्ञान मिळविण्याची लोकांस गोडी लावून, त्या विद्येंत त्यांना पारंगत करून सोडल्यास, लोकांस संपत्तिमान् होण्यास विलंब लागणार नाहीं. युरोपांतील राष्ट्रांनां या दोनच विद्यांच्या साहाय्यांपासून चांगला फायदा झाला आहे. शेतकी, व्यापार व यांत्रिक शक्तीचें ज्ञान मिळविण्याकरितां, युरोपाप्रमाणें इकडे प्रत्येक स्थळीं शाळा स्थापन केल्यावांचून, या देशांतील प्रजा सधन होऊं शकणार नाहीं. व्यापार व उद्योगधंदे यांची वृद्धि करून, देशाची अबादी करण्यासाठीं, लोकांना सुधारणें हें बऱ्याच अंशानें सरकाराच्या आधीन असतें. राजसत्ताक राज्यांत प्रजेची सर्व प्रकारची सुधारणा राज्यकर्त्यांच्या बुद्धिकौशल्यावरच अवलंबून रहाते. 'राजा कालस्य कारणम्' म्हणजे 'राजा हा चांगला किंवा वाईट काळ येण्यास कारणीभूत होतो' असा राजसत्तेखालील प्रदेशांत सामान्य नियम असतो. चांगला काळ जसा राजसत्तेनेंच येतो, तसाच वाईट काळही राजसत्तेच्या प्रतापानें पुढें येत असतो. देशाची अबादी यांत्रिक शिक्षणानें जशी होते, तशीच ती भूगर्भ व पदार्थविज्ञानशास्त्रांच्या अध्ययनानेंही बऱ्याच अंशीं होऊं शकेल. शोभिवंत व मजबूत इमारती कशा बांधाव्या; लोखंडी सडका कशा तयार कराव्या, लोखंड कसें तयार करावें वगैरे गोष्टींचें पूर्ण ज्ञान मिळवून, आमचे लोक स्वकर्तव्यास तत्पर झाल्यास, ह्या देशांतील कारखान्यांकरितां मोठा पगार देऊन, परदेशांतून जे असंख्य लोक आणावे लागतात, तसे ते लागणार नाहींत. ह्या देशांतील लोकांकडून तें काम झाल्यास, परदेशाच्या लोकांच्या पोषणाचा

बोजा, ह्या देशावर येऊन पडणार नाहीं. खाणींतून लोखंड काढण्याचाही धंदा इकडे चांगला चालूं शकेल; परंतु त्या धंद्यास योग्य असें आम्हांस शिक्षण मिळालें पाहिजे. खनिज पदार्थ शोधून काढून, त्यांजवर उपजीवन चालविण्याची शक्ति जोंपर्यंत आमच्यांत प्रवेश करणार नाहीं, तोंपावेतों आमच्या देशाचा उत्कर्ष होऊं शकणार नाहीं. मोठमोठे कारखाने काढणें, कालवे खोदणें, यंत्रें तयार करणें इत्यादि साधनें सानुकूळ झाल्यावांचून आपलें दारिद्र्य नष्ट व्हावयाचें नाहीं. तसेंच आपल्या देशांतील पैशानें परदेशांतून ज्यास्त संपत्ति कशी आणावी, याचें ज्ञान मिळण्याकरितां आमच्या लोकांनीं पुढें होऊन, आपला उत्कर्ष करून घेतला पाहिजे; परंतु या देशांतील प्रजा अज्ञान असल्यानें, तें वळण खरोखर सरकारानेंच लावण्याची फार जरूर आहे. हिंदुस्थानास सज्ञान करून त्यावर राज्य करण्याची इच्छा इंग्लंडास फार आहे. हा हेतु पार पाडण्याची खटपट सुरू होतांच, हिंदुस्थानांतील सांपत्तिक स्थिति सुधारून, लोकांच्या दैन्यावस्थेचा बराच ऱ्हास होईल.

काम करणारांची व मजुरांची संख्या या देशांत हल्लीं बरीच असून, त्यांचे धंदे यांत्रिक शक्तीनें आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें, सर्व कारागीर व मजूर हे अत्यंत निर्धन झाले. मनुष्यांची जेथें खोट असते, तेथें यांत्रिक शक्तीपासून चांगला फायदा होतो, परंतु ज्या स्थळीं मनुष्यांची मुळींच खोट नसते, अशा ठिकाणीं यांत्रिक शक्तीपासून किती अपाय घडतो, याचा हिंदुस्थान हा एक प्रस्तुतकाळीं नमुनाच झाला आहे. यांत्रिकशक्तीचा उपयोग केल्यानें, थोड्या माणसांपासून ज्यास्त काम होतें. त्यांत काम करविणारांस सकृद्दर्शनीं बराच मोठा फायदा मिळतो हें खरें; परंतु तीं यंत्रें ज्या ठिकाणीं तयार होतात, त्या ठिकाणच्या असंख्य लोकांस आपण काम देतों व केवळ थोड्याशा लाभाकरितां आपल्या देशांतील कारागिरांस उपाशीं मारतों, हें बरोबर नाहीं. हेंच आमच्या देशांतील व्यापाऱ्यांस खरें व्यापारीय शिक्षण असतें, तर त्यांनीं याच देशांत यांत्रिक कारखाने काढून, कारागिरांकडून यंत्रें बनविण्याचें काम घेतलें असतें. बंदुका, तरवारी वगैरे हत्यारेंही पूर्वीं याच देशांत बनत असत. तो धंदा इ० स० १८५८पासून बंद पडला व ती जागा युरोपांतील व्यापाऱ्यांनीं बळकाविली. पाश्चिमेचा उदय या देशांत झाल्यापासून, ह्या देशांतील

मूळचे सर्व धंदे बंद पडले व लोकांस केवळ 'आकाशाकडे पाहण्याची पाळी' आली! ह्या देशांतील सर्व कारागिरांस सांप्रत दुष्काळ फार नडत असतो. त्यांस योग्य कामगिऱ्या मिळेपर्यंत तो नष्ट व्हावयाचा नाहीं. ही कामगिरी म्हणजे, त्या लोकांना योग्य धंदा देऊन, त्या धंदेवाईक लोकांच्या मुलांना कारागिरी शिकविण्याची सोई करणें. नुसतें शिक्षण दिल्यानें त्या लोकांच्या दारिद्र्याचा ऱ्हास होणार नाहीं. त्यांना आपला धंदा चालविण्याची पूर्ण शक्ति आणून देऊन, त्यांना सरकार व धनाढ्य लोक यांनीं, आपल्या खर्चानें मोठमोठे कारखाने काढून दिले पाहिजेत. मोठमोठ्या उद्योगशाला स्थापून, जगावरील प्रख्यात कलांचें ज्ञान लोकांस देऊन, त्या शिकविलेल्या लोकांस त्यांच्या ज्ञानाप्रमाणें कामगिरी सांगितल्यास, ह्या देशाचा उत्कर्ष बऱ्याच थोड्या काळांत होईल. हिंदुस्थानांतील व्यापारावर हल्लीं बराच दाब आहे. ज्या मालाची इंग्लंडास फार जरूर, असा माल इकडून भरपूर तिकडे जातो आणि परदेशांतील मालास, इकडे सांप्रत इतकें प्राधान्य मिळालें आहे कीं, त्यामुळें स्वदेशांतील वस्तूंचा बराच उपमर्द होत असतो. ही स्थिति बदलण्याकरितांही कांहीं विवक्षित प्रकारचे यत्न व्हावयास पाहिजेत. सर्व प्रकारचा स्वदेशीय माल तयार होऊं लागल्यास, तो परदेशांतून येणाऱ्या मालापेक्षां जर स्वस्त मिळेल, तरच त्याचा खप होऊन, देशास फायदा मिळेल. परदेशांत ह्या देशांतला जो माल जातो, त्याजवर तेथील सरकारानें ज्याप्रमाणें जास्त जकात ठेवली आहे, त्याचप्रमाणें परदेशांतून ह्या देशांत येणाऱ्या मालावर, बरीच मोठी जकात बसेल, तरच इकडील व्यापार वाढूं शकेल. व्यापारधंद्यांची वाढ झाल्यावांचून, ह्या देशाचें दारिद्र्य नष्ट व्हावयाचें नाहीं.

हल्लीं जमीनधारा जो वाढला आहे, तो पूर्वींप्रमाणें उत्पन्नावर ऐनजिनशींत घेण्याचा रिवाज दाखल होऊन, कर्जाबद्दल जमिनीची विक्री होते, तो प्रकार बंद होण्याची फार आवश्यकता आहे. ही तजवीज सरकारानें अवश्य करावी. हल्लीं शेतकऱ्यांकडून जमिनी भडाभड पैसेदार लोकांकडे जातात. त्यांच्याकडेही बऱ्याच जमिनी येऊन पडतांच, सरकारदेण्याचा बोजा जास्त वाढून, त्या तिसरीकडे जाण्याचा दुर्दैवी योग येतो. कों-

कण व मावळांत सावकार लोक कशा अवस्थेंत शिरले व त्यांनीं आमच्या शेतकऱ्यांना हरप्रयत्नानें फसवून, ते कसे धनाढ्य झाले, याचा विचार केल्यास, आमच्या शेतकऱ्यांना निर्धन बनवून दुष्काळाच्या स्वाधीन करणारे हेच मुख्य होत, असें निर्विवाद ठरतें. या लोकांच्या दारीं कर्ज मागण्यास जाण्याची पाळी जेणेंकरून न येईल, अशा अवस्थेंत आमच्या शेतकऱ्यांना व दुसऱ्या उत्पादक वर्गास आणून ठेवण्याचे श्रम, सरकारानें अगोदर घेतले पाहिजेत. वारंवार जमीनधारा बदलणें व गांवांतील इतर लोकांकडून त्रास पोंचणें, हीं दोन कारणें शेतकीचा धंदा करणारांस फारच जाचक होत असतात. हल्लीं शेतकऱ्यांच्या सर्व व्यवहारांवर खर्चाचा फार दाब आहे. त्यांस जास्त जनावरें पाळतां येत नाहींत. डोंगरांत राहून गुरें चारणारे धनगर तर या बाबीमुळें अतिशय त्रस्त झाले आहेत. जंगलाच्या अडचणीमुळें असें झालें आहे कीं, पूर्वीं ज्या धनगरवाड्यावर दहा पंधरा हजार ढोरें आढळून येत असत, त्याच स्थळीं आतां पांच सहाशें जनावरेंही आढळून येत नाहींत! शेतकीला जनावरें ज्या ठिकाणाहून मिळावयाचीं तेथें व खुद्द शेतकऱ्यांच्यायेथीलही जनावरांची हीच दशा असल्यामुळें, ह्या देशांतील कृषिकर्मजीवि मनुष्यांना आपत्तीनें आपल्या फेऱ्यांत पूर्ण पकडलें आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांना चरण्याची पूर्वीं चांगली सोई होती, ती आतां राहिली नसल्यानें, त्यांचेजवळ ढोरें राहिलीं नाहींत व शेतकी बरोबर होत नसते.

काम करणाऱ्या लोकांस निर्वाहापुरती मजुरी मिळते किंवा नाहीं, त्याचा विचार हल्लीं कारखानदारांकडून होत नसतो. उदरनिर्वाहार्थ मजुरी करणाऱ्या लोकांजवळ रोज थोडथोडी शिल्लक राहील, अशी त्यांस मजुरी मिळाल्यास, धान्याची महर्गता होतांच किंवा दुष्काळ पडल्यावर कोणाच्याही मदतीची त्यांस अपेक्षा उरणार नाहीं. कामाच्या बदल्यांत मिळणारा मुशाहिरा निर्वाह होऊन थोडीशी शिल्लक उरण्याइतका असेल, तरच दुष्काळासारख्या आपत्तीचा मजुरांवर किंवा काम करणारांवर वाईट परिणाम घडत नसतो. इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांत मजुरांस मजुरी चांगली मिळते, तेणेंकरून त्यांस आपला निर्वाह करून, थोडी शिल्लक ठेवितां येते. त्या देशांत कार-

खाने जास्त; यंत्रांचा उपयोग तिकडे बराच होतो व मजूरही इतर देशांपेक्षां फारसे कमी नाहींत; अशा देशांतील मजुरांना हिंदुस्थानाप्रमाणें खरोखर मजुरी कमी मिळाली पाहिजे; परंतु तिकडे तसें नाहीं. हिंदुस्थानापेक्षां धान्य नेहमीं महाग मिळत असतांही, त्या देशांतील मजूर सधन असतात व हिंदुस्थानांतील मजुरांस काम मिळूनही, सुबत्तेच्या दिवसांत उपास कंठण्याची पाळी यावी, हें अतिशय विलक्षण आहे. इंग्लंडांत व अमेरिकेंत मजुरांस मजुरी पुष्कळ मिळते. कापसाच्या गिरण्या व लोंकरीच्या विणकामावरील मजुरीचे दर फारच जास्त आहेत. तेथील लोकसंख्या दरसाल बरीच वाढत असते आणि यांत्रिक शक्तीचाही तिकडे पूर्ण स्वैरतेनें उपयोग होत असतां, तिकडे मजुरी जास्त देण्याचें धोरण कारखानदारांस कसें परवडतें, हा एक आपल्या दृष्टीनें मोठा प्रश्न आहे; परंतु तिकडे त्याला फारसें वजन मिळत नाहीं. तिकडील कारखान्यांत हल्लीं काम फार वाढलें आहे. जगावरील मागण्या त्यांच्याकडे इतक्या येत असतात कीं, तें काम करून देण्यास त्या कारखान्यांस सवडच मिळत नसते. तशा मोठ्या पायावर, ह्या देशांत कारखाने स्थापन करून, मजुरदारांना पोटभर खाण्यास मिळेल व त्यांच्या संग्रहास पैसे राहतील, अशी कांहीं तरी योजना होण्याची फार जरूर आहे. हल्लीं या लोकांस मिळणारी मजुरी इतकी थोडी असते कीं, सुकाळाच्या दिवसांतही मजुरी मिळून, त्यांचें पोट भरत नसतें. हिंदुस्थानांतील मजुरांस भरदुष्काळांत, कीं ज्या प्रसंगीं धान्याचे भाव फारच वाढले असतात, अशा दिवसांत दोन किंवा अडीच आणे मजुरी मिळते. सरकारानें जो हा दर ठरविला आहे, त्यापेक्षां खानगी कारखान्यांतील मजुरांस फारच थोडा मुशाहिरा मिळतो. मजुरांना कामाची जरूर असते. कारखानदारांना मजुरांचा फारसा खप नसतो, अशा प्रसंगीं कामाकरितां तयार असलेल्या लोकांवर आपत्ति येऊन पडणें, यांत फारसें आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांत मजुरांची संख्या शेंकडा ८, इंग्लंडांत शेंकडा १५ व फ्रान्सांत शेंकडा १७ आहे. हिंदुस्थानांत गरीब लोकांची संख्या शेंकडा ६५.९ व इंग्लंडांत ३.२ आहे. हिंदुस्थानांतील कारखाने पडत्या स्थितींत हल्लीं आहेत, ती त्यांची स्थिति बदलल्यावांचून, मजुरांना दुष्काळांशीं सामना करण्याची शक्ति येणार नाहीं. मजुरांचा वर्ग इंग्लंड व फ्रा-

न्सापेक्षां हिंदुस्थानांत बराच कमी असतां, त्यांच्या निर्वाहाची या देशास इतकी पंचाईत पडावी व त्यांच्या पोराबाळांना दरसाल उपाशीं रहाण्याचा दुर्योग यावा, हें फारच विलक्षण आहे. ही स्थिति घालविण्याकरितां, फ्रान्सांत व जर्मनींत कारखानदार आणि मजूर यांच्या हितांचा विचार करणाऱ्या स्वतंत्र मंडळ्या आहेत. त्या मंडळ्यांच्या मागण्यांचा तिकडील सरकार विचार करितें; त्याच प्रकारची किंवा त्यापेक्षां जास्त सुधारलेली युक्ति अमलांत आणण्याचा, ह्या देशांत यत्न व्हावयास पाहिजे.

जमीनदारांवर खर्चाचा बोजा बराच वाढत असतो. जवळच्या किंवा उसनवार घेतलेल्या पैशाचा उपयोग जमिनीकडे करण्यास ह्या देशांतील शेतकरी तयार नसतात. शेतकींत केलेल्या सुधारणेचें फळ सारा वाढण्याचे रूपानें सरकाराकडून मिळेल किंवा काय याचें त्यांस मोठें भय असतें. मि० ब्राऊन हे ह्मणतात कीं, "जमीनधारा ठरविण्याची जी पद्धति आहे, तिजमुळें शेतकींत सुधारणा करण्याकडे शेतकऱ्यांच्या मनाचा कल होत नाहीं, व ते शेवटीं दरिद्री होतात." पंजाबांतील मुलकीखात्यांत असा नियम आहे कीं, शेतांत नवीन विहिरी बांधून शेत सुपीक केल्यास, वीस वर्षेंपर्यंत तें सरकार पाण्याचा कर वाढवीत नाहीं. जुन्या विहिरींच्या दुरुस्तीस दहा वर्षांची माफी त्या सरकारानें ठेवली आहे. "शेतांत कायमची विहीर करून, तिचें पाणी ज्या जमिनीस देण्यांत येईल, त्या जमिनीवर सरकारसारा कधींही वाढवूं नये" असें दुष्काळकमिशनानें सरकारास सुचविलें होतें. हा नियम जर अमलांत आला, तर गेल्या तीस वर्षांत पुष्कळ पैसे खर्चून जे कालवे सरकारानें तयार केले, त्यापेक्षां या योजनेनें दुष्काळाच्या दिवसांत हिंदुस्थान जास्त संरक्षित होईल. जमिनीची सुधारणा केल्यास धारा वाढेल, असा शेतकऱ्यांस हल्लीं जो धाक वाटतो, तो क्रम फारच भयप्रद आहे. मि० ब्राऊन हे म्हणतात, कीं, "सर्व हिंदुस्थानास कायमचा जमीनधारा बंगाल इलाख्याप्रमाणें लागू करावा. मात्र असें करितांना आज जे वाढलेले धारे आहेत, त्यांविषयीं पोक्त विचार व्हावा. आपल्या ताब्यांत ज्या अवस्थेंत शेतकरी आले, त्या वेळचे जे धारे असतील, तेच कायम व्हावयास पाहिजेत."

“हिंदुस्थानाच्या वस्तीची स्वाभाविक वृद्धि दरसालास शेंकडा १ टक्यानें होत असते. लागवडींत असलेली जमीन दरमाणशीं एक एकरही पूर्ण नाहीं. हें जमिनीचें प्रमाण दरमाणशीं दरसाल कमीच होत असतें. हल्लीं जे लोक खाऊनपिऊन सुखी आहेत, ते दिवसेंदिवस निर्धन बनत चालले. त्यांच्यांतील निर्धन लोकांस त्यांनींच वांचविलें पाहिजे; असें आपण त्यांस जें सांगतों त्यामुळें, हिंदुस्थानांतील साधारण स्थितीच्या लोकांवर अनाथपोषणाचें जास्त जोखीम येऊन पडतें व ते हळू हळू निर्धन होतात. त्या लोकांना दुसऱ्याचे मदतीवर सरकारानें अवलंबून ठेवूं नये. त्यांच्या अंगांत स्वसंरक्षणाचें सामर्थ्य आपण उत्पन्न केलें पाहिजे. त्यांच्या संपत्तीची वाट केल्यास ती आपल्याच वैभवाची वृद्धि करण्यास कारणीभूत होईल. हिंदुस्थानांतील लोकांची धार्मिक पद्धति फारच खर्चाची आहे. तींत जरा काटकसर करण्यास आपण त्या देशास शिकविलें पाहिजे. सामाजिक कारणांतूनच लग्नकार्यांप्रीत्यर्थ होणाऱ्या अवाढव्य खर्चाचा तिकडे उद्भव झाला. ही पद्धति मोठमोठ्या सधन लोकांस थोड्याच काळांत निर्धन बनविते. दुष्काळास न जुमानतां आपला बचाव करण्यास आपण कसें समर्थ होऊं, तें सरकारानें त्या लोकांस बरोबर शिकविलें पाहिजे.” असें मि० ब्राऊन हे ह्मणतात.

केवळ दैवी शक्तीवर फारसें अवलंबून न राहतां, उद्योगास प्राधान्य दिल्यास, दुष्काळांचीं संकटें कधींही त्रासदायक होणार नाहींत. गहूं, भात, बाजरी वगैरे धान्यांचें बीं सुधारण्याकडे सरकारानें शेतकऱ्यांचें लक्ष वळविलें पाहिजे. भाताचें मूलस्थान ‘हिंदुस्थान’ हें असून, या देशांतून हें धान्य इजिप्त, मादागास्कर, दक्षिण युरोप व अमेरिकेंत गेलें, असा याचा इतिहास सांपडतो. अमेरिकेंत या धान्याचे पिकांत बरीच मोठी सुधारणा झाल्यानें, या भाताच्या (केरोली येथील) तांदुळांस दरहंड्रेटवेटास इंग्लंडांत २० पर्यंत भाव येतो, व त्याच जातीच्या हिंदुस्थानांतील तांदुळांस दरहंड्रेटवेटास ८ चाही भाव तेथें येत नाहीं! शेतांत पिकलेल्या धान्याचें बीं पुन्हां त्याच ठिकाणीं पेरणें, या कृतीनें पीक कमी येतें व तें चांगलें नसतें, असा कृषिकर्मविद्येच्या अभिज्ञाते मंडळ्यांचा अभिप्राय आहे. तसेंच बियांची

नेहमीं तपासणी करून, जें उत्तम असेल तेंच पेरणें, हें जास्त लाभकारक आहे. परदेशांत उत्तम ठरलेले बियांचे नमुने मागवून, त्यांची लागवड केल्यास तें फारच फलद्रूप होईल. शेतीची नांगरणी उत्तम, बीं चांगलें, खत भरपूर व मशागत उत्कृष्ट प्रकारची; इतक्या गोष्टी अनुकूळ असल्यावर, पीक कमी व वाईट आलें असें कधींही होणार नाहीं. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतकीचेंच शिक्षण देण्याची योजना प्रथम अमलांत आली पाहिजे. कोणती जमीन कशी फलद्रूप करावी व तींत कोणतें धान्य कसें लावावें ह्मणजे त्यास चांगलें पीक येईल, तें अनुभवी विद्वानांकडून शेतकीचा धंदा करणाऱ्या लोकांस शिकविण्याची फार जरूर आहे. तसेंच शेतकीच्या हत्यारांचा चांगला उपयोग कसा करावा व त्यांत सुधारणा करण्यासारखी असल्यास ती कशी करावी, हें ज्ञानही शेतकऱ्यांस दिलें पाहिजे. पडित जमिनी लागवडीस कशा आणाव्या हेंही त्या लोकांस काळजीपूर्वक सरकारानें शिकवावें. पदवीधर विद्वान् किंवा नोकर बनविण्याकरितां प्रत्येक गांवीं ज्याप्रमाणें शाळा घातल्या आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक खेड्यांत किंवा कसब्यांत कृषिकर्मविद्येचें अनुभवजन्य ज्ञान देणाऱ्या शाळा स्थापन कराव्या, म्हणजे या देशांतील शेतकी वरिष्ठ प्रकारची ठरण्यास अवधी लागणार नाहीं. हें ज्ञान सरकारानें शेतकऱ्यांच्या मुलांस फुकट द्यावें व इतर लोकांजवळून मात्र कांहीं रक्कम घ्यावी, म्हणजे सरकाराच्या अंगावर खर्चाचें जोखीम फारसें पडणार नाहीं. शेतकऱ्यांचीं मुलें ह्या विद्येचें ज्ञान मिळवून पारंगत झाल्यास, त्याचा पुढील पिढीवर फारच चांगला परिणाम घडेल. मि० ओकोनर हे म्हणतात कीं, " ज्या जमिनीचा कस कमी झाला आहे, तिला तशी होऊं न देतां, पीक कसें वाढवितां येईल, त्या संबंधानें सुधारलेल्या देशांतील सरकार प्रजेस प्रथम ज्ञान देतें. तसें शिक्षण हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना मिळत नाहीं. निरनिराळ्या पिकांचा नमुना तयार करण्याकरितां एक खातें स्थापन झालें आहे; परंतु त्याचा पुढील दोन कारणांनीं उपयोग होत नसतो. या खात्यानें तयार केलेला नमुना साधारण शेतकऱ्यांच्या शक्तीबाहेरचा असतो, व तें खातें जो अनुभव मिळवितें, त्याचा शेतकऱ्यांस उपयोग करून देण्यांत येत नाहीं. कृषिकर्मविद्येंतील निष्णात प्रो० वॉलेस व डॉक्टर

वॉल्कर यांनीं सुचविल्याप्रमाणें, शेतकीस उपयोगीं पडणारें खत किंवा तशा मासल्याचे पदार्थ, हिंदुस्थानांतून बाहेर जाऊं न देतां, अटकावून ठेवले पाहिजेत; परंतु ते अप्रतिबंध व्यापारतत्वामुळें जाण्याचे बंद होत नाहींत. हिंदुस्थानांतील प्रजा दैन्यावस्थेच्या फेऱ्यांत हल्लीं सांपडली आहे; याकरितां या बाबतीचा योग्य विचार करण्याची फार जरूर आहे."

हिंदुस्थानांत पडित जमीन बरीच आहे. ब्रिटिश हिंदुस्थान व एतद्देशीय राज्यें, यांचें एकंदर क्षेत्रफळ ७३,२५,०६,७३४ एकर असून, ब्रिटिश हिंदुस्थानाचें मात्र ५३,७३,४६,०२६ एकर क्षेत्रफळ आहे. सरकारानें राखलेल्या जंगलाकडे गुंतविलेली ६,३९,६९,९५५ एकर जमीन यांतून वजा केल्यास, ४७,३३,७७,०७१ एकर जमीन बाकी राहते. जेथें बिलकूल लागवड होऊं शकणार नाहीं, अशी जमीन ब्रिटिश हिंदुस्थानांत १५,३८,९५,०५६ एकर आहे. इ० स ०१८९६–९७ सालीं १७,७४,५६,९२९ एकर जमीन मात्र लागवडींत आलेली होती. ब्रिटिश हिंदुस्थानांत आणखी एकंदर १४ कोटी एकर जमीन लागवडीस येण्यासारखी आहे. अर्थात एकतृतीयांश जमिनीचाच लोक हल्लीं उपयोग करीत असतात. ही पडित जमीन लागवडीस आणण्याच्या सोई सरकारानें लोकांस करून दिल्यास, या देशाची चांगली अबादी होईल. मुंबई, पंजाब, मध्यप्रांत, मद्रास, आसाम वगैरे बाजूस बरीच पडित जमीन आहे. तिकडे वसाहती करून, सरकारानें लोकांस योग्य सवलती देऊन, त्या जमिनीची लागवड करावी. पडित व जंगली प्रदेशांत वसाहत करविल्यास, या देशांतील उत्पन्न दुप्पट वाढेल; इतकेंच नव्हे, तर, ह्या देशाच्या पूर्ववैभवाचेंही प्रत्यक्षावलोकन ह्या प्रसंगीं होईल. सातपुडा, विंध्याद्रि व सह्याद्रि पर्वताचे कांहीं भाग, या ठिकाणीं अद्यापि बरेच गांव वसूं शकतील अशी जागा आहे; तीही लोकांच्या सवडींचा विचार करून त्यांस द्यावी. मि० ओकोनर हे म्हणतात कीं, "बरीच जमीन लागवड करण्यासारखी आहे; परंतु तिचा उपयोग शेतकऱ्यांस होत नाहीं. ह्या जमिनीवर कोणतेंही पीक उत्तम प्रकारचें होऊं शकेल. शेतकऱ्यांजवळ भरपूर जमीन, शेतकीच्या सर्व सामानाची विपुलता, त्यांस शेतकीचें उत्तम ज्ञान व सरकारदेण्याचाही बोजा बराच कमी; येवढ्या गोष्टींची अनुकूलता

झाल्यास, हिंदुस्थानांतील शेतकी सर्व जगावर अप्रतिम ठरेल; इतकेंच नव्हे, तर, एक दोन किंवा त्यापेक्षांही जास्त वर्षांच्या अनावर्षणापासून लोकांना पीडा होऊं शकणार नाहीं. शाळेंत शिकून तयार झाल्यावर, नोकरी पतकरण्याकडे लोकांचा जो कल झाला आहे, तो बदलण्याकरितां हल्लीं सर्व वर्गांच्या लोकांना एकच प्रकारचें शिक्षण देण्याचा जो क्रम आहे, तो प्रथम बदलून, प्रत्येक धंद्याचें ज्ञान मिळण्याची योजना अमलांत आणण्याचा सरकारानें यत्न करावा. इंग्लंडची सत्ता हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून, ह्या देशास दुसरे बरेच फायदे झाले आहेत. त्याचप्रमाणें ह्या देशाची सांपत्तिक सुधारणा करण्याकडे इंग्लंड पूर्ण लक्ष देईल, तर त्याची सर्व जगावर विशेष ख्याती झाल्यावांचून रहाणार नाहीं."

दरसाल पावसावर अवलंबून रहाणें हल्लीं लोकांस भाग पडतें. ही पद्धति बदलली पाहिजे. कालवे, तलाव, व मोठ्या विहिरी यांच्या पाण्याचा शेतकीकडे उपयोग करितां येईल, अशी तजवीज सरकारानें करावी, म्हणजे पावसाची साधारण कमतरता वाटतांच, लोक त्या पाण्यानें शेतकी करून, जमीन पिकवितील. दुष्काळ पडल्यावर सरकार तलाव, विहिरी वगैरे कामें करवितें; परंतु तीं अगोदरच करून ठेवलीं पाहिजेत. दुष्काळाच्या दिवसांत शेतकीकरितां तलाव किंवा विहिरी खोदण्याचा यत्न करणें, हें कांहीं अंशानें 'संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः?' या न्यायाप्रमाणेंच आहे. पुढील दुष्काळांत या योजनेचा सामान्येंकरून बराच उपयोग होऊं शकेल. ज्या जमिनींस पाण्याची सोय असते, अशा जमिनींबद्दल बागायतीचा जास्त आकार सरकार घेतें व तें पीक तर करण्याचें सामर्थ्य शेतकऱ्यांस नसतें, अशा जमिनी कांहीं ठिकाणीं ओसाड पडल्या आहेत. युरोपांत ज्या जमिनीस पाण्याचा उपयोग होतो, अशा जमिनीवर हिंदुस्थानाप्रमाणें पाण्याचा जास्त आकार बसविलेला नाहीं. कुव्याच्या किंवा विहिरीच्या पाण्याचा शेतकीकडे उपयोग करितांना, शेतकऱ्यांस विशेष खर्चांत पडावें लागतें; परंतु त्याचा विचार न करितां, जमिनींत विहीर आहे येवढ्या सबबीवरच तिचा सारा वाढतो, ही विलक्षण गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शेतकऱ्यांवर पाण्याबद्दल जमिनीचा धारा जास्त बसविला नसता, तर या

देशांतील शेतकीस आज फारच उत्कृष्ट स्वरूप आलें असतें. जमिनीचा धारा ठरवितांना जी पहाणी होते, ती फारच अपूर्ण असल्यामुळें, तिचा शेतकऱ्यांवर वाईट परिणाम घडतो. पावसाचें पाणी मिळून जी जमीन पीक देते, तिजवर सरकारच्या देण्याचा असलेला बोजा उचलण्यास ती शक्तिवान् आहे किंवा नाहीं, याचा विचार जसा व्हावयास पाहिजे तसा तो होत नाहीं. ऐनजिनशी जमीनधारा घेण्याची ज्या वेळीं ह्या देशांत पद्धति होती, त्या समयीं शेतांत उत्पन्न होणाऱ्या धान्याचा सहावा भाग सरकार घेत असे; त्यामुळें शेतकऱ्यांवर सरकारदेण्याचा जास्त बोजा पडत नव्हता. शेतांत जसें पीक येईल, तसेंच सरकारास मिळे. पाण्याचा उपयोग केला ह्मणून जास्त धारा घेण्याच्या बदल्यांत तो उपयोग केल्यानें शेतकऱ्यांस जास्त मेहनत पडली, या सबबीनें सरकार एकंदर उत्पन्नाचा आठवा भाग घेत असे. ईश्वराकडून मिळणारें पावसाचें पाणी, ज्या सालीं शेतकीस भरपूर असतें, त्या समयीं मात्र सरकारास बराच वसूल येत असे. तोच क्रम पुनः अमलांत आणून, शेतकऱ्यांचीं मनें सरकारानें प्रफुल्लित करावीं.

शेतकऱ्यांच्या संग्रहास धान्य व चारा यांचा सांठा भरपूर राहील, अशी सरकाराकडून योजना होण्याची फार जरूर आहे. फाल्गुनचैत्रापासूनच शेतकऱ्यांना सावकारांच्या घरीं जाऊन, कर्जाऊ धान्य आणण्याचा किंवा झाडपाल्यावर निर्वाह करण्याचा अलिकडे जो प्रसंग येतो, तो फारच घातक आहे. एक दोन वर्षांचें खुराकी सामान गांवांतील प्रत्येक मनुष्याच्या संग्रहास असल्यास, पावसाच्या कमतरतेमुळें हल्लीं जो वाईट परिणाम घडतो, तो घडूं शकणार नाहीं. प्रत्येक गांवीं पूर्वींप्रमाणें धान्याचीं पेंवें व गवताच्या गंजी, भावी आपत्तीकरितां लोकांकडून सरकारानें राखून ठेवाव्या. हल्लीं शेतकरी व इतर लोक अतिशय निर्धन झाल्यामुळें, त्यांच्याजवळ आपत्कालीं उपयोगास येण्यासारखी संपत्ति शिल्लक रहात नाहीं. 'आजचा दिवस जेमतेम गेला, उद्यांचा कसा जाईल' अशी ज्या लोकांना वारंवार चिंता पडते, त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारल्यावांचून, त्यांचा दुष्काळांपासून कायमचा बचाव होणें अशक्य आहे. निरुद्योगी लोकांस धंद्यास लावून, त्यांना सधन करणें व उद्योगांतील लोकांजवळून आपत्कालीं उपयोगास

येईल अशी शिल्लक ठेवण्याचा यत्न करणें, हें देशांत शांतता ठेवणाऱ्या सरकारचें सुधारलेल्या राज्यपद्धतीप्रमाणें एक कर्तव्यच आहे. प्रजा निर्धन झाल्यास गुन्ह्यांची संख्या वाढते व सरकारास पुढें मोठ्या खर्चीत यावें लागतें; याकरितां सरकारानें अगोदरच सावधगिरी बाळगावी, हें जास्त श्रेयस्कर आहे. दुष्काळ पडल्यावर लोकांस काम देण्याकरितां सरकार ज्या मोटमोठ्या रकमा काढतें व मोठ्या खर्चाच्या पेंचांत तें एकदम सांपडतें, त्यापेक्षां दरसाल थोडथोड्या रकमेचा उपयोग दुष्काळांस प्रतिबंध करण्याकडे झाल्यास, दुष्काळांचें संकट पुढें असह्य न होतां, सरकाराच्या मदतीची अपेक्षा लोकांस रहाणार नाहीं. दुष्काळाच्या दिवसांत शेतकऱ्यांच्या निभावणीसाठीं सरकार तगाई देतें. तें एक जबरदस्त कर्जच असतें; परंतु अतिशय मोठें संकट येऊन पडल्यामुळें तें कर्ज घेऊन शेतकरी आपली निभावणी करितात. हें कर्ज सुकाळांत परत द्यावयाचें असल्यानें, चांगला पाऊस पडून धान्य पिकल्यावर, शेतकरी या सरकारदेण्यानें जास्त जेरीस येतात. सरकारानें आपत्कालीं दिलेल्या मदतीची फेड, चालू सरकारधारा व सावकारांचें इतर देणें; यांतून पार पडल्यावांचून शेतकऱ्यांस सुटका नसते. ह्या स्थितीमुळें सुकाळांतही त्यांस हटकून उपासमार पडतो.

हिंदुस्थानांत मोठमोठ्या नद्या बऱ्याच आहेत. त्यांचें पाणी दरसाल समुद्रास जाऊन मिळतें. या पाण्याचा शेतकीकडे उपयोग व्हावा, अशा हेतूनें सरकारानें तें पाणी आडवून, त्याचे पाट काढावे व त्या पाण्याचा उपयोग शेतकऱ्यांस यथेष्ट करूं द्यावा. डोंगरावर पडणारें पावसाचें पाणी त्याच्या तळाशीं तुंबवून ठेवल्यानें, अनावर्षणांच्या व इतर प्रसंगीं त्याचा शेतकीस चांगला उपयोग होऊं शकेल. चार महिन्यांनीं किंवा तीन महिन्यांनीं जीं धान्यें पिकतात, अशा धान्यांचीं दरसाल तीनचार पिकें शेतकऱ्यांना काढतां आल्यास, सरकारचें उत्पन्न वाढून लोकही बरेच सधन होतील. ब्रह्मदेश व बंगाल्यांत जसा तांदूळ पिकतो, त्याच प्रकारचा इतर ठिकाणींही तो पिकूं शकेल; मात्र तो पिकण्याची सोय सरकारानें उदार दिलानें करून दिली पाहिजे. निर्वाहास योग्य व थोड्या मुदतींत पिकणारीं धान्यें, यांची लागवड जितकी जास्त होईल तितकें चांगलें. रेल्वे तयार करण्यापेक्षां

कालवे काढल्यानें धान्य बरेंच पिकून, ह्या देशांतील व्यापारही वाढेल. सर्व देशांतील अबादीची वाढ करण्यास कालव्यांचा इलाज विशेष कारणीभूत झाल्याचें आढळून येतें. कालवे शेतकीस ज्याप्रमाणें पाणी पुरवितात, त्याचप्रमाणें ह्यांतून व्यापाराचेंही दळणवळण विशेष वाढतें. युरोपांत व अमेरिकेंत हे दोन्ही उपयोग करून घेत असतात. त्या देशांत रेल्वेपेक्षां कालवे बांधण्याचा प्रघातच विशेष श्रेष्ठ मानितात. कालव्यांचा उपयोग शेतकी व व्यापाराकडे तिकडे होतो. जर्मनींत असा नियम आहे कीं, जास्त वजनाचें सामान रेल्वेनें पाठविल्यास खर्च विशेष होतो, याकरितां असें सामान होड्यांत घालून कालव्यांतून पाठवावें. मालाची नेआण करण्याचें काम आगगाडी व कालवे या दोन मार्गांनीं तिकडे होत असतें. अतिवृष्टि व अनावर्षण या दोन संकटांपासून हा उपाय लोकांचा पूर्ण बचाव करितो. रेल्वेनें असा बचाव होऊं शकत नाहीं. ज्या भागांत दुष्काळ किंवा लढाई चालू असेल, तेथील लोकांच्या निर्वाहक गरजा मात्र रेल्वे भागवूं शकतात. नद्यांचें पाणी ह्या देशांतील शेतकीकडे खेळविल्यास, देश सुपीक होऊन, हिंदुस्थानाचें हवामानही बरेंच बदलेल. उष्णताजन्य रोग कमी होतील व शीतरोग कदाचित् वाढतील; यापेक्षां जास्त अपाय घडूं शकणार नाहीं. देशांत धान्याचा भरपूर सांठा होऊन, लोकांस पोटभर खाण्यास अन्न मिळाल्यास, लोकांचें आरोग्य सुधारेल व हवेपासून जडणाऱ्या विकारांचा जोर फारसा चालूं शकणार नाहीं. नद्यांना महापूर येऊन जी हानि होत असते, ती कालव्यांच्या व्यवस्थेनें एकदम बंद पडेल. सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या ताब्यांत आलेल्या कोणत्याही इतर देशांत, अतिवृष्टी किंवा अनावर्षणांचा वाईट परिणाम लोकांस भोगावा लागत नाहीं. याचें कारण त्या देशांतील सरकार, तिकडील नद्यांच्या पाण्याचा चांगला उपयोग करितें हेंच होय. लार्ड क्रोमर यांनीं इजिप्तांतील राज्यकारभाराचा इ० सन १८९९ सालचा जो रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे, त्याजवरून हिंदुस्थान–सरकार व प्रजा यांना बरेंच शिकतां येईल. या देशांतील शेतकीचा मुख्य आधार जसा पावसावर आहे, त्याचप्रमाणें नील नदीस येणाऱ्या पुरावर इजिप्तांतील शेतकी अवलंबून असते. इ० स० १८९८ सालीं नील नदीस बरोबर

पूर आला नाहीं, त्यामुळें तिकडे दुष्काळ पडण्याचा संभव होता; परंतु तो देश सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं असल्याकारणानें, तिकडे दुष्काळ पडला नाहीं व दुष्काळनिवारणाकरितां एक पैसाही त्या सरकारास खर्च करावा लागला नाहीं. तसेंच सरकाराचा वसूलही या वर्षी बाकी न राहतां, सरकाराच्या खजिन्यांत या सालीं बरीच शिल्लक राहिली. दुष्काळाच्या संकटांत टिकाव धरण्याची शक्ति, इजिप्तांतील शेतकऱ्यांच्या अंगीं तेथील सरकारानें आणली आहे. नील नदीस पूर न आल्यास दुष्काळ पडेल, याकरितां त्या सरकारानें पाण्याच्या विस्तीर्ण टांक्या बांधून, त्या पाण्याचा दुष्काळाच्या दिवसांत शेतकीकडे उपयोग करण्याचें धोरण कायम केलें आहे. या योजनेनें तिकडे धान्याचें पीक दरसालपेक्षां या दुष्काळांत विशेष आलें व सरकाराचें उत्पन्नही बरेंच वाढलें. हीच पद्धत हिंदुस्थानांत चालू असती, तर तिचा बराच चांगला परिणाम घडला असता. या देशांत कांहीं ठिकाणीं सरकारानें कालवे काढले आहेत; परंतु त्यांच्या पाण्याचा उपयोग करणारांवर खर्चाची जबाबदारी असल्यामुळें, शेतकींत जी सुधारणा व्हावयास पाहिजे; ती करण्याकडे शेतकऱ्यांची प्रवृत्ति होत नाहीं. तसेंच कालव्यांचें पाणी आजूबाजूस मुरतें व जमिनीच्या गर्भांतील क्षार एकदम वर येऊन जमीन निरुपयोगी बनत असते. पंजाबांत हा क्षार इतका निघतो कीं, त्यामुळें तिकडे बरीच जमीन ओसाड पडली आहे. या पडित जमिनीचाही बागायतीप्रमाणें तिकडील शेतकरी सरकारास सारा देत असतात, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हा क्षार बाहेर न येतां तो जमिनींतच राहील, अशी तजवीज करण्याकरितां सरकारानें विशेष झटलें पाहिजे. गुजराथेंतील कांहीं ठिकाणीं जमिनींत क्षारवाहक धर्म जास्त असल्यामुळें, त्यांतून दरपावसाळ्यांत बराच क्षार बाहेर येतो. अर्थात अशा ठिकाणीं कोणत्याही धान्याचें पीक बरोबर येऊं शकत नाहीं. हा दोष काढून टाकून, ती जमीन जर लागवडीस आणली, तर बऱ्याच लोकांचें पोषण करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं येईल. सिंध व काश्मीरांत नदीच्या पुरानें शेतकी होत असते, त्याचप्रमाणें ती गुजराथेंतही होऊं शकेल. मारवाड हा अतिशय खराब स्थितींतील देश जरी

म्हणविला जातो, तरी त्या देशांत इतर ठिकाणचें पाणी कालव्यानें नेल्यास, तिकडील जमीन सुपीक होऊन पाण्याचेंही दुर्भिक्ष नष्ट होईल. तसेंच झाडांची लागवड तिकडे होऊं शकेल. हल्लीं पावसाचें सर्व पाणी नद्यांच्या द्वारें व्यर्थ जातें, त्याचा उपयोग करून घेण्याचा यत्न केल्यास, या देशांतील शेतकी वरिष्ठ प्रतीस जाऊन पोंचेल व 'दुष्काळ' ह्या शब्दापासून मनावर जो भयाचा संस्कार घडतो, तो पुढें घडूं शकणार नाहीं. सरकाराचे व्यापारी खात्याचे मुख्य, हे आपल्या जबाबांत म्हणतात कीं, "ज्या जमिनीवर हल्लीं धान्य पेरतात, तिला पाण्याचा पुरवठा करण्याचीं साधनें अनुकूळ करून दिल्यास व शेतकऱ्यांना त्यांचे धंद्याचें ज्ञान देऊन त्यांत त्यांना पारंगत केल्यास, हिंदुस्थानांतील जमीन विशेष फलदायक होईल."

या देशांतील लोकांच्या गृहस्थितीचा विचार करून, त्यांना सधन बनविण्यासाठीं, सरकाराकडून व लोकनायकांच्या द्वारें अनेक यत्न व्हावयास पाहिजेत. प्रत्येक गांव कसा अबाद होईल व लोकांचें वार्षिक उत्पन्न कसें वाढेल, त्याचा चांगला विचार होऊन, प्रत्येक ठिकाणीं निरनिराळी योजना अनुकूलतेप्रमाणें अमलांत आणणें इष्ट आहे. लोकांच्या गरजा शोधून काढून, त्या काळजीपूर्वक दूर करणाऱ्या मंडळ्याही ठिकठिकाणीं स्थापन व्हावयास पाहिजेत. प्रत्येक कुटुंबाची गृहस्थिति तपासून, तिजवरून त्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठीं, सरकारानेंही झटण्याची आवश्यकता आहे. प्रोफेसर ए. एफ्. म्युरिसन हे म्हणतात कीं, "पूर्वीं या देशांतील लोकांजवळ निर्वाह–विषयक साधन भरपूर असे. त्याचप्रमाणें तें ह्या राज्यांतही लोकांजवळ आणून देणें, हाच दुष्काळाचें संकट कमी करण्याचा रामबाण उपाय होय. शेतकरी व इतर लोकांजवळ धान्याचा भरपूर सांठा असावयास पाहिजे. हा धान्यसंग्रह सरकारानें आपण होऊन उदार दिलानें, योजना केल्यावांचून होणें शक्य नाहीं. ही योजना करण्यापूर्वीं शेतकऱ्यांना बऱ्याच मोठ्या जमीनधाऱ्याची सुबत्तेच्या दिवसांत सूट दिली पाहिजे. सरकारानें शेतकऱ्यांजवळ निर्वाहविषयक साधन भरपूर ठेवावें. जंगलें राखून पुनः झाडांची लागवड होईल, तर खात्रीनें हिंदुस्थानांत थोड्याच काळांत नियमित वृष्टि होऊन, पाऊस पडला नाहीं म्हणून दुष्काळ आला, ही

सबब निघून जाईल." इतर देशांतील शेतकऱ्यांजवळ धान्याचा संग्रह त्यांच्या खपापेक्षां जास्त असतो. त्यामुळें वाईट दिवसांतून ते निभावून जातात. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत पद्धति अमलांत आल्यास, इकडील लोकांसही दुष्काळाचे दिवस असह्य होणार नाहींत. हिंदुस्थानांत धान्य फार पिकतें आणि त्या धान्यावर ह्या व इतर देशांचा निर्वाह चालतो. असें असतां एखाद्या अवर्षणांतच हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची इतकी त्रेधा कां उडावी, याचा विचार होणें इष्ट आहे. ज्या वर्षी चांगलें पीक येईल, अशा वर्षी धान्याची पूर्ण किंवा अर्धी सूट सरकारानें शेतकऱ्यांस द्यावी व सावकारांच्या व्याजाचा बोजा कांहीं अंशीं कमी करावा, म्हणजे शेतकऱ्यांस बराच तकवा येईल; असें कांहीं पाश्चात्य विद्वानांचें मत आहे.

धान्यांस होणारे अनेक जातींचे रोग, टोळ, उंदीर व खेंकडे वगैरे प्राणी यांच्या उपद्रवापासून शेतांत तयार होणाऱ्या धान्याची फार खराबी होते व शेवटीं दुष्काळ पडतो. पाऊस बेताचा जरी पडला, तरी पूर्वोक्त सांथींचे रोग व इतर प्राणी यांपासून शेतकऱ्यांना शेवटीं सरकारधारा भरण्याइतकेंही सामर्थ्य रहात नाहीं. मृगनक्षत्राचा पाऊस मेघगर्जनेवांचून झाल्यास अनेक जंतु उत्पन्न होतात व हस्ताचा पर्जन्य मेघगर्जनेसह झाल्यास त्यांचा नाश होतो, अशी ह्या देशांतील लोकांची समजूत आहे. मृग व हस्त ह्या दोन नक्षत्रांचा पर्जन्य गर्जना न होतां पडल्यास, पूर्वोक्त प्रकारचे उपसर्ग शेतकीस लागत असतात. ते पुढें लागूं नयेत, याकरितां शेतकरी व सरकार यांनीं योग्य प्रसंगीं उपाय योजण्यास विलंब लावूं नये. शेणाच्या राखेचे अंगीं झाडांवर पडणाऱ्या किडी मारण्याची शक्ति असल्यानें, तिचा उपयोग कांहीं ठिकाणचे शेतकरी करीत असतात. चिनांत टोळधाड येऊन धान्यावर पडूं नये ह्मणून, तैलमिश्र पाणी शेतांतील धान्यावर शिंपितात व अमेरिकेकडे टोळधाड येतांच मोठा धूर शेतांच्या आजूबाजूस करून, त्या संकटास प्रतिकार करितात. उंदरांपासूनही कित्येक दुष्काळ कच्छ व काठ्यावाडांत पडले होते. टोळधाड आल्यास ते मारून टाकण्याचा ह्या देशांतील सरकाराकडून प्रयत्न होत असतो; परंतु त्यापासून चांगला फायदा झाल्याचें आढळून येत नाहीं. टोळधाड येत असतां सर्व आकाश आच्छा-

दित होतें व ते ज्या झाडांवर बसतात, तीं झाडें निष्पर्ण होतात अथवा मोडूनही जातात. इतकेंच नव्हे, तर शेतांत धान्याचा एक दाणाही राहूं शकत नाहीं. हें संकट फारच भयंकर आहे. धान्य पिकण्याच्या तयारींत असतां हें संकट बहुधा येतें; त्यामुळें शेतकऱ्यांना विशेष दुःख होतें. हें दुःख टाळण्याकरितां वैद्यक व रसायनशास्त्रविषयक विद्येच्या साहाय्यानें यत्न व्हावयास पाहिजेत. शेतांत खेंकडे उत्पन्न झाल्यानेंही कित्येक जमिनींत धान्य पिकत नाहीं. खेंकड्यांनीं अनेक ठिकाणच्या भातजमिनींची दरसाल कांहीं ठिकाणीं फार खराबी होत असते. शेताचे बांधही त्यांमुळें फुटतात. अर्थात् धान्य न पिकल्यानें शेतकऱ्यांची मेहनत फुकट जाते व त्यांच्या अंगावर सरकारधान्याची पूर्ण जबाबदारी येऊन पडते. अशीं उदाहरणें डोंगराच्या पायथ्याशीं व नदीच्या कांठीं असलेल्या जमिनींत विशेष घडतात. ह्या जमिनीवर सरकारसाराही इतर ठिकाणांपेक्षां बहुधा जास्त असतो. अशी जमीन बरीच खोदून, खेंकड्यांचा नाश करण्याचा पर्जन्यकाळ लागण्याच्या आरंभास दरसाल यत्न व्हावयास पाहिजे. या खेंकड्यांनीं खाऊन टाकल्यामुळें कांहीं ठिकाणच्या जमिनींतून शेतकऱ्यांस धान्याचा एक दाणाही मिळत नसतो. याकरितां अशा जमिनीवरचा धारा कमी करून, ती जमीन सुपीक बनविण्याकरितां सरकारानें झटावें हेंच उचित आहे.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना वायुचक्रशास्त्राचा उपयोग करून घेण्याची माहिती नसते, त्यामुळें त्यांच्याकडून शेतकीच्या कामांत बऱ्याच मोठ्या चुका होतात. शेतकऱ्यांस ऋतूंचे फेरफार व हवेंतील शीतोष्णतेचें मान समजूं लागल्यानें, ते पिकांचा ऋतुविकारापासून बचाव करूं शकतील. मुंबई इलाख्यांत सामान्यतः जून महिन्याच्या १० व्या तारखेपासून पावसाळ्यास आरंभ होतो, अशी समजूत आहे. या मोसमींत पडणारा पाऊस नैर्ऋत्य दिशेनें वहाणाऱ्या वायूनें सुरू होतो. तसें न होतां वातावरणांत झालेल्या इतर फेरफारानें पाऊस सुरू झाला असतां पेरण्या केल्यास, त्याचा उपयोग होत नाहीं. कित्येक पिकें हवेच्या विवक्षित मोसमींतच होत असतात. अमुक महिन्यांत अमुक ऋतु लागतो, या समजुतीनें शेतकऱ्यांचे सर्व श्रम फुकट जातात. ग्रेटब्रिटनांत धान्याचे पेरणीस ६५ अंशांपर्यंत

व धान्य पिकण्यास ७० अंशांपावेतों उष्णता लागते. अशा वेळेस ती कमी पडल्यास, तिकडील शेतकरी ती खोट यंत्रांच्या साहाय्यानें भरून काढतात. फ्रान्सांत ज्या समयीं ज्यास्त थंडी पडते, त्या वेळीं द्राक्षवल्लींचें संरक्षण करण्याकरितां ज्या बाजूनें वारा वाहतो, त्या दिशेस अग्नि प्रदीप्त करून धूर करितात. हा धूर वाऱ्याचे जोरानें शेतांवर पसरतो व थंडी कमी होते. युनायटेडस्टेटस् व पेरूमध्येंही हाच उपाय योजीत असतात. इंग्लंडांत अशा वेळीं शेतावर जाळें अंथरतात. हा तिकडे जो उपयोग होतो, तें वायुचक्रशास्त्रवेत्त्यांच्या सूचनांचेंच फळ होय. तसा इकडील शेतकऱ्यांस करितां यावा, यासाठीं ह्या विद्येचें संपूर्ण ज्ञान त्यांस प्राप्त करून दिलें पाहिजे. या कृतीनें या देशांतील शेतकीची चांगली उन्नति होईल. कर्नल डेविसन हे ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांत उत्तम शेतकी करावयाची असेल व शेतीच्या उत्पन्नापासून दुष्काळांतील विपत्ति टाळावयाची असेल तर, शेतकरी लोकांस सुशिक्षित बनवून सुधारावें. ते सुधारलेल्या हत्यारांचा उपयोग करूं शकतील, येवढ्याकरितां सरकारानें उद्योगशाळा उघडून, कारखाने स्थापून त्यांत गाड्या व शेतकीचीं हत्यारें तयार करण्यास त्यांना शिकवावें. त्यांचे मुलांस लहानपणापासून योग्य शिक्षण द्यावें. शेतकऱ्यांकडून जो कर वसूल करण्यांत येतो, त्यांतून थोडा भाग चांगले रस्ते तयार करण्याकडे खर्चावा. शेतकरी चांगलें पीक उत्पन्न करतील व स्वतःचीं ढोरें चांगले स्थितींत ठेवतील, याकरितां त्यांच्यांत चढाओढ करवून, उत्तम ठरतील त्यांस चांगलीं इनामें द्यावीत."

राज्यांतील प्रत्येक कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न, त्याचे वार्षिक खर्च, व कर्जाचा बोजा त्याच्यावर किती आहे, त्याचा तपास करून त्या कुटुंबाची सुधारणा करण्याचे यत्न सरकाराकडून व्हावयास पाहिजेत. कित्येक सामाजिक किंवा धार्मिक खर्च कमी करण्यासंबंधानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींत बरीच चळवळ चालू आहे; परंतु तिचा ह्मणण्यासारखा उपयोग होऊं शकत नाहीं. त्याचें कारण समाजास आकलन करण्याची शक्ति त्यांच्यांतील धूरिणांत उरली नाहीं हेंच होय. ही आकलनशक्ति त्यांच्यांत उत्पन्न व्हावी किंवा त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावी या हेतूनें, लोकांच्या नैमि-

त्तिक खर्चावर समाजानें बराच मोठा दाब ठेवावा. जीं संपत्तिमान् कुटुंबें अवाढव्य खर्चाच्या भारानें दबून शेवटीं निर्धन होतात, त्यांचा या दाबापासून चांगला बचाव होईल. हा दाब लोकांवर ठेवल्यानें कित्येक धार्मिक खर्चेही ओघानेंच कमी होतील व धर्मद्वारें भिक्षा मागणाऱ्या लोकांची संख्या कमी झाल्यावांचून रहाणार नाहीं. धार्मिक संस्थांना सरकारानें व लोकनायकांनीं निराळें वळण लावून, त्यांना उदात्त विचारांच्या राष्ट्रीय शिक्षणाची दिशा दाखवावी. या धर्मसंस्थेच्या किंवा देवमंदिरांच्या चालकांनीं आणि त्यांच्या शिष्यवर्गांनीं, भिक्षा मागून किंवा धर्मादायार्थ पैसा जमवून, त्या पैशाचा विनियोग दुष्काळांस प्रतिबंध करण्याकडे करावा. गाई व बैल यांचें संगोपन या धर्मसंस्थेकडून करवून, धार्मिक संस्थेच्या खर्चाकरितां शेतकी तयार करवावी, व त्या शेतांतून निघणारें उत्पन्न इतर बाबतींकडे खर्च न करितां, तें दुष्काळाचें संकट टाळण्याकरितां राखून ठेवावें. या उत्पन्नांवर सरकार व लोकांचे पुढारी यांनीं चांगली देखरेख ठेवावी. तसेंच ह्या उत्पन्नाची वाढ करण्याकरितां जितके प्रयत्न करण्याची जरूर वाटेल तितके करावे. ख्रिस्ती धर्मगुरु अशा कामाकरितां ज्याप्रमाणें पैसा जमा करून ठेवतात, त्याचप्रमाणें आमच्या धर्मांतील प्रमुख ह्मणविणारांनीं, संकटकाळीं योग्य मदत होण्याकरितां, दूरदृष्टिपूर्वक योजना अगोदरच करून ठेवावी. या संस्थांकडून अनाथ लोकांचें संरक्षण करवून, त्या लोकांच्या हातून त्या धर्मसंस्थेचें इतर काम घ्यावें. निरुद्योगी व उनाड लोकांस योग्य मार्गास लावण्यास हेंच साधन फार उपयोगीं पडेल.

# भाग सातवा.

## दुष्काळांचें तात्कालिक निवारण.

मागें सांगितल्याप्रमाणें, रोग होऊं न देण्याकरितां यत्न करणें हा वरिष्ठ प्रकारचा व तो झाल्यावर त्याचें निवारण करणें हा दुसऱ्या प्रतीचा यत्न होय. पावसाची साधारण कमतरता वाटतांच 'दुष्काळ पडणार' या समजुतीनें, प्रजेच्या संरक्षणाकरितां सरकार व लोक यांच्याकडून, दुष्काळशामक यत्न व्हावयास पाहिजेत. थोडासा आजार होतांच औषधाची योजना करणें हें जसें प्रशस्त, त्याप्रमाणें या दुष्काळाचेंही आहे. पावसाची साधारण कमतरता होतांच, धान्याचे भाव थोडथोडे वाढत जातात; अशा प्रसंगीं खरोखर उपासमार कोणास होतो, तें शोधून काढून, त्या लोकांच्या निर्वाहाची योग्य व्यवस्था लावणें हें आद्यकर्तव्य होय. अशा प्रसंगीं प्रत्येक गांवच्या पुढाऱ्यांनीं, आपल्या गांवांतील दीन लोकांसंबंधानें योग्य वेळीं सरकारास खरी हकीकत कळविण्यास आळस करूं नये. 'सरकारास जरूर असेल तर सरकार पाहिजे ती सोय करील.' ही समजूत अगदीं चुकीची आहे. आपल्या लोकांच्या दीन स्थितीची सरकारास प्रत्येक वेळेस योग्य माहिती देणें व आपल्या देशबांधवांवर येणाऱ्या आपत्तीचें निवारण करणें, हें प्रत्येक गांवच्या सुशिक्षित लोकांचें कर्तव्यकर्मच आहे. अशा कामासाठीं सार्वजनिक हिताच्या सभाही ठिकठिकाणीं स्थापन व्हावयास पाहिजेत. त्या सभांनीं आपले प्रतिनिधि सर्व ठिकाणीं पाठवून, खरी हकीकत मिळवावी व ती सरकाराच्या नजरेस आणावी. या संस्थांपासून सरकारास पुढें चांगली मदत होऊं लागल्यास, याचा सरकारी नोकरही उपयोग करून घेतील. ह्या संस्थांनीं आपलें काम मोठ्या इमानानें व काळजीपूर्वक मात्र केलें पाहिजे. सरकाराचे नोकर आपलें महत्व वाढविण्याकरितां सरकारास जी माहिती कळवितात, तींत सत्याचा फारच थोडा अंश असतो, अशी कांहीं इंग्लिश मुत्सद्यांची समजूत आहे. ती खोटी नाहीं. चार्लस ब्लेयर हे म्हणतात कीं, "सरकारास मिळणारी माहिती एकपक्षीच असते; याकरितां सार्वजनिकहितार्थ झटणाऱ्या लोकांनीं, दुसऱ्या बाजूची साग्र माहिती मिळवून, ती सरकारापुढें मांडल्यास, सरकाराचें लक्ष लोकांच्या दुःखांकडे वळल्यावांचून राहणार नाहीं. फक्त ऐकींव माहितीवर भिस्त ठेवून,

प्रजाहितार्थ झटणाऱ्या वर्तमानपत्रांत ज्या हकिकती प्रसिद्ध होतात, त्यांस खोट्या ठरविण्याचा यत्न होणें किंवा त्यांत अतिशयोक्तीचा भाग बराच आहे असें सरकाराकडून त्यांस दूषण मिळणें, ह्यायोगें सरकारी नोकरांना एके प्रकारची फूसच दिली जाते; तो क्रम बदलण्यासाठीं ह्या देशांतील सुशिक्षित लोकांनीं फार जपलें पाहिजे. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणारी माहिती विश्वासपात्र असावी व तिला सरकारानें वजन देण्याचा निश्चय करावा." लोकपक्षानें मिळविलेली माहिती खरी मानावी किंवा सरकारास मिळालेली हकीकत खरी मानावी, याचा निर्णय करितांना सरकार लोकपक्षाच्या माहितीस वजन देईल, अशा दर्जास आमच्या सार्वजनिकहितार्थ झटणाऱ्या संस्था आल्या पाहिजेत. या संस्थांचा हेतु सरकारास मदत करण्याचा असल्यानें, सरकाराच्या मनांत विपरित भाव येण्याचा संभव बिलकूल रहाणार नाहीं. सरकार दुष्काळाच्या प्रसंगीं प्रजेचे प्राण वांचविण्याकरितां जसें झटतें, त्याचप्रमाणें सार्वजनिकहितासाठीं इतर लोकांनींही यत्न करण्याची अवश्यकता आहे. देशावर येणाऱ्या आपत्तींशीं टक्कर देण्याकरितां ह्या संस्थांनीं मोठ्या रकमा अगोदरच जमवून ठेवाव्या. असें केल्यानें आपत्तीच्या प्रसंगीं त्यांचा चांगला उपयोग होऊं शकेल. ह्या व्यवस्थेकरितां सावकार, धनाढ्य व इतर धंदेवाईक लोकांनीं दरसाल अमुक रक्कम या संस्थेस दिलीच पाहिजे असें ठरवून, प्रत्येक इलाख्यांतील लोकांसाठीं निरनिराळ्या संस्था स्थापन कराव्यात. या संस्थांकडून दरसाल लोकस्थितीची माहिती मुख्य संस्थेस कळावी, याकरितां प्रत्येक कसब्यांत किंवा तालुक्यांत तिचे प्रतिनिधि असावेत. त्यांनीं दरआठवड्यास ही माहिती मुख्य संस्थेकडे पाठवावी. दुष्काळ आहे किंवा नाहीं, हें ठरविण्यांत सरकाराचे बरेच दिवस आरंभीं जात असतात, तसें या कृतीनें बिलकूल होणार नाहीं. सरकारास खरी स्थिति लवकर कळेल व सरकाराचा आश्रय मिळेपर्यंत, या संस्थेकडून लोकांचे प्राण वांचले जातील. हल्लीं दुष्काळ ठरेपर्यंत लोकांस उपासमार काढावे लागतात, तो प्रकार पुढें घडणार नाहीं. सरकारावर राज्यकारभाराचें बरेंच काम असल्यानें, योग्य वेळीं प्रजेच्या सद्यःस्थितीकडे लक्ष देण्यास सवड होत नाहीं. अर्थात् त्यामुळें मनुष्यें व जनावरें यांना त्रास होणें यांत फारसें नवल नाहीं. सरकाराकडून

मदतीचीं कामें सुरू होईंपर्यंत लोकांची जी दशा होते, ती फारच भयंकर असते. अन्नावांचून तुटलेले हे लोक, पुढें सरकारानें दुष्काळशमनार्थ सुरू केलेल्या कामांवर जाऊन दाखल होतांच, श्रमातिरेक होऊन व खाण्यास भरपूर मिळाल्यानें, एकदम मृत्युमुखीं पडतात. ही भयंकर स्थिति प्रत्येक गांवांतील सुशिक्षित व धनाढ्य लोकांनीं टाळून, लोकांस वांचविण्याचें श्रेय प्रथम घेतलें पाहिजे. ज्यांना बिलकूल उद्योगधंदा नसल्यामुळें उपासमार होत असेल, अशा लोकांकरितां सरकारानें त्या गांवाची अबादी करण्यासाठीं, कायमचीं लहान लहान कामें नेहमीं चालू ठेवावीं. मजूर जोंपर्यंत मिळतील तोंपावेतों तें काम चालवावें व मजूर कामावर येतनासे होतांच तें बंद करावें. असें केल्यानें दुष्काळाच्या आरंभास लोक अन्नाच्या कमतरतेमुळें अशक्त होत असतात, ते तसे होणार नाहींत.

पावसाची साधारण कमतरता पडतांच, ह्या देशांतील व्यापारी धान्याचे भाव एकदम वाढवीत असतात. धान्याची खोट असेल किंवा बाहेरून धान्य वेळेवर येऊनं पोंचण्याचें साधन अनुकूळ नसेल, अशा प्रसंगीं ते भाव वाढण्याचा जास्त संभव असतो. थोड्या धान्यावर जास्त दिवस काढण्याचा ज्या वेळीं विचार उद्भवतो, त्या प्रसंगीं तें धान्य पुरविण्याकरितां त्याची किंमत वाढवावी लागते; परंतु तशा विचारांचा मागमूसही नसून, इतर ठिकाणांहून धान्य येण्याची मोकळीक असतां, धान्याचे भाव वाढल्यानें लोकांच्या मनावर फारच वाईट संस्कार घडतो. धान्याची व इतर पदार्थांची खोट भरून काढण्यासाठीं, आगगाडीचा ज्या देशांत चांगला उपयोग होतो, तेथें धान्याच्या भावास एक दोन पाऊस न पडल्यानें तेजी येणें, हें अर्थशास्त्राच्या विरुद्ध आहे. हिंदुस्थानांतील धान्याचे व्यापारी अनुभवजन्य ज्योतिषशास्त्रावर भरंवसा ठेवणारे असल्यानें, त्यांच्याकडून कांहीं प्रसंगीं स्वार्थाची परिसीमा होते व साधारण मध्यम स्थितीच्या लोकांतूनही धान्य खरेदी करण्याची शक्ति निघून जाते. ज्यांच्याजवळ भरपूर पैसे असतात, असे लोक अन्यायानें पैसे मिळविण्याच्या हेतूनें, धान्याचे सट्टे करून मनास वाटेल तसा भाव ठरवितात. अर्थात् त्यांची ही कृति दुष्काळाचे संकटास वृद्धिकारक होते. कांहीं धनाढ्य लोक महर्गतेचा आपणांवर संस्कार

घडूं नये, या हेतूनें धान्याचा सांठा करितात. दुष्काळाच्या आरंभास धान्याच्या मागण्या जास्त व पुरवठा साधारण कमी अशी स्थिति येतांच, भाव एकदम वाढतात व ते भरदुष्काळांत तर पुरवठा जास्त आणि मागण्या कमी, असा उलट प्रकार असतांही, हिंदुस्थानांतील स्वार्थी व्यापारी धान्याचे भाव वाढविण्यास भीत नाहींत. अशा प्रसंगीं सरकार व सुशिक्षित लोक यांनीं आपला दाब धान्याच्या व्यापाऱ्यांवर ठेवला पाहिजे. तो न ठेवल्यास मध्यम स्थितीचे लोकही थोड्याच वेळांत निर्धन बनून, ते दुष्काळाच्या पूर्ण तडाक्यांत सांपडतात. मजुरीवर निर्वाह करणाऱ्यांचे तर अशा प्रसंगीं फारच हाल होतात. ज्यांच्याजवळ थोडीशी मिळकत असते, त्यांना ती बाजारांत नेऊन विकावी लागते व त्याजवर जितके दिवस निघतील तितके त्यांस काढावे लागतात. ही स्थिति चालू आहे तोंच त्यापेक्षांही जरा वरच्या दर्जाचे लोक फार पीडिले जाऊन, त्यांची त्रेधा उडून जाते. बाजारांत त्यांना कर्ज मिळेनासें होतें; इतकेंच नव्हे, तर सोनें, चांदी, मोत्यें वगैरेंचे मूल्यवान् दागिने विकत घेणारें गिऱ्हाईक नसल्यानें, जी किंमत उपजेल तीच त्या अडचणींत सांपडलेल्या अब्रूदार मनुष्यांस कबूल करावी लागते. ते अडचणींत सांपडल्यामुळें त्यांच्या वस्तूंची किंमत बाजारांत बरोबर उपजत नाहीं. ह्या विपत्तिग्रस्त लोकांना अशा प्रकारची विलक्षण अडवणूक व्हावी, हें सुधारलेल्या काळास मोठें दूषणकारकच आहे. अशी भयंकर स्थिति बाजारांत चालूं नये; यासाठीं लोकनायकांनीं सरकाराचें लक्ष बाजारांतील बंदोबस्त करण्याकडे नेऊन, लोकांवर येणाऱ्या संकटांचा परिहार तात्काळ करणें इष्ट आहे.

सर विलीयम हंटर हे ह्मणतात कीं, "दुष्काळग्रस्त प्रदेशांत आगगाडीनें धान्याचा बराच पुरवठा करितां येतो. दुष्काळपीडित प्रदेशाखेरीज ज्या ठिकाणीं स्वस्त दरानें धान्य मिळतें, अशा ठिकाणचें धान्य खरेदी करून, तें दुष्काळग्रस्त प्रदेशांत नेऊन, त्याजवर मोठा नफा मिळविण्याची व्यापाऱ्यांत प्रवृत्ति होते. बैलांच्या गाड्या, त्यांचे तांडे व दुसऱ्या कित्येक साधनांनीं सुपीक प्रदेशांतून धान्य आणविल्यानें प्राचीन काळीं दुष्काळांचें निवारण होत असे. तें काम हल्लीं आगगाडीच्या साहाय्यानें आपण करीत आहोंत.

बैलांचे तांडे व गाड्या यांच्या द्वारें, दुष्काळाच्या दिवसांत धान्य आणविणें हें प्राचीन काळीं निर्भय नव्हतें. अन्नार्थी लोकांच्या टोळ्यांकडून रस्त्यांत हल्ले होत, त्यामुळें ह्या धान्य पुरविणाऱ्या साधनांबरोबर सरकारास फौजेचाही उपयोग करावा लागे. तसेंच योग्य वेळीं धान्याचा पुरवठाही होणें अशक्य होतें. ही सर्व उणीव आगगाडीनें दूर होते; याकरितां दुष्काळाच्या दिवसांत जीं मदतीचीं कामें सरकारानें काढावयाचीं, त्यांत आगगाडीचा रस्ता तयार करणें हें जास्त महत्वाचें आहे. लोकांचें दळणवळण वाढून, व्यापारास कोणत्याही प्रकारची आगगाडीनें हरकत येत नाहीं." मि० ब्राऊन हे ह्मणतात कीं, "आगगाडीच्या योगानें व्यापार वाढतो व देशाची फार त्वरेनें सुधारणा होते असें ह्मणतात; परंतु या गाडीनें जें धान्य बाहेर जातें तें अर्धपोटीं उपाशीं राहणाऱ्या लोकांच्या तोंडांतून निघालेलें असतें; ह्या गोष्टीकडे आपलें लक्ष जात नाहीं. हिंदुस्थानाची वस्ती वाढत चालली, धान्याचे भाव वाढले व ज्यांना बिलकूल जमीन नाहीं अशा लोकांची संख्या वाढत चालली आहे. आगगाडीच्या योगानें फार मोठ्या बैलांची शक्ति निरुपयोगी झाली व जमिनीस खत मिळण्याचे मार्ग एकदम बंद पडले." आपल्या राज्यांतील प्रजेच्या संरक्षणाकरितां दुष्काळाच्या आरंभापासून, सरकारानें यत्न करणें उचित आहे. सरकाराच्या साहाय्याची या प्रसंगीं हिंदुस्थानांत फार जरूर असते. प्राचीन काळच्या हिंदू राजांनीं अशा प्रसंगीं लोकोपयोगाचीं असंख्य कामें करून, लोकांचें संरक्षण केल्याचें इतिहासावरून आढळून येतें. रस्ते, इमारती, तलाव वगैरे कामें अशा प्रसंगीं सशक्त लोकांकडून घेतल्यास, त्याचा अर्थशास्त्रदृष्टीनें मनुष्यस्वभाव व देशस्वास्थ्य यांच्यावर चांगला परिणाम घडतो. श्रमाचा बदला घेऊन मदत करणें ही पद्धति जास्त प्रशस्त आहे. श्रम न घेतां मदत दिल्यानें भावी आपत्तीचें निरसन होण्याचा मार्ग बंद होतो व सशक्त लोकांच्या शरीरारोग्यावर अपाय घडतो. ज्यांना शक्तिच उरली नसेल व ज्यांना काम करण्याचें अगदीं सामर्थ्य नसेल, अशा लोकांचें संरक्षण मात्र श्रम न घेतां केल्यास तें अनिष्ट नसतें. अशक्त लोकांस या कृतीनें शक्ति येईल व भूतदयेस प्राधान्य मिळेल. या अशक्त माणसांची संख्या एकंदरींत जास्त

नसते; त्यामुळें मोठ्या खर्चाचीही जबाबदारी सरकारावर येऊन पडणार नाहीं. देशांतील सधन लोकांनीं अशा कामासाठीं कायमची रक्कम निराळी काढून, तींतून अनाथ गरीब लोकांचें संरक्षण केल्यास, सरकाराच्या अंगावरचें एक जोखीम कमी होईल. इंग्लंडांतील धनाढ्य लोक त्या देशांतील गरीब लोकांचें संरक्षण ज्या प्रकारानें करितात, तोच क्रम या देशांतील धनाढ्य लोकांनीं अमलांत आणण्याकरितां झटलें पाहिजे.

सर बार्टल फ्रेयर यांचें मत असें होतें कीं, दुष्काळाचा आरंभ होतांच व्यापाऱ्यांचें दळणवळण वाढविण्यास प्रतिबंध करूं नये. धान्य बाहेर जाण्याची बंदी केल्यानें बरेच अपाय[1] घडतात. दुष्काळग्रस्त प्रदेशांत धान्य येऊं शकत नाहीं व दुष्काळास भयंकर स्वरूप येतें. सरकारानें दुष्काळाच्या दिवसांत, ज्या ठिकाणीं धान्याचा पुरवठा बराच असेल, तेथून तें खरेदी करून स्वतः आणवावें किंवा तें आणविणाऱ्या व्यापाऱ्यांना चांगलें उत्तेजन द्यावें. दुष्काळाच्या दिवसांत मजुरांची खोट नसते. त्यांना खाण्यास दिल्यास देशाचें दळणवळण वाढविणाऱ्या ज्या सडका त्या थोड्या खर्चांत सहज होऊं शकतील. ह्या व्यवस्थेनें व्यापार वाढून देश सधन होईल, व सरकाराचेंही उत्पन्न वाढेल. दुष्काळाच्या दिवसांत सडका केल्यानें बराच मोठा फायदा होतो. ज्या देशावर दुष्काळाचें संकट येतें, तेथील बहुतेक लोक अगोदर निरुद्योगी व निर्धन बनलेले असतात. यास्तव अशा लोकांचे संरक्षणाकरितां सरकारानें देशाची अबादी होण्यासारखीं कामें काढून, त्यांजवर त्या लोकांस काम द्यावें. दुष्काळ पडण्याच्या आरंभास किंवा तो पडल्यावर, उदरनिर्वाहार्थ बाहेर जाण्याची लोकांत एकदम प्रवृत्ति होते. दुष्काळग्रस्त प्रदेशांतील लोक आपलें मूलस्थान सोडून, त्यांच्या मनास वाटेल तिकडे ते चालते होतात! अशा प्रसंगीं सरकारानें त्यांस बाहेर जाण्याची एकदम बंदी करून, त्यांना तेथेंच कामावर लावावें. तसें न केल्यास ते बाहेर पडलेले लोक खाण्यास न मिळाल्यानें रस्त्यानेंच मरतात; किंवा त्यांच्यांत स्पर्शसंचारक सांथींच्या रोगांचा उद्भव होतो. ज्या देशांत अनेक राज्यें असतात, तेथें ह्या दीन स्थितीचा फारच वाईट परिणाम घडतो.

---

१. सर बार्टल फ्रेयर यांचें चरित्र, भाग २ रा पृष्ठ ५७.

एका राज्यांतील दुष्काळपीडित प्रजा दुसऱ्या राज्यांत गेल्यास, त्या राज्याच्या अब्रूची ह्या योगानें मोठी हानि होते. ज्या राज्यांतील प्रजा सुखी, तें राज्य अब्रूदार समजण्याचा, हिंदुस्थानांत परंपरेनें चालत आलेला नियम आहे. ज्या राज्यांतील प्रजा कंगाल, अशा राज्यांसंबंधानें प्राचीन काळीं परराष्ट्रें विशेष तिरस्कार दाखवीत असत. ज्यांना इतर देशांत गेल्यास धंदा मिळण्यासारखा असेल, अशाच लोकांस सरकारानें पाहिजे तर बाहेर जाऊं द्यावें; परंतु असें करणें हेंही पुढें घातक होत असतें. आपल्या राज्यांतील प्रजेनें दुसऱ्या राष्ट्रांशीं व्यापार करून, पैसा मिळवून सधन व्हावें हा सर्वोत्कृष्ट मार्ग आहे; परंतु आपल्या प्रजेनें उदरनिर्वाहार्थ दुसऱ्या राष्ट्रांकडे जाऊन याचना करणें हें मात्र अयोग्य होईल. असा प्रकार न बनावा यासाठीं राज्यांतील सधन लोक व सरकार यांनीं, अशा दैन्यांतून गरीब प्रजेस वांचविण्याकरितां योग्य उपाय योजावे. दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसतांच, निरनिराळीं कामें सर्व बाजूंनीं सुरू करून, काम मिळत नसल्यामुळें निर्वाह होत नाहीं; अशी कोणाचीही कुरकूर राहूं देऊं नये. हीं कामें फारच विचारपूर्वक सुरू करावयास पाहिजेत. सर बार्टल फ्रेयर हे ह्मणतात कीं, "अशीं कामें सुरू करितांना एकेच ठिकाणीं मनुष्यांचा मोठा जमाव होऊं देऊं नये. मोठा जमाव झाल्यानें, त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होतें व सांथीच्या रोगांचा उद्भव होण्याचें भय असतें. साधेल तितकें ज्या त्या ठिकाणच्या लोकांकडून त्यांच्या गांवाजवळ किंवा त्यांच्याच गांवीं सरकारानें विहिरी व तलाव खोदण्याचें आणि रस्ते तयार करण्याचें काम घ्यावें. हीं कामें पुढील दुष्काळांच्या प्रसंगीं फार उपयोगीं पडतात. काम करणाऱ्या लोकांस कामाच्या बदल्यांत योग्य तनखा, पैशांच्या किंवा धान्याच्या रूपानें द्यावा; परंतु लोकांस निरुद्योगी ठेवून उपासानें मरूं देऊं नये." तसेंच ते आणखी असें ह्मणतात कीं, "सरकारानें अशा प्रसंगीं सर्व दर्जाच्या लहानमोठ्या अमलदारांपर्यंत परभारें व पूर्ण संबंध ठेवून, त्यांच्या अधिकारांतील सर्व बाबतींविषयीं चांगलें माहितगार व्हावें. सरकार व सर्व अमलदार, यांनीं लोकांच्या खऱ्या स्थितीविषयीं चांगली माहिती मिळवावी. राजमार्ग, आगगाडीचे रस्ते व कालवे बांधून, लोकांचें व्यापारी दळणवळण वाढवि-

ण्याचा उपाय, या प्रसंगीं सरकारानें योजावा. सरकार लोकांपासून पैसे घेऊन जें व्याज लोकांस देतें, त्याजपेक्षां थोडेंसें जास्त व्याज उत्पन्न होईल तर, शेतकऱ्यांस व दुसऱ्या दुष्काळपीडित लोकांस कर्जाऊ पैसा सरकारानें द्यावा. शेतकऱ्यांजवळून कर वसूल करण्यांत कडकपणा नसावा. कारण हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति फारच वाईट आहे."

मद्रासचे इंजिनीयरखात्यांतील सर आर्थर कॉटन हे ह्मणतात कीं, "ज्या प्रदेशांत दुष्काळ पडण्याचें जास्त भय असेल, तेथें जरूरीचीं व लोकांस ज्यांपासून चांगला फायदा मिळेल अशीं बांधकामें सुरू करितां यावीं, यासाठीं प्रथमपासून हुशार अमलदारांस तिकडे पाठवावें.........दुष्काळनिवारणार्थ जीं साधनें एकत्र करावयाचीं असतील, तीं त्याच प्रदेशांत तयार करवावीं. धान्यसंग्रह होईल तितका तेथें करून ठेवावा. व लोकांस दुष्काळाच्या भयापासून वांचविण्याकरितां जे कांहीं उपाय योग्य वाटतील, ते अगोदरच तयार करून ठेवावे. दुष्काळग्रस्त प्रदेशांत मजबूत आणि निःपक्षपाती देखरेख रहाण्यासाठीं चांगले विश्वासू व हुशार अमलदार तयार करून ठेवावे." दुष्काळ पडल्यावर सरकार व धनाढ्य लोक एकदम घाबरून जातात हें बरोबर नाहीं. कोणते उपाय कसे योजावे, त्याचा विचार अगोदर करून ठेवून, प्रसंग येऊन पडतांच, योग्य व्यवस्था झाल्यास सरकाराची धांवपळ उडत नसते. थोड्या खर्चांत जास्त काम करून घेण्याची संधि सरकारास या समयीं मिळते; तिचा लाभ सरकारानें तारतम्यपूर्वक करून घेणें इष्ट आहे. जीं कामें सुरू करावयाचीं त्यांचे नकाशे, खर्चाचा अंदाज व तत्संबंधीं नियम हे अगोदरच तयार झालेले असल्यास, कामास आरंभ करण्यास व लोकांस धंदा मिळवून देण्यास विलंब लागणार नाहीं. ह्या कामाकरितां सरकारानें कायमचें खातें काढून, प्रत्येक ठिकाणची अबादी कशी होईल व दुष्काळाच्या दिवसांत दुष्काळग्रस्त प्रदेशांत कोणतीं कामें सुरू करावयाचीं तें ठरवावें. त्या कामांकरितां लागणाऱ्या पैशाची सवड, सरकारानें आपले इतर खर्च कमी करून, त्यांतून ती अगोदरच करून ठेवावी. दुष्काळ पडल्यावर सरकारास इतर ठिकाणाहून, कर्ज काढण्याचा प्रसंग येणें हें फारच वाईट आहे. लोहमार्गापेक्षां कालव्यांचीं कामें करणें

हें जास्त सोयस्कर असतें. ज्या ठिकाणीं बाहेरून धान्य न आल्यामुळें, दुष्काळाचें संकट असह्य होतें, अशा ठिकाणीं मात्र लोहमार्गाचें काम सुरू करावें. नद्यांना पूल बांधणें व ज्या गांवीं पाण्याची खोट असेल अशा ठिकाणीं इतर ठिकाणांहून पाणी आणणें हे दोन उपाय फार महत्वाचे आहेत. पुलांस व पाणी आणण्यास लागणारें सर्व सामान, बनेल तोंपर्यंत जेथील तेथेंच तयार करवून उपयोगांत आणावें, ह्मणजे इतर ठिकाणीं पैसा न पाठवितां, थोड्या खर्चांत बरेंच मोठें काम होऊं शकेल. परदेशांतून माल येईल तेव्हां काम चालेल, ही पारतंत्र्यात्मक स्थिति चांगली नाहीं. या योगानें सरकारास फारच मोठा खर्च सोसावा लागतो. दुष्काळाच्या दिवसांत कारागीर व मजूर यांचें संरक्षण व्हावें, याकरितां सार्वजनिक पैशांतून, लोकोपयोगाच्या इमारती तयार करविल्यास, सरकारावरील मोठें जोखीम बऱ्याच अंशानें कमी होऊं शकेल. मोठमोठ्या धनाढ्य लोकांनींही अशाच प्रसंगीं इमारती बांधून, लोकांचें संरक्षण करावें असें सरकारानें ठरवावें; परंतु त्या कामांवरील मजुरांस व कारागिरांस निर्वाहापुरती मजुरी मिळते किंवा नाहीं; येवढी देखरेख अशा दुष्काळाच्या दिवसांत सरकारानें ठेवावी ह्मणजे बस आहे. अशा इमारती किंवा दुसरीं कामें करविण्यास जे सधन लोक तयार असतील, त्यांस थोडीशी इनामाची लालूच सरकारानें दाखविल्यास, बरेंच मोठें काम होऊं शकेल.

दुष्काळाच्या संकटांत देशाचा बराच भाग ज्या समयीं सांपडतो, त्यावेळची स्थिति फारच भयंकर असते. अशा प्रसंगीं सरकाराकडून सर्व बाजूनें मनुष्य व पशू, यांच्या संरक्षणाचे सारखे उपाय सुरू होण्याची अपेक्षा आहे. ह्या प्रसंगीं देशांतील सधन व सरकारी नोकरांनीं आपल्या औदार्याचा पूर्ण उपयोग करून, गरीब लोकांचे प्राण वांचवून, सरकारास मदत केल्याचें श्रेय संपादन करावें. अशा उदार गृहस्थांस प्रोत्साहन देऊन, त्यांच्या हस्तें दुष्काळपीडितांवर दया करविणें हें जसें सरकाराचें कर्तव्य आहे, तसेंच आपली मालमत्ता सुरक्षित असावी अशी इच्छा ठेवणाऱ्या सधन लोकांचेंही आहे. लोकांस खाण्यास न मिळाल्यास ते पोटाकरितां स्वस्थतेचा भंग करण्यास प्रवृत्त होतात व जेथें सांपडेल तेथें चोऱ्या किंवा लूट करून

आपले प्राण वांचवीत असतात. अशा वाईट कामाकडे निर्धन लोकांची प्रवृत्ति न व्हावी, यासाठीं जपण्याची फार जरूर असते. खाण्यास न मिळाल्यानें चोरी केल्यास, 'सरकार शिक्षा करील' हें जरी त्या लोकांस माहित असतें, तरी 'कैदेंत पोटभर खाण्यास मिळेल' या समजुतीस अशा संकटसमयीं प्राधान्य मिळण्याचा संभव विशेष असतो. पोटाकरितां चोऱ्या करणाऱ्या लोकांस फटके मारण्याची किंवा इतर प्रकारची शिक्षा सरकार करितें व नंतर त्यांस सोडून देतें. हा प्रघात फारच घातक आहे. त्या गुन्हेगार लोकांस धंद्यांस लावण्याचा यत्न केल्यास, गुन्ह्यांची संख्या बरीच कमी होईल.

प्रदेशाच्या खपापुरतें धान्य व्यापाऱ्यांकडून पुरविलें जात नसेल किंवा व्यापारी लोक स्वार्थाकडे दृष्टि देऊन, धान्याचे भाव मुद्दाम वाढवीत असतील, तर त्या प्रसंगीं सरकारानें स्वतः धान्य मागवून, तें मूळ किमतीस किंवा स्वस्त दरानें देण्याचा इलाज अमलांत आणावा. मूळभावानें धान्य खरेदी करण्याचें ज्या ठिकाणच्या लोकांस सामर्थ्य नसेल, अशाच ठिकाणीं सरकारानें खोट खाऊन धान्य विकावें. ही खोटीची रक्कम सरकार व इतर सधन लोक यांनीं पैसा जमवून, त्यांतून पुरी करावी. ज्यांची शरीरप्रकृति चांगली असेल अशाच लोकांस, सरकारानें दुष्काळशामक कामांवर दाखल करावें. उदार लोक व सरकार यांनीं दुष्काळ निवारणाकरितां बराच पैसा जमवून, त्यांतून अशक्त माणसें, लहान मुलें व इतर अनाथांस फुकट अन्नवस्त्र द्यावें. ह्या संबंधानें सर बार्टल फ्रेयर हे म्हणतात कीं, "अनाथांस अन्न दिल्यानेंच सरकाराचें कर्तव्य संपतें असें नाहीं. लहान मुलांस कित्येक आईबाप टाकून देत असतात; त्यांना एकत्र करून त्या मुलांचें संरक्षण करण्याचेंही सरकाराचें आद्य कर्तव्य आहे." मध्यम स्थितीच्या लोकांची दुष्काळांत बरीच खराबी होत असते. जीं अब्रूदार माणसें आश्रय घेण्यास तयार नसतील, त्यांना बिनव्याजानें सरकारानें कर्जाऊ पैसे द्यावेत. या लोकांकरितां एक मोठा फंड जमवावा व त्यांतून योग्य मदत, त्या लोकांच्या मनास वाईट न वाटेल, अशा गुप्त रीतीनें द्यावी. प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील राजेलोक, दुष्काळाच्या प्रसंगांत, स्वतः अशा अब्रूदार

कुटुंबास आपल्या खानगींतून, कोणासही कळूं न देतां, उदार मनानें मदत देत होते. खुद्द औरंगजेबानेंही मध्यम स्थितीच्या लोकांचा याच प्रकारानें परामर्ष घेतला होता. अब्रूदार माणसें दुसऱ्याच्या धर्मादाय पैशाचा उपयोग करून घेण्यास तयार नसतात; याकरितां त्यांचें संरक्षण विचारपूर्वक कसें करावें; त्या संबंधानें योग्य ज्ञान, युरोपांत व अमेरिकेंत जी पद्धति चालू आहे तिजवरून होतें. तिकडील संपत्तिमान् लोक निर्धनावस्थेस आलेल्या अब्रूदार लोकांस मदत करण्याकरितां, बराच पैसा अगोदर जमवून ठेवतात व त्या रकमेंतून त्या लोकांस न कळतां योग्य मदत देऊन, त्यांजवरील संकटांचा तिकडे परिहार होतो. तोच प्रकार ह्या देशांत निदान दुष्काळाच्या दिवसांत तरी अमलांत आणण्याची फार जरूर आहे. दुष्काळाच्या आरंभासच हे उपाय योजावयास पाहिजेत. दुष्काळानें भयंकर स्वरूप धारण केल्यावर, ह्या लोकांची दशा फारच वाईट होते व शेवटीं अशीं माणसें आपल्या अब्रूचें संरक्षण होत नाहीं ह्मणून, आत्महत्या करून प्राण सोडितात.

लोकांस उद्योगधंद्यांस लावून, त्यांचें संरक्षण करणें हें दुष्काळनिवारणाच्या कामांत मुख्य तत्व आहे. अशीं कामें बनल्या त्वरेनें काढून, त्यांत सर्व वर्गाच्या लोकांचा निर्वाह चालेल अशी योजना करावी. तुरुंगांत शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारांपेक्षां, मेहनतीवर निर्वाह करणाऱ्या ह्या लोकांस कमी मजुरी न मिळेल अशी दक्षता ठेवणें व लोकांच्या आरोग्यसंवर्धनार्थ योग्य परिश्रम घेणें, हेंही या समयीं सरकाराचें कर्तव्य आहे. मनुष्यांच्या आरोग्याकरितां ज्या औषधांची खास जरूर अशा व साथींच्या रोगांस प्रतिकार करणाऱ्या औषधांचा दवाखाना, प्रत्येक दुष्काळशामक कामांवर ठेवावा, आणि त्यांतून वेळचेवेळीं लोकांस औषधें द्यावीं. कामांवरील लोकांच्या सर्व गरजा थोडक्या अवकाशांत व थोड्या श्रमांत भागविण्याची व्यवस्था तेथें असेल तर, त्यापासून चांगला परिणाम घडतो. फार भयंकर दुष्काळांत तर लोकांच्या आरोग्यासंबंधानें फारच काळजी बाळगण्याची जरूर असते. आरोग्यसंरक्षणाच्या नियमांचें उल्लंघन होतांच, असंख्य माणसें मृत्युमुखीं पडतात, व इतके दिवस त्यांना वांचविण्याकरितां घेतलेले परिश्रम एकदम व्यर्थ जातात! प्राचीन काळीं दुष्काळाच्या दिवसांत काम करणाऱ्या लोकांस व

त्यांच्या बायकामुलांस दररोज दोन वेळां खाण्यास देऊन, त्यांजकडून अगदीं हलकें काम घेतलें जात होतें. 'मजुरांनीं सर्व दिवस मजुरी करून, बिऱ्हाडीं जावें व नंतर लांकुडफाटें शोधून आणून सैंपाक करावा आणि खावें.' ह्या हल्लींच्या पद्धतीनें श्रमातिरेक होतो व मजुरी करणारांची शक्ति नष्ट होते. दुष्काळांत लोकांकडून जीं कामें घ्यावयाचीं, तीं उत्पादक असावींत. व्यापारोद्योग वाढून, मनुष्यें व शेतकीचीं जनावरें, यांजवर पुढें आपत्ति येऊं नये; अशा धोरणाचीं जीं कामें होतील, तींच खरीं महत्वाचीं होत. कांहीं देशांत पाण्याचें दुर्भिक्ष फार असतें. तें संकट टाळण्याकरितां ज्या सोई करणें इष्ट असेल त्या कराव्या. अनावर्षणामुळें जे दुष्काळ पडतात, त्यांत पाण्याचें दुर्भिक्ष फार असतें. गुजराथेंतील व मारवाडांतील लोकांस पाण्याचे कमतरतेनें इतर ठिकाणापेक्षां जास्त पीडा होते. जुन्या विहिरी, जुने तलाव वगैरे ठिकाणीं तळास भरपूर पाणी आहे किंवा नाहीं, त्याची तपासणी करून, योग्य असेल तर फ्रान्साप्रमाणें 'पातालकूप' करणें हें जास्त श्रेयस्कर होईल. हे पातालकूपच फ्रान्सांतील शेतकऱ्यांना विशेष फलदायक झाले आहेत.

दुष्काळाच्या आरंभास शहरांजवळ रहाणारे निर्धन लोक झाडें तोडून, त्यांचीं लांकडें बाजारांत विकून आपला निर्वाह चालवितात; हा क्रम बंद करण्याची फारच जरूर आहे. झाडांची लागवड केल्यानें पाऊस बेताचा पडून, जमीन दमदार बनते व झाडें तोडल्यानें ती रखरखीत होते. इ० स० १८७८ सालीं ह्या संबंधानें सरकाराची पूर्ण खात्री झाली. सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं जंगलांचें संरक्षण व जास्त झाडांची लागवड करण्यासंबंधानें, त्या समयीं सरकारास शिफारस केली होती. युरोप व अमेरिका खंडांत सर्पणाकडे बहुधा खनिज कोळशांचा उपयोग होतो; तसें हिंदुस्थानांत नाहीं. खनिज कोळशांच्या भरपूर खाणी ह्या देशांत सांपडून, त्यांचा उपयोग सर्पणाकडे होईपर्यंत तरी झाडांच्या लागवडीकडे विशेष लक्ष देण्याची जरूर आहे. दरसाल सर्पणाकडे जितकीं लांकडें लागतात, त्याच्या दीडपटीनें झाडांची नवीन लागवड होत जाईल तर, दुष्काळाचें संकट फारसें पीडाकारक होणार नाहीं. आरंभास आंबे वगैरे फळझाडें

तोडून त्यांचा दुष्काळांत सर्पणाकडे उपयोग होत असतो; तो तसा होऊं नये, याकरितां सरकारानें योग्य बंदोबस्त करावा. दुष्काळ-निवारणाचीं कामें उशीरानें सुरू झाल्यास, लोकांचा ओघ स्वसंरक्षणाकडे वळतो व ते पाहिजे तसल्या भयंकर गुन्ह्यांस प्रवृत्त होतात; याकरितां प्रत्येक गांवीं मदतीच्या कामाची जरूर कोणास आहे, त्याचा बारकाईनें शोध करून, तशा निर्धन लोकांस, योग्य कामांवर गुंतविण्याकडे दुर्लक्ष होतां उपयोगी नाहीं. ह्या महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष न दिल्यास, गांवाच्या स्वस्थतेवर व पुढें प्रदेशाच्या अबादीवर अपायकारक संस्कार घडतो; असा बऱ्याच युरोपियन कामदारांस पूर्ण अनुभव आला आहे.

सर रिचर्ड टेंपल हे म्हणतात कीं, "दुष्काळाच्या संकटानें त्रासलेल्या लोकांस, बनेल तोंपर्यंत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं देऊं नये. ते अन्नाच्या शोधास निघालेले लोक उपासमारानें एकदम मृत्युमुखीं पडण्याचा संभव असतो. उद्योगधंद्याकरितां बाहेर जाण्यास निघालेल्या लोकांस, दुष्काळग्रस्त प्रांत सोडून इतर ठिकाणीं फार सावधगिरीनें पाहिजे तर जाऊं द्यावें; परंतु अर्ध्या रस्त्यांत त्यांस उपासमार पडून ते अशक्त होऊन परत न येतील अशी फार काळजी बाळगावी. इ० स० १८७४ मध्यें बंगाल व बहार प्रांतांतील दुष्काळांत ह्या भटकणाऱ्या लोकांस प्रतिबंध केल्यानें, पुढें निपजणारा भयंकर परिणाम टळला होता. इ० स० १८७७ मध्यें मद्रास व मुंबई इलाख्यांत हा इलाज अमलांत न आणल्यानें बरीच खराबी झाली." दुष्काळग्रस्त प्रदेशांतील लोकांस इतर ठिकाणीं जाऊं देणें ही सर्वांत मोठी चुकीच होय. मारवाडांतील दुष्काळामधून, तिकडील भिकार इतर देशांत गेल्यानें कित्येक सुपीक प्रदेशही दुष्काळाच्या पूर्ण तडाख्यांत सांपडल्याचें आढळून येतें. इ० स० १८१५ मध्यें गुजराथेंत दुष्काळ असह्य झाला, त्याचें कारण मारवाडांतून आलेलें भिकार हेंच होय. इतर देशांतून येणाऱ्या भिकारांची संख्या वाढूं देणें हें इष्ट नाहीं. तसेंच गांवांत भिक्षा मागून खाणारें भिकारही वाढूं देऊं नये. गोसावी, बैरागी वगैरे भिकाराची संख्या बनेल तितकी कमी करणें इष्ट आहे. जितके भिक्षा मागणारे कमी, तितका लोकांच्या पाठीमागें याचकांचा त्रास कमी होतो. या भिकाऱ्यांना

प्रत्येक घरून जी भिक्षा मिळते, ती एकत्र केल्यास, हिंदुस्थानांत दरसाल कोट्यावधि रुपये जमतील व त्यांतून देशहिताच्या उपयोगीं पडणारीं मोठमोठीं कामें होऊं शकतील. हल्लीं ह्या लोकांना जी भिक्षा घातली जाते, तिचा चांगला उपयोग बिलकूल होऊं शकत नाहीं.

प्रत्येक गांवांतील लोकस्थितीची सरकारानें नोंद ठेवावी. ह्या कामावर चांगले हुशार व रयतेची कळकळ बाळगणारे अंमलदार नेमावे. त्यांनीं प्रत्येक गांवीं फिरून जे लोक निरुद्योगी असतील त्यांस उद्योगास लावण्याची, आजारी मनुष्यांस औषध, अनाथांस अन्न व निराश्रितांस आश्रय देण्याची व्यवस्था योग्य रस्त्यानें लावून द्यावी. तसेंच अत्यंत दरिद्री झालेल्या व ज्यांना दोनप्रहरची भ्रांत पडते, अशा लोकांना योग्य मदत देण्याकरितां, जी तजवीज करावी लागेल, ती केल्यास लोकांच्या हृदयांतील राजनिष्ठेस विशेष तेज येईल. उद्योगधंदा मिळत नाहीं म्हणून, बरेच लोक निराश होतात व ते उपासमार काढून, आपल्या शरीराची खराबी करून घेतात; अशा लोकांसंबंधानें सरकारानें दुष्काळाच्या व इतर प्रसंगीं विशेष काळजी बाळगावी. प्रत्येक गांवच्या पुढारी लोकांनीं, आपल्या गांवांतील अनाथ व निर्धन लोकांची ही दीन स्थिति सरकारास कळविण्यास विलंब लावूं नये. त्या गांवीं अशा दीन लोकांस फुकट अन्न देण्याची सोय सरकारानें करून ठेवावी. कित्येक सरकारी कामदार त्यांस फार कडक रीतीनें वागवितात, त्यामुळें आपली गृहस्थिति ते दीन लोक सरकारी कामदारांस कळविण्यास फार भीत असतात; याकरितां अशा कामांवर जे अंमलदार नेमावयाचे ते विशेष मायाळू असावेत व त्यांचें लक्ष स्वकर्तव्य बजाविण्याकडे जास्त असावें.

खराब्याची व पडित जमीन पुढें लागवडीस यावी, याकरितां गांवच्या सधन लोकांनीं निरनिराळीं कामें प्रत्येक गांवीं सुरू करावींत. तसेंच सरकारानें शेतकऱ्यांस उत्तेजन येण्याकरितां निरपेक्ष भांडवलापैकीं कांहीं रकम देऊन, त्यांजकडून त्यांच्या शेतकींत ज्या सुधारणा करविणें इष्ट असेल त्या कराव्यात. खेरीज बीं, बैल व शेतकीचीं इतर साधनें, यांचा पुरवठा गरीब शेतकऱ्यांस करून, त्यांजवर आलेलें संकट कमी करण्याचा यत्न होण्याची फार जरूर आहे. अनावृष्टीपासून उद्भवणाऱ्या दुष्काळांत, शेतकीच्या

जनावरांची फार हानि होते; यास्तव त्या जनावरांस योग्य चारा वेळेवर मिळेल, अशी सरकारानें पूर्ण योजना करण्याकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. जेथें चरण्यास चारा व पिण्यास भरपूर पाणी मिळेल, अशा ठिकाणीं प्रत्येक गांवचे निरनिराळे कळप करून, तीं जनावरें सरकारानें आपल्या खर्चानें, त्यांच्या संरक्षणाची तेथें योग्य व्यवस्था लावून पोंचवावीं. असें करितांना त्या ढोरांस ज्या ठिकाणीं पोंचवावयाचें, तेथील हवापाणी अनुकूळ पडेल किंवा नाहीं, याचा प्रथम विचार करावा. तसेंच गुरांचा एकेच ठिकाणीं फार मोठा जमाव होऊं देऊं नये. सन १८९९-१९०० च्या दुष्काळांत गुजराथेंतील ढोरें ठाणें जिल्ह्यांत चरण्याकरितां पाठविलीं होतीं; परंतु तेथील हवापाणी त्या ढोरांस प्रतिकूळ होऊन बरींच जनावरें मरण पावलीं. तसेंच सांथींच्या रोगानेंही कांहीं ढोरें मेलीं. गुजराथेंतील ढोरांस ह्या दुष्काळाच्या आरंभास त्यांच्या पालकांनीं आंबा, चिंच व इतर झाडांच्या पाल्यावर वांचविण्याचा यत्न केला होता; परंतु त्यांचा तो हेतू पार पडला नाहीं. ह्या चाऱ्यानें तीं जनावरें उलट जास्त अशक्त झालीं. सोनगडच्या जंगलांतील गवत कापून, त्यांजवर बडोदें-राज्यांतील जनावरांचे प्राण वांचविण्याचा प्रयत्न, श्रीमंत गायकवाड सरकारांनीं केला होता; परंतु तें गवतही पुढें अपायकारक ठरलें. हें गवत ढोरांच्या खाण्यांत येतांच, त्यांजवर 'गोचीड' जातीचे प्राणी उत्पन्न झाले व तीं जनावरें अतिशय अशक्त बनलीं. तो चारा फार उष्ण पडून, कित्येक जनावरें अगदीं आंधळीं झालीं. तसेंच सोनगडाकडे चरण्यासाठीं गायकवाड सरकारांनीं आपले घोडे व इतर जनावरें ह्या दुष्काळांत पाठविलीं होतीं; परंतु त्यांस तिकडील हवा अनुकूळ न पडून, तीं शेवटीं मरण पावलीं. फड्या निवडुंगांचा चारा मात्र ह्या दुष्काळाच्या दिवसांत ढोरांचे प्राण वांचविण्यास फार उपयोगीं पडतो; परंतु त्याचा सर्व ठिकाणीं सारखा पुरवठा होणें अशक्य आहे. या कामाकडे माणसेंही बरींच गुंतवावीं लागतात. अशा माणसांच्या पोषणासंबंधानें योग्य विचार व्हावयास पाहिजे. तसेंच मनुष्यांच्या खाण्यांत येणारें धान्य चांगलें पौष्टिक असावें. खराब धान्य व दूषित पदार्थ लोकांच्या खाण्यांत न यावेत; याकरितां सरकारानें ह्या प्रसंगीं विशेष काळजी बाळगावी. खराब

धान्य थोड्या पैशांत मिळतें, या सबबीवर अशा धान्यांचा खप फार वाढत असतो. तसेंच दारोदार हिंडणाऱ्या भिकाऱ्यांस, लोकांकडून आंबलेले व आरोग्यास हानिकारक असे शिजविलेले पदार्थ खाण्यास मिळतात, त्यामुळें त्या लोकांची प्रकृति बिघडून त्यांची मृत्युसंख्या विशेष वाढते.

सावकारांनीं दिवाणींतून मिळविलेल्या निवाड्यांची बजावणी दुष्काळांत फार सावधगिरीनें करावी. सावकारांकडून जप्ती येऊन तींत देणेदारांची मालमत्ता जप्त झाल्यानें, मध्यम स्थितींतील लोक एकदम दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडतात. दिवाणी कायद्यांत देणेदाराच्या वार्षिक खर्चापुरतें धान्य व जरूरीचीं भांडीं आणि शेतकीचीं जनावरें यांशिवायच्या मालाची जप्ती करण्याचें फर्माविलें आहे; परंतु या धोरणांचा फारसा उपयोग होऊं शकत नाहीं. ते कर्जबाजारी लोक फारच दीन झाल्यामुळें त्यांच्याकडून, त्या धोरणांचें उल्लंघन करणारांवर कायदेशीर इलाज घेववत नाहीं व ते शेवटीं सावकारांच्या पेंचामुळें क्षुधातुर होतात. वर्षास पुरण्याइतकें धान्य तर अशा ठिकाणीं बहुधा सांपडत नसतेंच; परंतु शेतकीचीं जनावरें, वापरण्याचीं वस्त्रें, उपयोगांत येणारीं थोडींशीं भांडीं व दुसरें थोडेंसें किरकोळ सामान यांची जप्ती होते. हा माल एकदम घरांतून जातांच सावकारांचा कांहीं अंशीं फायदा होतो; परंतु तें कर्जबाजारी झालेलें कुटुंब भरदुष्काळांत दीन बनून, त्यास उपाशीं रहाण्याची पाळी येते. यास्तव दुष्काळाच्या दिवसांत सावकारांनीं दिवाणींतून मिळविलेल्या निवाड्यांची बजावणी सरकारानें एकदम बंद ठेवावी. तसेंच अब्रूदार लोकांस कर्ज देण्याचा प्रघात सावकार अशा दिवसांत बंद करीत असतात. सावकारांनीं आपले हात आंखडल्यास तीं अब्रूदार कुटुंबें फार पीडिलीं जातात; याकरितां सरकारानें दरम्यानगिरी करून, अशा प्रसंगीं, त्या अब्रूदार कुटुंबांस त्यांच्या सावकारांकडून, योग्य असेल तितकें कर्ज देववावें.

दुष्काळाचें संकट वाढतांच सरकार कधीं कधीं खर्च कमी करण्याचा सामान्य यत्न करितें. राज्यांतील वाढलेले खर्च कमी करणें हें एकंदरींत चांगलें; परंतु दुष्काळाच्या दिवसांत ह्या काटकसरीचा परिणाम हलक्या दर्जाच्या नोकरांवर फार वाईट घडतो. त्यांच्या जवळ निर्वाहाचें दुसरें साधन

नसतें व नोकरींतून कमी होतांच त्यांजवर दुष्काळाचा संस्कार घडून, ते लोक उपासमारानें बहुधा मृत्युमुखीं पडतात. ह्या लोकांवर व त्यांच्या बायकामुलांवर हा जो परिणाम घडतो, तो फारच वाईट आहे. ह्या कृतीनें दुष्काळाचें संकट उलट जास्त वाढतें. सरकारी व खानगी कारखान्यांतील नोकरांचें निर्वाहविषयक साधन अशा दिवसांत नष्ट होऊं देतां उपयोगी नाहीं. कापडाच्या गिरण्या व दुसरे कारखाने दुष्काळांत साधनाभावामुळें बंद होण्याचा प्रसंग येतो व मध्यम स्थितीचीं हजारों माणसें दुष्काळाच्या पूर्ण तडाक्यांत सांपडतात. असा दुर्दैवी योग न यावा, याकरितां सरकारानें त्या कारखानदारांस योग्य असेल ती मदत देऊन, त्यांचें संरक्षण करावें. कापसाच्या किंवा पाण्याच्या खोटीमुळें गिरण्या बंद ठेवाव्या लागतील अथवा तयार झालेल्या मालाचा खप न झाल्यानें त्या बंद होतील, तर अशा प्रसंगीं सरकारानें त्या कारखानदारांशीं थोडीशी मसलत केल्यास, बऱ्याच कुटुंबांवर दुष्काळामुळें येणारें संकट कांहीं अंशानें तरी टळेल. सरकारावर लोकांच्या पोषणाची येऊन पडणारी मोठी जबाबदारी ह्या योजनेनें कांहीं कमी होईल. त्या कारखान्यांस बिनव्याजी पैसा देऊन किंवा उत्तेजनार्थ कांहीं रक्कम देऊन तारलें पाहिजे. तसेच अशा भयंकर दिवसांत लहान पगारांच्या नोकरांचा खर्च, त्यांना मिळणाऱ्या तनख्यांतून भागत नसतो, यास्तव त्यांना थोडीशी महागाई सरकार देतें, तशी कारखानदारांनींही द्यावी. ही देतांना धान्याच्या वाढलेल्या भावांचा मात्र विचार व्हावयास पाहिजे. जितके भाव वाढतील तितकीच रक्कम महागाई–भत्त्याची त्या नोकरांना दिल्यास, दुष्काळाचें संकट फारसें असह्य होणार नाहीं. सरकाराच्या देशी फौजेस किंवा इतर खात्यांतील लहान पगाराच्या नोकरांस, धान्याचा पुरवठा करण्यासाठीं सरकारानें स्वतः दुकान काढून, त्यांतून मूळ किमतीस धान्य व चारा पुरविल्यानेंही दुष्काळाचें संकट कमी होऊं शकेल. ‘धनी व चाकर’ या नात्यानें धन्याचें जेवढें कर्तव्य असेल, तें सर्व या प्रसंगीं बजाविलें गेल्यास, दुष्काळाच्या आपत्तीपासून, लोकांस त्रास होणार नाहीं. राज्यकर्त्यांनीं ह्या प्रसंगीं प्राचीन भारतवंशीय राजांप्रमाणें आपलें कर्तव्य बजावून, लोकांचें संरक्षण करावें.

**अपुत्रस्य नृपः पुत्रो, निर्धनस्य धनं नृपः ।**
**अमातुर्जननी राजा, अतातस्य पिता नृपः ॥**
**अनाथस्य नृपो नाथो, ह्यभर्तुः पार्थिवः पतिः ।**
**अभृत्यस्य नृपो भृत्यो, नृप एव नृणां सखा ॥**
**सर्वदेवमयो राजा, तस्मात्त्वामर्थयेन्नृप. ।**

कालिकापुराण अध्याय ५०.

**भावार्थ**–ज्यास पुत्र नसेल त्याचा पुत्र राजा व निर्धन लोकांचें राजा हेंच धन होय. ज्यास आई नाहीं त्याची आई व ज्यास बाप नाहीं त्याचा पिता राजा, अनाथांचा नाथ व विधवांचें पोषण करणाराही राजाच होय. ज्यास चाकर नसेल त्याची व्यवस्था चाकराप्रमाणें करणाराही राजाच आहे. सर्व लोकांचा मित्र राजा असून, तो सर्व देवतांनीं युक्त असल्या-मुळें हे राजा, तुझी सर्व लोक प्रार्थना करितात.

दुष्काळ पडण्यापूर्वीं व तो पडल्यावर राज्यकर्त्यांचें कर्तव्य फारच मोठें आहे. त्यांनीं आपले ऐषाराम बेतानें ठेवून, प्रजेचें संरक्षण करावयास झटावयाचें असतें. गरीब लोकांचा मुख्य तरणोपाय या समयीं राज्यकर्त्यांव-रच अवलंबून असतो. त्यांनीं स्वतः अशा प्रसंगीं संकोचित वृत्तीचा त्याग करून, आपल्या उदात्त विचारांनीं प्रजेचें संरक्षण करावें. राजास प्रजेची अपेक्षा स्वभावतः असतेच. धर्माध्यक्षांचेंही कर्तव्य या प्रसंगीं राज्यकर्त्यां-बरोबरच आहे. त्यांनीं धर्मादायार्थ संपादन केलेल्या पैशाचा विनियोग, राष्ट्रीय दृष्टीनें अनाथ व निर्धन लोकांस अन्न देण्याकडे केल्यास, त्यापासून राज्यकर्त्यांवरचें बरेंच जोखीम कमी होऊं शकेल. शैव, वैष्णव, स्वामिनारा-यण, रामदासी, जंगम, नानक, कबीर, जैन वगैरे सांप्रदायांत बरेच सधन लोक आहेत, व त्या त्या पंथांतील धर्मगुरूंनीं मनावर घेतल्यास, दुष्काळ-निवारणाचें काम विशेष स्वल्प होईल. या धर्मस्थानांकडून, अतिथि, अभ्या-गत, अनाथ मुलें व फकीरफुकरा ह्यांचें संरक्षण करावें. तसेंच या धर्मादा-यांतून कारागिरांस उत्तेजन देऊन, त्यांच्याकडून माल तयार करवावा व तो त्या सांप्रदायांतील सधन लोकांकडून विकत घेववावा. असें केल्यानेंही दुष्काळाचें निवारण होईल. आमच्या धर्मगुरूंना राष्ट्रीय ज्ञानाची दिशा

दाखवून, त्यांच्याकडून हीं महत्वाचीं कामें सुशिक्षित लोकांनीं व सरकारानें करवून घ्यावीत. ठिकठिकाणीं यांचे मठ असून, त्यांची प्राप्तिही एकंदरींत कमी नसते. हे साधुवृत्ति जन फक्त देवांची सेवा करण्यांतच भूषण मानीत असतात. त्यांच्यांत राष्ट्रभक्तीचा व भूतदयेचा चांगला प्रवेश झाल्यास, ह्या देशाच्या आपत्तीचें तात्कालिक निवारण होऊं शकेल. शेतकीचीं जनावरें व इतर साधनांचेंही संरक्षण या धार्मिक संस्थांकडून योग्य वेळीं होण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

सरकाराच्या व धनाढ्य लोकांच्या मदतीनें स्वदेशांत निरपेक्ष भांडवल उभें करून, त्यांतून निर्धन शेतकऱ्यांस, त्यांच्या उपयोगास लागणारे बैल व इतर साधन पुरवावें. तसेंच त्यांतून शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याचाही यत्न व्हावा. या भांडवलावर शेतकऱ्यांचाच हक्क असावा. दुष्काळ संपण्याच्या सुमारास या रकमेंतून अनाथ शेतकऱ्यांस, नवें धान्य उत्पन्न होईपर्यंत निर्वाहास लागणाऱ्या पैशाची व धान्याची उदारतेनें मदत द्यावी. शेतकऱ्यांवर संकटकाळाच्या कर्जाचा बोजा, सुकाळांत फेडण्यावर अवलंबून असतो, तो ही मदत निरपेक्ष असल्यामुळें पडणार नाहीं. सुकाळ येतांच शेतकरी या योगानें मोठ्या आनंदांत राहूं शकतील. पाऊस पडल्यावर दुष्काळनिवारणाचीं कामें, शेतें पुनः पिकून देशांत सुबत्ता होईपर्यंत चालू ठेवावीं. त्या दुष्काळपीडित लोकांस 'सरकार हें आपलें खरोखर मायबाप आहे व तेंच संकटकाळीं आपला बचाव करितें' असें मनापासून वाटेल तरच राष्ट्राचें खरें कल्याण होईल. सरकार, शेटसावकार, व्यापारी व इतर श्रीमंत लोक यांचा निर्वाह किंवा वैभव ह्या गरीब लोकांच्या परिश्रमावरच अवलंबून असतें, याकरितां ह्या दुष्काळाच्या दिवसांत या सधन वर्गांतील लोकांनीं, 'दुष्काळाचें हें संकट आपल्यावरच आलें आहे' असें मानून निर्धन लोकांस सुख देण्याचा यत्न करावा. दुष्काळाचें संकट निर्धन लोकांना पीडा न करील असे योग्य उपाय योजणें, हें देशांतील सधन लोक व सरकार यांचें मुख्य कर्तव्य आहे.

# विक्रीचीं पुस्तकें.

कि० ट० 
रु. आ.

## प्राकृत.

**नशीब आणि उद्योग**—पन्नास रुपये बक्षिसाची जाहिरात दिल्याप्रमाणें अठरा निबंधांपैकीं पसंत ठरलेला उद्योगप्रधान निबंध. ... ... ... ... ·।·॥ ८॥

**भाऊबंदांत कलह**—उत्पन्न होऊन विभक्तपणा होतो त्याचीं कारणें काय व तो न होण्याचे उपाय—पन्नास रुपये बक्षिसाची जाहिरात दिल्याप्रमाणें सर्व निबंधांत उत्तम ठरलेला निबंध.... ... ... ·।· ८-

**स्थलनामकोश**—( दक्षिणाप्राइझकमिटीकडून बक्षीस मिळालेला. ) यांत सर्व पृथ्वींतील ठळक ठळक शहरें, गांवें, नद्या, पर्वत, बंदरें, बेटें, इ० विल्हेवारीनें देऊन त्यांत कोणत्या ठिकाणीं कोणती प्रसिद्ध गोष्ट घडली, कोठें काय पदार्थ होतो, नद्यांची लांबी, अशी उपयुक्त माहिती दिली आहे. ह्याचीं पाकीटसाईजचीं ६७६ पृष्ठें झालीं आहेत. ·॥= ८-

---

# A LIFE

OF THE

LATE HON. MR. JUSTICE

# MAHADEO GOVIND RANADE.

## Price 4 Annas.

***Postage Half Anna.***

☞ हीं सर्व पुस्तकें मुंबईंत निर्णयसागर छापखान्यांत व्ही. पी. नें अथवा रोख पैसे पाठविले असतां मिळतील.